# सुलभ
# मराठी व्याकरण

संकलन लेखन
**सौ. सुलभा उमेश कोप्पीकर**

# *मनोगत*

*माझी नातवंडे, सलोख्व, स्नेहल व मिलाप, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत आहेत. मराठीचा अभ्यास करतांना ती मुले मला वारंवार शंका विचारीत असत. म्हणून त्यांच्यासाठी थोड्या प्रमाणात काहीतरी माहिती गोळा करावी असे वाटले. त्यांनी विचारले ल्या प्रश्नातूनच मला हे पुस्तक तयार करण्यास चालना मिळत गेली, आणि माझ्या हातून कळत नकळत हे पुस्तक तयार करण्याइतपत माहिती माझ्याकडे गोळा झाली.*

*सौ. कांती रेळेकर ह्या सेवानिवृत्त झालेल्या शिक्षिका असून अभ्यासू व प्रयोगशील आहेत. मराठी हा त्यांचा आवडता विषय. त्यानी आपल्या मराठीच्या अध्यापनाच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर मला वेळोवेळी मदत केली. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.*

*डॉ. सदा कऱ्हाडे, कै. सौ. निर्मला भिडे व माझा मुलगा डॉ. प्रवीण कोप्पीकर यानी ही मला योग्य मार्गदर्शन केले व बहुमोल अशा सूचनाही केल्या. त्यांची मी ऋणी आहे.*

*माझा दुसरा मुलगा डॉ. विवेक कोप्पीकर याने तर मला वेळोवेळी मनोधैर्य दिले. इतकेच नव्हे तर हे पुस्तक तयार करीत असताना त्यानेच जास्त मेहनत घेतलेली आहे. म्हणून माझ्या ह्या पुस्तकाचे श्रेय माझ्यापेक्षा त्यालाच अधिक आहे. वेळोवेळी त्याचीच प्रेरणा मला मिळत गेली म्हणूनच हे पुस्तक निर्माण करण्याचा संकल्प मी हाती घेतला. तर त्याचे आभार मी कोणत्या शब्दात मानू !*

*तसेच माझे पती श्री उमेश कोप्पीकर, धाकटा मुलगा आनंद व माझ्या सुना सौ. दीपा, सौ. शीला, सौ. सीमा व सौ शीतल पंडित यानी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या खूपच मदत केली. त्यांची मी अत्यंत ऋणी आहे.*

*मी हे पुस्तक तयार करण्यासाठी अनेकांच्या पुस्तकांची मदत घेतलेली आहे. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते. तसेच हे पुस्तक तयार होईपर्यंत ज्यांनी ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांचे मी आभार मानते.*

***धन्यवाद !***
***सौ. सुलभा कोप्पीकर***

# अनुक्रमणिका

## भाग (१) व्याकरण

### (१) मराठी शुद्धलेखनाचे नियम

(अ) अनुस्वार

(आ) ऱ्हस्व - दीर्घ अक्षरे

(इ) सामान्यरूप

(ई) इतर

### (२) शब्दांच्या जाती -

(१) विकारी शब्द

(२) अविकारी शब्द

### (१) विकारी शब्द -

(अ) नाम

(आ) सर्वनाम

(इ) विशेषण

(ई) क्रियापद

(अ) **विकारी** शब्दांच्या जाती - **नाम**

(अ) सामान्य नाम

(ब) विशेषनाम

(क) भाववाचक नाम

(आ) **विकारी** शब्दांच्या जाती - **सर्वनाम**

(अ) पुरुषवाचक सर्वनाम

(१) प्रथमपुरुष सर्वनाम

(२) द्वितीयपुरुष सर्वनाम

(३) तृतीयपुरुष सर्वनाम

(ब) दर्शक सर्वनाम

(क) संबंधी सर्वनाम

(ड) प्रश्नार्थक सर्वनाम

(ई) सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम

(फ) आत्मवाचक सर्वनाम

(इ) ***विकारी*** *शब्दांच्या जाती -* ***विशेषण***

***(अ) गुण विशेषण***

***(ब) संख्या विशेषण***

*(१) गणनावाचक संख्या विशेषण*

*(२) क्रमवाचक संख्या विशेषण*

*(३) आवृत्तीवाचक संख्या विशेषण*

***(क) सार्वनामिक विशेषण***

***(ड) धातुसाधित विशेषण***

*(१) नामापासून विशेषण*

*(२) विशेषणापासून भाववाचक नाम*

*(३) सामान्यनामापासून भाववाचक नाम*

(ई) ***विकारी*** *शब्दांच्या जाती -* ***क्रियापद***

*(अ) सकर्मक क्रियापद*

*(ब) अकर्मक क्रियापद*

*(क) संयुक्त क्रियापद*

*(ड) सहाय्यक क्रियापद*

*(ई) प्रयोजक क्रियापद*

*(फ) शक्य क्रियापद*

*(१) कर्ता*

*(२) कर्म*

*(३) प्रत्यक्ष कर्म व अप्रत्यक्ष कर्म*

*(४) विधानपूरक*

*(५)* ***क्रियापदाचे काळ***

*(अ) वर्तमानकाळ*

*(ब) भूतकाळ*

*(क) भविष्यकाळ*

***काळांचे उपप्रकार***

*अ)* ***वर्तमान काळ***

*१) साधा वर्तमानकाळ*

*२) चालू/अपूर्ण वर्तमानकाळ*

*३) पूर्ण वर्तमानकाळ*

*४) रीति वर्तमानकाळ*

*ब)* ***भूत काळ***

*१) साधा भूतकाळ*

*२) चालू/अपूर्ण भूतकाळ*

*३) पूर्ण भूतकाळ*

*४) रीति भूतकाळ*

*क)* ***भविष्य काळ***

*१) साधा भविष्यकाळ*

*२) चालू/अपूर्ण भविष्यकाळ*

*३) पूर्ण भविष्यकाळ*

*४) रीति भविष्यकाळ*

*(६)* ***क्रियापदांचा अर्थ***

*(अ) स्वार्थ*

*(ब) आज्ञार्थ*

*(क) विध्यर्थ*

*(ड) संकेतार्थ*

## *(२) अविकारी शब्द -*

*(उ) क्रियाविशेषण अव्यये*

*(ऊ) उभयान्वयी अव्यये*

*(ए) शब्दयोगी अव्यये*

*(ऐ) केवलप्रयोगी अव्यये*

*(उ)* *शब्दांच्या जाती -* ***क्रियाविशेषण अव्यये***

*(अ) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये*

*(ब) कालवाचक क्रियाविशेषण अव्यये*

*(ड) परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये*

*(क) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये*

*(ऊ)* *शब्दांच्या जाती -* ***उभयान्वयी अव्यये***

*(ए)* *शब्दांच्या जाती -* ***शब्दयोगी अव्यये***

*(ऐ)* *शब्दांच्या जाती -* ***केवलप्रयोगी अव्यये***

*(१) हर्षदर्शक* *(२) शोकदर्शक*

*(३) आश्चर्यदर्शक* *(४) विरोधदर्शक*

*(५) तिरस्कारदर्शक* *(६) प्रशंसादर्शक*

*(७) स्वीकारदर्शक* *(८) संबोधनदर्शक*

***(३) शब्द विचार***

***(३.१) शब्द विचार - लिंग विचार***

***(३.२) शब्द विचार - वचन विचार***

***(३.३) शब्द विचार - विभक्ती विचार***

- *विभक्तीचे प्रमुख कारकार्थ*

***(४) वाक्य***

***(४.१) वाक्यांचे प्रकार - १***

*(१) विधानार्थी वाक्य*

*(अ) होकारार्थी वाक्य*

*(ब) नकारार्थी वाक्य*

*(२) आज्ञार्थी वाक्य*

*(३) प्रश्नार्थक वाक्य*

*(४) उद्गारार्थी वाक्य*

***(४.१) वाक्यांचे प्रकार - २***

*अ) केवल वाक्य*

*ब) मिश्र वाक्य*

*क) संयुक्त वाक्य*

### (४.२) वाक्य परिवर्तनाचे प्रकार

### (४.३) वाक्याचे पृथक्करण

### (४.४) वाक्याचे प्रयोग

(१) कर्तरी प्रयोग

(अ) सकर्मक कर्तरी

(ब) अकर्मक कर्तरी

(२) कर्मणी प्रयोग

(३) भावे प्रयोग

(अ) अकर्मक भावे

(ब) सकर्मक भावे

### (५) वर्णविचार

(१) स्वर (२) स्वरादी (३) व्यंजने

### (६) संधी

(१) स्वरसंधी (२) व्यंजन संधी (३) विसर्ग संधी

### (७) समास

(१) अव्ययीभाव समास

(२) तत्पुरुष समास

(अ) विभक्ती तत्पुरुष समास

(आ) उपपद तत्पुरुष समास

(इ) कर्मधारय समास

(१) द्विगू समास

(२) मध्यमपद लोपी समास

(ई) नञ तत्पुरुष समास

(३) द्वंद्व समास

(अ) इतरेतर द्वंद्व

(ब) वैकल्पिक द्वंद्व

(क) समाहार द्वंद्व

**(४) बहुव्रिही समास**

(८) चिन्हे

(८.१) **विराम चिन्हे**

१) पूर्णविराम

२) अर्धविराम

३) स्वल्पविराम

४) अपूर्णविराम

(८.२) **अर्थदर्शक चिन्हे**

१) प्रश्नचिन्ह

२) उद्गारचिन्ह

३) अवतरणचिन्ह

४) संयोगचिन्ह

५) अपसारणचिन्ह

## भाग (२)

१) जोड शब्द व त्यांचे अर्थ

२) शब्द समूहाबद्दल एक शब्द

३) म्हणी व त्यांचे अर्थ

४) शून्यात परार्धे भरली आहेत

५) वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

६) विरुद्ध अर्थाचे शब्द

७) समान अर्थाचे शब्द

८) समूहदर्शक शब्द

९) नर-मादी-अपत्य

१०) पंचेद्रियांची करामत

११) प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण

१२) वैशिष्ट्ये

१३) अलंकारिक शब्दयोजना

१४) सारवट शब्द

१५) एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ

१७) परंपरागत उपमा

## प्रश्नसंग्रह

# भाग (१) व्याकरण

# (१) मराठी शुद्ध लेखनाचे नियम

# (१) मराठी शुद्ध लेखनाचे नियम

## अ) अनुस्वार

१) नाकापासून स्पष्टपणे उच्चार होणाऱ्या अक्षरावर नेहमी अनुस्वार द्यावा.
उदा. डोंगर, सतरंजी, धंदा, कुंभार, अंधार, पंचमी. इ.

२) नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्य रूपांवर अनुस्वार द्यावा.
उदा. लोकांना, मुलांकडून, मित्रांचे, घोड्यांसाठी, त्यांना इ.

३) आदरार्थी अनेकवचनी (बहुवचनी) नामांच्या सामान्य रूपांवर अनुस्वार द्यावा.
उदा, शिक्षकांनी, वडिलांनी, आजोबांनी, विवेकानंदांनी, रानडेंनी इ.

४) पुढील शब्दांवर अनुस्वार देऊ नये. जसे - का, की, केळे, करू, करताना, खेळू, घरात, घरी, जाऊ, तेथे, तेव्हा, जेथे, जेव्हा, झोप, नाव, नवे, पाच, बसू, माती, लाकूड, शाळेत. (कारण - या शब्दात अनुनासिकाचा स्पष्ट उच्चार होत नाही)

## आ) ऱ्हस्व - दीर्घ अक्षरे

१) इ - कारान्त आणि 'उ' - कारान्त शब्दातील शेवटचे अक्षर नेहमी दीर्घ लिहावे,उदा - मी, कवी, गुरू, बाहू जू, ऋषी, गती, वही, गहू पेरू, वाळू, शत्रू.

परंतु असे शब्द जोडशब्दात आल्यास हा शेवटचा ई कार व ऊ कार ऱ्हस्व होतात.

उदा - विद्यार्थिभांडार ऋषिकुमार, कविचरित्र, लघुकथा, शत्रुपक्ष इ.

**अपवाद** - अति, आणि, नि, परंतु, तथापि, अद्यापि, यद्यपि, प्रभृति, यथामति, यथाशक्ति, इति, ही अव्यये ऱ्हस्वातच लिहावी.

२) सामासिक शब्दातील पहिले पद ऱ्हस्व 'इ' कारान्त किंवा 'उ' कारान्त असल्यास ते ऱ्हस्वातच राहते. आणि ते पद दीर्घ 'ई' कारान्त किंवा 'ऊ' कारान्त तत्सम शब्द असल्यास ते दीर्घातच राहते.

उदा - कविचरित्र, गतिमान, गुरुवर्य, पशुपक्षी, युक्तिवाद, लघुकथा, वायुपुत्र, शक्तिमान, हरिनाम, गौरीहर, वधूवर इ.

३) अकारान्त शब्दातील उपान्त्य 'इ' कार किंवा 'उ' कार दीर्घ असतो.

उदा - ऊस, गूळ, चूल, नीळ, दूध, धीट, धूप, नीट, नवीन, पाऊस, पूल, फूल, बहीण, बक्षीस, माणूस, मीठ, मूल, म्हणून, विहीर, तीर, घूस, परीट, बुरूज, कापूस इ.

**अपवाद** - संस्कृतमधून मराठीत आलेल्या तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.

उदा - अरुण, कुसुम, गुण, तरुण, दक्षिण, पश्चिम, प्रिय, मधुर, मंदिर, युग, विष, शिव इ.

४) एकाक्षरी शब्द दीर्घ असावेत -

उदा - मी, तू, ती, ही, जी, ऊ, थू, धू, पी, पू, शी इ.

५) शब्दातील अन्त्य अक्षर दीर्घ असल्यास उपान्त्य अक्षर हे बहुधा ऱ्हस्व असते.

उदा - दिवा, जुनी, किती, मुळा, महिना, वकिली, गरिबी, गुरुजी, माहिती, सुरू, हुतुतू इ.

**अपवाद** - संस्कृत मधून मराठीत आलेल्या तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही. उदा - परीक्षा, प्रतीक्षा, गीता, पूजा इ.

६) *शब्दाच्या शेवटी 'इक' प्रत्यय आल्यास 'क' पूर्वीचा 'इ' कार 'उ' कार ऱ्हस्व लिहावा.*

*उदा. - ऐतिहासिक, कौटुंबिक, धनिक, यांत्रिक, लौकिक, वार्षिक, शारीरिक, सार्वजनिक, साप्ताहिक, नैतिक, पौराणिक, बौद्धिक, भाविक, भौगोलिक, मानसिक इ.*

७) *हळूहळू , लुटूलुटू , मुळूमुळू , दुडूदुडू अशा प्रकारच्या शब्दातील दुसरे व चौथे अक्षर दीर्घ असते.*

८) *गावाच्या नावात शेवटी 'पूर' ही अक्षरे असल्यास त्यातील 'पू' नेहमी दीर्घ लिहावे.*

*उदा. नागपूर बिजापूर इ.*

## इ) सामान्यरूप

१) *ऱ्हस्व 'इ' कारान्त व 'उ' कारान्त तत्सम शब्दाचे सामान्यरूप करताना त्या शब्दातील अंत्यस्वर दीर्घ होतो.*

*उदा. - रवि - रवीचे, प्रभु - प्रभूला इ.*

२) *मराठी शब्दाचे उपान्त्य अक्षर (दीर्घ) ई किंवा ऊ याने युक्त असल्यास शब्दाचे सामान्यरूप होताना ते उपान्त्य अक्षर ऱ्हस्व होते.*

*उदा. - वीट - विटेने, मूठ - मुठीत, बहीण - बहिणीला, रायपूर - रायपुरात इ.*

***अपवाद*** *- संस्कृतमधून मराठीत आलेल्या अशाप्रकारच्या तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.*

*उदा. - सीता - सीतेला, पूर्व - पूर्वेकडे, परीक्षा - परीक्षेसाठी, पूजा - पूजेकरिता इ.*

## ई) इतर

१) *कोणता, एखादा हे शब्द कोणचा व एकादा असे लिहू नये.*

२) *'ए' कारान्त नामाचे सामान्यरूप 'या' कारान्त करावे.*

*उदा. - फडके - फडक्यांना, रस्ते - रस्त्यांना, हसणे - हसण्यासाठी, आंबा - आंब्याना, लिहीणे - लिहिण्यासाठी.*

३) *धातूला 'ऊन' व 'ऊ' प्रत्यय लागताना मूळ धातूत शेवटी 'व' असल्यास त्यावेळी 'वून' व 'वू' किंवा 'ऊन', 'ऊ' अशी रूपे होतात.*

*उदा - धाव - धावून, धावू, जेव - जेवून, जेवू, जा - जाऊन, जाऊ, इ.*

४) *राहणे, पाहणे, वाहणे हे शब्द असेच लिहावेत. या शब्दांची रहाणे, पहाणे, वहाणे, ही चुकीची रूपे असल्याने ही लिहू नयेत.*

५) *मराठीत रुढ झालेले तत्सम व्यंजनांत शब्द 'अ' कारान्त लिहावेत. त्यातील शेवटच्या अक्षराचा (संस्कृतातल्याप्रमाणे) पाय मोडू नये.*

*उदा - अर्थात, क्वचित, पश्चात, विद्युत, साक्षात, कदाचित, भगवान, विद्वान, तस्मात इ.*

६) *लिहिताना एखाद्या माणसाच्या तोंडचे शब्द त्याच्या मूळ उच्चारा प्रमाणे जसेच्या तसे लिहावेत.*

*उदा. - ''मला असं वाटतं की मिलापचं चित्र बरोबर असावं''*

***काही शुद्ध शब्द*** -

*अधिक, अधीन, अधीर, अनिल, इच्छा, इयत्ता, ईर्षा, ईश, ईश्वर, उद्योग, उज्ज्वल, उष्ण, उत्कृष्ट, उर्फ, एरवादा, एकूण, कर्तृत्व, कीर्ती.*

*क्रीडा, खड्ग, गृहस्थ, जीवन, ज्येष्ठ, द्वितीया, तृतीया.*

*निःस्पृह, परामर्ष, पृष्ठ, पृथ्वी, बृहस्पती, मातुःश्री, महत्त्व.*

*मुत्सद्दी, लक्ष्मण, वक्तृत्व, वृक्ष, सत्त्व, क्षत्रिय, ज्ञानेश्वर.*

***स्वाध्याय*** *- पुढील शब्द शुद्ध करून लिहा - आकर्शण, उंदिर, खुण, हिन, चिरंजिव, दिव्याकार, दिपक, फुल, भिक, विहिर.*

# (२) शब्दांच्या जाती

# शब्दांच्या जाती

- **विकारी**
  - **नाम**
    - सामान्य नाम
    - विशेष नाम
    - भाववाचक नाम
  - **सर्वनाम**
    - पुरुषवाचक सर्वनाम
    - दर्शक सर्वनाम
    - संबंधी सर्वनाम
    - सामान्य सर्वनाम
    - आत्मवाचक सर्वनाम
  - विशेषण
    - गुणवाचक विशेषण
    - संख्यावाचक विशेषण
    - धातुसाधित विशेषण
    - सार्वनामिक विशेषण
    - अधि/विधि-विशेषण
  - **क्रियापद**
    - **मुख्य दोन**
      - सकर्मक क्रियापद
      - अकर्मक क्रियापद
    - **त्याशिवाय क्रियापद**
      - शक्य क्रियापद
      - प्रयोजक क्रियापद
      - संयुक्त व सहाय्यक क्रियापद
- **अविकारी**
  - **क्रियाविशेषण अव्यय**
    - कालवाचक क्रियाविशेषण
    - स्थळवाचक क्रियाविशेषण
    - रीतिवाचक क्रियाविशेषण
    - संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण
  - **शब्दयोगी अव्यय**
  - **उभयान्वयी अव्यय**
  - **उद्गारवाचक अव्यय किंवा केवलप्रयोगी अव्यय**

# *(२) शब्दांच्या जाती*

*शब्दांच्या मुख्य जाती - शब्दांच्या मुख्यतः दोन जाती असतात.*

***१) विकारी शब्द*** ***२) अविकारी शब्द***

१) ***विकारी शब्द -*** *जे शब्द वाक्यात उपयोगात येताना त्यांच्या रुपात बहुधा कोणत्या तरी प्रकारचा बदल होतो. त्यांना विकारी शब्द असे म्हणतात.*

*उदा - मनुष्य, ती, हसला इ.*

२) ***अविकारी शब्द -*** *ज्या शब्दांचा वाक्यात केव्हाही, कोणत्याही प्रकारचा बदल न होता उपयोग होतो, त्याना अविकारी शब्द म्हणतात.*

*उदा - हळू, तर, परंतु, इ.*

*शब्दांची कार्ये आठ आहेत. म्हणजेच, शब्दांच्या जाती (कार्ये) आठ आहेत.*

*१) नाम*
*२) सर्वनाम*
*३) विशेषण*
*४) क्रियापद*
*५) क्रियाविशेषण अव्यय*
*६) शब्दयोगी अव्यय*
*७) उभयान्वयी अव्यय*
*८) केवलप्रयोगी अव्यय*

*यापैकी पहिल्या चार जाती विकारी शब्दांच्या असून पुढच्या चार अविकारी शब्दांच्या जाती आहेत.*

***विकारी शब्दांच्या जाती*** *- अ) नाम आ) सर्वनाम इ) विशेषण ई) क्रियापद*

# *विकारी शब्दांच्या जाती*

## *अ) शब्दांच्या जाती - नाम*

*नामे - नाम म्हणजे कोणत्याही वस्तूला दिलेले नाव.*

*नामांचे मुख्य प्रकार तीन - अ) सामान्य नाम ब) विशेषनाम क) भाववाचकनाम*

***विशेष सूचना** : - नामाचे पाच प्रकार.*

***अ) विशेषनाम, ब) भाववाचकनाम, क) समूहवाचक नाम, ड) पदार्थवाचक नाम किंवा द्रववाचक नाम, ई) सामान्यनाम***

*अ) **सामान्य नाम** - जे नाम एकाच जातीच्या अनेक वस्तूंना लागू पडते, ते सामान्यनाम*
*उदा. - पर्वत, मुलगी, घर, शाळा, फळ, फूल, गाय, घोडा, टेबल, खुर्ची इ.*

*ब) **विशेषनाम** - जे नाम एकाच जातीच्या विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध करून देते, ते विशेषनाम.*
*उदा. - सलोख, स्नेहल, हिमालय, गंगा, कपिला इ.*

*क) **भाववाचक नाम** - ज्या नामामुळे, प्राण्यामधील किंवा पदार्थामधील गुणांचा, भावाचा किंवा धर्माचा बोध होतो, ते भाववाचक नाम.*
*उदा. - प्रामाणिकपणा, गोडी, धूर्तपणा, शौर्य, निर्भयता, कारुण्य इ.*

***स्वाध्याय** - पुढील वाक्यातील नामे शोधा व लिहा -*

*१) सलोख, पुस्तक आण,*
*२) शेतकरी जमीन नांगरतात.*
*३) या झाडाची फळे गोड आहेत.*
*४) स्नेहलच्या बोलण्यात गोडी आहे.*

# *विकारी शब्दांच्या जाती*

## *आ) शब्दांच्या जाती - सर्वनाम*

***सर्वनामे*** *- स्वतःचा असा काही विशेष अर्थ नसून सर्व नामांच्या बद्दल उपयोगात येणारा जो विकारी शब्द त्यास सर्वनाम असे म्हणतात.*

*सर्वनामाचे **अर्थदृष्टया प्रकार सहा आहेत** -*

***(अ)** पुरुषवाचक सर्वनाम **(ब)** दर्शक सर्वनाम **(क)** संबंधी सर्वनाम*

***(ड)** प्रश्नार्थक सर्वनाम **(इ)** सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम **(फ)** आत्मवाचक सर्वनाम.*

*मराठीत एकंदर सर्वनामे नऊच आहेत -*

*मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, आपण, स्वतः*

***अ) पुरुष वाचक सर्वनाम** - तीन प्रकार आहेत.*

*१) प्रथम पुरूषवाचक सर्वनाम*

*२) द्वितीय पुरूषवाचक सर्वनाम*

*३) तृतीय पुरूषवाचक सर्वनाम.*

*१) **प्रथम पुरूषवाचक सर्वनाम** - बोलणाऱ्या व्यक्तीने स्वतःविषयी वापरलेली सर्वनामे*

*उदा. - मी, आम्ही, आपण, स्वतः व त्यांची विभक्ती प्रत्यये.*

*२) **द्वितीय पुरूषवाचक सर्वनाम** - बोलणारी व्यक्ती ज्यांच्याशी बोलते, त्यांच्या विषयी वापरलेली सर्वनामे.*

*उदा. - तू, तुम्ही, आपण, स्वतः व त्यांची विभक्ती प्रत्यये.*

*३) **तृतीय पुरूषवाचक सर्वनाम** - बोलणारी व्यक्ती ज्यांच्या विषयी बोलते त्यांच्या विषयी वापरलेली सर्वनामे.*

*उदा. - तो, ती, ते, त्या, ती व त्यांची विभक्ती प्रत्यये.*

***ब) दर्शक सर्वनाम** - विशेषतः वस्तू जवळ असल्यास लिंग भेदाप्रमाणे 'हा, ही, हे, ह्या,' ही सर्वनामे वापरतो. पण वस्तू दूर असल्यास 'तो, ती, ते, त्या,' ही सर्वनामे वापरतो. ही सर्वनामे वापरताना आपण ते पदार्थ दर्शवितो किंवा दाखवितो म्हणून त्याना दर्शक सर्वनामे असे म्हणतात.*

***क) संबंधी सर्वनामे** - 'जो, जी, जे, ज्या,' ह्या सर्वनामांचा संबंध त्याच वाक्यात पुढे येणाऱ्या 'तो, ती, ते, त्या,' या दर्शक **सर्वनामाशी** असतो. म्हणून 'जो, जी, जे, ज्या' या सर्वनामांना संबंधी सर्वनामे असे म्हणतात.*

*उदा - १) जो अभ्यास करतो तो परीक्षेत पास होतो.*

*२) जे चकाकते ते सारे सोने नसते.*

*३) जी कविता लिहिते ती कवयित्री होते.*

***ड) प्रश्नार्थक सर्वनाम** - वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी वापरलेली सर्वनामे. कोण, काय, कोणास, कोणाचा, कोणी यामुळे प्रश्न विचारता येतो. म्हणून ही प्रश्नार्थक सर्वनामे होय.*

*उदा - डब्यात काय आहे ? दरवाजात कोण आहे ? हे काम कोणी केले ? हे पुस्तक कोणाचे आहे ? वही कोणास देणार आहेस ?*

***ई) सामान्य किंवा अनिश्चित सर्वनाम -*** *प्रश्नार्थक वाक्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी वापरलेली कोण, कोणास, काय ही सर्वनामे कोणत्या नामाबद्दल वापरलेली आहेत हे निश्चित सांगता येत नाही. म्हणून अशा 'कोण व काय' या सर्वनामांना अनिश्चित किंवा सामान्य सर्वनामे म्हणतात.*

*उदा - मिलापच्या पिशवीत काय आहे ते पाहूया. तुम्ही कोणताही प्रश्न विचारा, स्नेहलचे उत्तर तयार असते. आंबा कोणी खाल्ला ते माहीत नाही.*

***फ) आत्मवाचक सर्वनाम -*** *स्वतः व आपण ही सर्वनामे.*

*उदा. - मी स्वतः अभ्यास करणार. स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग मिळत नाही. आपले काम आपणच करावे. तुम्ही स्वतः चहा घ्या. त्यानी स्वतः मिलापला बोलावले. तुम्ही आपल्या घरी जा. त्यानी आपले पुस्तक बदलले आहे.*

*'आपण' ह्या सर्वनामाचा प्रथम पुरुषवाचक व द्वितीय पुरुषवाचक याप्रमाणे उपयोग करणे व आत्मवाचक याप्रमाणे उपयोग करणे यात फरक आहे. जेव्हा ते 'आम्ही किंवा तुम्ही' या अर्थाने येते, तेव्हा ते अनुक्रमे प्रथम व द्वितीय पुरुषवाचक असते. व 'स्वतः' या अर्थी येते तेव्हा ते आत्मवाचक असते.*

***पुरुषवाचक 'आपण' व आत्मवाचक' आपण' यातील फरक***

| ***पुरुषवाचक आपण*** | ***आत्मवाचक आपण*** |
|---|---|
| *१) प्रथम व द्वितीय पुरुषीच येते,* | *१) सर्व पुरुषी येते.* |
| *२) आदरार्थी अनेकवचनी येते,* | *२) दोन्ही वचनी येते.* |
| *३) तुम्ही व आम्ही याच अर्थी येते,* | *३) स्वतः याच अर्थी येते.* |
| *४) कर्ता, कर्म होऊ शकते,* | *४) कर्ता, कर्म कधी ही होऊ शकत नाही.* |

***स्वाध्याय :*** *खालील वाक्यातील ठळक शब्द नामे आहेत की सर्वनामे आहेत ते सांगा :*

*१) गमतीदार **पोशाख** केलेला एक **माणूस** रिंगणात आला. **तो** फार ठेंगणा होता.*

*२) नंतर काही **हत्ती** रिंगणात आले. **ते** वर्तुळाकार फिरू लागले.*

# *विकारी शब्दांच्या जाती*

## *इ) शब्दांच्या जाती - विशेषण*

***विशेषण** - नामाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द. म्हणजे नामांचा कोणत्या तरी प्रकारचा गुण किंवा वैशिष्टय दाखविणारा जो विकारी शब्द त्याला विशेषण म्हणतात. विशेषणे ही कशाचीही नावे नसतात. विशेषणे एकाकी कधीच येऊ शकत नाहीत. कधी कधी नाम नसताना विशेषण एकाकी येते. तेव्हा तेच नाम होते. विशेषण हे नामाला जोडून नामाच्या आधी येते.*

*उदा - गरिबास श्रीमंत व्हावेसे वाटते. येथे गरीब हा शब्द नामाप्रमाणे उपयोगात आलेला आहे. म्हणून ते विशेषण नसून नामच आहे.*

***विशेषणे चार प्रकारची असतात.***

*अ) गुणवाचक विशेषण ब) संख्यावाचक विशेषण*

*क) सार्वनामिक विशेषण ड) धातुसाधित विशेषण.*

*(टीप -*

*अधि-विशेषण / विधि-विशेषण*

*मराठी वाक्यामध्ये पुष्कळ वेळा विशेषण नामाच्या पुर्वी येते. ह्या वाक्याच्या पूर्वी येणाऱ्या विशेषणास नुसते विशेषण किंवा अधि-विशेषण म्हणतात. पण नामाचे नंतर विधेयाची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या विशेषणास विधि-विशेषण म्हणतात.*

*उदा - (१) ''पण मुलगी हुशार आहे'' येथे 'हुशार' हे विधि-विशेषण आहे - विशेषणावर विशेष जोर देण्याची आवश्यकता असल्यास विशेषणे नामाच्या नंतर येतात. (२) ''हुशार मुलगी लक्ष देउन अभ्यास करते'' येथे 'हुशार' हे अधि-विशेषण आहे)*

*अ) गुणवाचक विशेषण - नामांचे गुण किंवा विशेष दाखविणाऱ्या अशा विशेषणांना 'गुणवाचक विशेषणे' म्हणतात.*

*उदा. - चांगला मुलगा, पांढरी टोपी, कडू कारले, पिवळी केळी.*

*चांगला, पांढरी, कडू, पिवळी ही विशेषणे त्यांच्या पुढे येणारी नामे कशा प्रकारची आहेत हे सांगतात.*

*ब) संख्यावाचक विशेषण - ही विशेषणे नामाची संख्या दर्शवितात.*

*त्यात तीन प्रकार आहेत.*

*१) गणनावाचक संख्या विशेषण*

*२) क्रमवाचक संख्या विशेषण*

*३) आवृत्तीवाचक संख्या विशेषण.*

*१) गणनावाचक संख्या विशेषण - काही गणनावाचक संख्या विशेषणे निश्चित संख्या, अनिश्चित संख्या किंवा **परिमाणही** दाखवितात.*

*उदा. - वीस मुले, पंचवीस पुस्तके, दहा फळे, पाच पाने. यात वीस, पंचवीस, दहा, पाच ही निश्चित संख्या होय.*

*काही मुले, थोडे तांदूळ, पुष्कळ मुंग्या, यात काही, थोडी, पुष्कळ ही अनिश्चित संख्या होय.*

२) **क्रमवाचक संख्या विशेषण -** यात वस्तूंचा क्रम दाखविला जातो.

उदा. - पहिला क्रमांक, चौथा मुलगा, आठवा बाक. यात पहिला, चौथा, आठवा ही क्रमवाचक संख्या विशेषण होय.

३) **आवृत्तीवाचक संख्या विशेषण -** यात संख्येची किती आवृत्ती झाली हे कळते.

उदा. - दुप्पट मोठा, तिप्पट उंची, दसपट पुस्तके. यात दुप्पट, तिप्पट, दसपट ही आवृत्तीवाचक संख्या विशेषणे होय.

**संख्यावाचक विशेषण उदा.**

| अंक | गणनावाचक | क्रमवाचक | आवृत्तीवाचक |
|---|---|---|---|
| १ | एक | पहिला | एकपट |
| २ | दोन | दुसरा | दुप्पट |
| ३ | तीन | तिसरा | तिप्पट |
| ४ | चार | चौथा | चौपट |
| ५ | पाच | पाचवा | पाचपट इ. |

क) **सार्वनामिक विशेषण -** सर्वनामापुढे त्याची नामे लगेच आलेली असतात. अशी ही सर्वनामे विशेषणे होतात. सर्वनामापासून बनलेल्या अशा विशेषणांना सार्वनामिक विशेषणे म्हणतात.

टीप - हा कागद, ते फळ, ती चिमणी, - हा, ते, ती, ही सर्वनामे वाटतील, परंतु ती या ठिकाणी कागद, फळ, चिमणी या नामांची विशेषणे म्हणून आलेली आहेत. सर्वनाम नामाबद्दल वापरतात. इथे ती नामाबरोबर आहेत हे ध्यानात ध्यावे.

उदा. - माझे घर, तुझी शाळा, त्यांचे मित्र, येथे माझे, तुझी, त्यांचे ही सार्वनामिक विशेषणे होय.

ड) **धातुसाधित विशेषण -** धातू पासून कृदंत रुपे बनतात. काही कृदंत रुपांचा वाक्यात विशेषणासारखा उपयोग होतो. त्याना धातूसाधित विशेषणे म्हणतात.

उदा - त्याचा चेहरा बोलका वाटतो. (बोलणे) आम्ही सिंहगडला चालत चालत गेलो. (चालणे). कोकिळा गात आहे. (गाणे) बोलका, चालत, गात ही धातुसाधित विशेषणे होय.

टीप - कृदंत - धातुपासून तयार झालेले रुप, यालाच कृदंत म्हणतात. गा धातूपासून गाणे, गान, गाता, गाताना, गाऊ, गाऊन, गाणारा अशी कृदंत रुपे तयार होतात.

## १) नामापासून विशेषणे :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) आनंद | - | आनंदी | २) इतिहास | - | ऐतिहासिक |
| ३) इच्छा | - | इच्छित, ऐच्छिक | ४) उपयोग | - | उपयोगी |
| ५) उत्साह | - | उत्साही | ६) ऐट | - | ऐटबाज, ऐटदार |
| ७) केस | - | केसाळ | ८) कागद | - | कागदी |
| ९) कुटुंब | - | कौटुंबिक | १०) खर्च | - | खर्चिक |
| ११) गर्व | - | गर्विष्ट | १२) गुण | - | गुणवान |
| १३) चव | - | चविष्ट | १४) चैन | - | चैनी |
| १५) जल | - | जलमय | १६) जग | - | जागतिक |
| १७) जोर | - | जोरदार | १८) डोंगर | - | डोंगराळ |
| १९) तऱ्हा | - | तऱ्हेवाईक | २०) तोंड | - | तोंडाळ |
| २१) दया | - | दयावंत | २२) दगड | - | दगडी |
| २३) दुःख | - | दुःखी | २४) दोष | - | दोषी |
| २५) धूर | - | धुरकट | २६) धर्म | - | धार्मिक |
| २७) निसर्ग | - | नैसर्गिक | २८) प्रकाश | - | प्रकाशित |
| २९) पराक्रम | - | पराक्रमी | ३०) पद्धत | - | पद्धतशीर |
| ३१) पुस्तक | - | पुस्तकी | ३२) बहुमत | - | बहुमतवादी |
| ३३) बंड | - | बंडखोर | ३४) बुद्धी | - | बुद्धिमान, बौद्धिक |
| ३५) भारत | - | भारतीय | ३६) भीती | - | भीतीदायक |
| ३७) मजा | - | मजेशीर | ३८) मानव | - | मानवी |
| ३९) यंत्र | - | यांत्रिक | ४०) यश | - | यशस्वी |
| ४१) रंग | - | रंगीत | ४२) राग | - | रागीट |
| ४३) राष्ट्र | - | राष्ट्रीय | ४४) लोखंड | - | लोखंडी |
| ४५) लाज | - | लाजाळू | ४६) लाकूड | - | लाकडी |
| ४७) वजन | - | वजनी | ४८) वाळवंट | - | वाळवंटी |
| ४९) व्यवहार | - | व्यवहारी | ५०) वर्ष | - | वार्षिक |
| ५१) व्यापार | - | व्यापारी | ५२) विनय | - | विनयी, विनयशील |
| ५३) शहर | - | शहरी | ५४) शक्ती | - | शक्तिमान |
| ५५) शास्त्र | - | शास्त्रीय | ५६) शाकाहार | - | शाकाहारी |
| ५७) शौर्य | - | शौर्यशाली | ५८) शिक्षण | - | शैक्षणिक |
| ५९) सरकार | - | सरकारी | ६०) समाज | - | सामाजिक |
| ६१) सर्वांग | - | सर्वांगीण | ६२) सागर | - | सागरी |
| ६३) सुख | - | सुखी | ६४) सूत | - | सुती |
| ६५) सुगंध | - | सुगंधी | ६६) हवा | - | हवाई |
| ६७) हास्य | - | हास्यास्पद | ६८) हौस | - | हौशी |
| ६९) ज्ञान | - | ज्ञानी | | | |

***स्वाध्याय*** *- पुढील वाक्यातून विशेषणे शोधा व लिहा :-*

***अ)***

*१) त्याने तीन गोळ्या झाडल्या.*

*२) मेहनती शेतकरी खूप पिके काढतात.*

*३) एकचाकी सायकली घेऊन काही मुली आल्या.*

***ब)*** *पुढील शब्दापासून विशेषणे बनवा - भूगोल, मानस, विज्ञान, स्वर्ग, सप्ताह, तर्क, दीन, प्रभू.*

## २) शब्दापासून भाववाचक नामे -

विशेषणांना ई, य, ता, त्व, पण, पणा, गिरी ही प्रत्यये लागून भाववाचक नामे तयार होतात.

| | | | |
|---|---|---|---|
| १) अनुकूल | - अनुकूलता | २) अपूर्व | - अपूर्वाई |
| ३) आवश्यक | - आवश्यकता | ४) उत्सुक | - उत्सुकता |
| ५) उंच | - उंची | ६) उदास | - औदासीन्य, औदास्य |
| ७) उदार | - उदारपणा, औदार्य | ८) उष्ण | - उष्णता |
| ९) कणखर | - कणखरपणा | १०) करुण | - कारुण्य |
| ११) कुशल | - कौशल्य | १२) कोमल | - कोमलता |
| १३) खंबीर | - खंबीरपणा | १४) खिन्न | - खिन्नता |
| १५) खोल | - खोली | १६) गुन्हेगार | - गुन्हेगारी |
| १७) गुलाम | - गुलामगिरी | १८) गोड | - गोडी, गोडवा |
| १९) गरीब | - गरिबी | २०) गोंडस | - गोंडसपणा |
| २१) चपळ | - चपळाई | २२) चतुर | - चातुर्य, चतुरपणा |
| २३) चांगला | - चांगुलपणा | २४) जाड | - जाडी |
| २५) जुना | - जुनेपणा | २६) तृप्त | - तृप्ती |
| २७) तीव्र | - तीव्रता | २८) थंड | - थंडी |
| २९) दयाळू | - दयाळूपणा | ३०) दीन | - दैन्य |
| ३१) दुर्बल | - दौर्बल्य | ३२) देव | - देवत्व, देवपण |
| ३३) धीट | - धिटाई, धीटपण | ३४) नम्र | - नम्रता |
| ३५) नवीन | - नाविन्य | ३६) निळसर | - निळसरपणा |
| ३७) निपुण | - नैपुण्य | ३८) निर्भय | - निर्भयता |
| ३९) प्रमुख | - प्रामुख्य | ४०) प्रसिद्ध | - प्रसिद्धी |
| ४१) प्रवित्र | - पावित्र्य | ४२) प्रतिकूल | - प्रतिकूलता |
| ४३) प्रवीण | - प्राविण्य | ४४) पौष्टिक | - पौष्टिकता |
| ४५) बहादूर | - बहादुरी | ४६) भव्य | - भव्यता |
| ४७) भागीदार | - भागीदारी | ४८) भीषण | - भीषणता |
| ४९) मऊ | - मऊपणा | ५०) मंगल | - मांगल्य |
| ५१) मालक | - मालकी | ५२) माणूस | - माणूसकी |
| ५३) मित्र | - मैत्री, मित्रत्व | ५४) म्हातारा | - म्हातारपण |
| ५५) मूर्ख | - मूर्खपणा | ५६) मोठा | - मोठेपणा |
| ५७) योग्य | - योग्यता | ५८) लायक | - लायकी |
| ५९) लहान | - लहानपण, लहानपणा | ६०) लुच्चा | - लुच्चेगिरी |
| ६१) रुंद | - रुंदी | ६२) वृद्ध | - वार्धक्य |
| ६३) विविध | - विविधता | ६४) विशिष्ट | - वैशिष्ट्य |
| ६५) शहाणा | - शहाणपण, शहाणपणा | ६६) श्रीमंत | - श्रीमंती |
| ६७) शूर | - शौर्य | ६८) श्रेष्ठ | - श्रेष्ठत्व, श्रेष्ठता |
| ६९) सजीव | - सजीवता | ७०) शांत | - शांतता |
| ७१) शत्रू | - शत्रुत्व | ७२) संपन्न | - संपन्नता |
| ७३) समृद्ध | - समृद्धता | ७४) सपाट | - सपाटी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७५) स्वच्छ | - | स्वच्छता | ७६) स्वतंत्र | - | स्वातंत्र्य |
| ७७) स्तब्ध | - | स्तब्धता | ७८) सुंदर | - | सौंदर्य |
| ७९) संथ | - | संथपणा | | | |

**१) स्वाध्याय**

१) पुढील शब्दापासून विशेषणे बनवा - हुशार, दास, पुरोहित.

२) नामे व विशेषणे यांच्या जोड्या लावा.
विशेषणे - मऊ, ताजे, गरीब, कडक, सुंदर, असह्य, काळी, लोखंडी.
नामे - अन्न, पहारा, जमीन, फूल, बिछाने, तिजोरी, लोक, बोजा.

३) पुढील शब्दापासून भाववाचन नामे बनवा :-
मऊ, खोल, गोड, निर्भय, उदार, अपूर्व, दुर्बल.

## ३) सामान्य नामापासून भाववाचक नामे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) वकील | - | वकिली | २) देव | - | देवपण |
| ३) गुलाम | - | गुलामगिरी | ४) पाटील | - | पाटीलकी |
| ५) मित्र | - | मित्रत्व, मित्रता | ६) मानव | - | मानवता |
| ७) मनुष्य | - | मनुष्यपण | ८) शिपाई | - | शिपाईगिरी |

# *विकारी शब्दांच्या जाती*

## *ई) शब्दांच्या जाती - क्रियापद*

***क्रियापद*** *- क्रियावाचक शब्दाने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो. क्रियेचा काळ आणि विशेष अर्थ यांचा पूर्ण बोध होतो. तसेच ह्या क्रियावाचक शब्दामुळे वाक्ये पुरी होतात. म्हणून ह्या विकारी शब्दास क्रियापद असे म्हणतात.*

***क्रियापदाचे एकूण सहा प्रकार आहेत -***

| | |
|---|---|
| ***(अ) सकर्मक क्रियापद*** | ***(ब) अकर्मक क्रियापद*** |
| ***(क) संयुक्त क्रियापद*** | ***(ड) सहाय्यक क्रियापद*** |
| ***(ई) प्रयोजक क्रियापद*** | ***(फ) शक्य क्रियापद*** |

***(अ) सकर्मक क्रियापद*** *- ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरूरी असते, त्यास सकर्मक क्रियापद म्हणतात.*

*उदा - रामू भाजी विकतो - विकणारा कोण ? रामू. म्हणून रामू हा कर्ता. विकण्याची क्रिया कोणावर घडते ? भाजी या शब्दावर, म्हणून भाजी हे कर्म. रामू विकतो या वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. त्याला पूर्ण होण्यास 'भाजी' या कर्माची जरूरी आहे. म्हणून 'विकतो' हे सकर्मक क्रियापद आहे.*

*उदा - १) मिलाप चित्र काढतो. २) सलोख अभ्यास करतो. ३) स्नेहल कविता रचते. वरील तीन वाक्यात अनुक्रमे चित्र, अभ्यास, कविता ही कर्मे असल्याने काढतो, करतो व रचते ही सकर्मक क्रियापदे होय.*

***ब) अकर्मक क्रियापद*** *- ज्या क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरूरी नसते, त्यास अकर्मक क्रियापद म्हणतात.*

*उदा - १) कावळा ओरडतो. २) नेहा झोपते. ३) स्नेहा खेळते.*

*वरील वाक्यात ओरडतो कोण ? कावळा. म्हणून कावळा कर्ता. कर्म नाही.*

*झोपते कोण ? नेहा. म्हणून नेहा कर्ता. कर्म नाही व*

*खेळते कोण ? स्नेहा, म्हणून स्नेहा कर्ता, कर्म नाही.*

*वरील वाक्यातील ओरडतो, झोपते, खेळते ही अकर्मक क्रियापदे आहेत. यातील ओरडण्याची, झोपण्याची व खेळण्याची क्रिया दुसऱ्या कोणावरही घडत नाही. या क्रियापदाना कर्माची जरुरी नसते. म्हणून या क्रियापदांना अकर्मक क्रियापदे म्हणतात.*

***(क) संयुक्त क्रियापद व (ड) सहायक क्रियापद*** *- कधी कधी क्रियेचा अर्थ पूर्ण करण्यासाठी मुख्य क्रिया दर्शविणाऱ्या रुपाला जोडून दुसऱ्या क्रियापदाचा उपयोग करावा लागतो. या दोन्ही क्रियापदांच्या संयोगाने जे क्रियापद तयार होते त्याला संयुक्त क्रियापद म्हणतात. तसेच त्या मुख्य क्रिया दर्शविणाऱ्या रुपाला जोडून जे दुसरे क्रियापद येते, त्याला सहायक क्रियापद किंवा सहायकारी क्रियापद म्हणतात.*

*मुख्य क्रिया दर्शविणारे रूप + सहायक क्रियापद = संयुक्त क्रियापद*

*उदा.- कावळा झाडावर ओरडत आहे. या वाक्यात 'ओरडत' या धातुसाधिताला 'आहे' या क्रियापदाने सहाय केले आहे. पण ह्या संयुक्त क्रियापदाने एकाच क्रियेचा बोध झाला पाहिजे.*

***कृदंत*** *- मुख्य धातूचे रूप अपूर्ण - क्रिया दर्शक म्हणजे धातुसाधित असून सहायक धातूचे रूप मात्र पूर्ण क्रियादर्शक म्हणजे क्रियापद असते. व या दोन्हीमुळे संयुक्त क्रियापद होते.*

*उदा.- नेहा गात आहे. ह्या वाक्यात 'गात' हे क्रियापद नव्हे, 'गा' या धातूला 'त' हा*

*प्रत्यय लागून 'गात' असा क्रियावाचक शब्द तयार झालेला आहे, पण या 'गात' शब्दाने वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. म्हणून हा शब्द क्रियापद नाही. धातूला प्रत्यय लागून क्रिया अपुरी दाखविणाऱ्या शब्दाला 'धातुसाधित' किंवा 'कृदंत' म्हणतात.*

*'गा' या धातूपासून गात, गाताना, गाता, गाऊ, गाणारा ही धातुसाधित रुपे तयार होतात.*

*ई) **प्रयोजक क्रियापद -** जेव्हा कोणीतरी एखादी क्रिया दुसऱ्याकडून करवितो, तेव्हा ती क्रिया दाखविणारे क्रियापद हे 'प्रयोजक' क्रियापद असते.*

*उदा. नेहा बहिणीला हसविते. ह्या वाक्यात नेहा स्वतः हसत नसून हसण्याची क्रिया बहिणीकडून करविते. तसेच पाडतो, रडविते, आणवितो, करवितो, ही प्रयोजक क्रियापदे होय.*

*फ) **शक्य क्रियापद -** जेव्हा एखाद्या क्रियापदावरुन कर्त्याला ती क्रिया करण्याची शक्ती किंवा सामर्थ्य आहे असा बोध होतो. अशा क्रियापदांना 'शक्य क्रियापदे' म्हणतात.*

*उदा. त्याला आता खूप चालवते. मला आता दुकानापर्यंत जाववते.*

*चालवते व जाववते ही शक्य क्रियापदे होय. कारण येथे क्रियेवरून शक्यतेचा किंवा समर्थतेचा अर्थ कळत असल्यामुळे क्रिया चालवणारा कोण ? किंवा जाणारा कोण ? असे विचारण्याची अपेक्षा नसून चालण्याची किंवा जाण्याची शक्ती असणारे कोण ? ह्या अर्थाच्या प्रश्नानेच अपेक्षित व योग्य उत्तर निघते.*

***स्वाध्याय -** खालील वाक्यातील क्रियापदे ओळखा*

*१) पाऊस पडला. २) वारा वाहतो. ३) वीज चमकते. ४) मिलाप पुस्तक वाचतो. ५)नेहा हसते. ६) कोमल बोलते.*

## *१) कर्ता २) कर्म ३) प्रत्यक्ष कर्म व अप्रत्यक्ष कर्म ४) विधान पूरक*

*१) **कर्ता** - वाक्यात क्रियापदाने दाखविलेली क्रिया करणाऱ्याला कर्ता असे म्हणतात.*

*उदा.- कबूतर उडते. ह्यात उडणारे म्हणजे उडण्याची क्रिया करणारे कबूतर आहे. म्हणून 'कबूतर' त्या क्रियापदाचा कर्ता आहे.*

*२) **कर्म** - क्रियापदाने दाखविलेली क्रिया ज्याच्यावर घडते, ते कर्म होय.*

*उदा.- अक्षय आंबा खातो. येथे खाण्याची क्रिया करणारा कोण? 'अक्षय' कर्ता. खाण्याची क्रिया कोणावर घडली? 'आंबा' या शब्दावर घडली म्हणून 'आंबा' हा शब्द त्या क्रियापदाचे कर्म आहे.*

*३) **प्रत्यक्ष कर्म व अप्रत्यक्ष कर्म** - काही वेळा एकाच वाक्यात क्रियापदाला वस्तुवाचक व व्यक्तिवाचक अशी दोन कर्मे असतात. त्याना अनुक्रमे प्रत्यक्ष कर्म व अप्रत्यक्ष कर्म असे म्हणतात.*

*उदा. सलोखने मिलापला गोष्ट सांगितली. या वाक्यात गोष्ट हे प्रत्यक्ष कर्म व मिलापला हे अप्रत्यक्ष कर्म होय.*

*४) **विघान पूरक** - जेव्हा एखादे क्रियापद अकर्मक असूनही त्याने केलेल्या विघानाची पूर्तता करण्यासाठी एखाद्या शब्दाची आवश्यकता असते, तेव्हा त्या शब्दाला 'विघानपूरक' म्हणतात.*

*उदा. मिलाप कलाकार आहे. स्नेहल कवयित्री आहे. या दोन्ही वाक्यात 'आहे' हे क्रियापद अकर्मक आहे, परंतु विघानांची पूर्तता 'कलाकार' व 'कवयित्री' या शब्दांनी झाली आहे. म्हणून 'कलाकार' व 'कवयित्री' हे शब्द विघान पूरक आहेत.*

# *क्रियापदाचे काळ*

***क्रियापदाचे काळ*** *- काळ म्हणजे वेळ. क्रियापदावरून क्रियेचा काळ ठरविता येतो. मुख्य काळ तीन आहेत - (अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ (क) भविष्यकाळ*

***अ) वर्तमानकाळ*** *- याकाळात क्रिया आता घडते असा बोघ होतो.*

*उदा. नेहा खूप बडबड करते. सोनल व नेहा शाळेत जातात.*

***ब) भूतकाळ*** *- या काळात क्रिया पूर्वी घडली असा बोघ होतो.*

*उदा. नेहाने खूप बडबड केली. सोनल व नेहा शाळेत गेल्या.*

***क) भविष्यकाळ*** *- या काळात क्रिया पुढे घडेल असा बोध होतो.*
*उदा. नेहा खूप बडबड करील. सोनल व नेहा शाळेत जातील.*

*वर्तमान काळ केव्हा अल्प असतो व केव्हा तो प्रदीर्घही असू शकतो. 'सूर्याभोवती पृथ्वी फिरते' यातील वर्तमान काळ केवढा दीर्घ आहे! तो संपतच नाही.*

*वर्तमान काळाच्या पूर्वीचा काळ व वर्तमान काळाच्या नंतरचा काळ हे दुस-या बाजूने अमर्याद आहेत.*

*१) वर्तमान भूतकाळ, भूत भविष्यकाळ इ. संज्ञा मराठीत स्वीकारण्यास योग्य नाहीत. एखादी क्रिया भूतकाळीही होते व वर्तमानकाळी ही होते. किंवा भविष्यकाळात भूतकाळही असतो. क्रियापदावरून किंवा वाक्यावरून खरोखर अर्थ उत्पन्न होत असतील तर तेच सांगितले पाहिजेत.*

**वर्तमान काळ, भूतकाळ व भविष्य काळ या तीन ही काळांचे प्रत्येकी चार उप प्रकार आहेत.**

## १) वर्तमान काळ (Present Tense)

**उपप्रकार**

अ) **साधा वर्तमानकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरुन क्रिया नक्की घडते एवढेच समजते.
**(Simple Present Tense)**

**उदा.**- कोमल दररोज संध्याकाळी आई बरोबर फिरायला जाते.

ब) **चालू किंवा अपूर्ण वर्तमानकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरुन क्रिया अजून अपूर्ण म्हणजेच चालू आहे. असे समजते.
**(Present Continuous / Imperfect Tense)**

**उदा.**- शिल्पा आता खेळत आहे.

क) **पूर्ण वर्तमानकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरुन क्रिया नुकतीच पूर्ण झाली असे समजते.
**(Present Perfect Tense)**

**उदा.** प्रतीक आताच जेवला आहे.

ड) **रीति वर्तमानकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरून क्रिया सतत होण्याची रीत समजते.
**(Present Perfect Continuous Tense)**

**उदा.** कोमल नेहमी पुस्तकातील चित्रे पाहत असते.

## २) भूतकाळ (Past Tense)

**उपप्रकार**

अ) **साधा भूतकाळ** - या क्रियापदाच्या रूपावरून क्रिया होऊन गेलेली आहे असे समजते.
**(Simple Past Tense)**

**उदा.** शिल्पा काल चंद्रपूरला गेली.

ब) **चालू किंवा अपूर्ण भूतकाळ** - या क्रियापदाच्या रूपावरून क्रिया चालू होती किंवा अपूर्ण होती असे समजते.
**(Past Continuous / Imperfect Tense)**

**उदा.** समीत कॉलेजला जात होता.

क) **पूर्ण भूतकाळ** - या क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पूर्ण झाली असे समजते.
**(Past Perfect Tense)**

**उदा.** कोमल जेवावयास बसली होती.

ड) **रीति भूतकाळ** - या क्रियापदाच्या रूपावरून क्रिया सतत होत असे ही रीत समजते.
**(Past Perfect Continuous Tense)**

उदा. कोमल बाहुली घेऊन खेळत असे.

## ३) भविष्य काळ (Future Tense)

**उप प्रकार**

अ) **साधा भविष्यकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरून क्रिया होईल असे समजते.
**(Simple Future Tense)**

**उदा.** मिलाप व त्याची आजी उद्या पुण्याला जातील.

ब) **चालू किंवा अपूर्ण भविष्यकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरून क्रिया चालू किंवा अपूर्ण असेल असे समजते.
**(Future Continuous / Imperfect Tense)**

**उदा.** आम्ही स्वारला जात असू.

क) **पूर्ण भविष्यकाळ** - यात क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पूर्ण झाली असेल असे समजते.
**(Future Perfect Tense)**

**उदा.** अश्विनी शाळेत गेलेली असेल.

***ड) रीति भविष्यकाळ*** *यात क्रियापदाच्या रूपावरून क्रिया सतत होत असेल असे समजते.*
**(Future Perfect Continuous Tense)**

***उदा.*** *सलोख व अंकुश अभ्यास करीत जातील.*

***तीनही काळ त्यांच्या वेगवेगळया उपप्रकारासह पुढील तक्त्यात दर्शविलेले आहेत.***

## *काळ*

| ***वर्तमानकाळ*** | ***भूतकाळ*** | ***भविष्यकाळ*** |
|---|---|---|
| ***उप प्रकार*** | ***उप प्रकार*** | ***उप प्रकार*** |
| *१) साधा वर्तमानकाळ* | *१) साधा भूतकाळ* | *१) साधा भविष्यकाळ* |
| *२) चालू वर्तमानकाळ* | *२) चालू भूतकाळ* | *२) चालू भविष्यकाळ* |
| *३) पूर्ण वर्तमानकाळ* | *३) पूर्ण भूतकाळ* | *३) पूर्ण भविष्यकाळ* |
| *४) रीति वर्तमानकाळ* | *४) रीति भूतकाळ* | *४) रीति भविष्यकाळ* |

***स्वाध्याय*** *- पुढील वाक्यांचे काळ ओळखा :-*

*१) स्टेशनवर गाडी थांबते.*
*२) तुझे पत्र मिळाले.*
*३) गाय चारा खाईल.*
*४) सलोख घरी येईल.*
*५) आम्ही जेवतो.*
*६) मिलापने अभ्यास केला.*
*७) कोमल चित्रगीत ऐकत होती.*
*८) शिल्पा खेळावयास बसली होती.*
*९) अंकुश पोहत असे.*
*१०) प्रतीक जेवताना खेळत असेल.*

# ***क्रियापदांचा अर्थ सांगणारी वाक्ये***

*१) मुलगी रोज भाजी खाते.*

*२) मुलांनो, रोज भाजी खा.*

*३) मुलांनी रोज भाजी खावी.*

*४) मुलांनी रोज भाजी खाल्ली तर तब्येत चांगली राहते.*

*पहिल्या वाक्यात कर्ता क्रिया करतो यात फक्त काळाचा बोध होतो. पुढील तीन वाक्यावरून काळाचा बोध होत नाही. पण सांगणाऱ्याचा हेतू समजतो. दुसऱ्या वाक्यात मुलांना उपदेश केला आहे. तिसऱ्या वाक्यात कर्तव्य सांगितले आहे. आणि चौथ्या वाक्यात अट सांगितली आहे म्हणून २, ३, ४ या वाक्यांवरून क्रियेच्या काळाचा बोध होत नसून सांगणाऱ्याचा उद्देश किंवा हेतू समजतो, यालाच व्याकरणात **अर्थ** म्हणतात.*

*क्रियापदाचे बोलणाऱ्याच्या मुख्य हेतूवरून चार अर्थ मानतात -*

***अ) स्वार्थ ब) आज्ञार्थ क) विध्यर्थ ड) संकेतार्थ***

***(अ) स्वार्थ -** क्रियापदाला केवळ स्वतःचा अर्थ समजतो. वर्तमान, भूत, भविष्य या काळात क्रिया करणाऱ्याचा हेतू नुसते विधान करण्याचा असतो. क्रियापदाची सर्व काळातील ही स्वार्थी रूपे होत.*

***उदा.** १) मी अभ्यास करतो. (वर्तमानकाळ) २) मी अभ्यास केला. (भूतकाळ) ३) मी अभ्यास करीन. (भविष्यकाळ) ४) मी अभ्यास करणार नाही. (नकार)*

***(ब) आज्ञार्थ -** 'मुलांनो, रोज भाजी खा'. या वाक्यातील 'खा' या क्रियापदावरून सांगणाऱ्याचा हेतू साधे विधान करावयाचा नसून आज्ञा किंवा उपदेश करावयाचा आहे. क्रियापदावरून आज्ञा, विनंती, उपदेश किंवा आशीर्वाद देण्याचा हेतू दिसला तर त्याला आज्ञार्थ असे म्हणतात.*

*उदा. १) माझ्या प्रश्नाचे उत्तर दे. (आज्ञा) २) परमेश्वर तुम्हाला सुखी ठेवो. (आशीर्वाद) ३) देवा मला आजारपणातून मुक्त कर. (प्रार्थना) ४) पैसे जपून वापरा. (विनंती)*

***(क) विध्यर्थ -** क्रियापदावरून कर्तव्य, इच्छा, योग्यता, तर्क, शक्यता, असा कोणता तरी बोध होतो.*

*उदा. १) आपण नेहमी एकमेकांशी प्रेमाने वागावे (कर्तव्य) २) मला चांगले मित्र मिळावेत. (इच्छा) ३) तो घरी पोचला असावा. (तर्क) ४) मिलापच्या चित्राला बक्षीस मिळावे. (शक्यता)*

*कर्तव्य यालाच विधी म्हणतात. म्हणून ही क्रियापदे विध्यर्थ होय*

***(ड) संकेतार्थ -** यात क्रियापदावरून एक गोष्ट दुसरीवर अवलंबून आहे, अशा प्रकारचा बोध होतो. संकेत म्हणजे अट. संकेत होण्यास दोन वाक्ये लागतात. ती 'जर-तर' 'अव्ययांनी जोडलेली असतात.*

*उदा. जर मी मंद वाऱ्याची झुळूक झाले असते तर कळीला हळूच स्पर्श केला असता. कधी कधी 'जर' हे अव्यय गाळून वाक्ये लिहितात.*

*उदा. झाडाला फूले आली तर मी ती देवाला वाहीन.*

***अविकारी शब्द -** अविकारी शब्दात व्यय म्हणजे बदल होत नाही. म्हणून त्यांस अव्यये म्हणतात. अविकारी शब्दांचा वाक्यात के हाही व कोणत्याही प्रकारचा बदल न करता नेहमी उपयोग केला जातो.*

# *अविकारी शब्दांचे प्रकार*

*अविकारी शब्दांचे चार प्रकार आहेत.*

*उ) क्रिया विशेषण अव्यये,*

*ऊ) उभयान्वयी अव्यये,*

*ए) शब्दायोगी अव्यये,*

*ऐ) केवलप्रयोगी अव्यये*

## *अविकारी शब्दांचे प्रकार*

### *उ) शब्दांच्या जाती - क्रिया विशेषण अव्यये*

*१) **क्रिया विशेषण अव्यये -** क्रियेचे स्थल, काल, रीति, संख्या इ. कोणत्याही प्रकारचे वैशिष्टय दाखविणारा जो अविकारी शब्द आहे त्याला क्रिया विशेषण अव्यय असे म्हणतात.*

*क्रियाविशेषण अव्यये अर्थदृष्ट्या सामान्यतः चार प्रकारची आढळतात*

*अ) स्थलवाचक ब) कालवाचक क) रीतिवाचक ड) परिमाणवाचक किंवा संख्यावाचक.*

*अ) **स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये -** क्रिया कोठे घडली, तिचे स्थळ किंवा ठिकाण दर्शविणारा शब्द. उदा. येथे खेळू नका. आमची शाळा घरापासून जवळ आहे. येथे, तेथे, पलीकडे, सभोवार, वर, खाली, आत, मागे, पुढे इ. शब्द त्यांच्या वाक्यातील क्रिया कोठे घडते या बद्दलची विशेष माहिती सांगतात.*

*ब) **कालवाचक क्रियाविशेषण अव्यये** - क्रिया घडण्याचा काळ दाखविणारे शब्द.*

*उदा. १) हल्ली दहिसरला विजेचे दिवे आलेले आहेत. २) गोकर्णला पूर्वी मातीचे रस्ते होते. ३) दिवाळीत मुले आठवडाभर फटाके वाजवितात. ४) आम्ही वारंवार समुद्रावर फिरायला जातो.*

*केव्हा? हा प्रश्न क्रियापदास विचारल्यास - आज, उद्या, यंदा, जेव्हा, महिनाभर, वारंवार, आता, पूर्वी, मागे, सकाळी, रात्री, नेहमी, पुन्हा, दररोज, वेळोवेळी, क्षणोक्षणी इ. उत्तरे मिळू शकतात.*

*क) **रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये** - क्रिया घडण्याची रीत दाखविणारे शब्द. कसा? कशी? कसे? या प्रश्नानी क्रियापदाकडून येणारी उत्तरे.*

*उदा. असे, तसे, जलद, सावकाश, हळूहळू, आपोआप, झटपट, खरोखर, खचित, उगीच, फुकट, मुद्दाम, व्यर्थ १) मी सावकाश जेवते. २) तो चटकन दुकानात जाऊन आला. ३) सलोख फार जलद चालतो.*

*ड) **परिमाणवाचक (किंवा संख्यावाचक) क्रियाविशेषण अव्यये -** क्रिया किती प्रमाणात घडली, हे सांगणारे परिमाणवाचक शब्द. किती? या प्रश्नाने क्रियापदाकडून येणारे उत्तर.*

*उदा. किंचित, अत्यंत, थोडा, मुळीच, भरपूर, अतिशय, काहीसा, जरा, पूर्ण, बिलकुल, कमी, अधिक, इ. १) सलोख मुळीच झोपला नाही. २) मिलापने पारिजातकाची भरपूर फुले आणली.*

***स्वाध्याय** - पुढील वाक्यातील क्रियाविशेषणे शोधून लिहा :-*

*१) सलोख जलद चालतो.*

*२) स्नेहलने तीनदा हे पुस्तक वाचले.*

*३) ही गोष्ट ऐकून मिलाप खूप हसला.*

*४) नेहा भरभर बोलते.*

## अविकारी शब्दांचे प्रकार

### ऊ) शब्दांच्या जाती - उभयान्वयी अव्यये

ऊ) ***उभयान्वयी अव्यये*** *- दोन शब्द किंवा दोन वाक्ये याना केवळ जोडण्याचे काम करणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यये म्हणतात. ही अव्यये दोन वाक्ये जोडण्याचे कार्य करतात.*

*उदा. त्यासाठी, आणि, व, शिवाय, अन्, परंतु, पण, अथवा, किंवा, वा, म्हणून, कारण, की, म्हणजे, तर, जर, तरी, यासाठी, इ. शब्दांचा वापर करतात.*

*उदा.*

१) स्नेहल लक्षदेऊन अभ्यास करते म्हणून तिचा पहिला नंबर येतो.

२) यश मिळावे म्हणून सलोख खूप मेहनत करतो.

३) मिलापचा पाय दुखत होता तरी तो शाळेत गेला.

४) कोमल आणि शिल्पा एकाच वयाच्या आहेत.

## अविकारी शब्दांचे प्रकार

### ऊ) शब्दांच्या जाती - शब्दयोगी अव्यये

ऊ) ***शब्दयोगी अव्यये*** *- नाम किंवा दुसरा एखादा विकारी शब्द त्याला जोडून येऊन त्याचा वाक्यातील इतर शब्दाशी संबंध दाखविणाऱ्या अविकारी शब्दाला शब्दयोगी अव्यय असे म्हणतात.*

*उदा. मनुष्य हा पैशापेक्षा गुणाने अधिक श्रीमंत असला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षक काय सांगतात ह्याकडे अधिक लक्ष द्यावे. पावलावर, घरावर, झाडापुढे येईपर्यंत, केल्यामुळे इ.*

***सूचना -***
*काही स्थलवाचक व कालवाचक अव्यये क्रियाविशेषण अव्ययेही असतात व शब्दयोगी अव्ययेही असतात. ज्यावेळी ती नामापुढे त्यास जोडून येतात, तेव्हा ती शब्दयोगी अव्यये असतात. आणि जेव्हा ती स्वतंत्र असून कशासही जोडली न जाता क्रियेचा गुण दाखवितात, तेव्हा ती क्रियाविशेषण अव्यये असतात. यातील फरक पहा -*

| | शब्दयोगी अव्यये | क्रियाविशेषण अव्यये |
|---|---|---|
| १) | तो झाडावर आहे. | तो हात वर करतो. |
| २) | दिव्याखाली बसून वाचू नये. | मी खाली येतो. |
| ३) | दूध पिण्यापूर्वी दात घासावे. | पूर्वी तो खूप खेळत होता. |
| ४) | जेवणानंतर चूळ भरावी. | ती नंतर डॉक्टरकडे गेली. |

***स्वाध्याय :*** *- पुढील वाक्यातील शब्दयोगी अव्यये शोधून लिहा :-*

१) शिंपी पक्षी घरट्याबाहेर आला.

२) मुले बाकावर बसली.

३) मिलाप येईपर्यंत तू थांब.

४) तुला लिहिल्याशिवाय चालणार नाही.

५) आमची बस दुकानाजवळ थांबते.

### ऐ) उद्‌गारवाचक अव्यय किंवा केवलप्रयोगी अव्यय -

*मनाला एकाएकी होणारे हर्ष, शोक, तिरस्कार, आश्चर्य इ. विकार दर्शविण्यासाठी जे शब्द एकदम उच्चारले जातात, अशा अविकारी शब्दांना केवल प्रयोगी किंवा उद्‌गार वाचक अव्यये असे म्हणतात. आपल्या मनात जितक्या प्रकारच्या भावना उद्‌भवतात तितके त्यांचे प्रकार संभवतात.*

*१) हर्षदर्शक - वाहवा, अहाहा, वा वाः अहा, आहो.*

*२) शोकदर्शक - अरेरे, अगाई, हायहाय, शिवशिव, रामराम, देवारे, आईआई.*

*३) आश्चर्यदर्शक - अबब, अरे बापरे, अय्या, अगबाई.*

*४) विरोधदर्शक - छे, छट्, अंहं, उंहूं, छी, छीछी.*

*५) तिरस्कारदर्शक - छी, थूः, शीः, इश्श, अहाहा.*

*६) प्रशंसादर्शक - वाहवा, शाबास, भले, ठीक.*

*७) स्वीकारदर्शक (संमतीदर्शक) - जी, हां. ठीक. बरे, होय.*

*८) संबोधनदर्शक - अरे, अहो, अग, ए, रे.*

## *(३) शब्दविचार*

*नाम, सर्वनाम आणि नामाप्रमाणे उपयोगात आणलेली विशेषणे ह्याना लिंग, वचन व विभक्ती हे विकार होतात.*
*मूळ शब्दापुढे लिंग, वचन, विभक्ती इ. करिता जी अक्षरे लागतात, त्यास प्रत्यय असे म्हणतात.*

# (३) शब्द विचार

## (३.१) शब्द विचार - लिंग विचार

(१) **लिंग विचार** - शब्दावरुन त्याच्या ठिकाणच्या वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्वाचा, स्त्रीत्वाचा त्याशिवाय निराळ्या प्रकारचा जो बोध होतो, त्यास लिंग असे म्हणतात.

घोडा या शब्दाचे पुरुषत्व व गाय या शब्दाचे स्त्रीत्व अर्थाच्या दृष्टीने वास्तविक आहे. परंतु दरवाजा, वीट यात दरवाज्याचे पुरुषत्व व वीटेचे स्त्रीत्व हे काल्पनिक स्वरूपाचे आहे. लिंगाचे तीन प्रकार - १) पुल्लिंग २) स्त्रीलिंग ३) नपुंसकलिंग

१) **पुल्लिंग** - ज्या शब्दावरून त्याच्या ठिकाणच्या वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्वाचा बोध होतो, त्यास पुल्लिंगी शब्द म्हणतात.

२) **स्त्रीलिंग** - ज्या शब्दावरून त्याच्या ठिकाणच्या वास्तविक किंवा काल्पनिक स्त्रीत्वाचा बोध होतो, त्यास स्त्रीलिंगी शब्द म्हणतात.

३) **नपुंसकलिंग** - ज्या शब्दावरून त्याच्या ठिकाणच्या वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्व किंवा स्त्रीत्व या पेक्षा निराळ्या प्रकारचा बोध होतो, त्या शब्दास नपुंसकलिंगी शब्द असे म्हणतात.

आपणास सर्वनामावरून लिंग ओळखता येते.

उदा.

| **पुल्लिंग,** | **स्त्रीलिंग,** | **नपुंसकलिंग** |
|---|---|---|
| तो दरवाजा | ती वही | ते पुस्तक |
| हा रुमाल | ही साडी | हे दूघ |
| जो | जी | जे |

मी, आम्ही, तू, तुम्ही, ही सर्वनामे पुल्लिंगी नामाबद्दल आल्यास पुल्लिंगी समजावे व स्त्रीलिंगी नामाबद्दल आल्यास स्त्रीलिंगी समजावे.

## पुल्लिंगी नामाची स्त्रीलिंगी रूपे

अ) काही 'अ' कारान्त संस्कृत व मराठी पुल्लिंगी नामाची स्त्रीलिंगी रूपे 'ई' कारान्त होतात.

| **पुल्लिंग** | | **स्त्रीलिंग** | **पुल्लिंग** | | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|---|---|---|
| वानर | - | वानरी | दास | - | दासी |
| सिंह | - | सिंही | मृग | - | मृगी |
| उंदीर | - | उंदरी | गाढव | - | गाढवी |
| देव | - | देवी | तरूण | - | तरुणी |
| गोप | - | गोपी | हंस | - | हंसी |
| हरीण | - | हरिणी | मगर | - | मगरी |
| बेडूक | - | बेडकी | | | |

*ब) काही प्राणिवाचक पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे 'ईण' हा प्रत्यय लागून होतात.*

| पुल्लिंग | | स्त्रीलिंग | पुल्लिंग | | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|
| वाघ | - | वाघीण | सुतार | - | सुतारीण |
| सोनार | - | सोनारीण | सिंह | - | सिंहीण |
| पोपट | - | पोपटीण | माकड | - | माकडीण |
| मालक | - | मालकीण | कोळी | - | कोळीण |
| ससा | - | ससीण | भिकारी | - | भिकारीण |
| पक्षी | - | पक्षीण | माळी | - | माळीण |
| गवळी | - | गवळीण, गवळण | कुंभार | - | कुंभारीण |
| उंट | - | उंटीण | जमीनदार | - | जमीनदारीण |
| हत्ती | - | हत्तीण | लोहार | - | लोहारीण |
| धोबी | - | धोबीण | तेली | - | तेलीण |
| शिक्षक | - | शिक्षिका | | | |

***क)** मराठीत काही आकारान्त पुल्लिंगी प्राणिवाचक नामांचे स्त्रीलिंगी रूप 'ई' कारान्त असते व नपुंसकलिंगी रूप 'ए' कारान्त असते.*

| पुल्लिंग | | स्त्रीलिंग | पुल्लिंग | | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|
| घोडा | - | घोडी | मुलगा | - | मुलगी |
| कुत्रा | - | कुत्री | पाडा | - | पाडी |
| भाचा | - | भाची | कावळा | - | कावळी |
| आजा | - | आजी | परका | - | परकी |
| चुलता | - | चुलती | नवरा | - | नवरी |
| वाडा | - | वाडी | बकरा | - | बकरी |
| पोरगा | - | पोरगी | कोल्हा | - | कोल्ही |
| म्हातारा | - | म्हातारी | मामा | - | मामी |
| कोंबडा | - | कोंबडी | चिमणा | - | चिमणी |
| पाहुणा | - | पाहुणी | आजोबा | - | आजी |

*(ड) काही पुल्लिंगी नामांची रूपे स्वतंत्र रीतीने होतात.*

| पुल्लिंग | | स्त्रीलिंग | पुल्लिंग | | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|
| उंट | - | सांडणी | कवी | - | कवयित्री |
| कोकीळ | - | कोकिळा | बैल | - | गाय |
| पुरुष | - | स्त्री | नर | - | नारी, मादी |
| गवळी | - | गवळण | पती | - | पत्नी |
| गायक | - | गायिका | राघू | - | मैना |
| ग्रंथकर्ता | - | ग्रंथकर्ती | गृहस्थ | - | गृहिणी |
| संपादक | - | संपादिका | राजपुत्र | - | राजकन्या |
| बालक | - | बालिका | लेखक | - | लेखिका |
| श्रीमान | - | श्रीमती | विधुर | - | विधवा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नातू | - | नात | नवरा | - | नवरी, बायको |
| राजा | - | राणी | नायक | - | नायिका |
| खोंड | - | कालवड | रेडा | - | म्हैस |
| पक्षी | - | पक्षिणी, पक्षीण | मोर | - | लांडोर |
| शुक | - | शुकी, सारिका | बालवीर | - | वीरबाला |
| भाऊ | - | बहीण | मित्र | - | मैत्रीण |
| विद्यार्थी | - | विद्यार्थिनी | युवक | - | युवती |
| पिता | - | माता | बंधु | - | भगिनी |
| सासरा | - | सासू | विद्वान | - | विदुषी |
| जनक | - | जननी | पुत्र | - | कन्या |
| बाप, बाबा | - | आई | व्याही | - | विहीण |
| दीर | - | जाऊ | बोका | - | भाटी, मांजर |
| बोकड | - | शेळी | वाघ्या | - | मुरळी |
| वर | - | वधू | शिक्षक | - | शिक्षिका |
| शिष्य | - | शिष्या | देव | - | देवता |
| नवरदेव | - | नवरी | नर्तक | - | नर्तिका |

*(इ) काही 'आ' कारान्त पुल्लिंगी पदार्थवाचक शब्दांचे लघुत्वार्थी स्त्रीलिंगी रूप 'ई' कारान्त होते.*

| पुल्लिंग | | स्त्रीलिंग | पुल्लिंग | | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|---|---|
| आरसा | - | आरशी | खळगा | - | खळगी |
| सुपला | - | सुपली | दांडा | - | दांडी |
| पळा | - | पळी | खडा | - | खडी |
| कुरकुला | - | कुरकुली | लोटा | - | लोटी |
| | | | दोर | - | दोरी |

**स्वाध्याय -**

*अ) पुढील नामांचे लिंग ओळखा : रस्ता, वानर, कोल्ही, युवक, पुढारी, पुस्तक, शाळा, परीट, मैना, राहणी, बोकड, बूट.*

*ब) प्रत्येक नामाचे लिंग बदलून लिहा : कोंबडा, जाऊ, कवी, मालक, गाढवी, बालवीर, मोर, भिकारी, स्त्री, वाघ, जननी.*

# *(३) शब्द विचार*

## *(३.२) शब्द विचार - वचन विचार*

*२) **वचन विचार** - शब्दावरून वस्तू एक आहे की अनेक आहेत, याचा जो बोध होतो, त्यास वचन असे म्हणतात. वचने दोन आहेत. **एकवचन** व **अनेकवचन**.*

***अ) विशेषनामाची अनेकवचनी रूपे होत नाहीत -***

*उदा. - सलोख्व, मिलाप, स्नेहल, निर्मला, कांती, शांता, शालिनी, मालू, कुसूम, कोमल इ. नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत.*

***ब) भाववाचक नामाची अनेकवचनी रूपे होत नाहीत -***

*उदा. हुशारी, चांगुलपणा, आनंद, संताप, धैर्य, भीती, इ. नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत,*

***क) समूहवाचक नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत -***

*उदा. गर्दी, प्रेक्षक, सभा, थवा, कळप, तांडा, ताफा, गट, इ. नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत.*

***ड) द्रववाचक किंवा पदार्थवाचक नामाचे अनेकवचन होत नाही -***

*उदा. दूध, तेल, लोणी, तूप, पाणी, ताक, पेय, इ. द्रववाचक नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत. तसेच गहू, तांदूळ, साख्वर, चहा, कॉफी, डाळ इ. पदार्थ वाचक नामांची अनेकवचनी रूपे होत नाहीत.*

***ई) कोणतेही नाम सामान्य नामाप्रमाणे वापरले तर त्याचे अनेकवचनी रूप होते***

***काही सामान्य नामांची अनेकवचनी रूपे :-***

***पुल्लिंगी शब्दांचे वचन***

*१) 'अ' कारान्त पुल्लिंगी नामांची एक वचनी व अनेक वचनी रुपे सारखीच असतात.*

*उदा. दगड (एकवचन) दगड (अनेकवचन)*

*पुढील सामान्य नामे 'अ' कारान्त पुल्लिंगी नामाची उदाहरणे आहेत - बैल, वाद्य, डाव, पाय, शिक्षक, फणस, बाण, वानर, कप, ओठ, कान, नारळ, गाल, सरदार, देव, समुद्र, सागर, पर्वत, ढग, पंख्व, पूल, बाजार, तलाव, पतंग, सैनिक, वाघ, सिंह, औत, अस्वल, पोपट, रंग, मानव, पुरूष, गुलाब, देश, वेष, लोहार, हात, दात, सुनार, डोंगर, जिराफ, कंदील, इ. 'अ' कारान्त पुल्लिंगी नामे होय.*

*(२) 'आ' कारान्त पुल्लिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'ए' कारान्त होतात उदा.*

| ***एकवचन*** | | ***अनेकवचन*** | ***एकवचन*** | | ***अनेकवचन*** |
|---|---|---|---|---|---|
| *राजा* | - | *राजे* | *मासा* | - | *मासे* |
| *ससा* | - | *ससे* | *रस्ता* | - | *रस्ते* |
| *गोळा* | - | *गोळे* | *आंबा* | - | *आंबे* |
| *वाफा* | - | *वाफे* | *किल्ला* | - | *किल्ले* |
| *आरसा* | - | *आरसे* | *बगीचा* | - | *बगीचे* |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *कोल्हा* | - | *कोल्हे* | *झरा* | - | *झरे* |
| *दिवा* | - | *दिवे* | *खांदा* | - | *खांदे* |
| *घोडा* | - | *घोडे* | *चमचा* | - | *चमचे* |
| *सदरा* | - | *सदरे* | *किनारा* | - | *किनारे* |
| *पेला* | - | *पेले* | *मजला* | - | *मजले* |
| *कट्टा* | - | *कट्टे* | *फुगा* | - | *फुगे* |
| *दाणा* | - | *दाणे* | *पैसा* | - | *पैसे* |
| *डबा* | - | *डबे* | *पंखा* | - | *पंखे* |
| *कोंबडा* | - | *कोंबडे* | *कावळा* | - | *कावळे* |
| *मासा* | - | *मासे* | *बंगला* | - | *बंगले* |
| *हिरा* | - | *हिरे* | *ओढा* | - | *ओढे* |
| *तुरा* | - | *तुरे* | *डोळा* | - | *डोळे* |
| *खटारा* | - | *खटारे* | *भोवरा* | - | *भोवरे* |
| *खिळा* | - | *खिळे* | *लांडगा* | - | *लांडगे* |
| *पिंजरा* | - | *पिंजरे* | *वाडा* | - | *वाडे* |
| *कोळसा* | - | *कोळसे* | | | |

**सूचना (१)**

*काही 'आ' कारान्त पुल्लिंगी आदरार्थी बहुवचनी वापरल्या जाणाऱ्या नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात.*
*उदा. काका, दादा, तात्या, मामा, आजोबा, आप्पा, भाई इ.*

**सूचना (२)**

*'आ' कारान्त खेरीज सर्व पुल्लिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात.*

३) *'इ, ई' कारान्त पुल्लिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात.*
*उदा. हत्ती, रवी, माळी, शेतकरी, बळी,*
*भिकारी, डोंबारी, प्रवासी, न्हावी, रहिवासी, आदिवासी, पहारेकरी, माळकरी, पुजारी, वारकरी, शिकारी, शिंपी, बैरागी, संन्यासी, कैदी, मंत्री, अधिकारी इ.*

४) *'उ, ऊ' कारान्त पुल्लिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात.*
*उदा. लाडू, पेरू, साधू, गडू, बांबू, चाकू, दांडू, खडू, लुटारू, उतारू, खिसेकापू, तराजू, चेंडू, शत्रू, तंबू इ.*

**सूचना (३)**

*साधु, रवि, कवि, मति, भक्ति, शक्ति, प्रीति, कीर्ति, हे ऱ्हस्व 'इ' कारान्त व ऱ्हस्व 'उ' कारान्त शब्द संस्कृत भाषेतून घेतलेले आहेत. परंतु आता हे शब्द मराठीत लिहिताना साधू, रवी, कवी, मती, भक्ती शक्ती, प्रीती, कीर्ती, असे दीर्घ 'ई' कारान्त व दीर्घ 'ऊ' कारान्त लिहितात.*

**सूचना (४)**

*मराठीत इ, उ, ए, ऐ व ओ औ या अन्ताचे पुल्लिंगी शब्दच फारसे नाहीत.*

**सूचना (५)**

***अपवाद** - अद्यापि, कदापि, परंतु, रीति, नीति, भीती, हे संस्कृत भाषेतून आलेले शब्द मराठीत बदल न करता तसेच लिहितात.*

## स्त्रीलिंगी शब्दांचे वचन

(अ) काही 'अ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'ई' कारान्त होतात. उदा.

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| वेल | - | वेली | साल | - | साली |
| इमारत | - | इमारती | तलवार | - | तलवारी |
| गाय | - | गाई, गायी | सायकल | - | सायकली |
| विजार | - | विजारी | गोष्ट | - | गोष्टी |
| बहीण | - | बहिणी | सहल | - | सहली |
| वाघीण | - | वाघिणी | विहीर | - | विहिरी |
| ओळ | - | ओळी | रास | - | राशी |
| भिंत | - | भिंती | पेन्सिल | - | पेन्सिली |
| जात | - | जाती | कुऱ्हाड | - | कुऱ्हाडी |
| आगबोट | - | आगबोटी | नथ | - | नथी |
| हत्तीण | - | हत्तिणी | पाठ | - | पाठी |
| रिबिन | - | रिबिनी | दौत | - | दौती |
| चाळ | - | चाळी | जमीन | - | जमिनी |
| डाळ | - | डाळी | शाल | - | शाली |

(आ) काही 'अ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'आ' कारान्त होतात. उदा :

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| माळ | - | माळा | वाट | - | वाटा |
| खाट | - | खाटा | मान | - | माना |
| झेप | - | झेपा | नाव | - | नावा |
| फौज | - | फौजा | हाक | - | हाका |
| मौज | - | मौजा | तान | - | ताना |
| वहाण | - | वहाणा | बंदूक | - | बंदुका |
| सून | - | सुना | नणंद | - | नणंदा |
| धार | - | धारा | बाग | - | बागा |
| रेघ | - | रेघा | चप्पल | - | चपला |
| लाट | - | लाटा | | | |

(इ) 'आ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात. उदा : - कन्या, शाळा, कथा, बालिका, विधवा, कला, विद्या, माता, गाथा, सत्ता, मालमत्ता, लता, कविता, तारका, कोकिळा, आया, सारिका, मैना, घंटा, चंद्रिका इ.

*(ई) 'इ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'या' कारान्त होतात. उदा.*

| **एकवचन** | | **अनेकवचन** | **एकवचन** | | **अनेकवचन** |
|---|---|---|---|---|---|
| झोपडी | - | झोपड्या | पिशवी | - | पिशव्या |
| नदी | - | नद्या | टोपली | - | टोपल्या |
| अंगठी | - | अंगठ्या | चांदणी | - | चांदण्या |
| टोपी | - | टोप्या | डबी | - | डब्या |
| भाजी | - | भाज्या | बादली | - | बादल्या |
| बाहुली | - | बाहुल्या | किंकाळी | - | किंकाळ्या |
| बाटली | - | बाटल्या | गोळी | - | गोळ्या |
| खाडी | - | खाड्या | वही | - | वह्या |
| खुर्ची | - | खुर्च्या | काठी | - | काठ्या |
| गाडी | - | गाड्या | कढई | - | कढया |
| स्त्री | - | स्त्रिया | झोळी | - | झोळ्या |
| डरकाळी | - | डरकाळ्या | टाळी | - | टाळ्या |
| होडी | - | होड्या | खिडकी | - | खिडक्या |
| पेटी | - | पेट्या | छत्री | - | छत्र्या |
| मिरची | - | मिरच्या | सुट्टी | - | सुट्ट्या |
| बी | - | बिया | साडी | - | साड्या |

*(उ) काही 'ई' कारान्त व काही 'उ, ऊ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात.*
*उदा :- नारी, दासी, धेनु, वधू, बाजू, दारू, इ.*

*(ऊ) काही 'ऊ' कारान्त स्त्रीलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'वा' कारान्त होतात.*

| **एकवचन** | | **अनेकवचन** | **एकवचन** | | **अनेकवचन** |
|---|---|---|---|---|---|
| सासू | - | सासवा | जाऊ | - | जावा |
| ऊ | - | उवा | बाजू | - | बाजवा |
| पिसू | - | पिसवा | जळू | - | जळवा |
| टाळू | - | टाळवा | | | |

## *नपुंसकलिंगी शब्दांचे वचन*

*(१) 'अ' कारान्त नपुंसकलिंगी नामांची एकवचनी रूपे 'ए' कारान्त होतात.*

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| शेत | - | शेते | पुस्तक | - | पुस्तके |
| पान | - | पाने | झाड | - | झाडे |
| टेबल | - | टेबले | जहाज | - | जहाजे |
| मेज | - | मेजे | पीस | - | पिसे |
| कारण | - | कारणे | पीक | - | पिके |
| शीत | - | शिते | माकड | - | माकडे |
| कमळ | - | कमळे | फूल | - | फुले |
| कुलूप | - | कुलपे | खोड | - | खोडे |
| शेपूट | - | शेपटे | कुंपण | - | कुंपणे |
| मूल | - | मुले | रबर | - | रबरे |
| मैदान | - | मैदाने | घुबड | - | घुबडे |
| वजन | - | वजने | रान | - | राने |
| पारितोषिक | - | पारितोषिके | दुकान | - | दुकाने |
| घर | - | घरे | कौल | - | कौले |
| घड्याळ | - | घड्याळे | मंदिर | - | मंदिरे |
| दार | - | दारे | देऊळ | - | देवळे |
| रत्न | - | रत्ने | नख | - | नखे |
| गाव | - | गावे | पेन | - | पेने |
| चित्र | - | चित्रे | फळ | - | फळे |

*(२) 'ए' कारान्तत नपुंसकलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'ई' कारान्त होतात.*

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| केळे | - | केळी | जाळे | - | जाळी |
| शेपटे | - | शेपटी | संत्रे | - | संत्री |
| तळे | - | तळी | मडके | - | मडकी |
| वांगे | - | वांगी | घरटे | - | घरटी |
| अंडे | - | अंडी | डोके | - | डोकी |
| खेडे | - | खेडी | कोडे | - | कोडी |

*(३) 'ई' कारान्त नपुंसकलिंगी नामांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात. उदा. लोणी, पाणी, दही, इ.*

*(४) 'ऊ' कारान्त नपुंसकलिंगी नामांची अनेकवचनी रूपे 'ए' कारान्त होतात.*

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| वासरू | - | वासरे | कोकरू | - | कोकरे |
| मेंढरू | - | मेंढरे | शिंगरू | - | शिंगरे |
| लिंबू | - | लिंबे | पाखरू | - | पाखरे |
| लेकरू | - | लेकरे | | | |

***स्वाध्याय***

*(अ) खालील नामांचे वचन ओळखा -*

*धडे, गायी, रास, देश, खडू, बी, ढेप, आंबा, काठी, पाखरू, नदी.*

*(ब) खालील नामांची अनेकवचनी रुपे लिहा -*

*लहर, झोळी, हाक, कारण, देऊळ, सासू, झेप, विहीर, माळ, टोपी, पाखरू, हत्ती, पिके, ऊ, भाजी, बाग, शाल, बंदूक, लाट, खांदा.*

# *(३) शब्द विचार*

## *(३.३) शब्द विचार - विभक्ती विचार*

*(३) **विभक्ती विचार** - नामाचा क्रियापदाशी किंवा वाक्यातील इतर शब्दाशी असलेला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध दाखविण्यासाठी त्याची जी निरनिराळी रूपे होतात, त्यास विभक्ती असे म्हणतात.*

***विभक्ती प्रत्यय** :- नामाचा वाक्यातील दुसऱ्या शब्दाशी संबंध दाखविण्यासाठी त्यांना जी अक्षरे जोडून नामांचे व सर्वनामांचे विभक्तीचे रूप तयार करतात, त्यांना विभक्ती प्रत्यय असे म्हणतात.*

***शब्दाचे सामान्य रूप** - एखाद्या शब्दाला विभक्ती प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागताना त्या शब्दाचे मूळ रूप बदलते, या बदललेल्या रूपाला त्या शब्दाचे सामान्य रूप असे म्हणतात.*

*उदा:- १) मित्र ह्याचे सामान्यरूप मित्रा. २) घोडा ह्याचे सामान्यरूप घोड्या ३) लाडू, ह्याचे सामान्यरूप लाडवा.
४) नवरा ह्याचे सामान्यरूप नवऱ्या.*

*एकंदर आठ विभक्ती मानलेल्या आहेत. विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी - शब्दांचे सामान्यरूप करावे लागते. विभक्तीचे प्रत्यय ला वून मित्र या नामाची होणारी रूपेः-*

| | - | **एकवचन** | | **अनेकवचन** |
|---|---|---|---|---|
| **विभक्ती** | **प्रत्यय** | **नामांची रुपे** | **प्रत्यय** | **नामांची रूपे** |
| प्रथमा | प्रत्यय नाहीत | मित्र | प्रत्यय नाहीत | मित्र |
| द्वितीया | स, ला, ते | मित्रास, मित्राला | स, ला, ना, ते, | मित्रांस, मित्रांना |
| तृतीया | ने, ए, शी, | मित्राने, मित्राशी, | नी, ही, ई, शी, | मित्रांनी, मित्रांशी |
| चतुर्थी | स, ला, ते | मित्रास, मित्राला | स, ला, ना, ते | मित्रांस, मित्रांना |
| पंचमी | ऊन, हून, | मित्राहून | ऊन, हून, | मित्रांहून |
| षष्टी | चा, ची, चे | मित्राचा, मित्राची, | चा, ची, चे | मित्रांचा, मित्राचे<br>मित्रांची, मित्रांचे |
| सप्तमी | त, ई, आ | मित्रात | त, ई, आ | मित्रांत |
| संबोधन | प्रत्यय नाहीत | मित्रा | | मित्रांनो |

*टीप - काही विभक्ती प्रत्ययांचा उपयोग फक्त पद्यातच होतो.*

# सर्वनामांचे विकार

***सर्वनामांचे विकार -*** *नामाप्रमाणे सर्वनामांनाही लिंग, वचन, व विभक्ती हे विकार होतात.*

*(१) मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, आपण, व स्वतः ह्या नऊ सर्वनामापैकी मी, तू, कोण, काय, आपण व स्वतः ही सर्वनामे तिन्ही लिंगी समान आहेत. तो, हा, जो, यांची रूपे लिंगाप्रमाणे बदलणारी आहेत.*

*(२) मी, तू, तो, हा, जो, ही, सर्वनामे वचनाप्रमाणे बदलणारी असून कोण, काय, आपण, स्वतः ही दोन्ही वचनात समान आहेत.*

| एकवचन | | अनेकवचन | एकवचन | | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| मी | - | आम्ही | तू | - | तुम्ही |
| तो, ती, ते | - | ते, त्या, ती | हा, ही, हे | - | हे, ह्या, ही |
| कोण | - | कोण | काय | - | काय |
| आपण | - | आपण | स्वतः | - | स्वतः |

*(३) सर्वनामे नामाप्रमाणेच विभक्तीचे बाबतीत सर्वस्वी चालत नाहीत.*

*(४) सर्वनामे ही काही प्राणी किंवा वस्तू नाहीत, म्हणून त्यांचे संबोधन विभक्ती रूप तेवढे होत नाही, बाकीची रूपे होतात.*

उदाः-

१)

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|
| प्रथमा | मी | आम्ही | तू | तुम्ही |
| द्वितिया | मला | आम्हाला | तुला | तुम्हाला |
| तृतीया | मी | आम्ही | तू | तुम्ही |
| चतुर्थी | मला | आम्हाला | तुला | तुम्हाला |
| पंचमी | माझ्याहून | आम्हाहून | तुझ्याहून | तुम्हाहून |
| षष्टी | माझा | आमचा | तुझा | तुमचा |
| | माझी | आमची | तुझी | तुमची |
| | माझे | आमचे | तुझे | तुमचे |
| सप्तमी | माझ्यात | आम्हात | तुझ्यात | तुम्हात |
| | | आमच्यात | तुमच्यात | |

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | तो, ती, | ते, त्या |
| द्वितीया | त्याला, तिला, | त्यांना त्यांना |
| तृतीया | त्याने, तिने, | त्यांना त्यांनी |
| चतुर्थी | त्याला, तिला, | त्यांना त्यांना |
| पंचमी | तोहून, तीहून, | त्यांहून त्यांच्याहून |
| षष्टी | त्याचा, तिचा | त्यांचा, त्यांचा |
| | त्याची तिची | त्यांची त्यांची |
| | त्याचे तिचे | त्यांचे त्यांचे |
| सप्तमी | त्याच्यात तिच्यात | त्यांच्यात त्यांच्यात |

***लक्षात ठेवा -***

*द्वितीया आणि चतुर्थी यांचे प्रत्यय एकच आहेत, पण जेव्हा वाक्यात कर्म असेल तेव्हा द्वितीया विभक्ती आणि इतर वेळी चतुर्थी विभक्ती असते.*

***स्वाध्याय -***

*१) पुढील नामांची विभक्ती ओळखा :*

*शेतांत, मुंबईहून, मुलांनो, मुली, वाघांना, टकलीची, कपड्यास, मला, झाडांची, त्याने, घरी, पोत्यांची.*

*२) पुढील नामे सर्व विभक्तीत लिहून दाखवा - अ) झाड ब) मूल*

# *कारकार्थ*

***विभक्तीचे प्रमुख कारकार्थ*** *- विभक्तीच्या योगाने नामाचे किंवा नामाप्रमाणे योजिलेल्या शब्दांचे क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी संबंध जोडला जातो, तो ज्या प्रकारचा संबंध असतो त्यास त्या विभक्तीचा अर्थ असे म्हणतात. हा संबंध त्या नामाला किंवा सर्वनामाला लागलेल्या विभक्ती प्रत्ययाने जोडला जातो.*

*उदा. सलोख मिलापला सांगतो. ह्या वाक्यात सलोख व मिलाप या नामांचा सांगतो या क्रियापदाशी संबंध आहे, सलोख या नामाची प्रथमा विभक्ती असून मिलाप या नामाची 'ला' प्रत्यय लागून द्वितीया विभक्ती आहे.*

*सलोख हा कर्ता व मिलाप हे कर्म आहे.*

*कोणतीही विभक्ती अशा प्रकारे ज्या प्रकारचा संबंध वाक्यातून दर्शविते त्यावरून तिचा कारकार्थ ठरतो. एका विभक्तीचे निरनिराळे कारकार्थ असू शकतात. प्रत्येक विभक्तीचा एक प्रमुख कारकार्थ असतो.*

***१) प्रथमा - कर्ता***

*उदा.* ***स्नेहल*** *शाळेत गेली. २)* ***कोमल*** *नाचते.*

*या वाक्यातील स्नेहल व कोमल हे प्रथमांत शब्द असून प्रथमेचा अर्थ कर्ता आहे.*

***२) द्वितीया - कर्म***

*उदा. १) अंकुशने चित्र काढले. २) रघूने मुंबई पाहिली*

*या वाक्यातील चित्र, मुंबई हे प्रथमांत शब्द असून प्रथमेचा अर्थ कर्म आहे.*

***३) तृतीया - करण (क्रियेचे साधन)***

*उदा. शीलाने चाकूने काकडी कापली.*

*या वाक्यात कापण्याची क्रिया चाकू या साधनाने होत असल्यामुळे म्हणजेच कापण्याचे साधन चाकू असल्याने हे चाकूने पद करण दर्शक आहे.*

***४) चतुर्थी - संप्रदान (उद्देशून)***

*उदा. कविताने कोमलला फूल दिले - काही धातूंना एक प्राणिवाचक चतुर्थ्यंत कर्म व दुसरे अप्राणिवाचक प्रथमान्त कर्म अशी दोन कर्मे असतात. प्रथमांत कर्मास प्रत्यक्ष कर्म व चतुर्थ्यांत कर्मास अप्रत्यक्ष कर्म असे म्हणतात. दिलेल्या वाक्यात फूल हे प्रथमांत कर्म असून कोमलला हे चतुर्थ्यांत कर्म आहे. त्या चतुर्थी विभक्तीचे अर्थ संप्रदान असे म्हणतात.*

***५) पंचमी-अपादान (अपादान म्हणजे एका गोष्टी पासून दुसरी दूर जाणे किंवा तिचा वियोग होणे)***

*एखाद्या क्रियेच्या संबंधाने ज्या पासून एखाद्या वस्तूचा वियोग दाखवायचा असतो, त्यास अपदान म्हणतात-*

*उदा. शिल्पा नागपूरहून नासिकला येईल, या ठिकाणी येण्याचे क्रिये संबंधाने शिल्पाचा नागपूरहून वियोग होत आहे असे विधान आहे. म्हणून 'नागपूरहून' हे अपादान कारक पद आहे.*

***६) षष्ठी-संबंध-*** *दोन वस्तूंचा संबंध षष्ठी प्रत्यययुक्त शब्दांनी दाखविला जातो.*

*उदा. सोन्याचा हार, हाराचे सोने या शब्दात सोने व हार यांचा संबंध षष्ठीच्या प्रत्ययाने दाखविलेला आहे. तसेच इतर.*
*उदा. दगडाची मूर्ती, मूर्तीचा दगड, टेबलाचे लाकूड, लाकडाचे टेबल, खुर्चीचा मालक, मालकाची खुर्ची इ.*

***७) सप्तमी- अधिकरण***

*स्थल व काळ ही दोन्ही अधिकरणेच मानतात.*

*उदा. सलोख, मिलाप व कोमल रोज सकाळी शाळेत जातात या वाक्यात जाण्याची क्रिया 'सकाळ' या काळी व 'शाळा' या स्थानी घडत असल्यामुळे 'सकाळी' व 'शाळेत' ही दोन्ही पदे अधिकरणवाचक आहेत, त्यापैकी 'सकाळी' हे कालाधिकरण व 'शाळेत' हे स्थळाधिकरण दाखविते.*

# *(४) वाक्य*

## *वाक्य*

***वाक्य** - पुऱ्या अर्थाच्या बोलण्यात दोन किंवा अधिक शब्द असतात.*

*केव्हा केव्हा एका शब्दाने देखील वाक्याचा अर्थ पुरा झाला असे वाटते. जा, ये, बैस.*

*पण या प्रत्येक शब्दाच्या मागे 'तू' हा शब्द गुप्त असतो. पुऱ्या अर्थाच्या प्रत्येक बोलण्यास 'वाक्य' असे म्हणतात.*

*वाक्य हे पुऱ्या अर्थाचे बोलणे असते.*

*उदा :*

*(१) नदी वाहते. हे एक वाक्य आहे. यात दोन शब्द आहेत. (२) 'मांजर दूध पिते'. हे ही एक वाक्य आहे. यात तीन शब्द आहेत.*

***स्वाध्याय : -***

*वाक्ये बनवा -*

*(१) शिक्षक मुलांना ............................*

*(२) ......................... दागिने घडवितो*

*(३) मी पुस्तक ......................*

*(४) ........................ वास येतो.*

*(५) पोपट पिंजऱ्यात ......................................*

*(६) ...................................... पाणी पितो.*

## *वाक्याचे दोन भाग*

*प्रत्येक वाक्यात आपण कोणाबद्दल तरी बोलतो, व काहीतरी बोलतो, उदा. 'शिवाजी राजा होता' या वाक्यात आपण शिवाजीबद्दल बोलतो, आणि शिवाजीबद्दल 'राजा होता' असे बोलतो.*

*म्हणून प्रत्येक वाक्याचे दोन भाग होतात. 'कोणाबद्दल बोलतो' तो एक भाग आणि 'काय बोलतो' हा दुसरा भाग.*

*वाक्याचे मुख्य भाग (अवयव) दोन आहेत -*

*(१) उद्देश्य २) विधेय*

***१) उद्देश्य** - ज्याच्या संबंधी किंवा ज्याला उद्देशून आपण बोलतो, म्हणजे ज्याच्याविषयी वाक्यात काही सांगितलेले असते, म्हणजेच ज्याच्याविषयी वक्ता बोलतो, त्यास उद्देश्य म्हणतात.*

***२) विधेय** - आपण उद्देश्याबद्दल जे काय बोलतो म्हणजेच जे विधान करतो त्यास विधेय म्हणतात.*

*उदा. शहाणा मुलगा अभ्यास करतो. या वाक्यात 'शहाणा मुलगा' उद्देश्य आहे आणि 'अभ्यास करतो' हे विधेय आहे.*

***उदा. -** १) मुले नियमितपणे शाळेत जातात.*

*२) नंदिता देवाला नमस्कार करते.*

*३) दिपिका दिव्याला शिकविते.*

| ***(कोणाबद्दल बोलतो)*** | ***(काय बोलतो)*** |
|---|---|
| ***उद्देश्य*** | ***विधेय*** |
| *१) मुले* | *नियमितपणे शाळेत जातात.* |
| *२) नंदिता* | *देवाला नमस्कार करते.* |
| *३) दिपिका* | *दिव्याला शिकविते.* |

***स्वाध्याय -***

*(१) खालील वाक्यातील उद्‌देश्य व विधेय ओळखा -*

*अ) मिलाप खेळतो. २) स्नेहल निबंध लिहिते. क) सलोख अभ्यास करतो.*

*२) खालील वाक्ये उद्‌देश्य घालून पुरी करा -*

*अ) ------ पराक्रमी होता. ब) ------ उडतात. क) ------- सूर्याभोवती फिरते.*

*३) खालील वाक्ये विधेय घालून पुरी करा -*

*अ) माथेरानची हवा ------. ब) आमची शाळा ------. क) तुझे पत्र ------.*

## *(४.१) वाक्यांचे प्रकार - १*

***वाक्यांचे प्रकार*** *- मुख्य प्रकार चार -*

*१) विधानार्थी वाक्य*

*२) आज्ञार्थी वाक्य*

*३) प्रश्नार्थक वाक्य*

*४) उद्‌गारार्थी वाक्य*

*१)* ***विधानार्थी वाक्य*** *- एखाद्या गोष्टी विषयी विधान केले जाते. त्या वाक्य प्रकारास विधानार्थी वाक्य म्हणतात. उदा. कावळयाने चिमणीची अंडी खाल्ली.*

*विधानार्थी वाक्याचे दोन भाग पडतात. अ) होकारार्थी वाक्य ब) नकारार्थी वाक्य.*

*अ)* ***होकारार्थी वाक्य*** *- या विधानातून एखाद्या कृतीचा होकार दर्शविला जातो.*

*उदा. १) मी दहीभात जेवीन. २) शिल्पाने कोमलला मारले.*

*ब)* ***नकारार्थी वाक्य*** *- या विधानातून एखाद्या कृतीचा नकार दर्शविला जातो.*

*उदा. १) अक्षय परीक्षेच्या वेळी गोष्टीची पुस्तके वाचत नाही. २) मिलाप में महिन्यात अभ्यास करीत नाही.*

*२)* ***आज्ञार्थी वाक्य*** *- क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, विनंती, प्रार्थना, उपदेश किंवा आशीर्वादाचा बोध होतो, त्यास आज्ञार्थी वाक्य म्हणतात.*

*उदा. १) मिलाप, तू हे गोष्टीचे पुस्तक आवडीने वाच. २) मुलांनी मनापासून अभ्यास करावा. ३) सलोख, तू मजेत प्रवास करून ये.*

*३)* ***प्रश्नार्थक वाक्य*** *- या प्रकाराची वाक्ये ही प्रश्न सूचक असतात. या वाक्यातून प्रश्नाचा बोध होतो.*

*उदा. १) तू किती वाजता शाळेत जाणार ? २) अशोक काय करतो ?*

*४)* ***उद्‌गारार्थी वाक्य*** *- ज्या वाक्यात एखाद्या भावनेची तीव्रता उद्‌गारातून स्पष्ट होते, त्या वाक्यास उद्‌गारार्थी वाक्य असे म्हणतात. या वाक्यात किती, केवढा, काय, इ. शब्द प्रयोग असतात.*

*उदा. १) काय ही बडबड ! २) अरे बापरे ! केवढा मोठा प्राणी हा ! यात आनंद, आश्चर्य, दुःख अशा एखाद्या भावनेतून निघणारे उद्‌गार आलेले असतात.*

*मूळ वाक्य रचना बदलून सांगितल्या प्रमाणे लिहिणे हेच वाक्य रूपांतर.*

## *(४.१) वाक्यांचे प्रकार - २*

***वाक्ये तीन प्रकारची आहेत -***

*१) केवल वाक्य*

*२) मिश्र वाक्य*

*३) संयुक्त वाक्य*

***१) केवल वाक्य** - ज्या वाक्यात एकच उद्‌देश्य असून एकच क्रियापद असते, त्यास केवल वाक्य असे म्हणतात. केवल वाक्याला शुद्‌ध वाक्य असेही म्हणतात.*

*उदा. अ) मिलाप शाळेत जातो. ब) स्नेहलने सुंदर चित्र काढले. क) सलोख नियमितपणे सायकल चालवितो. या तीनही वाक्यात प्रत्येकी एकच उद्‌देश्य असून एकच क्रियापद आहे.*

***२) मिश्र वाक्य** - या वाक्यात एक मुख्य वाक्य असून, त्यावर अवलंबून असणारी एक किंवा जास्त गौण वाक्ये असतात.*

*ज्या वाक्यात एक मुख्य उद्‌देश्य व एक मुख्य विधेय असते, आणि दोन किंवा अधिक क्रियापदे असतात, त्यास मिश्रवाक्य असे म्हणतात.*

*मिश्र वाक्यातील मुख्य उद्‌देश्य व मुख्य विधेय यानी होणारे जे वाक्य त्यास प्रधान वाक्य असे म्हणतात. आणि इतर वाक्यांस गौण वाक्य किंवा अवलंबी वाक्य असे म्हणतात.*

*उदा. १) 'जो मनुष्य चोरी करतो, त्यास शिक्षा होते.'*

*यात 'त्यास शिक्षा होते' हे मुख्य वाक्य असून 'जो मनुष्य चोरी करतो' हे त्यावर असलंबून असणारे गौण वाक्य होय.*

*२) 'मी आता शाळेत जाणार', असे सलोख म्हणाला.*

*यात 'सलोख म्हणाला' हे मुख्य वाक्य असून 'मी आता शाळेत जाणार' हे त्यावर अवलंबून असणारे गौण वाक्य होय.*

***३) संयुक्त वाक्य** - ज्या वाक्यामध्ये दोन अथवा अधिक प्रमुख वाक्ये असतात, त्यास संयुक्त वाक्य असे म्हणतात.*

*उदा. सलोख घरी आला आणि झोपला. या वाक्यात 'सलोख घरी आला', व 'आणि झोपला', ही दोन्ही मुख्य वाक्ये आहेत.*

*काही संयुक्त वाक्यात केवल व मिश्र वाक्यांचा संयोग झालेला असतो. हे संयोग तीन प्रकारचे असतात -*

*१) केवलकेवल संयोग*

*२) मिश्रमिश्र संयोग*

*३) केवलमिश्र संयोग*

***१) केवलसंयुक्त वाक्य** - केवलकेवल संयोग म्हणजेच दोन किंवा अधिक केवल वाक्यांचा संयोगाने होणारे वाक्य. त्यास केवलसंयुक्त वाक्य असे म्हणतात. उदा. मिलाप आला आणि लगेच गेला. या वाक्यात दोन केवल वाक्यांचा संयोग झालेला आहे.*

***२) मिश्रसंयुक्त वाक्य** - मिश्रमिश्र संयोग म्हणजेच दोन किंवा अधिक मिश्र वाक्यांच्या संयोगाने होणारे वाक्य. त्यास मिश्र संयुक्त वाक्य असे म्हणतात. उदा.*

*जो श्रीमंत असतो त्याला विद्येची गोडी नसते आणि ज्याला विद्येची गोडी असते त्याला अनुकूलता नसते. या वाक्यात दोन मिश्र वाक्यांचा संयोग झालेला आहे.*

***३) केवलमिश्र संयुक्त वाक्य** - केवलमिश्र संयोग म्हणजेच एक किंवा अधिक केवल वाक्ये आणि एक किंवा अधिक मिश्र वाक्ये ह्यांच्या संयोगाने होणारे वाक्य. यास केवलमिश्र संयुक्त वाक्य असे म्हणतात.*

*उदा. श्रीमंताला विद्या नको आणि ज्याला विद्या हवी असते त्याला शिकण्यापुरताही पैसा मिळत नाही.*

***विशेष सूचना :** संयुक्त वाक्यांचे हे पोटभेद सांगण्याची विशेष चाल नाही. तर या वाक्यांस सरसकट संयुक्त वाक्येच म्हणण्याचा परिपाठ आहे.*

***स्वाध्याय*** - *खालील वाक्यात केवल, मिश्र व संयुक्त असे वर्गीकरण करा*

*(१) स्नेहल रोज पोहावयास जाते.*

*(२) जो अभ्यास करील तो पास होईल.*

*(३) सलोख म्हणाला की मिलापने रस्त्यावर जाऊ नये व तिकडचे आईस्क्रीम खाऊ नये.*

*(४) सलोख व मिलाप अक्षयकडे गेले आणि बराच वेळ बसले, परंतु अखेरीस तो त्याना भेटला नाही.*

*(५) स्नेहल चित्रकलेच्या परिक्षेत 'अ' वर्गात पास झाली.*

## *(४.२) वाक्य परिवर्तनाचे प्रकार*

१) ***प्रश्नार्थी*** *व* ***विधानार्थी वाक्यांचे*** *परस्पर रूपांतर*

| ***प्रश्नार्थक वाक्य*** | ***विधानार्थी वाक्य*** |
|---|---|
| *अ) त्या भांड्यात कुठे पाणी आहे ?* | *अ) त्या भांड्यात पाणी नाही.* |
| *ब) मला कुठे सतार वाजवता येते ?* | *ब) मला सतार वाजवता येत नाही.* |

२) ***उद्‍गारार्थी*** *व* ***विधानार्थी वाक्यांचे*** *परस्पर रूपांतर*

| ***उद्‍गारार्थी वाक्य*** | ***विधानार्थी वाक्य*** |
|---|---|
| *अ) काय ही बडबड !* | *अ) ही फारच बडबड आहे.* |
| *ब) केवढी तहान लागलेली आहे त्या बिचाऱ्याला !* | *ब) त्या बिचाऱ्याला फारच तहान लागलेली आहे.* |

३) ***होकारार्थी*** *व* ***नाकारार्थी*** *वाक्यांचे परस्पर रूपांतर - हे रूपांतर करताना वाक्याचा अर्थ बदलता कामा नये.*

| ***होकारार्थी वाक्य*** | ***नकारार्थी वाक्य*** |
|---|---|
| *अ) हा खोटा अभिमान चुकीचा आहे.* | *अ) हा खोटा अभिमान बरोबर नाही.* |
| *ब) ती परीक्षेत पास होईल.* | *ब) ती परीक्षेत नापास होणार नाही.* |

## *(४.३) वाक्याचे पृथक्करण*

- *पुऱ्या अर्थाच्या शब्द समूहास वाक्य म्हणतात. वाक्यात दोन किंवा अधिक शब्द असतात. प्रत्येक वाक्यात कर्ता व क्रियापद ही असतात. क्रियापद सकर्मक असल्यास वाक्यात कर्म असते. क्रियापद अकर्मक असल्यास वाक्यात कर्म नसते. वाक्यात कर्ता, कर्म व क्रियापद याशिवाय इतर शब्दही असतात.*

- *कर्त्याविषयी जास्त माहिती सांगणारे शब्द कर्त्यापूर्वी येतात, कर्माविषयी जास्त माहिती सांगणारे शब्द कर्मापूर्वी येतात. व क्रियापदाविषयी जास्त माहिती सांगणारे शब्द क्रियापदापूर्वी येतात.*

*कर्त्याविषयी शब्द व कर्ता, (कर्म असल्यास) कर्माविषयी शब्द व कर्म, क्रियापदाविषयी शब्द व क्रियापद अशी साधारणतः वाक्यरचना असते.*

*उदा. रानटी पोपट झाडावरील पिकलेला पेरू भरभर खातो.*

*या वाक्यात 'रानटी पोपट' हे उद्‌देश्य व 'झाडावरील पिकलेला पेरू भरभर खातो' हे विधेय.*

*आता प्रत्येक भागाची पुन्हा फोड करू. कर्ता व कर्त्याचा विस्तार ही उद्‌देश्य भागात येतात. कर्म व कर्माचा विस्तार ही विधेय भागात येतात व क्रियापदाचा विस्तार व क्रियापदही विधेय भागातच येतात.*

***अ) उद्‌देश्य भागाचे दोन भाग पडतात.***

*१) कर्त्याचा विस्तार*

*२) कर्ता*

***ब) विधेय भागाचे चार भाग पडतात.***

*१) कर्माचा विस्तार,*

*२) कर्म,*

*३) क्रियापदाचा विस्तार,*

*४) क्रियापद.*

*अशा रीतीने वाक्याची फोड करणे यासच वाक्यपृथक्करण असे म्हणतात. वाक्यपृथक्करण म्हणजे वाक्याचे सर्व भाग निरनिराळे करणे.*

*तसेच वाक्याचे मुख्य भाग व पोट-भाग नीट ओळखून ते व्यवस्थितपणे लिहून दाखविणे यालाच वाक्यपृथक्करण म्हणतात.*

*वाक्ये -*

*१) आमचा काळा घोडा फार जोराने पळाला.*

*२) रानटी पोपट झाडावरील पिकलेला पेरू भरभर खातो.*

*३) आमचे छोटे बाळ हळूहळू चालते.*

*४) शेतकऱ्यांचे बैल जड नांगर नेटाने ओढतात.*

*खालील तक्त्यात उद्‌देश्य व विधेय असे दोन भाग पाडून वरील वाक्ये लिहू -*

***तक्ता***

| ***१) उद्‌देश्य*** | | ***२) विधेय*** |
|---|---|---|
| *१) आमचा काळा घोडा* | - | *फार जोराने पळाला.* |
| *२) रानटी पोपट* | - | *झाडावरील पिकलेला पेरू भरभर खातो.* |
| *३) आमचे छोटे बाळ* | - | *हळूहळू चालते.* |
| *४) शेतकऱ्यांचे बैल* | - | *जड नांगर नेटाने ओढतात.* |

*आता ह्याच वाक्यांचे सर्व भाग निरनिराळे करून वाक्यपृथक्करण कसे करता येते ते पाहू.*

## तक्ता

| | उद्देश्य | | विधेय | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | १ | २ | ३ | ४ |
| | कर्त्याचा विस्तार | कर्ता | कर्माचा विस्तार | कर्म | क्रियापदाचा विस्तार | क्रियापद |
| १) | आमचा काळा | घोडा | ----- | ---- | फार जोराने | पळतो. |
| २) | रानटी | पोपट | झाडावरील पिकलेला | पेरू | भरभर | खातो. |
| ३) | आमचे | बाळ | ----- | ---- | हळूहळू | चालते. |
| ४) | शेतकऱ्यांचे | बैल | जड | नांगर | नेटाने | ओढतात. |

**स्वाध्याय** - खालील वाक्यांचे वाक्यपृथक्करण करा...

१) रिक्शावाल्याने सात रुपये मागितले.

२) आमचा सलोख मुंबईच्या बोरीबंदर स्टेशनवर गेला.

३) कालचा प्रसंग माझ्या मित्राला सांगण्या सारखा आहे.

## *(४.४) वाक्याचे प्रयोग*

***प्रयोग** - वाक्याचे महत्त्वाचे घटक तीन आहेत. कर्ता, कर्म व क्रियापद. क्रिया करणारा कर्ता. ज्याच्यावर क्रिया घडते ते कर्म. कर्ता व कर्म ह्यांचा क्रियापदाशी संबंध असतोच. हा संबंध कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन, पुरूष ह्या संदर्भात असतो. क्रियापदाचे कर्त्याशी किंवा कर्माशी येणारा संबंध म्हणजेच प्रयोग होय.*

*मुख्य प्रयोग तीन आहेत -*

***१) कर्तरी प्रयोग***

***२) कर्मणी प्रयोग***

***३) भावे प्रयोग***

***१) कर्तरी प्रयोग** - कर्तरी प्रयोगात कर्त्याची विभक्ती प्रथमा असते ब) कर्माची विभक्ती द्‌वितीया असते. क) कर्त्याच्या लिंग, वचनाप्रमाणे क्रियापद बदलते. कर्तरी प्रयोगाचे दोन प्रकार - अ) सकर्मक कर्तरी ब) अकर्मक कर्तरी*

***अ) सकर्मक कर्तरी प्रयोग** - कर्तरी प्रयोगात जर कर्म असेल तर तो सकर्मक कर्तरी प्रयोग होय -*

*उदा. सलोख पुस्तक वाचतो. — कर्त्याच्या लिंगाप्रमाणे क्रियापद बदलते.*

*स्नेहल पुस्तक वाचते.*

*मुलगा चित्र काढतो. — कर्त्याच्या वचनाप्रमाणे क्रियापद बदलते.*

*मुले चित्र काढतात.*

***ब) अकर्मक कर्तरी प्रयोग** - कर्तरी प्रयोगात कर्म नसेल तर तो अकर्मक कर्तरी प्रयोग*

*उदा. स्नेहा हसते. नेहा झोपते. (कर्म नाही)*

***२) कर्मणी प्रयोग** - कर्माचे जे लिंग, वचन तेच लिंग, वचन क्रियापदाचे असते. अशा रचनेस कर्मणी प्रयोग म्हणतात. कर्म प्रथमात असते. कर्माप्रमाणे क्रियापद चालते. कर्त्याची विभक्ती तृतीया असते.*

*उदा. अ) मिलापने पेरू खाल्ला. ब) कविताने सफरचंद खाल्ले. क) अंकुशने काकडी खाल्ली. (कर्मच्या लिंगबदलानुसार क्रिया पद बदलते).*

*मिलापने पेरू खाल्ला.*

*कविताने (तृतीया विभक्ती) सफरचंद (प्रथमा) खाल्ले (लिंगबदल)*

*अंकुशने काकडी खाल्ली.*

*आईने पेढा दिला. आईने पेढे दिले.*

*आईने - (तृतीया) पेढा (प्रथमा) दिला, (वचनबदल)*

*आईने पेढे दिले.*

*कर्माच्या वचनानुसार क्रियापदाचे वचन बदलते.*

***३) भावे प्रयोग** - जेव्हा क्रियापदाचे रूप कर्ता, कर्म यांच्या लिंग, वचन व पुरुष इ. वर अवलंबून नसते, तेव्हा ते नेहमी तृतीया पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असे स्वतंत्र असते. अशा रचनेला 'भावे प्रयोग' म्हणतात.*

*उदा. तिने घरात रहावे. त्याने नोकरीस जावे.*

*भावे प्रयोगाचे प्रकार दोन आहेत.*

*अ) अकर्मक भावे — ब) सकर्मक भावे*

***अ) अकर्मक भावे** - ज्या भावे प्रयोगात कर्म नसते. तो अकर्मक भावे प्रयोग. त्याने उठावे. कर्ता तृतीयेत आहे.*

*समुद्रावर जाण्यास त्याला उजाडले. 'त्याला' हा कर्ता चतुर्थीत आहे.*

**ब) सकर्मक भावे** - ज्या भावे प्रयोगात कर्म असते, त्यास सकर्मक भावेप्रयोग असे म्हणतात.

उदा.
१) शिपायाने चोरास पकडले.
२) शिपायांनी चोरांना पकडले.-क्रियापद 'पकडले' स्वतंत्र. कर्म-चोरास, चोरांना (द्वितीयेत).

**कर्तरी प्रयोगाचे कर्मणी प्रयोगात रूपांतर**

| | कर्तरी | कर्मणी |
|---|---|---|
| १) | गाय गवत खाते. | गाईने गवत खाल्ले. |
| २) | सलोख अभ्यास करतो. | सलोखने अभ्यास केला. |

**कर्मणी प्रयोगाचे कर्तरी प्रयोगात रूपांतर**

| | कर्मणी | | कर्तरी |
|---|---|---|---|
| १) | स्नेहलने कविता लिहिली. | १) | स्नेहल कविता लिहिते. |
| २) | मिलापने चित्र काढले. | २) | मिलाप चित्र काढतो. |

स्वाध्याय - खालील वाक्यांचा प्रयोग ओळखा -

१) गाय चारा खाते. २) मिलापने आंबा खाल्ला. ३) स्नेहल दूध पिते. ४) सलोख गोष्टीचे पुस्तक वाचतो.
५) अक्षयने नाटक पाहिले. ६) शिल्पा अभ्यास करते. ७) कोमलने चित्र पाहिले

# (५) वर्ण विचार

***वर्णविचार*** *- आपल्या तोंडातून जे मूळचे ध्वनी निघतात त्यांना वर्ण म्हणतात. मराठी भाषेत एकूण ४८ वर्ण आहेत. त्यांना मूळाक्षरे असे ही म्हणतात. या वर्णाचे तीन प्रकार आहेत.*

***१) स्वर***

***२) स्वरादी***

***३) व्यंजने***

***१) स्वर*** *- ज्या वर्णाचा उच्चार स्वतंत्रपणे म्हणजे दुसऱ्या वर्णाच्या सहाय्यावाचून होतो, त्यास 'स्वर' असे म्हणतात, हे १२ स्वर आहेत, अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ. (स्वर हे पूर्ण उच्चाराचे असतात.)*

***२) स्वरादी*** *- ज्या वर्णाचा उच्चार अगोदर स्वरांचे सहाय्य घेऊन होतो, त्यास 'स्वरादी' म्हणतात, हे उच्चार दोन आहेत, अ + ं = अं - अनुस्वार, अ + ः = अः विसर्ग.*

***३) व्यंजने*** *- ज्या वर्णाचा उच्चार स्वरांच्या मागून सहाय्य घेऊन होतो, त्यांना व्यंजने म्हणतात. व्यंजनांचा उच्चार स्वरांशिवाय लंगडा पडतो, उदा. (त्, क्, म्, इ.) स्वर व स्वरादी - हे व्यंजनात मिळून बाराखडी तयार होते. उदा. क् + अ = क, क् + आ = का, क् + इ = कि इ.*

*व्यंजने एकूण ३४ आहेत. व्यंजने ही अपूर्ण उच्चाराचे वर्ण आहेत. क्, ख्, ग्, घ्, पासून ह्, ळ्, पर्यंतचे हे ३४ वर्ण स्वतंत्रपणे उच्चारता येत नाहीत. वर्णाचे भेद - मुखाच्या ज्या भागापासून वर्ण उच्चरले जातात, त्या भागास त्या वर्णाची स्थाने म्हणतात.*

***१) कंठ्य*** *- जे वर्ण कंठस्थानातून उच्चारले जातात, त्यांना कंठ्य वर्ण असे म्हणतात. उदा. अ, आ, क वर्ग, ह, विसर्ग हे कंठ्य वर्ण आहेत. (क वर्ग - क, ख, ग, घ, ङ)*

***२) तालव्य*** *- जे वर्ण तालुस्थानातून (टाळू) उच्चारले जातात, त्यांना तालव्य वर्ण असे म्हणतात. उदा. इ, ई, च वर्ग, य्, श, हे तालव्य वर्ण आहेत. (यातील, च्, छ्, ज्, झ्, या वर्णाचा उच्चार त्यांना य् लावून होणाऱ्या उच्चारासारखा होतो. उदा - चलन, छत्री, जल, झलक, या शब्दांतील च, छ, ज, झ या वर्णांचे उच्चार च् + य, छ् + य् झ् + य् असे होतात. (च वर्ग- च, छ, ज, झ, ञ)*

***३) मूर्धन्य*** *- (टाळ्याला जीभ लावून ज्याचा उच्चार करावा लागतो किंवा होतो असा वर्ण) जे वर्ण मूर्धस्थानातून उच्चारले जातात त्यांना मूर्धन्य वर्ण असे म्हणतात. उदा. ऋ, ट वर्ग र्, ष्, ळ्, (ट वर्ग - ट, ठ, ड, ढ, ण)*

***४) दंत्य*** *- जे वर्ण दंतस्थानातून उच्चारले जातात, त्यांना दंत्य वर्ण असे म्हणतात. उदा. लृ, त वर्ग, ल्, स्, हे दंत्य वर्ण होय. (त वर्ग - त, थ, द, ध, न)*

***५) ओष्ठ्य*** *- जे वर्ण केवळ ओठांद्वारे उच्चारले जातात, त्यांना ओष्ठ्य वर्ण असे म्हणतात. उदा. उ, ऊ, प वर्ग, हे ओष्ठ्य वर्ण आहेत. (प वर्ग - प, फ, ब, भ, म)*

***६) कंठतालव्य*** *- जे वर्ण उच्चारण्यासाठी कंठस्थान व तालुस्थान या दोन्ही स्थानांचे सहाय्य घ्यावे लागते, त्यांना कंठतालव्य वर्ण असे म्हणतात.*

*उदा. ए, ऐ, हे कंठतालव्य वर्ण आहेत.*

७) ***कंठौष्ठ्य*** - *जे वर्ण उच्चारण्यासाठी कंठ व ओठ या दोन्ही स्थानांचे सहाय्य घ्यावे लागते, त्यांना कंठौष्ठ्य वर्ण असे म्हणतात.*

*उदा. ओ, औ हे कंठौष्ठ्य वर्ण आहेत.*

८) ***दंतौष्ठ्य*** - *जे वर्ण उच्चारण्यासाठी दात व ओठ या दोन्ही स्थानांचे सहाय्य घ्यावे लागते, त्यांना दंतौष्ठ्य वर्ण असे म्हणतात.*

*उदा. 'व' हे दंतौष्ठ्य वर्ण आहे.*

९) ***दंततालव्य*** - *जे वर्ण उच्चारण्यासाठी दात व तालू या दोन्ही स्थानांचे सहाय्य घ्यावे लागते, त्यांना दंततालव्य वर्ण असे म्हणतात.*

*उदा. च्, छ्, ज्, झ्, हे दंत तालव्य वर्ण आहेत. (या वर्णाचा उच्चार त्यांना 'अ' लागून होणाऱ्या उच्चारासारखा होतो. चूक, चाकू, जमीन, झाड, इ. अशा वर्णाचे उच्चार आहेत)*

*(च् + अ, छ् + अ, ज् + अ, झ् + अ असे उच्चार होतात)*

***वर्णांचा तक्ता :-***

| | ***वर्णाचे नाव*** | ***स्वर*** | ***व्यंजने*** |
|---|---|---|---|
| १) | कंठ्य | अ, आ, | क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्, |
| २) | तालव्य | इ, ई, | च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श्,<br>(उच्चार च् + य्, छ् + य्, ज् + य्, झ् + य्, याप्रमाणे होतो) |
| ३) | मूर्धन्य | ऋ | ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ्, |
| ४) | दंत्य | | ऌ त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स्, |
| ५) | ओष्ठ्य | उ, ऊ, | प्, फ्, ब्, भ्, म्, |
| ६) | कंठ तालव्य | ए, ऐ, | ----- |
| ७) | कंठौष्ठ्य | ओ, औ | -------- |
| ८) | दंतौष्ठ्य | -------- | व्, |
| ९) | दंत तालव्य | ------- | च्, छ्, ज्, झ्,<br>(उच्चार - च् + अ, छ् + अ, ज् + अ, झ् + अ या प्रमाणे होतो) |

***मराठीत च्, ज्, झ्, ह्यांचे उच्चार दोन प्रकारचे असतात.***

***पहिला प्रकार - (तालव्य वर्ण)*** - *संस्कृत मधील-चरित्र, चाचा, चार, चहा, वाचन, विचार, चतुर, चंद्र, चक्र, चिमणी, चारदा, चाळीस, चैत्र, जागृती, जंगली, जग, जन, जळ, विजय, जयंती, झक्क, झलक, झकास, झब्बू छावा. (या वर्णांचा उच्चार त्यांना 'य्' लागून होणाऱ्या उच्चारासारखा होतो) उदा. च् + य् + अ = च्य, ज् + य् + अ = ज्य.*

***दुसरा प्रकार - (दंत तालव्य)*** - *चमचा, चोर, चारा, चाकू, चणे, चूक, चव, काच, चाल, पाच, चुरमुरे, चोच, चकती, चरखा, जाई, जुई, जमीन, जकात, जरीकाठी, जावक, जावई, जड, जाणे, झाड, झगडा, झटपट, झडप, झरा. (या वर्णांया उच्चार त्यांना 'अ' लागून होणाऱ्या उच्चारा सारखा होतो.) उदा. च् + अ = च, ज + अ = ज.*

***पहिल्या ५ वर्गातील व्यंजनात ३ भाग पाडलेले आहेत***

*१) **कठोर** २) **मृदू** ३) **अनुनासिक***

| | | क वर्ग | च वर्ग | ट वर्ग | त वर्ग | प वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | **कठोर** (श्वासाचा उपयोग) | क्, ख् | च्, छ् | ट्, ठ् | त्, थ् | प्, फ् |
| २) | **मृदू** (नादाचा उपयोग) | ग्, घ् | ज्, झ् | ड्, ढ् | द्, ध् | ब्, भ् |
| ३) | **अनुनासिक** | ङ् | ञ् | ण् | न् | म् |

*'क्ष्' व 'ज्ञ्' ही व्यंजने नाहीत. त्यांना जोडाक्षरे म्हणतात.*

*क्ष् = क् + ष्.        ज्ञ् = द् + न् + य्*

*अनुस्वारापुढे जर पाच वर्गातील कोणतेही व्यंजन आले, तर त्या व्यंजनाच्या वर्गातील शेवटच्या अनुनासिकाचा अनुस्वाराबद्दल उच्चार होतो.*

*उदा. ङ् - शंकर, ञ - चंचू, अंजन, ण् - घंटा, पंडित, न् -- पंत, मंद, म् - गुंफणे, शुंभ इ.*

**१) अर्धस्वर** - *ज्यांचा उच्चार अर्धवट 'इ, उ' या स्वरां सारखा होतो. त्यांचा संबंध त्या स्वरांशी अधिक असतो.*

*उदा. - य्, र्, ल्, व्, हे अर्धस्वर होय.*

**२) ऊष्म** - *ज्या वर्णाचा उच्चार प्रस्वर आहे, त्याना ऊष्म म्हणतात. उदा. श्, ष्, स् हे ऊष्मवर्ण होय.*

**३) महाप्राण** - *ज्याचा उच्चार करताना, फुफ्फुसातील हवा तोंडावाटे जोरात बाहेर फेकली जाते. त्या वर्णांना महाप्राण म्हणतात. 'ह' हे महाप्राण होय.*

**४) ळ** *हा वर्ण मराठीत स्वतंत्र वर्ण मानला जातो.*

***स्वाध्याय*** - *उत्तरे लिहा -*

*१) स्वर व व्यंजन यातील फरक कोणता ? २) स्वर कशाला म्हणतात ? ३) वर्ण किती प्रकारचे आहेत ?*
*४) मराठी वर्णमालेतील स्वर कोणते ? ५) च व ज चे उच्चार किती प्रकारचे असतात ? कोणते ? उदाहरणे द्या.*

# (६) संधी

***संधी*** *- आपल्या बोलण्यात अनेक जोडशब्दांचा वापर होत असतो. दोन किंवा दोनाहून अधिक शब्द एकत्र जोडलेले असतात. पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण यांच्या मिश्रणाने एक वर्ण तयार होतो. अशाप्रकारे दोन वर्ण एकत्र करण्याच्या प्रकारास संधी असे म्हणतात. संधी या शब्दाचा अर्थ आहे सांधणे किंवा जोडणे.*

*संधीचे प्रकार तीन आहेत -*

1) ***स्वर संधी***
2) ***व्यंजन संधी***
3) ***विसर्गसंधी***

**१)** ***स्वर संधी*** *- दोन स्वर एकत्र येऊन जेव्हा संधी होते, तेव्हा त्या प्रकारास स्वर संधी असे म्हणतात. स्वरसंधीच्या नियमानुसार ५ प्रकारे संधी होते.*

**अ)** ***दोन सजातीय स्वर*** *- ऱ्हस्व स्वरापुढे ऱ्हस्व किंवा दीर्घ अथवा दीर्घ स्वरापुढे दीर्घ किंवा ऱ्हस्व स्वर आल्यास त्या दोहो बद्दल सजातीय दीर्घ स्वर होतो.*

**१)** *(अ + अ = आ, अ + आ = आ, आ + आ = आ)*

*उदा.*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| देव | + | आलय | = | देवालय |
| (अ | + | आ | = | आ) |
| ग्रंथ | + | आलय | = | ग्रंथालय |
| सिंह | + | आसन | = | सिंहासन |
| दर्भ | + | आसन | = | दर्भासन |
| सत्य | + | आग्रह | = | सत्याग्रह |
| वृक्ष | + | आरोपण | = | वृक्षारोपण |
| भ्रष्ट | + | आचार | = | भ्रष्टाचार |
| श्वेत | + | आवरण | = | श्वेतावरण |
| वाचन | + | आलय | = | वाचनालय |
| गोल | + | आकार | = | गोलाकार |
| अरूण | + | आचल | = | अरूणाचल |
| हिम | + | आलय | = | हिमालय |
| उप | + | आहार | = | उपाहार |
| जल | + | आशय | = | जलाशय |
| दिव्य | + | आसन | = | दिव्यासन |

*(आ + अ = आ)*

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परीक्षा | + | अर्थी | = | परीक्षार्थी |
| विद्या | + | अभ्यास | = | विद्याभ्यास | विद्या | + | अर्थी | = | विद्यार्थी |
| भाषा | + | अंतर | = | भाषांतर | भाषा | + | अभ्यास | = | भाषाभ्यास |
| | | | | | गज | + | आनन | = | गजानन |

(अ + अ = आ)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्व | + अनुभव | = | स्वानुभव | | सुर | + असुर | = | सुरासुर |
| हर्ष | + अतिरेक | = | हर्षातिरेक | | अल्प | + अवकाश | = | अल्पावकाश |
| नगर | + अध्यक्ष | = | नगराध्यक्ष | | कुसुम | + अग्रज | = | कुसुमाग्रज |
| देव | + अवतार | = | देवावतार | | भव | + अर्णव | = | भवार्णव |
| देश | + अंतर | = | देशांतर | | मान | + अपमान | = | मानापमान |
| गण | + अधीश | = | गणाधीश | | स्नेह | + अंकित | = | स्नेहांकित |
| हस्त | + अक्षर | = | हस्ताक्षर | | सूर्य | + अस्त | = | सूर्यास्त |
| गेह | + अंगना | = | गेहांगना | | क्षण | + अर्ध | = | क्षणार्ध |

(आ + आ = आ)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुर्वा | + आच्छादित | = | दुर्वाच्छादित | | महा | + आत्मा | = | महात्मा |
| महिला | + आश्रम | = | महिलाश्रम | | विद्या | + आलय | = | विद्यालय |
| | | | | | राजा | + आज्ञा | = | राजाज्ञा |

२) (इ + इ = ई, इ + ई = ई, ई + इ = ई, ई + ई = ई)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रवि | + इंद्र | = | रवींद्र | | मुनि | + इच्छा | = | मुनीच्छा |
| हरि | + इच्छा | = | हरीच्छा | | कवि | + ईश्वर | = | कवीश्वर |
| कवि | + इच्छा | = | कवीच्छा | | कवि | + ईश | = | कवीश |
| ऋषि | + ईश्वर | = | ऋषीश्वर | | मही | + इंद्र | = | महींद्र |
| देवी | + इच्छा | = | देवीच्छा | | गिरी | + ईश | = | गिरीश |
| पार्वती | + ईश | = | पार्वतीश | | | | | |
| मही | + ईश | = | महीश | | | | | |

३) (उ + उ = ऊ, ऊ + उ = ऊ, उ + ऊ = ऊ, ऊ + ऊ = ऊ)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गुरु | + उपदेश | = | गुरूपदेश | | भानू | + उदय | = | भानूदय |
| धेनु | + उर्जित | = | धेनूर्जित | | लधू | + उत्तम | = | लघूत्तम |
| भू | + उद्धार | = | भूद्धार | | सिंधू | + उर्मी | = | सिंधूर्मी |
| साधू | + उक्ती | = | साधूक्ती | | | | | |
| भू | + उर्जित | = | भूर्जित | | | | | |

## आ) विजातीय स्वर संधी :-

१) अ किंवा आ या स्वरापुढे इ आल्यास त्या दोहों बद्दल 'ए' येतो, उ किंवा ऊ आल्यास 'ओ' येतो व 'ऋ' आल्यास अर येतो.

अ + ई = ए, आ + इ = ए, अ + ऊ = ओ, अ + उ = ओ, अ + ऋ = अर्
अ + इ = ए, आ + ई = ए, आ + ऊ = ओ, आ + उ = ओ, आ + ऋ = अर्

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| परम | + ईश्वर | = परमेश्वर | गण | + ईश | = गणेश |
| ईश्वर | + इच्छा | = ईश्वरेच्छा | यथा | + इष्ट | = यथेष्ट |
| रमा | + ईश | = रमेश | लंका | + ईश्वर | = लंकेश्वर |
| भोजन | + इच्छा | = भोजनेच्छा | चक्र | + ईश्वर | = चक्रेश्वर |
| ओंकार | + ईश्वर | = ओंकारेश्वर | शुभ | + इच्छा | = शुभेच्छा |
| अरण्य | + ईश्वर | = अरण्येश्वर | सूर्य | + उदय | = सूर्योदय |
| धारा | + उष्ण | = धारोष्ण | गंगा | + ऊर्मी | = गंगोर्मी |
| सर्व | + उत्कृष्ट | = सर्वोत्कृष्ट | ग्राम | + उद्योग | = ग्रामोद्योग |
| महिला | + उपयोगी | = महिलोपयोगी | भीमा | + उर्मी | = भीमोर्मी |
| युद्ध | + उत्तर | = युद्धोत्तर | दक्षिण | + उत्तर | = दक्षिणोत्तर |
| शीत | + उदक | = शीतोदक | सुख | + उपभोग | = सुखोपभोग |
| शाला | + उपयोगी | = शालोपयोगी | महा | + ऋषी | = महर्षी |
| देव | + ऋषी | = देवर्षी | ब्रह्म | + ऋषी | = ब्रह्मर्षी |
| सप्त | + ऋषी | = सप्तर्षी | उमा | + ईश | = उमेश |
| महा | + ईश | = महेश | पर्वत | + ईश | = पर्वतेश |
| राष्ट्र | + इतिहास | = राष्ट्रेतिहास | देव | + इंद्र | = देवेंद्र |
| | | | महा | + उत्सव | = महोत्सव |
| | | | अल्प | + उपहार | = अल्पोपहार |
| | | | लंब | + उदर | = लंबोदर |
| | | | ग्राम | + उद्धार | = ग्रामोद्धार |

२) अ किंवा आ यांच्यापुढे ए किंवा ऐ आल्यास त्या दोहों ऐवजी 'ऐ' येतो. आणि ओ, औ आल्यास त्या ऐवजी 'औ' येतो.

अ + ए = ऐ, आ + ए = ऐ, आ + ओ = औ, अ + ओ = औ
अ + ऐ = ऐ, आ + ऐ = ऐ, आ + औ = औ, अ + औ = औ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मत | + ऐक्य | = मतैक्य | सदा | + एव | = सदैव |
| प्रजा | + ऐक्य | = प्रजैक्य | एक | + एक | = एकैक |
| देव | + ऐश्वर्य | = देवैश्वर्य | क्षण | + एक | = क्षणैक |
| नृप | + ऐश्वर्य | = नृपैश्वर्य | ब्रह्म | + ऐक्य | = ब्रह्मैक्य |
| गंगा | + ओघ | = गंगौघ | भव | + औषध | = भवौषध |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बाल | + औत्सुक्य | = बालौत्सुक्य | रमा | + औदार्य | = | रमौदार्य |
| जल | + ओघ | = जलौघ | उष्ण | + ओघ | = | उष्णौघ |
| जल | + औषधी | = जलौषधी | पितृ | + औत्सुक्त | = | पित्रौत्सुक्य |
| कथा | + ओघ | = कथौघ | वन | + औषधी | = | वनौषधी |

३) ऱ्हस्व किंवा दीर्घ इ, उ, ऋ यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास 'इ, ई' बद्दल 'य', उ, ऊ बद्दल 'व' आणि 'ऋ' बद्दल 'र' हे वर्ण येतात आणि त्यात स्वर मिसळून संधी पूर्ण होतो.

ई + ओ = य, इ + उ = य, अ + इ = य, अ + ई = य, आ + ई = य, अ + ऊ = व,
अ + उ = व, आ + ऊ = व, आ + उ = व, ऋ + आ = र, र् + आ = रा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अधि | + अयन | = अध्ययन | इति | + आदि | = इत्यादि |
| नदी | + ओघ | = नद्योघ | कोटी | + अवधी | = कोट्यावधी |
| अति | + उत्तम | = अत्युत्तम | स्थिती | + अंतर | = स्थित्यंतर |
| अति | + आदर | = अत्यादर | प्रति | + एक | = प्रत्येक |
| रवि | + उदय | = रव्युदय | मनु | + अंतर | = मन्वंतर |
| गुरू | + आज्ञा | = गुर्वाज्ञा | अनु | + अर्थ | = अन्वर्थ |
| गुरू | + ईश | = गुर्वीश | सु | + आगत | = स्वागत |
| पितृ | + आज्ञा | = पित्राज्ञा | पितृ | + अर्थ | = पित्रर्थ |
| पितृ | + औदार्य | = पित्रौदार्य | प्रति | + अक्ष | = प्रत्यक्ष |
| | | | सु | + अल्प | = स्वल्प |

४) ए, ऐ, ओ, औ या स्वरांपुढे कोणताही स्वर आला तर त्याबद्दल अनुक्रमे 'अय्, आय्, अव्, आव्', असे आदेश होतात व त्यात स्वर मिळून संधी होतो.

उदा.

| | | | |
|---|---|---|---|
| गै | + अन् | = गायन | (ऐ + अ = आय) |
| गो | + ईश्वर | = गवीश्वर | (ओ + ई = अव + इ = अवी) |
| ने | + अन | = नयन | (ए + अ = अय) |
| नौ | + इक | = नाविक | (औ + ई = आव् + इ = आवि) |

५) निव्वळ मराठी शब्दात केव्हा केव्हा संधीयुक्त अक्षरापैकी पहिले अक्षर स्वर कायम राहून दुसऱ्याचा लोप होतो. या उलट कधी दुसरे अक्षर स्वर कायम राहून पहिल्या अक्षराचा लोप होतो. त्याला अनुक्रमे पूर्वरूप संधी व पररूप संधी म्हणतात.

उदा.,

पूर्वरूप संधी - दुसरा स्वर लोप पावतो व पहिला स्वर कायम राहतो.

खिडकी + आत = खिडकीत (ई + आ = ई)

केले + असे = केलेसे

काही + असा = काहीसा

पररूप संधी - पहिला स्वर लोप पावतो व दुसरा स्वर कायम राहतो.

घर + ई = घरी

दार + ई = दारी

हात + ऊन = हातून

घर + ऊन = घरून

२) **व्यंजनसंधी -** जेव्हा एखाद्या व्यंजनात शब्दांच्या पुढे व्यंजन किंवा स्वर असतो. तेव्हा व्यंजन संधी घडून येतो.

**व्यंजनसंधीचे नियम -**

**अ)** पहिल्या ५ वर्गापैकी (अनुनासिक) सोडून कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले तर, पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो.

उदा.

द् + क = त् + क् = त्क्, भ् + प् = प् + प् = प्प्

| | | | |
|---|---|---|---|
| शरद् | + काल | = | शरत्काल |
| कुकुभ् | + प्रांत | = | कुकुप्प्रांत |
| क्षुध् | + पीडा | = | क्षुत्पीडा |
| विपद् | + काल | = | विपत्काल |
| वाक् | + तांडन | = | वाक्तांडन |
| क्षुध् | + पिपास | = | क्षुत्पिपास |
| हृद् | + पटल | = | हृत्पटल |
| सत् | + परुष | = | सत्पुरुष |
| दिक् | + पथ | = | दिक्पथ |
| सत् | + संगती | = | सत्संगती |

**आ)** पहिल्या पाच वर्गातील कठोर व्यंजनापुढे (अनुनासिका खेरीज) स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तृतीय व्यंजन येउन संधी होतो.

उदा.

वाक् + विहार = वाग् विहार

क् + व = ग् + व

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सत् | + जन | = | सज्जन | सत् | + इच्छा | = | सदिच्छा |
| जगत् | + उद्धार | = | जगदुद्धार | जगत | + आधार | = | जगदाधार |
| सत् | + आचार | = | सदाचार | आच् | + आदी | = | आजादी |
| षट् | + रिपू | = | षड्रिपू | दिक् | + विजय | = | दिग्विजय |
| षट् | + आनन | = | षडानन | अप् | + ज | = | अब्ज |
| क्षुत् | + भय | = | क्षुद्भय | जगत् | + एक | = | जगदेक |
| सत् | + वचन | = | सद्वचन | सत् | + उपदेश | = | सदुपदेश |
| वाक् | + विचार | = | वाग्विचार | दिक् | + अंबर | = | दिगंबर |
| वाक् | + बाण | = | वाग्बाण | जगत् | + ईश्वर | = | जगदीश्वर |
| सत् | + बुद्धी | = | सद्बुद्धी | सत् | + आंनद | = | सदानंद |

(**टीप** - हे नियम लावताना 'च्, ज्, श' या बद्दल 'क' होता).

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाच् (क) | + ईश | = | वागीश | दिक् | + अंत | = | दिगंत |
| दृश् (क्) | + गोचर | = | दृग्गोचर | दिक् | + गोल | = | दिग्गोल |
| वाक् | + विलास | = | वाग्विलास | सत् | + वर्तन | = | सद्वर्तन |
| जगत् | + अंबा | = | जगदंबा | चित् | + आभास | = | चिदाभास |
| वाक् | + विहार | = | वग्विहास | चित् | + आनंद | = | चिदानंद |

(ई) पहिल्या पाच वर्गातील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजना बद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| जगत् | + नाथ | = जगन्नाथ | | | | |
| त् + न् | = न् + न् | = न्न | जगत् | + माता | = | जगन्माता |
| तत् | + मय | = तन्मय | चित् | + मात्र | = | चिन्मात्र |
| सत् | + मान | = सन्मान | जगत् | + मान्य | = | जगन्मान्य |
| सत् | + मती | = सन्मती | वाक् | + निश्चय | = | वाङनिश्चय |
| सत् | + मुख | = सन्मुख | षट् | + मुख | = | षण्मुख |
| तत् | + निवास | = तन्निवास | षट् | + मास | = | षण्मास |
| वाक् | + मय | = वाङमय | मन् | + मन् | = | मन्मन |
| बृहत् | + महाराष्ट्र | = बृहन्महाराष्ट्र | जगत् | + मोहिनी | = | जगन्मोहिनी |
| सत् | + मार्ग | = सन्मार्ग | | | | |

१) त् या व्यंजनापुढे च्, छ, आल्यास त् चा च्, होतो.

सत् + चरित्र = सच्चरित्र

उत् + छेद = उच्छेद

चलत् + चित्रपट = चलच्चित्रपट

२) त् या व्यंजनापुढे ज् किंवा झ् आल्यास त् चा ज् होतो.

उत् + ज्वल = उज्ज्वल

शरत् + झंझावात = शरज्झंझावात

सत् + जन = सज्जन

३) त् या व्यंजना पुढे ट् आल्यास त् बद्दल ट् व ड् आल्यास त् बद्दल ड् हे व्यंजन येते.

तत् + टीका = तट्टीका

भगवत् + डमरू = भगवड्डमरू

४) त् या व्यंजनापुढे ल् आल्यास त् बद्दल ल् होतो.

तत् + लीन = तल्लीन

विद्युत् + लता = विद्युल्लता

उत् + लंघन = उल्लंघन

५) 'त्' पुढे 'श्' आल्यास त् चा च् होतो व 'श्' चा 'छ्' होतो.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| महत् | + शक्ती | = महच्छक्ती | श्रीमत् | + शंकर | = | श्रीमच्छंकर |
| सत् | + शास्त्र | = सच्छास्त्र | सत् | + शील | = | सच्छील |
| सत् | + शिष्य | = सच्छिष्य | उत् | + शिष्ट | = | उच्छिष्ट |
| मृत | + शकटिक | = मृच्छकटिक | | | | |

३) ***विसर्गसंधी*** - *विसर्ग लिहून दाखविण्यासाठी (:) असे चिन्ह वापरतात, त्याचा उच्चार 'ह' कारा सारखा करतात. विसर्ग शेवटी आला तर शब्दाचा शेवट विसर्ग उच्चारानेच होतो.*

***विसर्गसंधीचे नियम -***

*(अ) विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर असून त्याच्या पुढे मृदु व्यंजन आले असल्यास विसर्गाचा 'उ' होतो व तो मागील 'अ' मध्ये मिळून त्याचा 'ओ' होतो.*

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मन: | + रथ | = | मनोरथ | | | | |
| (मन+उ = ओ+रथ | | = | मनोरथ) | मनः | + रंजन | = | मनोरंजन |
| मन: | + राज्य | = | मनोराज्य | अध: | + वदन | = | अधोवदन |
| मन: | + विकार | = | मनोविकार | पय: | + अन्वित | = | पयोन्वित |
| तेज: | + निधी | = | तेजोनिधी | यश: | + गिरी | = | यशोगिरी |
| तप: | + धन | = | तपोधन | तप: | + बल | = | तपोबल |
| तेज: | + गोल | = | तेजोगोल | वय: | + मान | = | वयोमान |
| रज: | + गुण | = | रजोगुण | तम: | + गुण | = | तमोगुण |
| अध: | + गती | = | अधोगती | वयः | + वृद्ध | = | वयोवृद्ध |
| | | | | यशः | + धन | = | यशोधन |

*आ) विसर्गामागे अ, आ, खेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदु वर्ण आल्यास विसर्गाचा 'र' होऊन संधी होतो.*

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नि: | + अंतर | = | निरंतर | निः | + आकार | = | निराकार |
| (नि+र् | + अंतर | = | निरंतर) | आयुः | + वेद | = | आयुर्वेद |
| दु: | + आत्मा | = | दुरात्मा | नि: | + अपराध | = | निरपराध |
| दु: | + लक्ष | = | दुर्लक्ष | नि: | + वासित | = | निर्वासित |
| दु: | + जन | = | दुर्जन | नि: | + मळ | = | निर्मळ |
| दु: | + विलास | = | दुर्विलास | दु: | + दुशा | = | दुर्दशा |
| नि: | + विकार | = | निर्विकार | नि: | + लोभ | = | निर्लोभ |
| बहि: | + देश | = | बहिर्देश | दु: | + मुख | = | दुर्मुख |
| दुः | + दैव | = | दुर्दैव | बहिः | + अंग | = | बहिरंग |
| निः | + धन | = | निर्धन | निः | + आधार | = | निराधार |
| दुः | + गमन | = | दुर्गमन | पुनः | + आगमन | = | पुनरागमन |
| निः | + भय | = | निर्भय | दुः | + भाग्य | = | दुर्भाग्य |
| | | | | निः | + व्यसनी | = | निर्व्यसनी |

*टीप -*

*विसर्गाबद्दल 'र' येऊन पुन्हा यापुढे 'र्' हा वर्ण आला तर पहिला 'र्' लोप होऊन त्यामागील स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो.*

| | | | |
|---|---|---|---|
| नि: | + रस | = | नीरस |
| (नि+र् | + रस | = | नीरस) |
| नि: | + रदन | = | नीरदन |
| नि: | + रव | = | नीरव |

इ) *विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर असून पुढे क्, ख्, प्, फ्, या पैकी एखादे व्यंजन आले तर विसर्ग कायम राहतो मात्र पुढे दुसरे स्वर आल्यास विसर्गाचा लोप होतो.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *प्रातः* | *+ काल* | *= प्रातःकाल* | *रजः* | *+ करण* | *= रजःकरण* |
| *मनः* | *+ प्रवृती* | *= मनःप्रवृती* | *मनः* | *+ कल्पित* | *= मनःकल्पित* |
| *अधः* | *+ पतन* | *= अधःपतन* | *तेजः* | *+ पुंज* | *= तेजःपुंज* |
| *अंतः* | *+ पटल* | *= अन्तःपटल* | *मनः* | *+ पूत* | *= मनःपूत* |
| *अन्तः* | *+ कलह* | *= अन्तःकलह* | *रजः* | *+ कण* | *= रजःकण* |

ई) *विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून पुढे क् ख् प् फ् यापैकी कोणताही वर्ण आल्यास विसर्गाबद्दल 'ष्' येऊन संधी होतो.*

*निः + पाप = निष्पाप*

*(नि + ष् + पाप = निष्पाप)*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *निः* | *+ क्रिय* | *= निष्क्रिय* | *दुः* | *+ परिणाम* | *= दुष्परिणाम* |

***अपवाद*** *- दुः+ख = दुःख*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *दुः* | *+ कर्म* | *= दुष्कर्म* | *दुः* | *+ काळ* | *= दुष्काळ* |
| *निः* | *+ कारण* | *= निष्कारण* | *दुः* | *+ किर्ती* | *= दुष्कीर्ती* |
| *निः* | *+ कपट* | *= निष्कपट* | *दुः* | *+ कृत्य* | *= दुष्कृत्य* |
| *निः* | *+ फळ* | *= निष्फळ* | *दुः* | *+ प्रवृत्ती* | *= दुष्प्रवृत्ती* |

उ) *विसर्गाच्या पुढे च्, छ् आल्यास विसर्गाचा 'श्' होतो ट्, ठ्, आल्यास विसर्गाचा ष होतो आणि त्, थ् आल्यास विसर्गाचा 'स्' होतो*

*निः + चल = निश्चल*

*(नि+श+चल)*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *दुः* | *+ चरित्र* | *= दुश्चरित्र* | *मनः* | *+ चक्षु* | *= मनश्चक्षु* |
| *दुः* | *+ चिन्ह* | *= दुश्चिन्ह* | *निः* | *+ चित* | *= निश्चित* |

*मनः+ताप = मनस्ताप*

*(मन+स्+ताप)*

*अधः + तळ = अधस्तळ*

*निः + चित = निश्चित*

*निः + तेज = निस्तेज*

*दुः + तर = दुस्तर*

*रामः + टीकते = रामष्टीकते (राम + ष् + टीकते)*

ऊ) *विसर्गाच्या पुढे श् स् आल्यास विसर्ग कायम राहतो किंवा त्याच्याबद्दल श् स् येतो.*

*दुः + शासन = दुःशासन किंवा दुश्शासन*

*निः + संदेह = निःसंदेह किंवा निस्संदेह*

*निः + संतान = निःसंतान किंवा निस्संतान*

*दुः + शील = दुःशील किंवा दुश्शील*

*निः + शब्द = निःशब्द किंवा निश्शब्द*

*निः + शंक = निःशंक किंवा निश्शंक*

*ए) विसर्गाच्या पुढे 'कृ' धातू चे कोणतेही रूप (कर, कार) आल्यास विसर्गाचा 'स्' होतो*

*पुरः + कार = पुरस्कार*

*तिरः + कार = तिरस्कार*

***स्वाध्याय -***

*(अ) पुढील शब्दांचे संधी करा -*

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अति | + | अंत = |
| (२) | मही | + | ईश = |
| (३) | काही | + | असा = |
| (४) | षट् | + | मास = |
| (५) | सत् | + | जन = |
| (६) | उत् | + | लंघन = |
| (७) | पुरः | + | कर्ता = |
| (८) | निः | + | इच्छ = |
| (९) | तपः | + | बल = |
| (१०) | आशिः | + | वचन = |

*(आ) पुढील शब्दातील संधी सोडवून कोणता बदल झाला ते लिहा -*

*१) सन्मान २) भगवन्नाम ३) दैवाधीन ४) फलाहार ५) रजोगुण ६) निष्कपट ७) दुर्दैव ८) तल्लीन ९) लंबोधर १०) कित्येक.*

# (७) समास

***समास -** दोन किंवा दोनांपेक्षा अधिक शब्दामधील विभक्ती प्रत्यय अथवा संबंध दर्शक शब्द गाळून त्यापासून जो एक संयुक्त शब्द बनविला जातो त्या पद्धतीस 'समास' म्हणतात, अशा रीतीने तयार झालेल्या संयुक्त (जोडशब्द) शब्दाला सामासिक शब्द म्हणतात.*

*उदा.,- राजाचा वाडा - राजवाडा हा सामासिक शब्द.*

*ज्या निरनिराळ्या शब्दांचा समास बनतो त्या शब्दांना समासातील पदे असे म्हणतात.*

*उदा.,- राजवाडा या समासातील राजा व वाडा ही दोन पदे आहेत.*

*समास कसा तयार झाला हे स्पष्ट करण्यासाठी त्यात जोडल्या जाणाऱ्या शब्दांना आवश्यक ते प्रत्यय लावून किंवा काही ठिकाणी अन्य शब्दांचे सहाय्य घेऊन त्यांची फोड करावी लागते. ह्या फोड करण्याच्या पद्धतीला त्या समासाचा विग्रह असे म्हणतात.*

*उदा., १) तोंडपाठ तोंडाने पाठ (विग्रह) २) सत्यासत्य - सत्य किंवा असत्य*

***समासाचे एकूण चार प्रकार आहेत***

***१) अव्ययीभाव समास***

***२) तत्पुरूष समास***

***३) द्‌वंद्‌व समास***

***४) बहुव्रिही समास***

***१) अव्ययीभाव समास - किंवा (प्रथमपद प्रधान समास) -** ज्या समासात विशेषतः पहिले पद मुख्य असते किंवा पहिला शब्द अव्यय असतो आणि सर्व मिळून तो समसिक शब्द क्रियाविशेषण अव्यय होतो, त्या समासास अव्ययीभाव समास असे म्हणतात.*

*उदा.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आजन्म | - | जन्मापासून | प्रतिवर्ष | - | प्रत्येक वर्षी |
| आमरण | - | मरणापर्यंत | यथाशक्ती | - | शक्ती प्रमाणे |
| प्रतिदिन | - | प्रत्येक दिवशी | दारोदार | - | प्रत्येकदारी |
| काठोकाठ | - | काठापर्यत | देशोदेशी | - | प्रत्येक देशात |
| घडोघडी | - | प्रत्येक घडीला | गावोगाव | - | दर गावी |
| प्रतिक्षण | - | प्रत्येक क्षणी | यथाविधी | - | विधीप्रमाणे |
| यथान्याय | - | न्यायाप्रमाणे | यथाशास्त्र | - | शास्त्राप्रमाणे |
| यथाक्रम | - | क्रमाप्रमाणे | यथायोग्य | - | योग्य असे |
| यथायुक्त | - | युक्त असे | दिवसेंदिवस | - | प्रत्येक दिवशी |
| दरसाल | - | प्रत्येक साली | क्षणोक्षणी | - | प्रत्येक क्षणाला |
| हरघडी | - | प्रत्येक घडीला | जागोजाग | - | प्रत्येक जागी |
| रस्तोरस्ती | - | प्रत्येक रस्ती | गल्लोगल्ली | - | प्रत्येक गल्लीत |
| आळोआळी | - | प्रत्येक आळीत | आकंठ | - | कंठापर्यंत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विनाकारण | - | करणाशिवाय | अनुरूप | - | रूपास योग्य |
| बेकायदा | - | कायद्या विरूद्ध | गैरहजर | - | हजर नसलेला |
| बिनतक्रार | - | तक्रार न करता | नापसंत | - | पसंत नसलेला |
| यावज्जीव | - | जीव असेपर्यंत | गैरवाजवी | - | वाजवी नसलेला |
| गैरशिस्त | - | शिस्त नसलेला | बारामास | - | बारामहिने पर्यंत |
| बेसुमार | - | सुमार नसलेले | बिनतोड | - | तोड नसलेला |
| आसेतुहिमाचल | - | सेतूपासून हिमाचला पर्यंत | | | |

२) ***तत्पुरूष समास - द्वितीय पद प्रधान समास -*** *ज्या समासात दुसरे पद मुख्य असते आणि अर्थदृष्टया गाळलेला विभक्ती प्रत्यय किंवा शब्द विग्रहामध्ये घालावे लागतात, त्या समासास तत्पुरूष समास असे म्हणतात.*

***तत्पुरूष समासाचे प्रकार -***

***अ) विभक्ती तत्पुरुष समास,***

***आ) उपपद तत्पुरुष समास,***

***इ) कर्मधारय समास,***

***ई) दृविगू समास,***

***उ) मध्यमपद लोपी समास***

### *अ) विभक्ती तत्पुरुष समास -*

### *१) द्वितीया तत्पुरुष समास -*

*मनः + ताप = मनाला ताप = मनस्ताप*

*दुःखप्राप्त = दुःखाला प्राप्त  देशगत = देशास गत*

### *२) तृतीया तत्पुरुष समास -*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| परस्परनिगडित | = | परस्पराशी निगडित | | | |
| ईश्वरनिर्मित | = | ईश्वराने निर्मित | हस्तलिखित | = | हाताने लिहिलेले |
| मतिमंद | = | मतीने मंद | मातृसदृश | = | मातेशी सदृश |
| तत्सम | = | त्याशी सम | तोंडपाठ | = | तोंडाने पाठ |
| दुप्पट | = | दोहोंनी पट | चौपट | = | चोहोनी पट |

***स्वाध्याय -*** *पुढील समासिक शब्दांचे विग्रह करा -*

*दयार्द्र, भक्तिवश, द्रव्यसाध्य, कष्टसाध्य, ईश्वरदत्त, मनःकल्पित, कृपावलोकन, गुणहीन, गजमोजणी, घोडेमात, प्यादेमात, बुद्धिजड, कपाळ-करंटा, तोंडजबानी.*

### ३) चतुर्थी तत्पुरुष समास -

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रंथालय | = ग्रंथासाठी आलय | विद्यागृह | - विद्येसाठी ग्रह |
| पोळपाट | - पोळीसाठी पाट | ब्राह्मणभोजन | - ब्राह्मणासाठी भोजन |
| क्रीडांगण | - क्रीडेसाठी अंगण | क्रीडाभुवन | - क्रिडेसाठी भुवन |
| गायरान | - गायीसाठी असलेले रान | व्यवहारोपयोगी | - व्यवहारासाठी उपयोगी |
| पूजाद्रव्य | - पूजेसाठी द्रव्य | कंबरपट्टा | - कंबरेसाठी पट्टा |
| वाटखर्च | - वाटेसाठी लागणारा खर्च | | |

**स्वाध्याय** - पुढील सामासिक शब्दांचे विग्रह करा -

मेंढवाडा, व्याहीजेवण, बाईलवेडा, कमरबंद, गावसमाराधना

### ४) पंचमी तत्पुरुष समास -

| | | | |
|---|---|---|---|
| चोरभय | - चोरापासून भय | संकटमुक्त | - संकटापासून मुक्त |
| ऋणमुक्त | - ऋणापासून मुक्त | धर्मभ्रष्ट | - धर्मातून भ्रष्ट |
| रोगमुक्त | - रोगापासून मुक्त | मनुज | - मनुपासून जन्मलेला |
| स्वर्गभ्रष्ट | - स्वर्गातून भ्रष्ट | जातीभ्रष्ट | - जातीतून भ्रष्ट |
| मामेभाऊ | - मामाकडून भाऊ | | |

### ५) षष्टी तत्पुरुष समास -

| | | | |
|---|---|---|---|
| लोकमित्र | = लोकांचा मित्र | देवपूजा | - देवाची पूजा |
| सूर्यप्रकाश | - सूर्याचा प्रकाश | राजमंदिर | - राजाचे मंदिर |
| लक्ष्मीकांत | - लक्ष्मीचा कांत | केळफूल | - केळीचे फूल |
| धर्मवेड | - धर्माचे वेड | जनसेवा | - जनांची सेवा |
| राष्ट्राध्वज | - राष्ट्राचा ध्वज | हिमाद्री | - हिमाचा अद्री |
| समुद्रकाठ | - समुद्राचा काठ | विद्याभ्यास | - विद्येचा अभ्यास |
| देवभक्ती | - देवाची भक्ती | घोडदौड | - घोड्याची दौड |
| पिंपळपान | - पिंपळाचे पान | पुष्पमाला | - पुष्पांची माला |
| दलितोद्धारण | - दलितांचे उद्धारण | बालमित्र | - बालपणचा मित्र |
| ईश्वरभक्ती | - ईश्वराची भक्ती | देशाभिमान | - देशाचा अभिमान |

### ६) सप्तमी तत्पुरुष समास -

| | |
|---|---|
| नृपवर | - नृपात वर (श्रेष्ठ) |
| शास्त्रपंडित | - शास्त्रात पंडित |
| कलाकुशल | - कलेत कुशल |
| घरकोंबडा | - घरात राहणारा |
| स्वर्गवास | - स्वर्गात असे वास |

***आ) उपपद तत्पुरुष समास*** *- जेव्हा तत्पुरुष समासातील दुसरे पद-ज्याचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग होत नाही, अशा प्रकारचे - कृदंत - म्हणजे धातुसाधित असते. तेव्हा त्यास उपपद तत्पुरुष समास म्हणतात.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *कुंभकार* | - | *कुंभ करणारा* | *ग्रंथकार* | - | *ग्रंथ करणारा* |
| *द्विज* | - | *दोनदा जन्मणारा* | *दुतोंड्या* | - | *दोन तोंडे असणारा* |
| *पदवीधर* | - | *पदवी धारण करणारा* | *जन्मदा* | - | *जन्म देणारी* |
| *सर्वज्ञ* | - | *सर्व जाणणारा* | *जलद* | - | *जल देणारा* |
| *गृहस्थ* | - | *गृहात राहणारा* | *शेषशायी* | - | *शेषावर निजणारा* |
| *शास्त्रज्ञ* | - | *शास्त्र जाणणारा* | *शेतकरी* | - | *शेती करणारा* |
| *कामकरी* | - | *काम करणारा* | | | |

*ह्या समासात कार, स्थ, शायी, ज ही दुसरी पदे कृ, स्था, शे, जन, ह्या धातूपासून झालेली असून त्याचा असल्या सामासिक शब्दशिवाय दुसऱ्या कोठे ही स्वतंत्रपणे उपयोग होत नसल्याने हे उपपद तत्पुरुष समास आहेत.*

***इ) कर्मधारय समास*** *- दोन्ही पदे प्रथमा विभक्तीत, दोन्हीपैकी एक किंवा दोन्ही पदे विशेषण, उपमान किंवा रूपक म्हणून वापरतात. याचे दोन पोट प्रकार आहेत.*

*१) द्विगू समास* *२) मध्यमपद लोपी समास*

*उदा. पीतांबर पीत (पिवळे) असे अंबर (वस्त्र)*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *पुरूषोत्तम* | - | *उत्तम असा पुरुष* | *विद्याधन* | - | *विद्या हेच धन* |
| *सुवासना* | - | *सु (चांगली) अशी वासना* | *चरणकमल* | - | *चरणरूपी कमल* |
| *कमलनयन* | - | *कमलासारखे नयन* | *मुख्याध्यापक* | - | *मुख्य असा अध्यापक* |
| *महादेव* | - | *महा असा देव* | *अन्नब्रह्म* | - | *अन्नरूपी ब्रह्म* |
| *गलितगात्र* | - | *गलित असे गात्र* | *कृष्णकमल* | - | *कृष्ण असे कमल* |
| *गोधन* | - | *गो हेच धन* | *कुरूप* | - | *कु असे रूप* |
| *मुखचंद्र* | - | *मुख हाच चंद्र* | *महात्मा* | - | *महान असा आत्मा* |
| *बालकिरण* | - | *बाल असे किरण* | | | |

***१) द्विगू समास*** *- ज्या कर्मधारय समासात पहिले पद संख्यावाचक विशेषण असून त्या शब्दाच्या योगाने समुदायाचा अर्थ उत्पन्न होतो. सर्व शब्द एकवचनीच असतात. त्यास द्विगू समास म्हणतात.*

*उदा.*

| | | | |
|---|---|---|---|
| *नवरात्र* | *- नऊ रात्रींचा समूह* | *पंचारती* | *- पाच आरत्यांचा समूह* |
| *पंचपाळे* | *- पाच पाळ्यांचा समुदाय* | *त्रिभुवन* | *- तीन भुवनांचा समूह* |
| *चातुर्मास* | *- चार महिन्यांचा समूह* | *नवग्रह* | *- नऊ ग्रहांचा समुदाय* |
| *सप्ताह- सात आहांचा (दिवसांचा) समूह* | | *त्रैलोक्य* | *- तीन लोकांचा समूह* |

*२) **मध्यमपद लोपी समास** - ज्या कर्मधारय समासात पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दारववणारा एक शब्द असे अनेकशब्द लुप्त असतात व विग्रहाच्या वेळी त्याची स्पष्टता करावी लागते. त्यास मध्यमपद लोपी समास असे म्हणतात.*

*उदा.*

*सारवरभात - सारवरेने युक्त भात*

*पुरणपोळी - पुरण भरून केलेली पोळी*

*वांगीपोहे - वांगी घालून केलेले पोहे*

*बटाटेभात - बटाटे घालून केलेला भात*

*भाचेजावई - भाचीचा नवरा म्हणून जावई*

*मामेभाऊ - मामाचा मुलगा म्हणून मामेभाऊ*

***स्वाध्याय -***

*पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करा - कांदेपोहे, बांगीभात, घोडेस्वार, बालमित्र, भोजनभाऊ, मीठभाकर, जन्मदरिद्री, हस्ताक्षर, दहीभात.*

*ई) **नञ, तत्पुरुष समास** - अभाव किंवा निषेध या अर्थी व्यंजनादि शब्दांचे पूर्वी आणि स्वरादी शब्दांचे पूर्वीही अव्यये येऊन जे तत्पुरुष समास होतात, त्यास नञ तत्पुरुष समास म्हणतात,*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| *अन्याय* | - | *न न्याय* | *अब्रह्मण* | - | *न ब्राह्मण* |
| *अनादर* | - | *न आदर* | *अयोग्य* | - | *न योग्य* |
| | | | *अनिष्ट* | - | *न इष्ट* |

*स्वाध्याय - पुढील सामासिक शब्दांचे विग्रह करा -*

*अजाण, अपुरा, अनोळखी, नपुंसक, नापसंत*

*३) **द्वंद्व समास - क्रियापद प्रधान - उभयपदे महत्त्वाची** - ज्या समासतील दोन्ही पदे प्रधान असतात त्यास द्वंद्व असे म्हणतात. यात समासाचा विग्रह करताना दोन पदांचा संबंध 'आणि, व, अथवा, किंवा' अशा उभयान्वयी अव्ययानी स्पष्ट करावा लागतो.*

*उदा.,*

*मातापिता - माता आणि पिता*

*पापपुण्य - पाप अथवा पुण्य*

*कृष्णार्जुन - कृष्ण व अर्जुन*

*न्यायान्याय - न्याय किंवा अन्यास*

***द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत अ) इतरेतर द्वंद्व ब) वैकल्पिक द्वंद्व क) समाहार द्वंद्व***

***अ) इतरेतर द्वंद्व -*** *ह्या समासातील पदांमध्ये 'आणि, व,' समुच्चय बोधक उभयान्वयी अव्यये विग्रहाच्या वेळी घालावी लागतात.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आईवडील | - | आई आणि वडील | नवराबायको | - | नवरा व बायको |
| तहानभूक | - | तहान आणि भूक | यक्षकिन्नर | - | यक्ष आणि किन्नर |
| राधाकृष्ण | - | राधा आणि कृष्ण | सेवाशुश्रुषा | - | सेवा आणि शुश्रुषा |
| स्त्रीपुरुष | - | स्त्री आणि पुरुष | कौरवपांडव | - | कौरव आणि पांडव |
| दहीभात | - | दही आणि भात | उघडबोडका | - | उघडा आणि बोडका |
| स्पृश्यास्पृश्य | - | स्पृश्य आणि अस्पृश्य | खाचखळगे | - | खाच आणि खळगे |
| पळीपंचपात्रे | - | पळी आणि पंचपात्रे | रामलक्ष्मण | - | राम आणि लक्ष्मण |
| लेकीसुना | - | लेकी आणि सुना | वृक्षलता | - | वृक्ष आणि लता |
| हातपाय | - | हात आणि पाय | कृष्णार्जुन | - | कृष्ण आणि अर्जुन |
| प्रश्नोत्तर | - | प्रश्न आणि उत्तर | | | |

***ब) वैकल्पिक द्वंद्व*** *ह्या समासातील पदामध्ये विग्रहाच्या वेळी 'अथवा, किंवा' ह्यापैकी विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये घालावी लागतात. अर्थाच्या दृष्टीने समासातील दोन्ही प्रधान पदापैकी एकाचीच मात्र अपेक्षा असते.*

*उदा - आशानिराशा - आशा किंवा निराशा*

| | | | |
|---|---|---|---|
| बरेवाईट | - बरे किंवा वाईट | खरेखोटे | - खरे किंवा खोटे |
| देवदानव | - देव किंवा दानव | जयपराजय | - जय किंवा पराजय |
| न्यायान्याय | - न्याय किंवा अन्याय | पासनापास | - पास किंवा नापास |
| नेआण | - नेणे किंवा आणणे | सारासार | - सार किंवा असार |
| पापपुण्य | - पाप किंवा पुण्य | मानापमान | - मान किंवा अपमान |
| चारपाच | - चार किंवा पाच | | |
| इकडेतिकडे | - इकडे किंवा तिकडे | | |

***क) समाहार द्वंद्व -*** *ह्यात समासयुक्त पदांच्या अर्थाशिवाय आणखी तशाच प्रकारच्या अधिक गोष्टींचाही अंतर्भाव होतो.*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कापडचोपड | - | कापड, चोपड इ. | चुकलेमाकले | - | चूक, भूल इ. |
| चहाचिवडा | - | चहा चिवडा वगैरे | पाटीदप्तर | - | पाटी दप्तर वगैरे |
| गुरेढोरे | - | गुरे, ढोरे, अन्य जनावरे | भाजीभाकरी | - | भाजी, भाकरी वगैरे |
| पानसुपारी | - | पान, सुपारी वगैरे | हळदकुंकू | - | हळद, कुंकू वगैरे |
| अंथरूणपांघरूण | - | अंथरूण, पांघरूण वगैरे | चहाफराळ | - | चहा, फराळ वगैरे |
| चहापाणी | - | चहा, पाणी व फराळाचे पदार्थ | | | |
| भाजीपाला | - | भाजी, पाला असेच पदार्थ | | | |

***स्वाध्याय*** *- पुढील समासिक शब्दांचा विग्रह करा -*

*वेणीफणी, मीठभाकर, घरदार, शेटसावकार, चढउतार, जा-ये, दे-घे, किडूकमिडूक, दगडबिगड, तंटाबिंटा, भांडणबिंडण, लहानसहान सुख-दुःख, सत्यासत्य, धर्माधर्म, चांगले वाईट, आठपंधरा, एकदोन, झाडेझुडपे.*

### ४) बहुव्रिही समास

या समासात समासातील पदापैकी कोणतेही पद प्रधान नसून त्या सर्व सामासिक पदापासून त्यात असणाऱ्या पदांच्या शिवाय निराळ्याच पदाचा प्रामुख्याने बोध होतो व तो सामासिक शब्द त्या निराळ्या पदाचे विशेषण असतो. त्या समासाला बहुव्रिही समास असे म्हणतात.

उदा.,

दशानन - दश आहेत आनने ज्याला तो - रावण

लंबोदर - लंब म्हणजे मोठे आहे उदर ज्याचे तो - गणपती

टीप - ह्या समासाचा विग्रह करताना शेवटी संबंधी सर्वनाम येते व त्याची जी विभक्ती असते, तिचे नाव त्या समासास देतात.

### अ) द्वितीया बहुव्रिही -

दश आहेत आनने ज्याला तो - रावण (दशानन)

कर्म नाही ज्याला असे - अकर्म

अष्टपैलू - आठ पैलू आहेत ज्याला असा

प्राप्तधन - प्राप्त आहे धन ज्यास असा

अनंत - नाही अंत ज्याला तो

अनाथ - नाथ नाही ज्याला असा

अष्टभुजा - अष्ट आहेत भुजा जिला अशी

चौकोन - चार कोन आहेत ज्याला असा

### आ) तृतीया बहुव्रिही -

जितकाम - जित आहे काम ज्याने

मुरलीधर - मुरली धारण केली आहे ज्याने असा

जितेंद्रिय - इंद्रिये जिंकली आहेत ज्याने असा (जित आहेत इंद्रिये ज्याने)

**स्वाध्याय -**

खालील सामासिक शब्दांचे विग्रह करा -

कृतकृत्य, दत्तधन, लोककाम, जितकोप, युक्तायुध.

### इ) चतुर्थी बहुव्रिही -

पंचमुख - पाच आहेत मुखे ज्याला

त्रिनेत्र - तीन डोळे आहेत ज्याला

चतुर्मुख - चार मुख आहेत ज्याला

### ई) पंचमी बहुव्रिही -

निर्धन - धन गेले आहे ज्याच्यापासून

निर्बल - बल नाही ज्याच्यापाशी असा

गलितपर्ण - गलित आहेत पर्ण ज्यापासून

***उ) षष्टी बहुव्रिही -***

*तपोबल - तप हेच बल आहे ज्याचे*

*लंबोधर - लंब आहे उदर ज्याचे*

***स्वाध्याय -***

*मानधन, शूलपाणी, तीर्थपाद, शशिशेखर, चंद्रशेखर, घारडोळ्या, गायमुख्या, पांढरपेश्या, काळतोंड्या, चतुर्मुख, चौकोन, दुप्प ट, पाचपट या सामासिक शब्दांचे विग्रह करा.*

***ऊ) सप्तमी बहुव्रिही -***

*भीमादी - भीम आहे आदि ज्यामध्ये*

*इंद्रादि - इंद्र आहे आदि ज्यामध्ये असे*

*नाक - न म्हणजे नाही, अक म्हणजे दुःख - ज्यांत तो - स्वर्ग*

*वीर पुरुष - वीर आहेत पुरुष ज्यांत असा - गाव*

***ए) नञ बहुव्रिही -***

*निस्तेज - नाही तेज ज्याच्यात असा जो तो*

*अनादी - नाही आदी ज्याला तो (परमेश्वर)*

***स्वाध्याय***

*सामासिक शब्द - अव्यय, अज्ञान, अनाथ, अकर्मक इ. यांचा विग्रह करा*

***ऐ) सह-बहुव्रिही -***

*सराग-राग (प्रेम) सह असे जेते (स किंवा सह हे अव्यय आरंभी येऊन हा समास होतो).*

*सदार - दारेने सह*

***स्वाध्याय*** *- सहपरिवार, सपुत्र, सरूप, सवर्ण, सादर, सफल, सनाथ, समूल, सहकुटुंब यांचा विग्रह करून समास ओळखा.*

*स्वाध्याय - गाडीघोडा, स्त्रीपुरूष, पहारेकरी, हस्ताक्षर, थट्टामस्करी, लोकप्रिय, परोपकार, समाजसेवा, सतराअठरा, शुभहस्त, स ज्ञन, अनर्थ, कोटटोपी, ग्रंथालय, दुर्दशा, वसतीगृह, गुराखी, आकाशदिवा, चक्रधारी, चिऊकाऊ, महापुरुष, इंद्रधनुष्य, काळरा त्र, तटस्थ, परगाव, सर्वज्ञ, पायगुण, लेकसून, उदयास्त यांचा विग्रह करून समास ओळखा.*

# (८) चिन्हे

## विरामचिन्हे

***विरामचिन्हे*** *- आपण बोलताना एकसारखे बोलत नाही, वाचतानाही सारखे वाचीत नाही, बोलताना किंवा वाचताना थोडे थांबतो, काही ठिकाणी अर्धवट थांबतो व काही ठिकाणी पूर्ण थांबतो. थांबणे यालाच विसावा किंवा विराम म्हणतात.*

*(१)* ***पूर्णविराम*** *- जेथे एखादा विचार पूर्ण प्रकट झालेला दिसतो व बोलताना तसे दर्श विण्यासाठी आपण तेथे पूर्ण थांबतो. थांबण्याची खूण म्हणून (.) असे चिन्ह काढतात. त्याला पूर्ण विराम म्हणतात.*

*उदा. मिलाप बागेत धावतो. स्नेहलने फुले आणली. सलोख क्रिकेट खेळतो.*

*(२)* ***अर्ध विराम*** *- वाक्यात ज्या ठिकाणी अधिक वेळ थांबावे लागते, परंतु बोलणे मात्र पूर्ण होत नाही. त्यासाठी (;) हे अर्धविराम चिन्ह वापरतात.*

*उदा. इयक्यात, आकाशात जिकडे तिकडे ढग दिसू लागले; थोड्याच वेळाने गारांचा वर्षाव होऊ लागला; त्या गारांच्या माऱ्याने डोक्यास टेंगळे आली; अशा कचाय्यात आमचा सलोख सापडला.*

*(३)* ***स्वल्पविराम*** *- वाक्यात जेथे थोडेसे थांबावे लागते, तथे(,) हे स्वल्पविराम चिन्ह देतात. वाक्यात नामे, सर्वनामे, विरोषणे, क्रियापदे इ समान जातीचे अनेक शब्द एकत्र आले तर अशा प्रत्येक शब्दापुढे स्वल्पविराम देतात.*

*उदा., अक्षयने बाजारातून केळी, द्राक्षे, अंजीर, अननस व कलिंगड ही फळे आणली.*

*(४)* ***अपूर्ण विराम*** *- जेव्हा वाक्याच्या शेवटी एखादा तपशील द्यावयाचा असतो तेव्हा त्या तपशीलाच्या आधी (:) हे अपूर्ण विरामाचे चिन्ह वापरतात.*

*उदा. मुख्य ऋतू तीन आहेतः उन्हाळा, पावसाळा, हिवाळा.*

## अर्थदर्शक चिन्हे

*१)* ***प्रश्न चिन्ह*** *- प्रश्न विचारण्यासाठी प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी (?) हे चिन्ह वापरतात. त्याला प्रश्नचिन्ह म्हणतात.*

*उदा. तुमच्या हातात काय आहे ? तुम्ही कोणास विचारले ?*

*टीप - काही वाक्ये आपल्याला प्रश्नार्थक वाटतात. पण ती प्रश्नार्थक नसून आज्ञार्थक वाक्ये असतात.*

*उदा. - इंद्रधानुष्य म्हणजे काय, याचा खुलासा करा.*

*२)* ***उद्गार चिन्ह*** *- मनातील हर्ष, आश्चर्य, दुःख इ. पैकी कोणती ही भावना व्यक्त करणाऱ्या शब्दांच्या शेवटी (!) हे उद्गार चिन्ह देतात. तसेच केवळ प्रयोगी शब्दही आपल्या मनातील विकार दाखविण्याकरिताच वाक्यात येतात. म्हणून केवलप्रयोगी शब्दापुढे व त्या वाक्यापुढे उद्गार चिन्ह देतात.*

*उदा. अरे बापरे ! केवढा मोठा साप हा !*

*ओहोहो ! किती उंच पतंग उडाला हा !*

***३) अवतरण चिन्ह -*** *महत्त्वाचे शब्द किंवा शब्द समूह किंवा दुसऱ्यांचे म्हणणे (‘ ’) ह्या किंवा (‘‘ ’’) ह्या चिन्हाने दर्शवीत असतात.*

*शिक्षक म्हणतात, ‘‘मुलांनों, अभ्यासाकडे लक्ष द्या’’*

*लो. टिळकांनी ‘गीता रहस्य’ हा अमोल ग्रंथ लिहिला.*

***४) संयोग चिन्ह -*** *सामासिक शब्दातील प्रत्येक दोन पदामध्ये (-) ही खूण असते, तिला संयोगचिन्ह असे म्हणतात.*

*उदा. हरि-हर, राम-कृष्ण, गंगा-यमुना इ.*

***५) अपसारण चिन्ह किंवा स्पष्टीकरण चिन्ह -***

*एखद्या गोष्टीचा खुलासा करावयाच्या वेळी (-) या चिन्हाचा उपयोग करतात, त्यास अपसरणचिन्ह म्हणतात.*

*उदा., - सलोख आज एक चित्र काढणार होता. पण - - -?*

*मिलाप एक गाणे गाऊन दाखविणार होता, तेवढ्यात - - -?*

# भाग २ - (१ व  २)


१) जोड शब्द व त्यांचे अर्थ

२) शब्द समूहाबद्दल एक शब्द

३) म्हणी व त्यांचे अर्थ

४) शून्यात परार्धे भरली आहेत

५) वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

६) विरुद्ध अर्थाचे शब्द

७) समान अर्थाचे शब्द

८) समूहदर्शक शब्द

९) नर-मादी-अपत्य

१०) पंचेद्रियांची करामत

११) प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण

१२) वैशिष्ट्ये

१३) अलंकारिक शब्दयोजना

१४) सारवट शब्द

१५) एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ

१७) परंपरागत उपमा

# (१) जोड शब्द व त्यांचे अर्थ

## जोड शब्द व त्यांचे अर्थ

| | | |
|---|---|---|
| अकट चिकट | - | चोखंदळ |
| अकट विकट | - | अतिशय मोठा |
| अकडं तिकडं | - | अव्यवस्थित |
| अकरनकर | - | हट्टी, दुराग्रही |
| अकराळ विकराळ | - | भयंकर (अक्राळ विक्राळ) |
| अकांड तांडव | - | रागाने ओरड |
| अक्कल बाज | - | हुशार |
| अगट चिगट | - | मंद, आळशी |
| अगड तगड | - | क्षुल्लक वस्तू (सटरफटर) |
| अगड तबड | - | शिळेपाळे, जाडे भरडे अन्न |
| अगल्या बगल्या | - | आश्रित |
| अग्निपरीक्षा | - | अग्निदिव्य |
| अगापिछा | - | संबंधी |
| अग्निपात्र | - | इस्त्रीचे यंत्र |
| अग्नियंत्र | - | बंदूक, तोफ |
| अघळ पघळ | - | ऐस पैस, सैल |
| अंगत पंगत | - | मुलांचा एकत्र जेवणाचा प्रकार |
| अचकट विचकट | - | वाईट, अश्लील |
| अचक बोचक | - | गैर पद्धतीने, अस्ताव्यस्त |
| अचकल दचकल | - | वाईट अन्न |
| अचका विचका | - | गोंधळ, गुंतागुंत |
| अचका गचका | - | धसका, अपस्मार, फेफरे यांनी बसणारा हिसका |
| अचट बोचट | - | अर्धे मुर्धे, कमी जास्त |
| अचडे बचडे | - | लाडके मूल |
| अचरट पचरट | - | कोरडे, बेचव |
| अजात शत्रू | - | शत्रू नसलेला |
| अटक चटक | - | चेष्टा, खेळ |
| अटक मटक | - | खेळ |
| अटपा आटप | - | आवराआवर, निरवानिरव |
| अटाअट | - | वाण, उणीव, टंचाई |
| अटापीट | - | छळणूक, गांजणूक |
| अटांग पटांग | - | लांबलचक |
| अठोनी वेठोनी | - | पीळदार |

| | | |
|---|---|---|
| अटोकाट | - | अत्यंत |
| अडका अडकी | - | गुंतागुंत, विघ्न |
| अडगुण बडगुण | - | फालतू वस्तू |
| अडप झडप | - | चोरून मारून, लपून छपून |
| अडवा तिडवा | - | वाकडा तिकडा, बाकदार |
| अडगुले मडगुले | - | मुलांचे गाणे |
| अडपता दडपता | - | देखरेख करणारा |
| अडप दडप | - | धाक, वचक |
| अडोशी पडोशी | - | जवळपासचा, शेजारचा |
| अढा वेढा | - | आडकाठी, प्रतिबंध |
| अढेवेढे | - | वाकडे तिकडे मुद्दे, अळेपिळे |
| आणिबाणी | - | ऐनवेळ |
| अणुरेणू | - | अतिशय लहान कण |
| अदलाबदल | - | देवघेव, फेरफार |
| अतिरथी महारथी | - | मोठ मोठे वीर |
| अत्तर गुलाब | - | सुवासिक फुलांचे सत्व |
| अधिकाधिक | - | जास्तजास्त |
| अधिक उणे | - | जास्त कमी |
| अर्धा मुर्धा | - | (अर्धे मुर्धे) कमी जास्त |
| अफरा तफर | - | लबाडी, घोटाळा |
| अबर गोबर | - | अव्यवस्थित |
| अबर चबर | - | बेचव, नीरस |
| अभांड कुभांड | - | आळ, आरोप |
| अमन चमन | - | शांती, समृद्धी |
| अन्नपाणी | - | जेवण व पाणी (निर्वाहाचे साधन) |
| अमीर उमराव | - | बडे लोक |
| अमूक तमूक | - | कोणी एक |
| अयबू गयबू | - | कोणीतरी व्यक्ती |
| अन्न वस्त्र | - | अन्न व कपडे इ. |
| अरगी पारगी | - | आळीपाळी, अदला बदली |
| अरडी दरडी | - | अवघड जागा, कडा |
| अरडी परडी | - | परडी |
| अरता परता | - | अलीकडे, पलीकडे |
| अरब चरब | - | बेचव, नीरस, रुक्ष |
| अरस परस | - | आसपास, आजुबाजूला |
| अरळतरळ | - | तात्पुरते |
| अराळ फराळ | - | भाषण (तयारी नसलेले भाषण), अप्रस्तुत भाषण |
| अर्था अर्थी | - | कोणत्याही रीतीने |
| अलबत्या गलबत्या | - | कोणीही, भलता सलता |

| | | |
|---|---|---|
| *अलबलीत गलबलीत* | - | *ढिला, मंद* |
| *अरे तुरे* | - | *सलगीचे संबोधन* |
| *अलांडा बलांडा* | - | *अडथळा, विघ्न* |
| *अलाई बलाई* | - | *दु:ख, त्रास* |
| *अवडक चवडक* | - | *पसारा, गोंधळ* |
| *अवड चिवड* | - | *अव्यवस्थित पसारा* |
| *अवडा देवडा* | - | *अडवा तिडवा, वाकडा तिकडा* |
| *अवती भवती* | - | *आजुबाजूला* |
| *अवळ चवळ* | - | *अर्धवट* |
| *अवाई तवाई* | - | *संकट* |
| *अशीतशी* | - | *किरकोळ, क्षुल्लक* |
| *अष्टावक्र* | - | *विद्रूप, कुरूप* |
| *अष्ट पुत्र* | - | *आठ मुले* |
| *अष्टमांश -* | - | *आठवा हिस्सा* |
| *अष्ट पैलू* | - | *हुषार, कला जाणणारा* |
| *अष्टौप्रहर* | - | *रांत्रदिवस, सतत* |
| *असुळ विसुळ* | - | *अस्ताव्यस्त, अव्यवस्थित* |
| *अस्ती नास्ती* | - | *काय आहे, काय नाही ते* |
| *असते नसते* | - | *अप्रासंगिक* |
| *अहाच वहाच* | - | *वरवर, दिखाऊ* |
| *अहद तहद* | - | *या टोकापासून त्या टोकापर्यंत* |
| *अळा पिळा* | - | *मुरडा, पिरगळा* |
| *आखोआख* | - | *मूळ किमतीने* |
| *आखाडखाना* | - | *शस्त्रागार, तालीमखाना* |
| *आकाश पाताळ* | - | *सर्वत्र* |
| *आगर डोंगर* | - | *सरहद्द, आवार* |
| *आगा पिछा* | - | *मागचा पुढचा भाग* |
| *आगत स्वागत* | - | *सत्कार, पाहुणचार* |
| *आंगतपंगत (अंगत पंगत)* | - | *मुलांचा एकत्र भोजनाचा प्रकार* |
| *आई-बाप* | - | *आईवडील, पालक* |
| *आगळा वेगळा* | - | *अप्रतिम* |
| *आगे मागे* | - | *पुढे मागे* |
| *आचार विचार* | - | *नियम, शिस्त* |
| *आटक साटक* | - | *मुलांचा एक खेळ* |
| *आटा पिटा* | - | *खटाटोप* |
| *आटिवेटी* | - | *श्रम, कष्ट* |
| *आटेविटे* | - | *आठेविठे, आळेपिळे* |
| *आटपाट* | - | *ठामपणा, पक्केपणा* |
| *आटपाटनगर* | - | *कोणते तरी एक शहर* |

| | | |
|---|---|---|
| आटापाणी | - | पीठ व पाणी, रोजचा शिधा |
| आटोकाट | - | पराकाष्ठेचा, अत्यंत, पूर्ण |
| आट्या पाट्या | - | एक महाराष्ट्रीय खेळ |
| आणिबाणी | - | संकट प्रसंग |
| आदळ आपट | - | आदळणे व आपटणे, आपटा आपटी |
| आनंदी आनंद | - | खूप आनंद |
| आपट धोपट | - | आपटणे, आपटा आपटी |
| आंबट गोड | - | आंबट व गोड यांचे मिश्रम |
| आबड धाबड | - | ओबड धोबड, बेडौल |
| आबळा गोबळा | - | सर्व दिशास व्यापून असणारा |
| आबादी आबाद | - | भरभराट |
| आंबट चिंबट | - | आंबट |
| आयात निर्यात | - | आवक जावक |
| आयाबाया | - | शेजारणी पाजारणी |
| आवड निवड | - | पसंती, आवड नावड |
| आमने सामने | - | समोरा समोर |
| आवळे जावळे | - | जुळे |
| आरोह-अवरोह | - | चढ-उतार |
| आलीगेली | - | नफातोटा, जमाखर्च |
| आवट चावट | - | भसते सलते |
| आवती भोवती | - | आजूबाजूला, आसपास |
| आस्कळ विस्कळ | - | ऐसपैस |
| आस्कार हुस्कार | - | हुंदके देणे, श्वासोच्छ्वास |
| आशानिराशा | - | इच्छा-अनिच्छा |
| आहाळबाहाळ | - | संपूर्ण, विस्तीर्ण |
| आळसमळस | - | ऐसपैस |
| आळाटाळी | - | ढिलाई, चेंगटपणा |
| आळाटोळा | - | अंदाज |
| इकडे तिकडे | - | आजुबाजूला, येथेतेथे |
| इवले इवले | - | लहान |
| इन मिन साडेतीन | - | छोटा संसार |
| इमाने इतवारे | - | प्रामाणिकपणाने, एकनिष्ठेने |
| इडा पिडा | - | दुःखे, संकटे |
| उकसाबुकसी | - | ओक्साबोक्षी |
| उखळा उखळ | - | विस्कटणे, मोकळे करणे |
| उखाळी पाखाळी | - | वैगुण्य, दोष, कमीपणा |
| उगरा बागरा | - | उग्र, क्रूर, भयानक |
| उगवित पागवित | - | सोईसोईने, थोडेथोडे |
| उघडा बोडका | - | खुला, मोकळा, नागवा |

| | | |
|---|---|---|
| उघड वाघड | - | उघडपणे, प्रसिद्धपणे |
| ऊचकळ्या बुचकळ्या | - | बुडत्या माणसाच्या पाण्यातील गटांगळ्या |
| उचका उचक | - | घाईने ओढणे, फसविणे |
| उचमपचम | - | उठाठेव |
| उचलबांगडी | - | हकालपट्टी करणे |
| उचला उचल | - | घाईने सामानाचे स्थलांतर करणे |
| उजळ पाजळ | - | स्वच्छ, सतेज |
| उजवा डावा | - | फरक |
| उजूबुजू | - | आदर, मान, मर्यादा |
| उटाउटी | - | उठाउठी, तात्काळ, त्वरेने |
| उठसूट | - | कारणाशिवाय करण्याची क्रिया |
| उठाठेव | - | खटपट |
| उडतउडत | - | अस्पष्टपणे |
| उडवा उडवी | - | टाळाटाळी, उधळपट्टी |
| उतळपातळ | - | गप्पा, प्रौढी |
| उत्तमोत्तम | - | उत्कृष्ट |
| उत्तरोत्तर | - | क्रमाक्रमाने, हळूहळू |
| उतळपातळ | - | थोडेथोडे |
| उन्हातान्हाचा | - | भर दोन प्रहरचा |
| उधळ माधळ | - | उधळेपणा |
| उधार उसनवार | - | बिनव्याजी कर्ज |
| उपज निपज | - | जन्म आणि वाढ, उदय आणि प्रगती |
| उपासतापास | - | कडक व्रत, व्रतनियम |
| उरलासुरला | - | शिल्लक राहिलेला |
| उलगा उलग | - | आवराआवर, समाप्ती |
| उलाघाल | - | उलाढाल, क्रांती |
| उलटा पालटा | - | उलथा पालथा, गोंधळ |
| उठता बसता | - | वेळी अवेळी |
| उष्टे खरकटे | - | जेवणानंतर पानात राहिलेले |
| उसने पासने | - | उसनवारी, उधारी |
| ऊन पाऊस | - | सूर्यप्रकाश व पाऊस |
| ऋषीमुनी | - | साधूसंत |
| एकट दुकट | - | एखाद दुसरा, एकटाच |
| एकनिकी | - | एकी, जूट |
| एकमेक | - | परस्पर |
| एकमेळ | - | ऐक्य |
| एकांती लोकांती | - | गुप्त किंवा प्रकट, खाजगी किंवा सार्वजनिक |
| एकलकोंडा | - | एकांतप्रिय |
| एडगुळ बेडगुळ | - | ओबडधोबड |

| | | |
|---|---|---|
| एरडबेरड | - | बेडौल |
| ऐशआराम | - | चैन, सुख, ऐष आराम |
| ऐलपैल | - | या व त्या बाजूचा |
| ऐलतीर पैलतीर | - | या व त्या बाजूचा किनारा |
| ऐसपैस | - | विस्तीर्ण, प्रशस्त |
| ओकसाबोकशी | - | मोठ्याने हेल काढून रडणे |
| ओघळ निघळ | - | वेडा वाकडा प्रवाह |
| ओढाओढ | - | खेचाखेच, गर्दी |
| ओढाताण | - | पैशाची टंचाई |
| ओढून ताणून | - | कसेतरी, कष्टाने |
| ओबड धोबड | - | वेडेवाकडे, बेढव |
| ओवळा सोवळा | - | अपवित्र-पवित्र |
| ओळख पाळख | - | परिचय |
| औडक चौडक | - | ओबडधोबड, लहान मुलांचा खेळ |
| औरस चौरस | - | सभोवार, भोवती |
| औषध उपचार | - | वैद्यकीय उपचार |
| अंखण पंखण | - | धान्याप्रमाणे पसरणे |
| अंगकाठी | - | अंगाची ठेवण, देहयष्टी |
| अंथरूण पांघरूण | - | बिछाना व पांघरायचे वस्त्र |
| अंधार कोठडी | - | एकांत वासाची शिक्षा देण्याची खोली |
| अंडाळ बंडाळ | - | अव्यवस्था, गैरसोय |
| कडनिकड | - | निकडीचा प्रयत्न |
| कडाफोड | - | आदळ, आपट |
| कच्ची बच्ची | - | लहान मुले |
| कडी कोयंडा | - | दाराची कडी |
| कडी कुलपे | - | दाराची कडी व कुलूप |
| कमी अधिक | - | कमी जास्त |
| कडे लोट | - | ऱ्हास, शिक्षा म्हणून डोंगर कड्यावरून ढकलणे |
| कपडालत्ता | - | कापडचोपड, वस्त्र, कापड |
| कडोकडी | - | जोराने, नेटाने |
| कमजादा | - | कमी जास्त, कमी अधिक |
| करार मदार | - | वचन, बोली |
| कर्मकांड | - | धर्मकर्म |
| कर्मयोग | - | दैव, योगायोग |
| कर्मकथा | - | दुःखद कहाणी |
| कर्मकटकट | - | कंटाळवाणे, तापदायक |
| कर्मसंन्यास | - | कर्माचा त्याग |
| कर्ण कटू | - | कर्कश, कठोर |
| कलाकौशल्य | - | कलाकुसर, कलेत नैपुण्य |

| | | |
|---|---|---|
| कर्मधर्म | - | वर्तन, कृत्य |
| कसाबसा | - | मोठ्या कष्टाने, प्रयासाने |
| कसकसणे | - | अंग दुखून येणे |
| कहिबहि | - | कधीमधी, कधीतरी |
| कागद पत्र | - | पत्र, चिठ्ठी इ. |
| काऊ-चिऊ | - | कावळा चिमणी, लहान सहान |
| काट कसर | - | काटाकाट, खर्च कमी करणे |
| काटे कुटे | - | बारीकसारीक लाकडे, अडथळा |
| काटेकोर | - | बारीक, सूक्ष्म, व्यवस्थित |
| काथ्याकूट | - | निरर्थक चर्चा, वाद |
| कानाडोळा | - | दुर्लक्ष |
| कानामात्रा | - | अक्षर चिन्हे |
| कांदा भाकरी | - | जेवण, गरिबांचे जेवण |
| कानीकपाळी | - | अखंड (ओरडणे) |
| कानाकोपरा | - | सर्वत्र, कानाकोचा |
| काबाडकष्ट | - | मेहनत, श्रम |
| काम काज | - | लहान मोठे काम |
| काडी-कुटका | - | गवताचा तुकडा, अल्पशी गोष्ट |
| कामधंदा | - | उद्योग |
| कामचलाऊ | - | तात्पुरता उपयोगी पडणारा |
| कामचुकार | - | काम चुकविणारा |
| कामसाधू | - | स्वार्थी |
| कायदा कानून | - | न्याय |
| कार्यकर्ता | - | लोकांची सेवा हौसेने करणारा |
| कार्यतत्पर | - | कार्यात निमग्न |
| कालवा कालव | - | ढवळा ढवळ, घोटाळा |
| कालत्रयी | - | कधीही नाही |
| काल पुरूष | - | यम |
| कावरा बावरा | - | भयभीत, गोंधळलेला |
| काळासावळा | - | सावळा |
| काळ झोप | - | मृत्यूच्या वेळची झोप |
| काळरात्र | - | भयंकर संकटाची रात्र |
| काळवेळ | - | वेळकाळ, समय |
| काळ पुरूष | - | यम, त्यासारखा क्रूर पुरुष |
| काही बाही | - | थोडेसे, भलतेच |
| किडूक मिडूक | - | बारीक सारीक दागिने |
| किडा मुंगी | - | जीवजंतू |
| कुच कामाचा | - | अगदी निरुपयोगी |
| कुजबुजणे | - | हळूहळू बोलणे |

| | | |
|---|---|---|
| कुरबुर | - | धूसपूस, तंटा |
| कुल परंपरा | - | चाल, रीत |
| केरकचरा | - | केराप्रमाणे निरुपयोगी पदार्थ |
| केरकसपट | - | अगदी क्षुल्लक वस्तू |
| केर पोतेरे | - | झाडलोट, पाणी भरणे इ. |
| केरवारे | - | केरकचरा |
| केरपाणी | - | झाडलोट |
| कोड कौतुक | - | कौतुक, लाड, आवड |
| कोकण पट्टी | - | कोकण किनारा |
| कोलवा कोलव | - | चुकवा चुकव, टाळाटाळ |
| खटाटोप | - | मोठी तयारी, बेत |
| खबरबात | - | समाचार, बातमी |
| खडी साखर | - | खडे जमलेली साखर |
| खरेदी विक्री | - | माल खरेदी करून तो परत विकणे |
| खडा जंगी | - | जोराचे भांडण, लढाई |
| खाचखळगे | - | चढउतार, विषमता, खाचखोच |
| खाणाखुणा | - | संकेत, आठवणीचे चिन्ह |
| खातर जमा | - | खात्री, विश्वास |
| खालोखाल | - | योग्यतेने किंचीत कमी |
| खापरतोड | - | निपणतूचा/पणतूचा मुलगा (नातवाचा किंवा नातीचा नातू) |
| ख्याली खुशाली | - | स्वस्थता, गंमत |
| खाऊन पिऊन | - | तृप्त, खाऊन पिऊन समाधानी |
| खाणे पिणे | - | अन्न, भोजन, खाद्य पदार्थ इ. |
| खारीक खोबरे | - | सुका मेवा |
| खेळी मेळी | - | सलगी |
| खेळ खंडोबा | - | नाश |
| खोटेनाटे | - | असत्य |
| खोगीर भरती | - | व्यर्थ लोकांची भरती |
| गप्पागोष्टी | - | रिकामपणाच्या गोष्टी |
| गगन मंडल | - | आकाशाची पोकळी |
| गणगोत | - | नातेवाईक, सोयरेधायरे |
| गल्लीबोळ | - | लहान रस्ता |
| गडबड गोंधळ | - | धांदल |
| गद्धे पंचविशी | - | तारुण्याचा काळ |
| गरम नरम | - | फार थंड व फार गरम नसलेले |
| गण मैत्री | - | जन्म पत्रिकेतील गणांमधील मैत्री |
| गर्भ श्रीमंत | - | जन्मापासून श्रीमंत |
| गरीब गुरीब | - | गोरगरीब |
| गंगा जमुना | - | अश्रू |

| | | |
|---|---|---|
| गंगा भागीरथी | - | वयस्क विधवा, गंगेचे पवित्र पाणी |
| गज-घंटा | - | हत्तीच्या गळ्यातील घंटा |
| गंमत जंमत | - | चैन, मजा |
| गृहकलह | - | घरगुती तंटा |
| गाईगुरे | - | गुरे |
| गाई वासरू | - | गुरे |
| गाठ भेट | - | भेटी |
| गाडी-घोडा | - | वाहन |
| ग्राम देवता | - | गावचा प्रमुख कुलदेव |
| ग्रहगती | - | ग्रहांचा वाईट परिणाम |
| ग्रामपंचायत | - | गावची व्यवस्था पाहणारी संस्था |
| गारेगार | - | अतिशय गार |
| गुरू-दक्षिणा | - | विद्याभ्यास संपल्यावर गुरूस द्यावयाची देणगी |
| गुरू-संप्रदाय | - | गुरुमार्ग, गुरूने घालून दिलेली परंपरा |
| गुंता गुंत | - | घोटाळा, गोंधळ |
| गुरे ढोरे | - | गुरे |
| गुजगोष्ट | - | गुपित |
| गैरवाजवी | - | अयोग्य, अन्याय |
| गैर फायदा | - | अयोग्य फायदा |
| गैर समजूत | - | चुकीची समजूत |
| गैर सोय | - | अडचण, त्रास |
| गैर मसलत | - | मूर्खपणाचा बेत |
| गोर गरीब | - | गरीब व दरिद्री |
| गोरा गोमटा | - | सुंदर रूपाचा |
| गोब्राह्मण | - | गाय आणि ब्राह्मण, गरीब ब्राह्मण |
| गोरा मोरा | - | पांढरा पडलेला |
| गोरक्षण | - | कसायापासून गाय वाचविणे |
| गोडी गुलाबी | - | भलेपणा, मैत्री |
| गोड धोड | - | गोडाचे जेवण |
| गोपाळकाला | - | सर्वांचे जेवण्याचे डबे एकत्र करणे |
| गोळाबेरीज | - | तात्पर्य, सारांश |
| गोरापान | - | अतिशय गोरा |
| गौडबंगाल | - | लबाडी, युक्ती, रहस्य |
| घरदार | - | घर व संसार |
| घर कोंबडा | - | नेहमी घरात राहणारा |
| घर बार | - | घरदार, प्रपंचाचा पसारा |
| घायकुती | - | उतावळेपणा |
| घाई गर्दी | - | अगदी गडबड, गर्दी |
| घातपात | - | ठार मारणे, नाश |

| | | |
|---|---|---|
| घाई गडबड | - | अगदी गडबड, घाई घाईने |
| घुसळ खांब | - | दही घुसळण्यासाठी रवी ज्याला बांधतात तो खांब |
| घेवाण देवण | - | व्यवहार |
| घोडा गाडी | - | घोड्याची गाडी |
| घोडा मैदान | - | परीक्षेची कसोटी |
| घोडे बैल | - | घोडे व बैल |
| घोडचूक | - | अक्षम्य चूक |
| घोडकुदळ | - | उपवर झालेली पण लग्न न झालेली मोठी मुलगी |
| चकडमकड | - | सोंगढोंग, चालढील |
| चकनाचूर | - | सत्यानाश, नायनाट, चकाचूर, पूड, भुगा |
| चकरमकर | - | युक्त्या, डावपेच |
| चक्का चक्की | - | उघड भांडण, हमरी तुमरी |
| चक्रपाणी | - | सुदर्शन चक्र धारण करणारा विष्णू |
| चक्रीपुराण | - | एकाच बैठकीवरून अनेकांनी सांगितलेले पुराण |
| चंगीभंगी | - | दुर्व्यसनी |
| चट्टामट्टा | - | फडशा, खाऊन संपविणे |
| चढउतार | - | कमी जास्त |
| चटणी भाकरी | - | गरीबांचे साधे जेवण |
| चंद्रप्रभा | - | एक ओषधी गोळी |
| चंद्रग्रहण | - | चंद्रास लागलेले ग्रहण |
| चंद्रमणी | - | एक काल्पनिक रत्न |
| चपलगती | - | वेग |
| चरणरज | - | पायधूळ |
| चरणतळ | - | तळपाय |
| चरणामृत | - | पायांचे तीर्थ |
| चलनवलन | - | चालणे, वागणे, हालचाल |
| चलबिचल | - | अस्थिरता |
| चवढव | - | गोंधळ, भानगड |
| चवल्यापावल्या | - | कच्चीबच्ची; मोड |
| चंबूगबाळे | - | भांडीकुंडी, सामानसुमान |
| चहाफराळ | - | चहा व नास्ता |
| चाटकेबुटके | - | खेळण्यातील भांडीकुंडी, चूलबोळकी |
| चांडाळ चौकडी | - | चार वाईट माणसांचा समुदाय |
| चारा पाणी | - | गुरांचे खाणे |
| चाल चलन | - | आचार, वर्तन, वागणूक |
| चांगले चुंगले | - | चांगलेसे |
| चिपुटचिंगळी | - | चिटपाखरू |
| चिरगुट पांघरूण | - | अथरापांघरायचे |
| चिवून चावून | - | काटकसरीने |

| | | |
|---|---|---|
| चिठी (चिट्ठी) चपाटी | - | लहानसे पत्र |
| चिरी मिरी | - | लहानशी लाच, बक्षिशी |
| चिरे बंदी | - | घडीव दगडाचे बांधकाम |
| चिली पिली | - | मुले बाळे |
| चिरकाल | - | दीर्घ काळ |
| चुकूनमाकून | - | निर्हेतुकपणे |
| चुरचोंबडा | - | वटवट्या |
| चुडेदान | - | सौभाग्य |
| चुकला माकला | - | चुकून राहिलेला |
| चुनखडा | - | चुन्याचा खडा, निवडक रत्न, चपळ |
| चूकभूल | - | विस्मरणाने झालेला दोष |
| चेंगराचेगंर | - | चेपाचेपी |
| चेंदामेंदा | - | चुराडा, नाश |
| चेष्टा कुचेष्टा | - | टवाळकी |
| चेष्टा मस्करी | - | थट्टा |
| चोरूनमारून | - | लपूनछपून |
| चोळामोळा | - | चुरडणे |
| चोरी चपाटी | - | चोरी, दरोडा |
| चोर बीर | - | चोर वगैरे, चोरचिलटे |
| चोरी लबाडी | - | खोटेपणा, कपटीपणा |
| छान छोकी | - | डामडौल, दिमाख |
| छिन्न विच्छिन्न | - | छिन्न भिन्न, अस्ताव्यस्त |
| छेलछबीली | - | नखरेबाज, देखणा |
| छोटा मोठा | - | लहान मोठा |
| जमीन जुमला | - | खेडेगावातील जमीन |
| जड जवाहीर | - | सोने, रत्ने इ. |
| जनरूढी | - | लोकांची चाल, रीत |
| जन्मकुटाळ | - | कुचेष्टा करणारा |
| जपजाप्य | - | धार्मिक कृत्य, जपतप |
| जंतरमंतर | - | जादूटोणा |
| जन्म मरण | - | जन्म मृत्यू, जनन मरण |
| जन्म सावित्री | - | जन्मसवाशीण |
| जमीन दोस्त | - | सर्वस्वी नाश झालेला |
| जयस्तंभ | - | स्मारक म्हणून उभारलेला खांब |
| जलप्रलय | - | सर्व पृथ्वी पाण्यात बुडून जाते तो काळ |
| जसा तसा | - | जसा येईल तसा, कसाबसा |
| जय विजय | - | विष्णूचे दोन द्वारपाल |
| जय पराजय | - | जीत व पराजित, हार जीत |
| जन जागरण | - | जन जागृती |

| | | |
|---|---|---|
| जगजाहीर | - | प्रसिद्ध |
| जन प्रवाद | - | बाजारगप्पा, जनरीत |
| जन रीती | - | लोकांची प्रवृत्ती |
| जन्मगाठ | - | जन्मभर टिकणारा संबंध |
| जन्मदरिद्री | - | जन्मापासून दरिद्री |
| जय गोपाळ | - | नमस्काराचा पर्याय शब्द |
| जल क्रीडा | - | जलविहार |
| जातपात | - | जातगोत, जात जमात |
| जाती स्वभाव | - | जन्म स्वभाव, जातीनुसार स्वभाव |
| जाड जूड | - | लठ्ठ, धष्टपुष्ट |
| जाळपोळ | - | नासधूस |
| जाबजबाब | - | बोलण्याचे चातुर्य |
| जाणता अजाणता | - | कळत नकळत |
| जातकुळी | - | जात, वंशासंबंधी माहिती |
| जिरवाजिरव | - | निरवा निरव, छपवा छपवी |
| जीवश्च कंठश्च | - | जीवलग |
| जीव जंतु | - | लहान किडा |
| जुलूम जबरी | - | बलात्कार, जुलूम |
| जुना पुराणा | - | फार दिवस वापरलेली वस्तू, जुनवट, जीर्ण |
| झगडा बिगडा | - | वादविवाद, भांडण, तंटा |
| झाडे झुडपे | - | झाडांचा समुदाय (झाड झाडोरा) |
| झाड लोट | - | झाडून साफ करणे |
| झाड पाला | - | औषधाच्या उपयोगी पाला, वनस्पती |
| झाकपाक | - | जेवणानंतरची उरली सुरली कामे |
| झुंजुक मुंजुक | - | पहाटेचा संधी प्रकाश, झुंजुमुंजू |
| झोंबा झोंबी | - | ओढाओढ, हिसकणी |
| टंगळ मंगळ | - | टाळाटाळ, चुकवा चुकव, बेपर्वाई |
| टकामका | - | निश्चलपणे, चकित होऊन |
| टकेटोणपे | - | अडथळे, संकटे |
| टाणा टोणा | - | जादुगिरी, मंत्रतंत्र |
| टापटेप | - | उंचवटे, टेकाडे |
| टापटीप | - | सुव्यवस्था |
| टापस टीप | - | पुरेपूर, प्रसंगानुरूप |
| टाळाटाळ | - | भूलथाप, चालढकल |
| टोले जंग | - | मजबूत, बळकट |
| टोळभैरव | - | उडाणटप्पू, रिकामटेकडा |
| ठाकठीक | - | सुव्यवस्था, नीटनेटका, ठीकठाक |
| ठाकून ठोकून | - | प्रसंगानुरूप |
| ठाला ठेल | - | भरगच्च, स्वच्चून भरलेले |

| | | |
|---|---|---|
| ठाव ठिकाणा | - | पत्ता, मागमूस |
| ठायी ठायी | - | ठिकठिकाणी |
| ठेवरेव | - | भांडवल, संचय |
| ठोकतापीर | - | भांडखोर |
| डरांव डरांव | - | बेडकाचे ओरडणे |
| डगमग | - | लटपट, डळमळीतपणा, अस्थिरता |
| डचमळणे | - | खळबळणे, वर उसळणे |
| डबडबणे | - | अश्रूंनी भरुन येणे |
| डायाडोल | - | भयभीत |
| डावपेच | - | खेळातील खुबीदार डाव |
| डावाउजवा | - | व्यवहारोपयोगी चातुर्य |
| डाळ भात | - | साधे जेवण |
| डागडुगी | - | लहानसहान दरुस्ती |
| डाम डौल | - | डौलदार, छानछोकी, थाटमाट |
| डोळे मोड | - | नेत्र संकेत |
| डोंगर दरी | - | डोंगर व दरी असलेला भाग |
| डोंगर पठार | - | सपाट प्रदेश |
| ढकला ढकली | - | विनाकारण वेळ घालविणे |
| ढवळा ढवळ | - | उलाढाल, गोंधळ |
| ढवळा पवळा | - | बैलांची जोडी |
| ढाल ढकल | - | चालढकल, दिरंगाई |
| ढाल-तलवार | - | लढाईची (मारामारीची) साधने |
| तन मन धन | - | सर्वस्व, शरीर मन व संपत्ती |
| तप्तमुद्रा | - | दीक्षा घेताना तांब्या पितळेच्या मुद्रा तापवून अंगावर चिन्हे उमटवितात |
| तर्क ज्ञान | - | अनुमान करण्याची शक्ती |
| तर्क कौशल्य | - | कल्पना करण्याचे चातुर्य |
| तडका फडकी | - | झटापट, तात्काळ, तरकाफरकी |
| तडफडाट | - | चडफडाट |
| तरवार बहादूर | - | शूर, रणगाजी (तलवार - तरवार) |
| तडजोड | - | सलोखा, समेट |
| तप्तशूल | - | तापविलेला सूळ |
| तर्क वितर्क | - | कल्पना, अनुमान, अंदाज |
| तर्क विद्या | - | वादविवादपटुता, अंदाज करण्याची कुशलता |
| तंटा बखेडा | - | बोलाचाली, भांडण |
| ताट वाटी | - | जेवणाची तयारी |
| ताकडा तुकडा | - | लहान मोठा तुकडा |
| तारंतार | - | तंतोतंत, बरोबर |
| तारतम्य | - | श्रेष्ठ कनिष्ठ भाव, बरेवाईटपणा |
| ताळमेळ | - | देश काल इ. चा मेळ |

| | | |
|---|---|---|
| तान मान | - | योग्य व अनुकूल परिस्थिती |
| तांब्या पेला | - | पाणी पिण्यास लागणारी भांडी |
| ताजा तवाना | - | प्रफुल्ल, टवटवीत |
| तिखट मीठ | - | मीठ मसाला |
| तिरसट | - | चिडखोर |
| त्रिमूर्ती | - | ब्रह्मा, विष्णू, शंकर या तिघांचा मिळून झालेली मूर्ती |
| त्रिभूवन | - | स्वर्ग, मृत्यू व पाताळ हे तीन लोक |
| त्रिवर्ग | - | तिघेजण, उत्कर्ष, साम्य, ऱ्हास ह्या तीन अवस्था, तीन पुरुषार्थ |
| तेल फणी | - | केस नीट करणे, केस विंचरणे |
| तेजःपुंज | - | तेजस्वी |
| तेरी मेरी | - | हमरी तुमरी, अरेतुरेवर आलेले भांडण |
| तैल चित्र | - | तेलाच्या रंगांनी काढलेले चित्र |
| तोळामासा | - | थोड्या प्रमाणात |
| तोडमोड | - | किडुकमिडुक, मोडकी-तोडकी |
| त्रेधा तिरपीट | - | ओढाताण, तारांबळ |
| थंतर मंतर | - | जादूटोणा, मंत्रतंत्र |
| थकला भागला | - | दमलेला |
| थय थय | - | आनंद, मौज किंवा राग व्यक्त करण्यासाठी नाचणे |
| थांग पत्ता | - | सुगावा, ठाव |
| थातूर मातुर | - | अर्थहीन, निरर्थक |
| थाटमाट | - | डौल, डामडौल |
| थोडा थोडका | - | अल्प प्रमाणात |
| दगडधोंडा | - | दगड |
| दगाबाजी | - | कपट, ठकबाजी |
| दगेबाज | - | अप्रामाणिक |
| दगा फटका | - | कपट, लबाडी |
| दम छाट | - | श्वासोच्छ्वास निरोधनाची शक्ती |
| दमदाटी | - | धाकदपटशा |
| दळण कांडण | - | मोलकरणीची घरातील ढोबळ कामे |
| दहीभात | - | दह्यात कालविलेला भात |
| दंगामस्ती | - | गडबड, गोंधळ |
| दडप शाही | - | अरेरावी, जुलमी अंमल |
| दरी दरडी | - | उंच सखल |
| दस्तऐवज | - | हक्क पत्र, प्रमाण पत्र |
| दऱ्याखोऱ्या | - | मोठा विस्तार |
| दर्या सारंग | - | नावाडी, खलाशांचा नायक |
| दस्तखत | - | सही |
| दळण वळण | - | परिचय, व्यवहार |
| दृष्टादृष्ट | - | नजरानजर, परस्पर दर्शन |

| | | |
|---|---|---|
| दंत कथा | - | लोककथा, शास्त्रप्रमाणविरहित गोष्ट |
| दाणा पाणी | - | निर्वाह, पोट भरणे |
| दाणा गोटा | - | धान्यधुन्य, डाळी |
| दाणादाण | - | सैरावैरा पळणे, पांगापांग |
| दान धर्म | - | परोपकाराची धार्मिक कृत्ये |
| दानशूर | - | दानवीर, दान देण्यात शूर |
| दावेखोरी | - | शत्रुत्व, वैर |
| दान धर्म | - | पुण्यासाठी कलेले दान |
| दाग दागिने | - | अलंकार |
| दान पात्र | - | दान देण्यास योग्य |
| दातकडी | - | दातखिळी |
| दिवाबत्ती | - | दिवे |
| दिलदारी | - | उदारता |
| दिलहवाल | - | अस्वस्थ |
| दिवसा ढवळ्या | - | भरदिवसा |
| दिवाळी दसरा | - | सणाचा दिवस |
| दीन दुःखी | - | दीन दुबळे, केविलवाणा, अनुकंपनीय |
| दिवस रात्र | - | सतत |
| दुजाभाव | - | मनाचा दुटप्पीपणा, आत एक बाहेर एक अशी वृत्ती |
| दूध दुभते | - | दूध, दुभते पदार्थ |
| दूरदृष्टी | - | कुशाग्र बुद्धी |
| दुराचरण | - | निंद्य, वाईट वागणूक |
| दूध भात | - | दूध आणि भात, मेजवानीच पण विनयाने उल्लेख करण्याचा शब्द |
| देवाण घेवाण | - | देवघेव, व्यवहार |
| देवधर्म | - | धार्मिक कार्य, नवस करणे, देवपूजा |
| देवदानव | - | सुरासुर |
| देव देवता | - | देवता, परमेश्वर |
| देव दर्शन | - | देवाचे दर्शन |
| देव ऋषी | - | देवर्षी, नारद |
| दैवगती | - | नशीब |
| धकाबुकी | - | धक्का बुक्की, धक्के व बुक्के यांचा मार |
| धडधाकट | - | शाबूत, अव्यंग |
| धनदौलत | - | संपत्ती, मालमत्ता |
| धरपकड | - | गुन्हेगार, चोर यांना पकडण्याची क्रिया |
| धरसोड | - | चंचलता, अस्थिर |
| धष्टपुष्ट | - | गुबगुबीत, निकोप, धट्टाकट्टा |
| धरतीमाता | - | भूमाता, जमीन |
| धनुष्य बाण | - | ऐतिहासिक काळातील लढाईचे साधन |
| धर्मकर्म | - | आचार, वर्तन |

| | | |
|---|---|---|
| धर्मयुद्ध | - | न्याय युद्ध, निष्कपट युद्ध |
| धनधान्य | - | संपत्ती, घरदार, मालमत्ता इ. |
| धागादोरा | - | संबंध, पत्ता |
| धावाधाव | - | पळापळ, घाईने इकडे तिकडे पळणे |
| धान्य धुन्य | - | भात, गहू, ज्वारी इ. धान्य |
| ध्यानीमनी | - | अंतःकरणातील सर्व अवस्था व्यापणे |
| धावत पळत | - | अतिशय वेगाने, लवकर |
| धांगड धिंगा | - | गोंधळ, दांडगाई |
| धुमधडाका | - | गोंगाट, दणदणाट |
| धुमाकूळ | - | गोंधळ, दंगामस्ती |
| धेडगुजरी | - | अनेक भाषांची खिचडी |
| धोपट मार्ग | - | सरळमार्ग, परंपरागत चालत आलेली रीत, पद्धत |
| धोतर जोडी | - | दोन धोतरांची एक जोडी |
| नखशिखात | - | आपादमस्तक, सर्व शरीरभर, पायाच्या नखापासून शेंडीच्या अग्रापर्यंत |
| नंगानाच | - | निर्लज्जपणाचे वर्तन |
| नजर बंदी | - | जादुगिरी, हातचलाखी |
| नटूत थटूत | - | सजून, नट्टापट्टा करुन |
| नंदीबैल | - | संकेताप्रमाणे वागणारा |
| नन्नाचा पाढा | - | प्रत्येक गोष्टीला नकार देणे |
| नरकुंजर | - | गणपती, नरश्रेष्ठ |
| नफातोटा | - | फायदा व नुकसान |
| नदी नाले | - | लहान मोठे पाण्याचे प्रवाह |
| नगरवासी | - | शहरात राहणारे |
| नकार घंटा | - | नाकबूल करणे |
| नटवा नटवी | - | नखरेबाज |
| नवरा बायको | - | दंपती, पती पत्नी |
| नवनवती | - | तारुण्याची आरंभदशा |
| नवरा नवरी | - | नवदंपती, वर आणि वधू |
| नगार खाना | - | वाद्यांचा कारखाना, देऊळ |
| नव वधू | - | नवी नवरी |
| नव भूमी | - | नवीन भूमी, नवीन ठिकाण |
| नाव लौकिक | - | प्रसिद्धी, कीर्ती |
| नाक कान | - | अवयव |
| नामो निशान | - | अस्तित्व, नावकुल, संबंध |
| नाच गाणे | - | नाचगाण्याचा कार्यक्रम |
| न्याय नीती | - | न्याय निवाडा, न्याय, खरेपणा |
| नावगाव | - | नाव निशाण, संबंध, नावकुल |
| निमक हराम | - | कृतघ्न, बेईमान |
| निमक हलाल | - | कृतज्ञ, विश्वासू |

निशाणबाजी - नेम मारणे, वेध
निवासस्थान - घर
निम्माशिम्मा - अर्धेमुर्धे
निसर्ग रम्य - निसर्ग सौंदर्य, स्वाभाविक सौंदर्य
निसर्ग प्रेम - निसर्गावरील प्रेम
निज मुख - स्वतःचे तोंड
निळे काळे - निळा व काळा रंग मिळून झालेला हिरवा रंग, निस्तेज
निळा शार - निळे शहर (शार-शहर)
निळा सावळा - सावळा
नेत्रपल्लवी - नेत्र संकेत, खुणेची भाषा
नोकर चाकर - सेवक, चाकर, दास
नोक झोक - नखरा, थाटमाट
पडझड - मोडतोड
पही पाहुणा - वाटसरू, अतिथी, पै पाहुणा
पक्षपात - कैवार
पशुपक्षी - प्राणीमात्र
पळवा पळवी - पळापळ, धावाधाव
पहिला वहिला - प्रथमचा
पदोपदी - पावलो पावली, क्षणोक्षणी, वारंवार
पदर मोड - स्वतः खर्च करून
पंचयज्ञ - पांच प्रकारचे यज्ञ, ब्राह्मणाने करावयाचे यज्ञ
पाऊल वाट - अरूंद वाट, पायवाट
पालापाचोळा - कचरा, निरर्थक वस्तू
पाटपाणी - जेवणाची तयारी
पांढरपेशा - उच्च वर्णीय
पाताळयंत्री - गूढ, कारस्थानी
पानसुपारी - विड्याचे साहित्य, पोस्त, लांच
पायपोस - चप्पल, पादत्राण
पायगुण - शुभाशुभ शकून
पांढऱ्या पायाचा - अपशकुनी, वाईट पायगुणाचा
पांढराफटक - निस्तेज
पालनपोषण - संरक्षण, सांभाळ
पावलोपावली - वेळोवेळी, पदोपदी
पाच पन्नास - थोडेसे
पाने फुले - देवाच्या पुजेसाठी फुले व पाने
पाऊस पाणी - पाऊस, पीक इ. पर्जन्यमान
पांढरा शुभ्र - अतिशय पांढरा
पालुपद - वारंवार म्हणणे, ध्रुपद
पाहुणा राउळा - पै पाहुणा, पाहुणा बिहुणा, पाहुणा

| | | |
|---|---|---|
| पाठोपाठ | - | पाठीमागून, मागोमाग, लागोपाठ |
| पास नापास | - | निकाल |
| पाने बिने | - | पाने इ. |
| पांढरा कावळा | - | अप्राप्य वस्तू |
| पायपीट | - | विना कारण चालण्याचे श्रम |
| पिवळा जर्द | - | पिवळाधमक, अतिशय पिवळा |
| पिढ्यानपिढ्या | - | वंशपरंपरागत |
| पीक पाणी | - | पीक |
| पूसतपास | - | खोल चौकशी |
| पेच प्रसंग | - | विपत्ती |
| पैसा अडका | - | पैसे, पै पैसा |
| पोरे बाळे | - | मुले |
| प्रसंगावधान | - | संकट समयी भांबावून न जाणे |
| फट फजिती | - | फजिती, अपमानकारक स्थिती |
| फसवा फसवी | - | फसवणूक |
| फंद फितुरी | - | दगलबाजी, कारस्थान |
| फाटका तुटका | - | मोडका तोडका |
| फाकड पसारा | - | फापटपसारा, अवास्तव मांडलेला पसारा |
| फाटाफूट | - | वेगळे होणे, ताटातूट, विभक्त |
| फिरवा फिरव | - | उलटसुलट, उलथविणे, खालीवर करणे |
| फुकट फाकट | - | फुकट, मोफत |
| फेर फटका | - | इकडे तिकडे फिरणे, भटकणे |
| फेका फेक | - | भिरकाविणे |
| फौज फाटा | - | सैन्य व त्या बरोबर असणारे लोक, साहित्य इ. फौज, सैन्य |
| बकध्यान | - | साधुत्वाचे ढोंग |
| बरे वाईट | - | मरण, नाश |
| बहिणभावंडे | - | भावंडे, बहीण भाऊ, जवळचे नातेवाईक |
| ब्रह्मघोटाळा | - | गोंधळ, आचारविचारांची अव्यवस्था |
| बनवा बनवी | - | एकमेकांना बनविणे |
| बाजारहाट | - | बाजार खरेदी, बाजारपेठ |
| बापलेक | - | वडील व मुलगा किंवा मुलगी |
| बाग बगीचा | - | फुलबाग, मळा |
| बागुलबोवा | - | भीती वाटण्यासाठी उभे केलेले सोंग |
| बाजार बुणगे | - | फौजे बरोबर असणारी अवांतर माणसे |
| बाड बिछाना | - | बाड बिस्तरा, सामानसुमान |
| बाप जन्मी | - | सर्व आयुष्यात, जन्मापासून आजपर्यंत |
| बाल्यावस्था | - | बालपण |
| बाळी बुगडी | - | बारीकसारीक दागिने |
| बारीकसारीक | - | किरकोळ, बारीक |

| | | |
|---|---|---|
| बाळगोपाळ | - | लहान मुले |
| बाळकडू | - | बाळघुटी, कडू औषधे उगाळून पाजतात ते |
| बालबोध | - | सुलभ, सुबोध, लहान मुलांना समजेल असे |
| बाया बापड्या | - | बिचाऱ्या बायकांचा |
| बित्तबातमी | - | नक्की बातमी, बित्तं बातमी |
| बिनधोक | - | निश्चित |
| बिनडोक | - | विचार न करणारा, मूर्ख |
| बिनतोड | - | बिनचूक, सर्वोत्कृष्ट |
| बीजारोपण | - | बी पेरणे |
| बुद्धी पुरःसर | - | मुद्दाम, जाणून बुजून |
| बेभरवशी | - | फसव्या |
| बेल भंडार | - | एक प्रकारचा शपथ विधी |
| बेरीज वजाबाकी | - | हिशेब |
| बैल गाडी | - | बैल जोडलेली गाडी |
| बोलघेवडा | - | वाचाळ, वटवट करणारा |
| बोलाचाली | - | संभाषण |
| भरत भेट | - | राम व भरत यांची भेट |
| भक्त वत्सल | - | भक्तावर अती प्रेम करणारा |
| भरमसाट | - | पुष्कळ, अमर्याद |
| भक्तीभाव | - | भक्तीयुक्त प्रीती, पूज्यतेचा भाव |
| भले मोठे | - | खूप मोठे |
| भलतासलता | - | कोणीतरी, कोणतातरी |
| भात भाकरी | - | जेवण, (भाजी, भाकरी, पोळी इ.) |
| भाऊ बंदकी | - | बंधुत्वाची वागणूक |
| भाकड कथा | - | बाष्कळ गप्पा, कंटाळवाणी गोष्ट |
| भांडी कुंडी | - | सर्व प्रकारची भांडी |
| भाजी पाला | - | फळ भाजी व पाले भाजी, कंदमुळे इ. |
| भाकर तुकडा | - | भूक भागविण्यासाठी थोडेसे खाणे |
| भाऊ भाऊ | - | भावंडे |
| भांडण तंटा | - | भांडण, कलह |
| भीड भाड | - | संकोच, पर्वा, मुर्वत |
| भुई सपाट | - | भुईस लागून, भुपृष्ठ |
| भूत पिशाच | - | भुते खेते, मृतांची छाया |
| भेदाभेद | - | भेदभाव, परकेपणाची भावना, फरक |
| भोळाभाबडा | - | साधा भोळा, भोळासांब |
| भोसका भोसकी | - | मारामारी |
| मनकवडा | - | दुसऱ्यांचे मन वेधून घेण्याची शक्ती असलेला |
| मंत्र तंत्र | - | जादूटोणे, डावपेच |
| मराठा मोळा | - | मराठे लोकातील चालीरीती |

| | | |
|---|---|---|
| मरतुकडा | - | अतिशय अशक्त मनुष्य, रोडका |
| मनमुराद | - | आनंददायक, मनसोक्त |
| मनमिळाऊ | - | सर्वांशी मिळून मिसळून वागणारा |
| मनःकामना | - | अंतःकरणातील इच्छा |
| मनमोकळा | - | खुल्या अंतःकरणाने, संकोच सोडून |
| मर्कट चेष्टा | - | माकड चेष्टा, पोरकट चाळे |
| मागमूस | - | पत्ता, चाहूल |
| मान मरातब | - | आदर सत्कार, बहुमान |
| म्हातारा कोतारा | - | म्हातारा, वृद्ध, वयस्क |
| मातापितर | - | आईवडील, मातापिता |
| मारपीट | - | खूप मारणे, मारहाण |
| मामा भाचे | - | नातेवाईक, मामा व भाचा |
| माया ममता | - | दया, माया, स्नेह, प्रीती |
| मायलेकी | - | आई व मुलगी, माय लेकरे, माय माऊली |
| मागे पुढे | - | आगे मागे, केव्हा ना केव्हा |
| मान अपमान | - | आदर-अनादर |
| माल मसाला | - | सामग्री, उपयुक्त वस्तू |
| मान पान | - | आदर सत्कार, मान सन्मान |
| मीठ भाकर | - | जेवण, गरिबीचे जेवण |
| मीठ मिरची | - | मसाला, चव आणणारे पदार्थ |
| मुले बाळे | - | लहान थोर सर्व मुले |
| मूठमाती | - | पुरण्याचा अंत्यसंस्कार |
| मेटाकुटी | - | महत्प्रयास |
| मेवा मिठाई | - | तऱ्हेतऱ्हेची फळे व मिठाई |
| मैलोमैल | - | खूप दूरपर्यंत |
| मोडतोड | - | नासधूस |
| मोडका तोडका | - | मोडकळीस आलेला |
| मोल मजूरी | - | मजुरी घेऊन केलेली लोकांची कामे |
| यथाशक्ती | - | आपल्या शक्तीप्रमाणे |
| यथायोग्य | - | योग्य दिसेल तसे, अनुरूप, रूढीनुसार |
| यथाविधी | - | नियमानुसार |
| यथासांग | - | पूर्णपणे, कोणती ही गोष्ट कमी न करता |
| यथातथा | - | कसा तरी, कष्टाने, जेमतेम |
| यश अपयश | - | मानापमान, स्तुती किंवा निंदा |
| याता यात | - | हेलपाटा, त्रास, कष्ट |
| येर जार | - | येरझार, खेपा, हेलपाटा |
| रक्त बंबाळ | - | रक्ताने माखलेला |
| रंगढंग | - | एकंदर देखावा, युक्ती, चाळा |
| रंग रंगोटी | - | घर किंवा चेहरा रंगविणे |

| | | |
|---|---|---|
| रत्न जडित | - | रत्ने बसविलेला |
| रमत गमत | - | घाई न करता, बिनत्रासाने, सहज |
| रहाट गाडगे | - | चांगली व वाईट परिस्थिती,नशीबाचे फेरफार, व्यवहार |
| रत्ने माणके | - | मूल्यवान खनिज पदार्थ |
| रंगबहार | - | आनंदाची लूट, मौज, सुख |
| रडत राऊत | - | रडवा मनुष्य, रडतराव |
| रडत खडत | - | मोठ्या कष्टाने, रेंगाळत, नाइलाजाने |
| रंजलेले गांजलेले | - | पीडीत, दुःखित |
| रंगभंग | - | विरस, आनंदाचा नाश |
| रदबदल | - | मध्यस्थी, वाटाघाट |
| रानी वनी | - | जंगलात |
| रान फुले | - | जंगली फुले |
| राजा राणी | - | राजा व राणी, विनोदी जोडपे |
| राजे महाराजे | - | सम्राट, राजे व महाराजे |
| राग लोभ | - | दुःख व आनंद |
| राम राज्य | - | न्यायाचे व प्रजेचे रक्षण करणारे राज्य |
| राष्ट्रद्रोह | - | राष्ट्राशी शत्रुत्व |
| रान पाखरे | - | रानातील पाखरे |
| राम रगाडा | - | गर्दी, पराकाष्टेची दाटी |
| राजे रजवाडे | - | राजे, संस्थानिक, सरदार इ. |
| राख रांगोळी | - | नाश, विध्वंस |
| राग रंग | - | रागाची लक्षणे |
| रिकाम टेकटा | - | निरूद्योगी |
| रीतभात | - | रीतीरिवाज |
| रूपलावण्य | - | सौंदर्य, बांधेसूदपणा |
| रूसवा फुगवा | - | हट्ट, राग आणि चरफड |
| रोखठोक | - | उधारीचा नसलेला (रोख), स्पष्ट |
| रोगराई | - | लहानमोठे रोग |
| लघाळ मावशी | - | गप्पा मारणारी बाई |
| लपत छपत | - | चोरून, गुप्तपणे |
| लहान सहान | - | बारीक सारीक, हलका |
| लक्षावधी | - | लाखो |
| लग्नकार्य | - | लग्न समारंभ, मंगल कार्य |
| लता वेली | - | वेली |
| लघळ पघळ | - | अतिशय बडबड |
| लंबा-चौडा (चवडा) | - | लांबलचक |
| लग्न-बिग्न | - | लग्न आदि समारंभ |
| लहान थोर | - | लहान आणि मोठा |
| लाकूड फाटा | - | घर बांधण्यासाठी लागणारे लाकूड विटा इ. |

| | | |
|---|---|---|
| लाजकोंबडा | - | लाजाळू, भिडस्त |
| लाजलज्जा | - | लाज, मर्यादा |
| लांडा कारभार | - | नसती लुडबुड, उठाठेव |
| लांब लचक | - | प्रशस्त, अवाढव्य |
| लांडी लबाडी | - | लहान मोठी लबाडी, फसवणूक |
| लालन पालन | - | सांभाळ, संगोपन |
| लाडी गोडी | - | लाडकेपणा |
| लाच लुचपत | - | लाच, अप्रामाणिकपणाची देवाण घेवाण |
| लाल भडक | - | अतिशय तांबडा |
| लागे बांधे | - | नातीगोती |
| लांब सडक | - | लांब रस्ता |
| लांडगे-कोल्हे | - | हिंस्त्र पशु |
| लुंगा सुंगा | - | बारीक, क्षुद्र, नालायक |
| लुळापांगळा | - | कमजोर, व्यंग असलेला |
| लेचापेचा | - | अशक्त, कमजोर |
| लेकरे बाळे | - | मुले बाळे |
| लोक-परलोक | - | इहलोक व परलोक |
| लोट पोट | - | लोळण, बेसुमार, मौज, आनंद |
| लोणकढी (थाप) | - | समयानुसार ठेवून दिलेली (थाप), खोटी बातमी |
| लोणकढे (तूप) | - | ताजे साजूक (तूप) |
| वज्रघात | - | मोठी आपत्ती |
| वजन माप | - | प्रमाण |
| वरण भात | - | साधे जेवण |
| वर्ण धर्म | - | व्यवहार, जातीला योग्य असा आचार |
| व्रत वैकल्य | - | व्रताची अपूर्णता, नेम, व्रते |
| वर खाल | - | उंचसखल, विषम रीतीने |
| वर्णहीन | - | जातीहीन |
| वर्ण क्रम | - | अक्षरांचा क्रम |
| वृक्षवाटिका | - | बाग, उपवन |
| व्यथा वेदना | - | दुःख, वेदना |
| वटहुकुम | - | ताबडतोब अमलात येणाऱ्या कायद्याचे फर्मान |
| वडील धारा | - | घराण्यात शिस्त राखण्याचा अधिकार असलेली व्यक्ती |
| वरचष्मा | - | वरचढपणा, वर्चस्व |
| वरदहस्त | - | मोठ्यांचा आशीर्वाद, वर देण्यासाठी उचललेला हात |
| वरदक्षिणा | - | वधूचा पिता वरास देतो ती रक्कम |
| वहिवाट | - | चाल, रीत, व्यवस्था |
| वाडवडील | - | पूर्वज, वडील माणसे |
| वास्तपूस्त | - | विचारपूस |
| वाईटसाईट | - | निरुपयोगी, निरर्थक |

| | | |
|---|---|---|
| व्यापार उदीम | - | व्यवहार, कामधंदा |
| वादळ वारे | - | तुफान |
| वाकडा तिकडा | - | वक्र |
| वाटा घाटी | - | चर्चा, वादविवाद, वाटाघाट |
| वाक् बगार | - | कुशल, पटाईत |
| वाचाळ पंचविशी | - | बडबड लावणे |
| वाणसौदा | - | वाणसवदा, किराणा माल |
| वाजत गाजत | - | धुम धडाक्यात |
| वाजागाजा | - | प्रसिद्धी, गवगवा |
| वाटचाल | - | प्रवास |
| वादविवाद | - | चर्चा |
| वारे माप | - | प्रमाणाबाहेर, विसंगत |
| विघ्नसंतोषी | - | दुसऱ्यांच्या कामात विघ्न आलेले पाहून संतोष मानणारा |
| विचारपूस | - | वास्तपुस्त, चौकशी |
| विधिघटना | - | नशीब, प्रारब्ध, कर्मगती |
| वितंडवाद | - | अट्टाहासाने खोटा पक्ष स्थापन करण्यासाठी वादविवाद |
| विनासायास | - | श्रमाशिवाय |
| विरहव्यथा | - | विरहामुळे, होणारे दुःख |
| विल्हेवाट | - | उधळपट्टी, व्यवस्था, योग्य योजना |
| विश्वासघात | - | विश्वास दाखवून फसवणूक, बेइमानी |
| विस्मय चकित | - | आश्चर्यचकित |
| वेडा वाकडा | - | वाकडातिकडा |
| व्यासपीठ | - | उच्चासन, पुराणिकांचे आसन |
| शत पावली | - | जेवणानंतरच्या फेऱ्या |
| शरीर प्रकृती | - | शरीराची ठेवण, स्वभाव |
| शंखशिंपले | - | समुद्रात राहणाऱ्या काही प्राण्यांची घरे |
| शतमूर्ख | - | अत्यंत मूर्ख |
| शहाणा सुरता | - | बुद्धीमान, हुषार व देखणा |
| शरीर यष्टी | - | शरीर ठेवण, अंगकाठी |
| शब्द पाल्हाळ | - | शब्दावडंबर, शब्दजाल |
| शर पंजर | - | बाणांचा पिंजरा, पलंग |
| श्रम जीवी | - | मेहनती |
| श्रमदान | - | समाजासाठी विनामूल्य कष्टाचे काम करणे |
| शिळापाका | - | उरलेसुरलेले जेवण |
| शिवाशिव | - | स्पृश्य व अस्पृश्य यांचा गोंधळ |
| शिकला सवरलेला | - | शिक्षण घेतलेला, शिक्षित |
| शिवण टिपण | - | शिवणकाम |
| शिरोमणी | - | मुकुटमणी, श्रेष्ठ इसम |
| शिपाईप्यादे | - | जासूद, सैनिक |

| | | |
|---|---|---|
| शीघ्रकोपी | - | रागीट, तापट |
| शेजारपाजार | - | शेजार |
| शेठसावकार | - | सावकार, व्यापारी |
| शेंडेफळ | - | अखेरचे मूल |
| शेती भाती | - | शेतीवाडी, शेती, शेत जमीन |
| शेला पागोटे | - | बहुमानाची वस्त्रे |
| शेणसडा | - | पाण्यात शेण घालून जमिनीवर शिंपडणे |
| शेळ्या मेंढ्या | - | पाळीव जनावरे, बुद्धिबळातील एक डाव |
| शे दोनशे | - | शंभर-दोनशे |
| षोडशोपचार | - | विधीपूर्वक केलेले काम, पूजेचा विधी |
| सकट निकट | - | एकूण सगळे |
| संगतीसोबती | - | स्नेही, दोस्त, संगतसोबत |
| सगा सोयरा | - | नातेवाईक, सगेसोबती, सगे संबंधी, सोयरा धायरा |
| सडपाताळ | - | किरकोळ अंगाचा, रोडका |
| सणवार | - | सणबीण, |
| सदलाबदल | - | अदलाबदल |
| समज उमज | - | पूर्ण जाणीव, ज्ञान |
| सर मिसळ | - | मिश्रण, एकत्रीकरण |
| स्वयंपाक पाणी | - | जेवण |
| सटरफटर | - | किरकोळ |
| सदा सर्वदा | - | नेहमी, सतत |
| सरळसोट | - | सरळ |
| सणसुदी | - | सणाचा दिवस |
| सडा सारवण | - | झाडलोट |
| समुद्रमंथन | - | समुद्र घुसळणे |
| वादविवाद | - | वाटाघाट |
| सत्यापसत्य | - | चांगले वाईट |
| समुद्रमेखला | - | पृथ्वी |
| सवतासुभा | - | स्वतःचे असे निराळे |
| सती सावित्री | - | पतिव्रता, साध्वी |
| सटी सामासी | - | क्वचित प्रसंगी, कधीतरी |
| सत्ययुग | - | चार युगातील पहिले युग, सुवर्णयुग, |
| सत्वनिष्ठ | - | सत्व न सोडणारा |
| सल्लामसलत | - | विचार विनिमय, हितवाद |
| सरसकट | - | सरासरी, एकत्रितपणे |
| सत्य-असत्य | - | खरेखोटे |
| सर्वसामान्य | - | सर्वांस लागू होणारा |
| साखरभात | - | साखर व केशर घालून केलेला भात |
| साद पडसाद | - | प्रतिध्वनी |

| | | |
|---|---|---|
| साधाभोळा | - | सरळ, स्वभावाने गरीब |
| सागरतीर | - | समुद्रतीर, समुद्र किनारा |
| सांड लवंड | - | सांडासांड, सोडणे, पालथे करणे |
| साडी चोळी | - | स्त्रियांचा पोषाख |
| साज-शृंगर | - | थाटमाट, सजणे, नटणे |
| साखर झोप | - | अरुणोदयाच्या वेळची झोप |
| साधा सिधा | - | सरळ, एकमार्गी, निष्कपट |
| सांज सकाळ | - | नेहमी |
| सामान सुमान | - | चीज वस्तू, सामग्री, साहित्य |
| स्नान संध्या | - | स्नान व संध्या, देवपूजा |
| सांग सुगरण | - | नुसती तोंड पाटील की करणारी |
| सांगा वांगी, सांगोवांगी | - | ऐकीव गोष्ट |
| साधक बाधक | - | अनुकूल व प्रतिकूल, योग्य अयोग्य |
| सासुरवाडी | - | पत्नीचे माहेर |
| साळीमाळी | - | समाजातील काही वर्ग |
| साफसफाई | - | स्वच्छता, साफसुफी |
| साधुसंत | - | साधू आणि संत |
| स्त्री-पुरुष | - | पतीपत्नी, पुरुष व स्त्रिया |
| सुख-सोहळा | - | आनंददायक प्रसंग |
| सुईदोरा | - | सुई आणि दोरा |
| सुकाळसौदा | - | अत्यंक स्वस्त मालाची देवघेव |
| सुरंगाठ | - | सहज सुटण्यासारखी गाठ |
| सुतराम | - | जरासुद्धा (नाही) |
| सुदामपोहे | - | गरीब माणसाची भेट |
| सुतोवाच | - | सुचविणे, सांगण्यास किंवा बोलण्यास सुरवात करणे |
| सेवासुश्रूषा | - | आजारी माणसाची काळजी घेणे |
| सोनेनाणे | - | सोने व इतर किमती वस्तू |
| सोक्षमोक्ष | - | गुंतून पडलेल्या व्यवहाराचा काही तरी कायमचाशेवट करणे, मोकळीक |
| सोयरे सूतक | - | लागे बांधे |
| सोवळे ओवळे | - | शुद्धतेने राहण्यासाठी सोवळेपणाची स्थिती |
| हरीवदन | - | हरीचे नामस्मरण |
| हरिचंदन | - | केशर, पिवळा चंदन |
| हसवाहसवी | - | हास्य |
| हलकी सलकी | - | कमी दर्ज्याची, कमी प्रतीची |
| हवा पाणी | - | वातावरण |
| हळदीकुंकू | - | सौभाग्यदर्शक, हळद कुंकू |
| हसतखेळत | - | मजेत, हासत बागडत |
| हरि पाठ | - | विठ्ठल भक्तीपर अभंग |
| हवा पालट | - | हवेत बदल |

| | | |
|---|---|---|
| हमरीतुमरी | - | हंबरातुंबरी, जोराचे भांडण, हमरातुमरी |
| हकनाक | - | हकनाहक, विनाकारण |
| हर हुन्नर | - | प्रत्येक कौशल्य, कसब |
| हाड वैर | - | अत्यंत तीव्र व फार जुने वैर |
| हात घाई | - | अती घाई |
| हातचलाखी | - | हस्त चापल्य, नजरबंदीचा कारभार |
| हातानिराळा | - | हातावेगळे, घेतलेले काम संपविणे |
| हाल अपेष्टा | - | नाना प्रकारची संकटे, आपत्ती |
| हाव भाव | - | भावनादर्शक अभिनय |
| हृदय शून्य | - | निर्दय, क्रूर |
| हाल हवाल | - | हकीकत, वर्तमान, हालअपेष्टा |
| हाडी मासी | - | शरीराने, अंगकाठी, शरीर रचना |
| हास्य विनोद | - | थट्टा मस्करी |
| हिरवा-निळा | - | रंगाची छटा |
| हिरवा गार | - | गडद हिरवा |
| हिरवा पिवळा | - | रंगाची छटा |
| हेकेखोर | - | हट्टी, दुराग्रही |
| हेवेखोर | - | व्देशी, मत्सरी |
| हेवादावा(हेवादेवा) | - | शत्रूभाव, व्देश, मत्सर |
| हैबती गैबती | - | अजागळ |
| हैदोसदुल्ला | - | हैदोस, गोंधळ |
| होमहवत | - | होम, यज्ञ |
| हौसमौज | - | चैन, इच्छा |
| क्षमा याचना | - | क्षमेची भिक्षा मागणे |
| क्षणोक्षणी | - | पावलो पावली, प्रत्येक क्षणास |
| क्षीरसागर | - | दुधाचा समुद्र |
| क्षेम कुशल | - | कुशल क्षेम समाचार |
| ज्ञान विज्ञान | - | शास्त्रीय ज्ञान |
| ज्ञानदीप | - | बुद्धीरूपी दिवा |
| ज्ञान कोश | - | ज्ञानाचा कोश (संग्रह) |
| ज्ञान अज्ञान | - | ज्ञान आणि अज्ञान |
| ज्ञान साधना | - | ज्ञान संपादन करणे |
| ज्ञान सागर | - | ज्ञान रूपी सागर |
| ज्ञान मंदिर | - | शाळा, ज्ञान प्राप्त होण्याचे ठिकाण |

# (२) शब्दसमूहाबद्दल एक शब्द

## शब्दसमूहाबद्दल एक शब्द

अरण्याचा राजा ........................................................- ..............................................वनराज
अरण्याची शोभा .......................................................- ............................................. वनश्री
अपेक्षा नसताना .......................................................- ............................................अनपेक्षित
अस्वलाचा खेळ करणारा .............................................- ..............................................दरवेशी
अंग राखून काम करणारा ............................................- ..............................................अंगचोर
अनुभव नसलेला .......................................................- ............................................अननुभवी
अन्न देणारा ............................................................- ............................................अन्नदाता
अग्नीची पूजा करणारा ................................................- ..........................................अग्नीपूजक
अनेक गोष्टीत एकाच वेळी लक्ष पुरविणारा ..........................- .......................................... अष्टावधानी
अचुक गुणकारी असे ..................................................- ............................................. रामबाण
अंतःकरणाला पाझर फोडणारे .........................................- .......................................... हृदयद्रावक
अग्नी विझवल्यानंतर राहणारी पांढरी भुकटी ...........................- ...................................................राख
अगदी न बोलणारा ....................................................- ........................................... मुखस्तंभ
अन्नाची भिक्षा मागणारा ...............................................- .............................................माधुकरी
अतिशय सुंदर पुरुष ...................................................- ..................................मदनाचा पुतळा
अतिशय मोठे प्रयत्न ...................................................- ...................................भगीरथ प्रयत्न
अधाशीपणे तोंड भरून घेतलेला घास .................................- ...................................बोकना, बोकणा
अतिशय वृद्ध झालेला माणूस .........................................- .........................................पिकले पान
अत्यंत रोड अशी व्यक्ती .............................................- ....................................पाप्याचा पितर
अत्यंत खोल (गूढ) मसलत करणारा ..................................- .......................................... पाताळयंत्री
अतिशय दुर्मिळ असा आलेला अनुकूल योग ...........................- ...................................................पर्वणी
अक्षर ओळख नसलेला ................................................- ............................................. निरक्षर
अनेक पदार्थांच्या समुदायात जे उत्तम असेल ते .........................- ............................................नगदमाल
अतिशय उग्र स्वरूप धारण करणारा ..................................- ........................................ नृसिंहावतार
अर्थ न समजता केलेले पाठांतर .......................................- .............................................पोपटपंची
अगदी दुर्मिळ झालेली वस्तू किंवा व्यक्ती ..............................- ....................................... उंबराचे फूल
अतिशय लवकर रागावणारा ...........................................- ........................................... शीघ्रकोपी
अंधाऱ्या रात्रीचा पंधरवडा ...........................................- ............................... कृष्णपक्ष, वद्यपक्ष
अत्यंत हट्टी पुरुष .......................................................- ............................................अडेलतट्टू

अनेक चांगल्या गुणांनी युक्त ................................................ - ............................................ अष्टपैलू
अत्यंत उदार मनुष्य ................................................ - ............................................ कर्णाचा अवतार
अत्यंत प्रिय असलेली व्यक्ती ................................................ - ............................................ गळ्यातील ताईत
अत्यंत गरीब स्वभावाची व्यक्ती ................................................ - ............................................ गोगलगाय
अत्यंत रागीट मनुष्य ................................................ - ............................................ जमदग्नी
अक्कल शून्य, हो ला हो करणारा ................................................ - ............................................ नंदीबैल
आंब्याच्या पानांची व झेंडूच्या फुलांची माळ ................................................ - ............................................ तोरण
आपल्या लहरीप्रमाणे वागणारा ................................................ - ............................................ स्वच्छंदी
आठवड्याने प्रसिद्ध होणारे नियतकालिक ................................................ - ............................................ साप्ताहिक
आग विझविणारे ................................................ - ............................................ अग्निशामक
आधी जन्मलेला ................................................ - ............................................ अग्रज
आवरता येणार नाही असे ................................................ - ............................................ अनावर
आकाशात गमन करणारा ................................................ - ............................................ खग
आकाशाचा भेद करणारे ................................................ - ............................................ गगनभेदी
आजारी लोकांची (रोग्यांजी) शुश्रूषा करणारी ................................................ - ............................................ परिचारिका
आई वडील नसलेली / नसलेला ................................................ - ............................................ पोरकी / पोरका
आपल्याच देशात तयार झालेली वस्तू (माल) ................................................ - ............................................ स्वदेशी
आईचे मुलांविषयी प्रेम ................................................ - ............................................ वात्सल्य
आपल्याबरोबर खेळात भाग घेणारा मित्र ................................................ - ............................................ खेळगडी
आपल्याच मताप्रमाणे चालणारा ................................................ - ............................................ हटवादी, हेकेखोर
आपल्याच फायदा करून घेणारा ................................................ - ............................................ स्वार्थसाधू, अप्पलपोटा
आठवड्यातून दोन वेळा / तीन वेळा प्रसिद्ध होणारे ................................................ - ............................................ द्विसाप्ताहिक/त्रिसाप्ताहिक
आयुष्यात शेवटी मिळवायचे ते ................................................ - ............................................ ध्येय
आगावू खर्चासाठी दिलेली रक्कम ................................................ - ............................................ अनामत
आपापसात हळूच बोलणे ................................................ - ............................................ कुजबूज
आपले काम साधण्यापुरते आर्जव ................................................ - ............................................ ताकापुरते रामायण
आकुंचित मनाचा ................................................ - ............................................ कूपमंडूक
आपापसातील कलह ................................................ - ............................................ यादवी
आपल्यावेळची परिस्थिती बदलून तिला योग्य वळण लावणारा ................................................ - ............................................ युगपुरूष
अचरणासाठी मुद्दाम केलेला एखादा धार्मिक नियम ................................................ - ............................................ व्रत
आश्चर्यकारक दैवी शक्ती ................................................ - ............................................ सिद्धी
आकाश जमिनीस टेकलेले दिसते ती मर्यादा ................................................ - ............................................ क्षितीज
इच्छिलेली वस्तू देणारा वृक्ष ................................................ - ............................................ कल्पवृक्ष
इच्छित वस्तू देणारी गाय ................................................ - ............................................ कामधेनू
इच्छिलेली वस्तू देणारा मणी ................................................ - ............................................ चिंतामणी
इतरांबरोबर बेपर्वाईने वागणारा ................................................ - ............................................ अरेराव
इतरांना मार्ग दाखविणारा ................................................ - ............................................ मार्गदर्शक
इंद्राचा खजिनदार, अतिशय संपत्तीमान पुरूष ................................................ - ............................................ कुबेर
इच्छा, आशा, लोभ सोडून देऊन इश्वराची प्राप्ती
करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या ................................................ - ............................................ योगी

ईश्वरधर्म (देव) आहे असे मानणारा ................................... - ..............................................आस्तिक

ईश्वरधर्म (देव) नाही असे मानणारा ................................... - ............................................. नास्तिक

उदयाला येत असलेला ....................................................... - ........................................... उदयोन्मुख

उतारूनी थांबण्याजी जगा ................................................. - ............................................प्रतिक्षालय

उपकाराची जाणीव ठेवण्याची प्रवृत्ती .................................... - ............................................ कृतज्ञता

उग्र व पराक्रमी मनुष्य ..................................................... - ............................................... नरसिंह

उपकाराची जाणीव न ठेवण्याची प्रवृत्ती .................................. - ............................................ कृतघ्नता

उत्सवप्रसंगी दिवे लावण्यासाठी मंदिरासमोर उभारलेला स्तंभ ........... - ............................................ दीपमाळ

उंचावरून पडणारा पाण्याचा लोट ......................................... - ............................................... धबधबा

उत्कर्ष दाखविणाऱ्या तळहातावरील रेषा ................................. - ............................................ भाग्यरेषा

उदार व मोठ्या मनाचा .................................................... - ............................................. दिलदार

उच्च दर्जा असलेला सुंदर महल ......................................... - ........................................... आलिशान

उपकाराची जाणीव ठेवणारा .............................................. - ................................................कृतज्ञ

उंटावरून टपाल नेणारा स्वार ............................................. - ......................................सांडणी स्वार

उपकाराची जाणीव न ठेवणारा ............................................ - .............................कृतघ्न, अनुपकारी

उपकाराखाली ओशाळा बनलेला .......................................... - ..................................................मिंधा

ऊस पेरलेले वावर ........................................................... - ................................................... फड

एखादी गोष्ट नाही अशी स्थिती .......................................... - ................................................ अभाव

एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे ....................................... - ............................................... धर्मांतर

एकमेकांवर अवलंबून असणारे ............................................. - ........................................ परस्परावलंबी

एकटा राहणारा ................................................................ - ...........................................एकलकोंडा

एकाच काळातील ............................................................ - ........................................... समकालीन

एकाच ठिकाणी राहण्याची सक्ती केलेला ................................ - ............................................स्थानबद्ध

एखाद्या संस्थेची स्थापना करणारा ....................................... - ............................................संस्थापक

एखाद्या प्रदेशात किंवा जंगलात अगदी मुळापासून राहणारे लोक ....... - ......................................... आदिवासी

एखाद्याच्या आठवणीदाखल केलेली गोष्ट ................................ - ............................................... स्मारक

एकादशी दिवशी भजन कीर्तनात करावयाचे जागरण ...................... - ............................................हरिजागर

एक लाभदर्शक धार्मिक प्रतीक ............................................ - ..............................................स्वस्तिक

एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी केलेला प्रयत्न, अभ्यास ................. - ................................................साधना

एखाद्या गोष्टीचा आरंभ .................................................... - ..........................................श्री गणेशा

एकाला उद्देशून दुसऱ्याला बोलणे ........................................ - ............................................अन्योक्ती

एकाने दुसऱ्याला सांगून तयार झालेली काल्पनिक गोष्ट ................. - ............................................. दंतकथा

एका माणसाला एकाच कामासाठी अनेक ठिकाणी जाण्याचा प्रसंग ............................................................ - .......................... त्रिस्थळीयात्रा, तिरस्थळी

एकाच वेळी अनेकजण बोलत असल्यामुळे होणारा आवाज .............. - ................................................ गलका

एखाद्याचे मागून जाणे ..................................................... - ............................................अनुगमन

ऐकावयास न येणारा ....................................................... - ................................................ बहिरा

ओळख नसलेला .............................................................. - ........................................... अनोळखी

कल्पनाही नसताना ........................................................... - ............................................अकल्पित

कल्पना नसताना एकदम आलेले संकट ................................... - ................................................. घाला

कधीही जिंकला न जाणारा ........ - ........ अजिंक्य

कर्तव्यापासून तोंड फिरविलेला ........ - ........ कर्तव्यपराङ्मुख

कसलीच इच्छा नसलेला ........ - ........ निरिच्छ

कष्ट करून जगणारा ........ - ........ श्रमजीवी

कबड्डीच्या क्रीडांगणावरील मधली महत्तवाची रेषा ........ - ........ मध्यरेषा

कविता करणारा ........ - ........ कवी

कधीही उद्योग न करणारा ........ - ........ निरुद्योगी

कधीही, कशाचीही आठवण न राहणारा ........ - ........ विसरभोळा, विसराळू

कधीही मरण नसणारा ........ - ........ अमर

कधीही नाश न पावणारा ........ - ........ अविनाशी

कर्तव्यात तत्पर असणारा ........ - ........ कर्तव्यपरायण, कर्तव्यतत्पर, कर्तव्यदक्ष

कर्तव्याकडे पाठ फिरविणारा ........ - ........ कर्तव्यपराङ्मुख

कमळाप्रमाणे डोळे असणारी ........ - ........ कमलाक्षी, कमलनयना

कधीही विसर पडणार नाही असा ........ - ........ अविस्मरणीय

कवितेची रचना करणारी ........ - ........ कवयित्री

कलेची आवड असणारा ........ - ........ कलाप्रेमी, कलासक्त, रसिक, कलाकार

कसलेही व्यसन नसणारा ........ - ........ निर्व्यसनी

कसलाही डाग (कालिमा) नसणारा ........ - ........ निष्कलंक

कसलीही तक्रार न करता ........ - ........ बिनतक्रार

कमी बुद्धी असलेला ........ - ........ मतिमंद

कमालीचा मूर्ख ........ - ........ मूर्ख शिरोमणी

कष्ट न करता सहज रीतीने मिळणारी ........ - ........ सहजसाध्य

कष्टाने मिळणारी ........ - ........ कष्टसाध्य

कमी आयुष्य असलेला ........ - ........ अल्पायुषी, अल्पायु

कधीही न विटणारे ........ - ........ अवीट, आकर्षक

कशाचीही अपेक्षा नसणे ........ - ........ निरपेक्ष

कपटी व कृष्ण कारस्थाने करणारा मनुष्य ........ - ........ शकुनीमामा

कठोर ह्रदय असणारी व्यक्ती ........ - ........ पाषाणह्रदयी

कवितेच्या प्रत्येक कडव्याच्या शेवटी येणारा चरण ........ - ........ पालुपद

कर्तृत्वशून्य व भेकड असा मनुष्य ........ - ........ दळूबाई

कधी न बदलणारे वाक्य ........ - ........ दगडावरची रेघ

कड्यावरून लोटण्याची शिक्षा ........ - ........ कडेलोट

कंटाळवाणे लांबलचक भाषण ........ - ........ एरंडाचे गुऱ्हाळ

कंठ दाटून आल्यावर जो मुखरस गिळतात तो ........ - ........ आवंढा

कसलाही अडथळा नसलेला ........ - ........ अकुंठित

कमी वेळ टिकणारा ........ - ........ अल्पजीवी

काचेच्या बांगड्या करणारा ........ - ........ कासार

काही ही कष्ट न करता आयते बसून खाणारा ........ - ........ ऐतखाऊ

काम साधून घेण्यापुरते गोड बोलणारा ........ - ........ कामापुरता मामा

| | | |
|---|---|---|
| *कानाना गोड वाटणारा* | - | *कर्णमधुर* |
| *कार्य करण्याची जागा* | - | *कर्मभूमी* |
| *कार्यात तत्पर असलेला* | - | *कार्यक्षम, कार्यतत्पर* |
| *काम करण्यात कुचराई (टाळाटाळ) करणारा* | - | *कामचुकार* |
| *काळजात कालवा कालव झाल्यासारखे वाटणे* | - | *गलबलणे* |
| *कार्यक्रम पाहण्यास आलेले लोक* | - | *प्रेक्षक* |
| *कायमचे आठवणीत राहणे* | - | *रूजणे* |
| *कायम टिकणारे* | - | *शाश्वत* |
| *काहीही सहन करण्याचे सामर्थ्य* | - | *सहनशीलता* |
| *काटकसरीने खर्च करणारा* | - | *मितव्ययी* |
| *कादंबरी लिहिणारा* | - | *कादंबरीकार* |
| *किल्ल्याच्या भोवतालची भिंत* | - | *तट* |
| *कीर्तन करणारा* | - | *कीर्तनकार* |
| *कुस्ती खेळण्याची जागा* | - | *हौदा, आखाडा* |
| *कुळातील पूजेची देवता* | - | *कुलदेवता* |
| *कुळाला तेज प्राप्त करून देणारा* | - | *कुलदीप* |
| *कुणाला दाद न देणारा* | - | *वस्ताद* |
| *कुरूप अशी स्त्री* | - | *शूर्पणखा, हिडिंबा* |
| *कुंजात विहार करणारा* | - | *कुंजविहारी* |
| *केवळ शोभेची आयते खाऊ मंडळी* | - | *भोजनभाऊ* |
| *कैदी ठेवण्याची जागा* | - | *कारागृह, कारा, बंदिशाळा, तुरुंग* |
| *कोणाच्याही पक्षात सामील न होणारा* | - | *अपक्ष* |
| *कोणत्याही पक्षाची बाजू न घेता न्याय देणारा* | - | *निःपक्षपाती, निष्पक्षपाती* |
| *कोणालाही कळू न देता* | - | *बिनबोभाट* |
| *कोणतेही काम करणारा* | - | *हरकाम्या* |
| *कोणत्याही परिस्थितीत ज्याची बुद्धी स्थिर राहते तो* | - | *स्थितप्रज्ञ, स्थिरबुद्धी, स्थिरमती* |
| *कोणत्याही क्षेत्रात सर्वांगाने घडून येणारा बदल* | - | *क्रांती* |
| *कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता सेवा करणारा* | - | *निःस्वार्थी* |
| *कोणताही आधार नसलेला* | - | *अनाथ, निराधार* |
| *कोणतेही काम करण्याचा कंटाळा करणारा* | - | *आळशी* |
| *कोणतेही कर्तृत्व नाही असा मनुष्य* | - | *अजागळ* |
| *कोणीही भोळा मनुष्य* | - | *भोळासांब* |
| *कोणतीही योजना आखणारा* | - | *योजक* |
| *कोणत्याही गोष्टीची आवड असलेला* | - | *रसिक* |
| *कोणत्याही विषयावर जो भाषण करतो तो* | - | *वक्ता* |
| *खाद्य पेयाचे नियमाने ठरेलेले प्रमाण* | - | *रतीब* |
| *खूप विस्तार असलेले* | - | *विस्तीर्ण* |
| *खूप आयुष्य असलेला* | - | *दीर्घायुषी, चिरंजीव* |
| *खूप पाऊस पडणे* | - | *अतिवृष्टी* |

| | |
|---|---|
| खूप जोरात किंवा एकसारखे टाळ्या वाजविणे ........................... | - ................................ टाळ्यांचा कडकडाट |
| खूप उंच उंच असे आकाश ................................................ | - .............................................. अंतराळ |
| खेळातील दोन डावांच्या मधला विसाव्याचा वेळ ......................... | - ................................................ मध्यंतर |
| खेळांडूच्या संघाचा प्रमुख .................................................. | - .............................................. कर्णधार |
| खोटी तक्रार करणारा .................................................... | - .......................... कांगावखोर, कागाळखोर |
| गावची न्याय निवाड्याची जागा ........................................... | - ................................................ चावडी |
| गावची कामकाजाची जागा ................................................ | - ................................................ चावडी |
| गावातील लोकांची एकत्र पाणी भरण्याची जागा ......................... | - .............................................. पाणवठा |
| गाई सांभाळणारा ............................................................ | - ................................................ गोपाळ |
| गावच्या पंचांचा कारभार असणारी संस्था ................................ | - ........................................... ग्रामपंचायत |
| गावाभोवतालचा तट ......................................................... | - .............................................. गावकूस |
| गाईसाठी काढून ठेवलेला घास ............................................ | - ............................................... गोग्रास |
| गावाचा कारभार ............................................................ | - ............................................. गावगाडा |
| गावातून किंवा शेतातून जणारी लहान वाट ............................... | - ................................................ पाणंदी |
| गाणे गाणारा ................................................................ | - ................................................. गायक |
| गुरूकडे आपल्या बरोबर शिकणारा ....................................... | - .............................................. गुरुबंधू |
| गोल गोल फिरणारा जोराचा वारा ........................................ | - ............................................... वावटळ |
| गोष्टी लिहिणारा ............................................................ | - ............................................ कथालेखक |
| गोकुळाष्टमीच्या शेवटी होणारा खेळ व प्रसाद ............................ | - ........................................... गोपाळकाला |
| गोल आकाराचा घडवलेला एक दगड .................................... | - ................................................ सहाण |
| घरादाराला व देशाला पारखा झालेला (मुकलेला) ........................ | - ............................................. निर्वासित |
| घरी पाहुणा म्हणून आलेला ................................................ | - ................................................. अतिथी |
| घरातील मजले दालन ...................................................... | - ................................................ माजघर |
| घरदार नसलेला ............................................................ | -..................... उपऱ्या, उपरा, (हक्क नसलेला) |
| घोडे बांधण्याची जागा .................................................... | - ......................................... तबेला, पागा |
| घोडयाच्या जबड्यात अडकविलेली लोखंडी साखळी ...................... | - ................................................ लगाम |
| चरित्र लिहिणारा ........................................................... | - ............................................ चरित्रकार |
| चहाड्या सांगणारा ......................................................... | - ............................................ चहाडखोर |
| चार पायावर चालणारा...................................................... | - ............................................... चतुष्पाद |
| चांदण्या रात्रीचा पंधरवडा ................................................. | - ................................ शुक्लपक्ष, शुद्धपक्ष |
| चांगले निवडलेले ........................................................... | - ............................................... निवडक |
| चांगल्या कार्यासाठी प्राण देणे ............................................ | - ............................................... बलिदान |
| चार रस्ते एकत्र मिळतात ती जागा ....................................... | - ........................................ चौक, चवाठा |
| चारी बाजूनी पाणी असलेला भूप्रदेश ...................................... | - ................................................... बेट |
| चांगला धष्टपुष्ट पण बुद्धीने मंद असा मनुष्य ............................ | - .................................................... शुंभ |
| चांगला विचार .............................................................. | - .............................................. सुविचार |
| चांगल्या गोष्टीचा ठसा ..................................................... | - ............................................... संस्कार |
| चित्रे काढणारा ............................................................. | - ............................................. चित्रकार |
| चिखलात उगवलेले कमळ ................................................... | - ................................................. पंकज |

चित्ताला आकर्षून घेणारा ................................................ - ............................चित्ताकर्षक, चित्तवेधक

चित्रपटात किंवा नाटकात काम करणारी स्त्री ........................... - ............................................. नटी

चित्रपटात किंवा नाटकात काम करणारा पुरूष .......................... - ............................................. नट

चित्ताची एकाग्रता कशी करावी हे सांगणारे शास्त्र ....................... - .......................................योगशास्त्र

चैनीत, ख्याली खुशालीत दिवस घालविणारा मनुष्य ..................... - ....................... खुशालचंद, खुशालटेकडा

चुगल्या सांगणारा ........................................................ - .................................. चुगलीखोर,

जमिनीवर राहणारे प्राणी................................................... - ........................................... भूचर

जमिनीवर आणि पाण्यात राहू शकणारे प्राणी ............................ - .......................................उभयचर

जगाचा स्वामी ............................................................ - ........................................ जगन्नाथ

जगाचा नाश होण्याची वेळ .............................................. - .......................................प्रलयकाल

जमिनीखालून जाणारा रस्ता ............................................. - ...........................................भुयार

जमीनीचे दान ............................................................ - ...........................................भूदान

जहाजांना दिशा दाखविणारा मनोऱ्यावरील दिवा ........................ - .......................................दीपस्तंभ

जवळचा प्रदेश ............................................................ - ......................................... परिसर

जवळ काहीही नसलेला .................................................. - ...................... अकांचन, निष्कांचन, निर्धन

जग जिंकणारा ............................................................ - .......................................जगज्जेता

ज्याचा मोबदला मिळत नाही असा खर्च ................................ - .......................................बुडितखर्च

जन्मापासून उपजत गुण .................................................. - ..................जन्मगुण (स्वाभाविक गुणधर्म)

जन्म झाला आहे तो देश ................................................ - ............................. जन्मभूमी, मायभूमी

जन्मापासून कायमचा दरिद्री ............................................. - ................................... जन्मदरिद्री

जवळ भांडवल नसता मोठे व्यापारी आहोत असा
बहाणा करणारा लहान शेठ .............................................. - .......................................तिरकमशेठ

जनावरांच्या खुरांस मारावयाची अर्धवर्तुळाकार लोखंडी पट्टी .......... - ............................................. नाल

जगावर किंवा युद्धात जय मिळविणारा ................................. - ....................................... फत्तेजंग

जहांबाज व कजाग बायको .............................................. - .......................................महामाया

जड, बुद्धीहीन, अजागळ मनुष्य ......................................... -........................................... मेषपात्र

ज्याचा अपराध नाही तो .................................................. -......................................... निरपराधी

ज्याला ताळतंत्र नाही असे वर्तन ....................................... - ................................... धांगडधिंगा

ज्या स्तंभावर अपराध्याचा वध केला जातो ............................. - ....................................... वधस्तंभ

ज्याला बोलता येत नाही असा ........................................... - ............................................मुका

ज्याचा विसर पडणार नाही असा ......................................... - ...................................अविस्मरणीय

ज्याला कशाचीच उपमा देता येणार नाही असा ........................ - ............................... अनुपम, निरुपम

ज्याला कोणीही शत्रू नाही असा ......................................... - ....................................अजातशत्रू

ज्याच्यापासून काहीही त्रास होत नाही असा ............................ - ...................................... निरुपद्रवी

ज्याच्यावर उपकार झाले आहेत असा .................................. - ........................................... उपकृत

जाणून घेण्याची इच्छा असणारा ......................................... - ........................................जिज्ञासू

ज्याचे बरोबर दुसऱ्याची तुलना करता येत नाही असे .................. - ........................................अप्रतिम

ज्याच्यातून आरपार दिसू शकते अशी .................................. - .......................................पारदर्शक

ज्याला खूप माहिती आहे असा .......................................... - ........................................बहुश्रुत

ज्याने खूप ऐकले आहे असा ............................................ - ........................................बहुश्रुत

ज्याची पत्नी मरण पावली आहे असा पुरुष ............................... - ............................................... विधुर

ज्याच्या हातात चक्र आहे असा ........................................... - ................................. चक्रपाणी, चक्रधारी

ज्याला मरण नाही असा .................................................... - ................................................. अमर

ज्याच्यापाशी अपार द्रव्य आहे तो ......................................... - ..................................... नवकोट नारायण

जादूचे खेळ करणारा ....................................................... - ............................................. जादूगार

ज्याला लाज नाही तो ...................................................... - ............................................. निर्लज्ज

ज्याच्या हातात सुदर्शन चक्र आहे असा .................................. - ..................................... सुदर्शनचक्रधारी

ज्याला सीमा नाही असा .................................................... - ................................................. असीम

ज्याला तळ लागत नाही असा - ........................................... - ................................. अथांग, थांग-खोली

ज्याला अंत नाही असा ...................................................... - ................................................. अनंत

ज्याला आधार नाही असा .................................................... - ............................................... निराधार

ज्याची किंमत करता येणार नाही असे .................................... - ............................ अमोल, अमूल्य, अनमोल

ज्याचा उपाय हमखास लागू पडतो ते औषध ............................. - ............................................... रामबाण

जाणून घेण्याची इच्छा ...................................................... - ............................................... जिज्ञासा

ज्याना मुख्यत्वे बुद्धीचा उपयोग करावा लागतो असे लोक ............. - ........................................... बुद्धीजीवी

जाणून घेणे अशक्य असे .................................................... - ................................................. अज्ञेय

ज्याला भीती नाही असा...................................................... - ................................................. निर्भय

ज्याचे हात गुडघ्यापर्यंत पोहोचतात असा ................................ - ........................................... आजानुबाहू

ज्याच्याजवळ अनेक कोटी रूपये आहेत असा ............................ - ........................................... कोट्याधीश

ज्या घराला छप्पर नसून वर चंद्र दिसतो असे मोडकळीस आलेले घर . - ............................................. चंद्रमौळी

ज्याला कोणत्याही गोष्टीची पारख नसते ................................. - ........................................ गाजरपारखी

जिवंत असे पर्यंत ........................................................... - ............................ आजन्म (जन्मापासून)

जिल्ह्याचा कारभार पाहणारी संस्था ...................................... - ........................................ जिल्हापरिषद

जिचे भाग्य नाहीसे झाले आहे अशी ....................................... - ........................................... हतभागिनी

जिचा पती जिवंत आहे अशी स्त्री ......................................... - ................................ सधवा, सुवासिनी

जिचा पती मरण पावला आहे अशी स्त्री ................................... - ................................................ विधवा

जिचा उपयोग होत नाही अशी ............................................. - ............................................ निरुपयोगी

जिवाला जीव देणारा ......................................................... - ............................................... जिवलग

जिथे बसगाड्या थांबतात ते ठिकाण ...................................... - ............................................ बसस्थानक

जीव धोक्यात घालण्यासारखे काम ........................................ - ....................................... सुळावरची पोळी

जीवनातील अंगीकृत कार्य सातत्याने करण्याची जागा (भूमी) ........... - ............................................ कर्मभूमी

जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य प्रतिपादन करणारे मत ................ - ................................................ अद्वैत

जुन्या मतांना व चाली रीतींना चिकटून राहणारा .......................... - ............................ पुराणमतवादी, सनातनी

जे साध्य होणार नाही ते .................................................... - ............................................... असाध्य

जे नाही ते आहे, असे वाटणे ............................................... - ................................................ आभास

जेवण झाल्यावर शंभर पावले फिरण्याचा परिपाठ ........................ - ............................................ शतपावली

जे मिळू शकते असे ......................................................... - ............................................... उपलब्ध

जोरात उसळून बाहेर पडणारी धार ....................................... - ............................ चिरकांडी, चिळकांडी

जो इतरांशी मिसळून वागत नाही असा .................................. - ...................... तिरशिंगराव, चिडखोर माणूस

झाडांचा दाट समूह ........ - ........ झाडी

झाडांच्या अंतर्सालीपासून बनविलेले वस्त्र ........ - ........ वल्कल

झाडाची वाळलेली पाने ........ - ........ पालापाचोळा

टोळासारखे नासाडी करीत उगाच हिंडणारे ........ - ........ टोळभैरव

ठराविक कालानंतर प्रसिद्ध होणारे ........ - ........ नियतकालिक

डाव्या कुशीवर झोपणे ........ - ........ वामकुक्षी

डाळ, तांदूळ, पीठ, मीठ, इ. स्वयंपाकाचे साहित्य ........ - ........ शिधा

डोंगरातील अरूंद मार्ग ........ - ........ डोंगरखिंड

डोंगराच्या माथ्यावरील सपाट प्रदेश ........ - ........ डोंगरपठार

डोंगर पोखरून वस्तीसाठी केलेली जागा ........ - ........ गुहा

डोंगर पोखरून आरपार केलेला रस्ता ........ - ........ बोगदा

डोळ्यांना आकर्षून घेणारी किंवा संतोष देणारी ........ - ........ नयनमनोहर

डोळ्यात घालावयाचे काजळ ........ - ........ अंजन

डोळे दिपवून टाकणारे ........ - ........ नेत्रदीपक

डोंगरात कोरलेले मंदिर ........ - ........ लेणे

ढगांनी झाकलेले ........ - ........ अभ्राच्छादित, मेघाच्छादित

ढगांनी न भरलेले ........ - ........ निरभ्र

तप करण्याची जागा ........ - ........ तपोभूमी

तंटा सोडविण्यासाठी उभय पक्षांनी मान्य केलेले लोक ........ - ........ पंच

तहाच्या अटीचा तर्जुमा ........ - ........ तहनामा

तंतुवाद्यावर छेडलेले मधुर स्वर ........ - ........ झंकार

तात्कालिक विरक्ती ........ - ........ स्मशानवैराग्य

त्रास देणारे समाजातील लोक ........ - ........ समाजकंटक

तांब्याच्या पत्र्यावर लिहिलेला लेख ........ - ........ ताम्रलेख

तारकापुंजांचा आकाशात दिसणारा पट्टा ........ - ........ आकाशगंगा

तिथी, वार, नक्षत्र, योग यांची माहिती असलेली पुस्तिका ........ - ........ पंचांग

तिन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश ........ - ........ द्वीपकल्प

तिथी - दिवस न ठरविता पाहुणा म्हणून अचानक आलेला ........ - ........ अतिथी

तीन महिन्यानी प्रसिद्ध होणारे ........ - ........ त्रैमासिक

तीन रस्ते एकत्र मिळतात ती जागा ........ - ........ तिठा

तीन तीर्थक्षेत्रांची यात्रा (काशी, प्रयाग, गया) ........ - ........ तिरस्थळी, त्रिस्थळी

तीन शिंगे असलेला ........ - ........ त्रिशंग

तीन कोन असलेली आकृती ........ - ........ त्रिकोण

तीन नद्या एकत्र मिळणारे ठिकाण ........ - ........ त्रिवेणी

तुलना करता येणार नाही असा ........ - ........ अतुलनीय

तुमचे वाईट होवो असे बोलणे ........ - ........ शाप

तेज नसलेली अवस्था ........ - ........ अवकळा

तोंडावर हात मारीत काढलेला आवाज ........ - ........ बोंब

तोंडातोंडी चालत आलेली काल्पनिक गोष्ट ........ - ........ दंतकथा

| | |
|---|---|
| तोंडावळा सारखा असल्यामुळे फसविणारा ................................ - | ................................ तोतया |
| तोंडावर स्तुती करण्याचा गुण ................................ - | ................................ तोंडपुजेपणा |
| तोफ असलेला गाडा ................................ - | ................................ रणगाडा |
| थोडक्यात समाधान मानणारी ................................ - | ................................ अल्पसंतुष्ट |
| थोरपुरूष, समाजसेवक, साधुसंत ह्यांच्या जन्मतिथीचा दिवस ................................ - | ................................ जयंती |
| दगडाची सुंदर मूर्ती घडविणारा ................................ - | ................................ शिल्पकार |
| दगडावर सुंदर कोरीव काम करणारा ................................ - | ................................ शिल्पकार |
| दररोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र ................................ - | ................................ दैनिक |
| दगडावर कोरलेले लेख ................................ - | ................................ शिलालेख |
| दक्षिण समुद्राजवळच्या सेतू (कन्याकुमारी) पासून हिमालयापर्यंत ................................ - | ................................ आसेतुहिमाचल |
| दगडासारखे कठोर हृदय असलेला ................................ - | ................................ पाषाणहृदयी |
| दर महिन्याला प्रसिद्ध होणारे नियतकालिक ................................ - | ................................ मासिक |
| दगडावर केलेले कोरीव काम ................................ - | ................................ शिल्प |
| दररोज ठरलेला कार्यक्रम ................................ - | ................................ दिनक्रम |
| दहा पापे नाहीशी करणारा ................................ - | ................................ दशहरा |
| दागदागिने नसलेली गरीब स्त्री ................................ - | ................................ लंकेची पार्वती |
| दारोदारी भिक्षा मागणारा ................................ - | ................................ भिक्षार्थी |
| दारावरील पहारेकरी ................................ - | ................................ द्‌वारपाल |
| दानधर्म करण्यात प्रख्यात ................................ - | ................................ दानशूर |
| दांडगाईने किंवा अव्यवस्थितपणे चालविलेला कारभार ................................ - | ................................ झोटिंगशाही |
| दाराशी हत्ती झुलण्याइतकी संपत्ती ................................ - | ................................ गजान्तलक्ष्मी |
| दार बंद करण्यासाठी योजलेला लाकडी किंवा लोखंडी दांडा ................................ - | ................................ आडसर |
| दिवसाला भिणारे ................................ - | ................................ दिवाभीत |
| दुष्काळात सापडणे ................................ - | ................................ दुष्काळग्रस्त |
| दुसऱ्या देशात जाणे ................................ - | ................................ परदेशगमन |
| दुसऱ्यावर अवलंबून असणारा ................................ - | ................................ परावलंबी |
| दुसऱ्यांचे दुःख पाहून कळवळणारा ................................ - | ................................ कनवाळू |
| दुसऱ्यांच्या ताब्यात असलेला ................................ - | ................................ अंकीत |
| दुसऱ्यांच्या मनातले जाणणारा ................................ - | ................................ मनकवडा |
| दुपारच्या जेवणानंतर घेतलेली अल्पशी निद्रा ................................ - | ................................ वामकुक्षी |
| दुःखाच्या भावनेतून सोडलेला लांब श्वास ................................ - | ................................ सुस्कारा |
| दुसऱ्या देशात हिंडणे ................................ - | ................................ परदेशभ्रमण |
| दुसऱ्यांचे पाहून त्यांच्या सारखेच वागणे ................................ - | ................................ अनुकरण |
| दुसरांच्या म्हणण्यावर लगेच विश्वास ठेवणारा ................................ - | ................................ कानाचा हलका |
| दुसऱ्याला ठार मारण्यासाठी पाठविलेला माणूस ................................ - | ................................ मारेकरी |
| दुसऱ्यांच्या कामात अडचण आली म्हणून संतोष मानणारा ................................ - | ................................ विघ्नसंतोषी |
| दुसऱ्यांच्या जीवावर जगणे ................................ - | ................................ परोपजीवी, उपजीवी |
| दुसऱ्यामध्ये न मिसळणारी ................................ - | ................................ एकलकोंडी |
| दुसरा धर्म स्वीकारणे ................................ - | ................................ धर्मांतर |

*दुष्ट (दृष्ट) माणसांची जूट ................................................ - ................................... चांडालचौकडी*
*दुसऱ्यास न दिसणारे काम ............................................ - ...........................................चोरकाम*
*देशाची सेवा करणारा ...................................................... - ...............................देशसेवक, देशभक्त*
*देवळाच्या कळसाखाली असलेली डेऱ्याच्या*
*आकाराची बंदिस्त जागा (देवळाचा गोलाकार कळस)..................... - ............................................... घुमट*
*देवळाचा आतील भाग ...................................................... - ............................................... गाभारा*
*देवापुढे सतत जळणारा दिवा ............................................ - ............................................... नंदादीप*
*देशासाठी / समाजासाठी आपले प्राण अर्पण करणारा .................. - ............................................... हुतात्मा*
*देवाला वाहून काढलेली शिळी फुले ..................................... - ...............................................निर्माल्य*
*देवास अर्पण करावयाचा पदार्थ ......................................... - ............................................... नैवेद्य*
*देवलोकातील स्त्रिया ........................................................ - ............................................... अप्सरा*
*देवालयाचे शिखराचे टोक ............................................... - ............................................... कळस*
*देवासमोर ओवाळण्याचा दीप ........................................... - ...............................................आरती*
*देवासाठी करावयाची एक विशिष्ट पूजा .................................. - ...............................................अनुष्ठान*
*देवाने घेतलेला मनुष्याचा जन्म ........................................ - ...............................................अवतार*
*दैवावर हवाली ठेवून राहणारा .......................................... - ............................................... दैववादी*
*दोन नद्या एकत्र मिळतात ते ठिकाण ................................... - ............................................... संगम*
*दोनदा जन्मलेला ........................................................... - ............................................... द्विज*
*दोन डोंगरामधील चिंचोळी वाट ......................................... - ............................................... खिंड*
*दोन नद्यामधील प्रदेश .................................................... - ...............................................दोआब*
*दोरीवर चालताना तोल संभाळण्यासाठी हातात घेतलेला बांबू ........... - ............................................... आढाळ*
*धनुष्य धारण करणारा .................................................... - ............................................... धनुर्धारी*
*धन्याशी निष्ठेने वागणारा ................................................ - ............................................... स्वामिनिष्ठ*
*धर्म स्थापन करणारा ...................................................... - ............................................... धर्मसंस्थापक*
*धर्मार्थ फुकट जेवण मिळण्याचे ठिकाण ............................... - ...............................अन्नछत्र, सदावर्त*
*धर्माला सोडून नियमबाह्य वर्तन ........................................ - ...............................................अधर्म*
*धड ना इकडे ना तिकडे ................................................. - ............................................... त्रिशंकू*
*धान्य साठविण्याची जागा ................................................ - ...............................................कोठार*
*न टाळता येणारे ........................................................... - ........................अपरिहार्य, अनिवार्य, अटळ*
*नवीन मतांचा पुरस्कार करणारा ......................................... - ............................................... नवमतवादी*
*नृत्य करणारा पुरूष ....................................................... - ............................................... नर्तक*
*नृत्य करणारी स्त्री ......................................................... - ............................................... नर्तकी*
*नवऱ्या मुलांची आई ....................................................... - ............................................... वरमाय*
*नवऱ्या मुलांचे वडील ...................................................... - ...............................................वरपिता*
*नदीत जेथवर समुद्राच्या भरतीचे पाणी येते तेथवरचा नदीचा भाग ...... - ............................................... खाडी*
*नशिबावर (देवावर) विश्वास ठेवून वागणारा ............................ - ............................................... दैववादी*
*नऊ दिवस टिकणारा ताप ................................................ - ............................................... नवज्वर*
*न समजण्याजोगे ........................................................... - ...............................................अगम्य*
*नदीच्या दोन्ही बाजूंचा सुपीक प्रदेश .................................... - ...............................................खोरे*
*न बोलाविता येणारा, मध्येचा टपकणारा ................................ - ...............................................आंगतुक*

नक्षत्रासारखी सुंदर किंवा खुबसूरत स्त्री ................................ - ........................................ चटकचांदणी
नशीबाने आलेली अवस्था ................................................. - ...............................................दैवदशा
नदीकाठची सुपीक जमीन ................................................ - ................................................... मळी
नदीची सुरुवात होते ते ठिकाण ......................................... - ................................................. उगम
नाटक लिहिणारा ........................................................ - ..........................................नाटककार
नावाचा एक सारखा उच्चार ............................................ - ....................................... जयघोष, घोषा
नाग, साप, अजगर यांचा खेळ करणारा ................................ - ............................................... गारूडी
नाणी पाडण्याचा कारखाना ............................................. - .............................................टाकसाळ
न्यायाच्या बाबतीत कठोर असणारा ...................................... - ........................................... न्यायनिष्ठुर
नाचण्याचा गोंधळ ....................................................... - ........................................... धांगडधिंगा
नारळाच्या झाडांची पाने ................................................ - ..............................................झावळ्या
निरर्थक गोष्टी ............................................................ - ........................................... भाकडकथा
नियम व शिस्त यानुसार इतरांवर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती ............ - ................................................प्रतोद
नियमाना सोडून किंवा स्वैर वर्तन करणारा ............................... - .............................................छंदिष्ट
निरुपयोगी माणसे किंवा वस्तू आणून केलेली भरती ..................... - ....................................... खोगीरभरती
निरनिराळ्या राष्ट्रातील .................................................. - ......................................... आंतरराष्ट्रीय
नियम शास्त्राप्रमाणे ...................................................... - ............................................ यथाशास्त्र
निरुपाय अवस्थेत सापडलेला ........................................... - ............................................. अगतिक
निरनिराळी सोंगे करून दाखविणारा .................................... - ............................................... बहुरूपी
निरपेक्ष बुद्धीने व स्वेच्छेने केलेल्या कामाबद्दल दिले जाणारे धन ..... - ............................................... मानधन
नेहमी खरे बोलणारा .................................................... - .............................. सत्यवादी, सत्यवचनी
नेहमी घरात बसून राहणारा ............................................ - ............................................ घरकोंबडा
नेहमी न दिसणारी गोष्ट ................................................. - ............................................... दुर्मिळ
पशु मोफत पोसले जाण्याचे ठिकाण .................................... - ........................................... पांजरपोळ
प्रवासात बरोबर घेतलेले खाद्य पदार्थ .................................. - ................................................शिदोरी
परंपरेने चालत आलेली ऐकीव गोष्ट .................................... - .......................................... आख्यायिका
पंधरा दिवसांचा काळ .................................................... - ........................................ पक्ष, पंधरवडा
पृथ्वीच्या मध्यबिंदूकडे ओढले जाणे ...................................... - ....................................... गुरूत्वाकर्षण
परिचित नसलेला ......................................................... - ............................................. अपरिचित
परिपूर्ण झालेले असे ..................................................... - ............................................... परिपक्व
प्रत्यक्ष किंवा समोर नाही असे ........................................... - ............................................ अप्रत्यक्ष
पंधरा दिवसांच्या कालावधीने प्रसिद्ध होणारे नियतकालिक ............ - .............................................. पाक्षिक
पहाटे म्हणावयाचे देवाच्या स्मृतीचे गीत ................................ - ............................................... भूपाळी
पडदा दूर करणे ......................................................... - ............................................. अनावरण
पहाटेची वेळ ............................................................. - .............................................. उषःकाल
पर्वतावर चढून जाणारे .................................................. - ............................................ गिर्यारोहक
प्रश्न विचारताच त्याचे योग्य उत्तर ताबडतोब देणारा ..................... - ........................................... हजरजवाबी
पहाटेचा पवित्र काळ ..................................................... - ............................................. रामप्रहर
पाऊस पुष्कळ पडणे ..................................................... - .............................................. अतिवृष्टी

पाऊस मुळीच न पडणे ................................................... - .................................. अवर्षण, अनावृष्टी
पायापासून डोक्यापर्यंत ................................................... - ..........................................आपादमस्तक
पायात जोडे न घातलेला ................................................... - ..............................................अनवाणी
पायी जाणारा ................................................... - ..............................................पादचारी
पाण्याखालून चालणारी बोट ................................................... - ............................................. पाणबुडी
प्राणी एकत्र ठेवतात ती जागा ................................................... - .................................. प्राणीसंग्रहालय
पाण्यात राहणारे प्राणी ................................................... - ............................................... जलचर
पायाच्या नखापासून शेंडीपर्यंत संपूर्ण शरीरभर ........................... - .......................................... नखशिखांत
पाच कोसांचा प्रदेश ................................................... - ............................................ पंचक्रोशी
पायदळी तुडविलेले................................................... - ............................................ पददलित
पादत्राणे बनविणारा ................................................... - ............................................... चांभार
पाणी साचलेली जागा ................................................... - ............................................ पाणथळ
पाच वडांचा समुदाय असलेली जागा ...................................... - ............................................... पंचवटी
पाहण्यायोग्य वस्तू मांडलेली जागा ...................................... - ............................................... प्रदर्शन
पापापासून मुक्तता ................................................... - ............................................ पापक्षालन
पाणी साठविण्यासाठी वापरात येणारे काचेचे भांडे ..................... - ................................................... जार
पाण्यामध्ये जन्मणारे प्राणी ................................................... - ................................................ जलज
पायात घालावयाचा विजयाचा तोडा ...................................... - ................................................ आकण
पाच दिव्यांची आरती ................................................... - ............................................... पंचारती
पाच प्रकारचे गोड पदार्थ ................................................... - .......................................... पंचपक्वान्ने
पांढरी खडी असलेले काळ्या रंगाचे लुगडे ............................. - ............................................. चंद्रकळा
प्रारब्ध योगाने कंटाळा येण्याजोगे कार्य जे गळ्यात पडते ते ............ - ........................................कर्मकटकट
पायी करावयाची यात्रा ................................................... - ............................................. पदयात्रा
पाण्याचा आघात सहन करण्याजोगी बांधलेली भिंत ..................... - ..................................................धक्का
पावसापासून निवारण करण्यासाठी केलेले झाडपाल्याचे आवरण ........ - ..................................................इरले
पिकांच्या रक्षणासाठी केलेला मांडव ...................................... - ............................................... माचा
पिण्यासाठी पाणी भरण्याची जागा ...................................... - .......................................... पाणवठा
पिण्याला योग्य असलेला द्रव पदार्थ ...................................... -.................................................. पेय
पितरांच्या स्मृतीचा दिवस व त्या दिवशी करण्याचे कार्य ................ - ............................................... श्राद्ध
पीक न उगवणारी जमीन ................................................... - ............................................... नापीक
पुरात सापडलेले / पुराचा तडाखा बसलेले /
पुरामुळे नुकसान झालेले लोक ................................................... - ............................................पूरग्रस्त
पुष्कळ जमीन असलेला ................................................... - ............................................ जमीनदार
पुन्हा मिळालेला जन्म ................................................... - ............................................ पुनर्जन्म
पुष्कळ ज्ञान असणारा ................................................... - ................................................ ज्ञानी
पूर्वी कधीही घडले नाही असे ................................................... - .................................. अपूर्व, अभूतपूर्व
पूर्वी घडलेल्या हकीकतीचे वर्णन ...................................... -............................................ इतिहास
पूर्णपणे अंकित किंवा ओशाळा ................................................... - ..................................ताटाखालचे मांजर
पूर्वीपासून चालत आलेले ................................................... - ............................................ परंपरागत
पूर्वेकडे तोंड करून उभा असलेला ...................................... - ............................................पूर्वाभिमुख

पूर्वेकडील प्रदेशातील लोक ............................................. - ............................................. पौर्वात्य
पूर्वी जन्मलेला........................................................................ - ............................................. पूर्वज
पूर्वी कधीही न ऐकलेले .................................................. - ............................................. अश्रुतपूर्व
पूर्वी कधीही न पाहिलेले .................................................. - ............................................. अदृष्टपूर्व
पूर्व जन्मीचे लागेबांधे ...................................................... - ............................................. ऋणानुबंध
प्रेरणा देणारा ....................................................................... - ............................................. प्रेरक
पैसे कर्जाऊ देणारा ........................................................... - ............................................. सावकार
पैसे ठेवण्याची लांबट पिशवी ............................................... - .............................................कसा
फक्त माणसाला पायी जाता येईल एवढी अरूंद वाट ..................... - .............................................पाऊलवाट
फाजील शहाणा अर्थात मूर्ख .................................................. - .............................................दीडशहाणा
फार कमी बोलणारा ........................................................... - ............................................. अबोल
फारच दुर्मिळ, पुष्कळ काळाने येणारी संधी ................................ - ............................................. कपिलाषष्टीचा योग
फार झोपाळू मनुष्य ........................................................... - ............................................. कुंभकर्ण
फुकट पाणी पाजण्याची व्यवस्था............................................. - ............................................. पाणपोई
फुकट पाणी मिळण्यासाठी केलेली सोय...................................... - ............................................. पाणपोई
बर्फाने आच्छादलेले............................................................ - .............................................बर्फाच्छादित
बरोबर की चूक, योग्य की अयोग्य हा विचार
न करता ठेवलेली श्रद्धा....................................................... - ............................................. अंधश्रद्धा
बऱ्याच मोठेपणी लग्न करण्यास तयार झालेला ............................. - ............................................. घोडनवरा
बळेच दाखविलेला अतिशय लांबचा संबंध.................................. - ............................................. बादरायणसंबंध
बंदुकीला जोडलेले लांब धारदार पाते ...................................... - ............................................. संगीन
बाहेरून दिसायला गरीब पण आतून लबाड ................................. - ............................................. मिष्कील
बाहेरून डौल न दाखविणारा पण खरोखरी गुणी मनुष्य .................. - ............................................. झाकलेमाणिक
बारकाईने चौकशी करणारा.................................................... - .............................................चिकित्सक
बैल पळावेत म्हणून तोंडाने केलेला आवाज ................................ - ............................................. हुसकणे
बोलण्याची भाषा.............................................................. - ............................................. बोलभाषा
बोटीवरील मुख्य व्यवस्थापक .................................................. - ............................................. कप्तान
भगवान शंकराची उपासना करणारा........................................... - ............................................. शैव, शिवभक्त
भगवान विष्णूची उपासना करणारा........................................... - .............................................वैष्णव
'भले होवो' अशी शुभ कामना................................................. - ............................................. आशीर्वाद
भयाने गांजलेली स्थिती........................................................ - ............................................. त्राही त्राही
भविष्य सांगणारा ............................................................... - ............................................. ज्योतिषी
भाषण करणारा.................................................................. - ............................................. वक्ता
भाषण ऐकणारा ................................................................. - ............................................. श्रोता
भाषण करण्याची कला........................................................ - ............................................. वक्तृत्वकला
भांडण उकरून काढणारी...................................................... - . भांडकुदळ, भांडखोर (भांडणाची खोड असलेली)
भाकरी करण्याची लाकडी परात ............................................. - ............................................. काथवट
भावनेच्या अतिरेकाने कंठ दाटून येणे....................................... - ............................................. गहिवर
भिन्न जातीतील वधुवरांचे लग्न................................................ - .............................................मिश्रविवाह
भिन्न जातीच्या एकत्रीकरणाने नवीन जात निर्माण करणे.................. - ............................................. संकर

*भीती न बाळगता सत्याची बाजू संभाळणे................................ - ............................................ सत्याग्रह*

*भूत, भविष्य, वर्तमान, ह्या तिन्ही काळी असलेला......................... - .................................... त्रिकाळ, त्रिकाल*

*भोवतालची जागा किंवा प्रदेश ............................................ - .............................................. परिसर*

*मन आकर्षित करणारा, मनाला आकर्षून घेणारे .......................... - ...................मनोवेधक, चित्ताकर्षक, चित्तवेधक*

*मनाला आनंद देणारा .................................................... - .................................मनोहर, मनोरंजक*

*मृत्यूवर विजय मिळविणारा ............................................... - ............................................. मृत्युंजय*

*मनाला वाटेल तसे (मनाचे समाधान होईपर्यंत) .......................... - ..........................................मनसोक्त*

*मन मानेल असे ....................................................... ..............................................मनःपूत*

*मृत्यू पावलेल्या माणसाची आठवण म्हणून केलेली कृती................... - ........................................... स्मारक*

*मरेपर्यंत, मरण येई पर्यंत .................................................. - ............................................. आमरण*

*महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे .......................................... - ..............................................मासिक*

*मनाला पाझर फोडणारी .................................................. - .......................................... हृदयद्रावक*

*मन हरण करणारा....................................................... - ............................................... मनोहर*

*मनाला आल्हाद देणारा .................................................. - .......................................आल्हाददायक*

*मशाल धरणारा नोकर..................................................... - ...........................................मशालजी*

*मर्मी लागेल असा स्वर, शब्द.............................................. - .............................................. उपरोध*

*मर्म, रहस्य गुरूने सांगितल्या शिवाय जे कळत नाही ते.................. - ...........................................गुरुकिल्ली*

*महान कर्तृत्वाच्या व्यक्तीच्या जीवनावर लिहिलेले प्रदीर्घ काव्य............ - ........................................... महाकाव्य*

*मनाला लागून राहिलेले दुःख ............................................. - ................................................ शल्य*

*मनाला वाटेल तसा वागणारा.............................................. - ................................................. स्वैर*

*मडकी बनविणारा........................................................ - ............................................... कुंभार*

*मासे पकडणारा.......................................................... - ................................................कोळी*

*माशासारखे डोळे असलेली स्त्री........................................... - ..............................................मीनाक्षी*

*माकडाचा खेळ किंवा तमाशा दाखविणारा................................ - ............................................... मदारी*

*म्हातारपणी बुद्धीला झालेला विकार ...................................... - .......................................... म्हातारचळ*

*म्हाताऱ्या किंवा लंगड्या व लुळ्या गुरांना मोफत पाळण्याचे ठिकाण ..... - ........................................... पांजरपोळ*

*मागून जन्मलेला......................................................... - ................................................अनुज*

*मागचा इतिहास पाहणे.................................................... - ....................................... सिंहावलोकन*

*मागचा पुढचा विचार करून वागणारी व्यक्ती............................. - ...............................................धोरणी*

*मालाच्या देवघेवीच्या व्यवहारात मिळणारा मोबदला....................... - ................................................अडत*

*मिजासखोर मनुष्य....................................................... - .......................................... तिस्मारखां*

*मिठाई तयार करणारा .................................................... - ............................................... हलवाई*

*मुलीचा तिच्या सासरी होणारा छळ....................................... - ........................................... सासुरवास*

*मुलगा नसलेला .......................................................... - ............................................निपुत्रिक*

*मुद्द्याला धरून असलेले.................................................... - ............................................. मुद्देसूद*

*मुलाला झोप यावी म्हणून म्हणावयाचे गीत .............................. - ..................................अंगाईगीत, पाळणा*

*मुद्दाम वाकडे जाण्याचा खटाटोप, आडमार्गाने वागण्याची तऱ्हा ....... - .................................... द्राविडी प्राणायाम*

*मूळचेच सुंदर असलेले ..................................................... - .......................................... निसर्गसुंदर*

*मूर्ती बनविणारा ........................................................... - .............................................मूर्तीकार*

मूर्तीची पूजा करणारा ................................................ - ............................................ मूर्तीपूजक
मूर्तीचा नाश करणारा................................................ - ............................................ मूर्तीभंजक
मूर्तीच्या मस्तकावर दूध, दही, पाणी इत्यादिनी घातलेले स्नान .......... - .................................... महामस्तकाभिषेक
मूर्तीच्या पाठीमागे चांदी इत्यादी धातूंची केलेली महिरपी ................. - ..............................................प्रभावळ
मूर्खपणाची मसलत देणारा ............................................ - ................................... उंटावरचा शहाणा
मोजता येणार नाही इतके............................................. - ........................असंख्य, अमाप, अगणित
मोजकाच आहार घेणारा............................................... - .............................................मिताहारी
मोजकेच बोलणारा.................................................... - ............................................. मितभाषी
मोकळेपणी फिरण्यास मनाई.......................................... - .......................................... संचारबंदी
मोजक्या शब्दात सांगितलेले तत्व.................................... - ..................................................सूत्र
मोठे ऋषी.............................................................. - ............................................... महर्षी
मोफत कोरडा शिधा मिळण्याचे ठिकाण................................. - ...............................................सदावर्त
मोठ्याने केलेले पाठांतर ............................................... - ..............................................घोकंपट्टी
मोठ्या माणसांच्या (मनुष्यांच्या) स्वागतासाठी उठण्याची क्रिया .......... - ........................................... अभ्युत्थान
यज्ञविधी प्रमुख ........................................................ - ...............................................पुरोहित
यज्ञातील मुख्य नेता, यज्ञ चालविणारा .................................. - .................................. उपाध्याय, अध्वर्यू
यज्ञात बळी किंवा आहुती देण्याच्या वेळी म्हणावयाचा शब्द ............. - ..................................................स्वाहा
यज्ञातील आहुती ........................................................ - ................................................... बळी
युद्धात शौर्य दाखविणारा ................................................ - ..................................... रणशूर, रणवीर
युरोप, अमेरीका या पश्चिमेकडील देशातील लोक ...................... - ........................................... पाश्चिमात्य
योग करण्याची जागा ..................................................... - ............................................योगशाळा
योग्य प्रसंगी योग्य उत्तर देणारा ........................................ - ...........................................समयसूचक
योजना करणारा ........................................................ - ...................................................योजक
रस्त्याने पायी जाणारा .................................................. - ..............................................पादचारी
रणांगणावर आलेले मरण ................................................ - ............................................... वीरमरण
रक्त गोळा करून ठेवण्याचे ठिकाण ..................................... - ..............................................रक्तपेढी
रत्नानी मढविलेले ....................................................... - ............................................रत्नजडित
रत्नांचा व्यापार करणारा ................................................ - ............................................. जवाहिऱ्या
राजाचे बसावयाचे आसन ................................................ - ...............................................सिंहासन
राजाचा शिक्का सांभाळणारा ............................................ - ........................................... शिक्केनवीस
राष्ट्राला पित्याप्रमाणे असणारा ......................................... - ..............................................राष्ट्रपिता
राजाच्या दरबारात नृत्याचे काम करणारी स्त्री ........................... - ...........................................राजनर्तिका
राजाची स्तुती करणारा .................................................. - .................................................... भाट
रात्री फिरणारा .......................................................... - ..............................................निशाचर
राष्ट्राराष्ट्रातील .......................................................... - ........................................... आंतरराष्ट्रीय
रात्रंदिवस एकाच गोष्टीचा नाद असलेला ............................... - ................................................ नादिष्ट
रात्रीचा पहारेकरी ........................................................ - ............................................... जागल्या
राज्यातील लोक .......................................................... - ............................................ रयत, प्रजा
राजाने मान्यता दिलेली ................................................... - .............................................राजमान्य

| | |
|---|---|
| रोजच्या हिशेबाजी टिपणवही | रोजखर्डा |
| लग्नात द्यावयाची भेट | आहेर |
| लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत | आबालवृद्ध |
| लहानपणी मिळालेले वळण किंवा शिक्षण | बाळकडू |
| लग्न न करणारा | ब्रह्मचारी |
| लढण्याची विद्या | युद्धकला |
| लक्ष न दिले गेलेले | उपेक्षित |
| लहान मुलांना समजेल असे | बालबोध |
| लग्न झालेल्या मुलीच्या आई वडिलांचे घर | माहेर |
| लहान मुलास प्रथम अन्न खावयास घालण्याचा समारंभ | उष्टावण |
| लांबत जाणारे काम | मारुतीचे शेपूट |
| लाकडाच्या वस्तू बनविणारा | सुतार |
| लाखो रूपये जवळ असणारा | लखपती, लक्षाधीश |
| लिहीण्याची हातोटी (शैली) | लेखनशैली |
| लिहीता वाचता येत असलेला | साक्षर |
| लेख लिहिणारा | लेखक |
| लोकांचा आवडता | लोकप्रिय |
| लोकांना मान्यता दिलेला | लोकमान्य |
| लोकांच्या सत्तेखाली त्यांच्याच संमतीने त्यांच्या हितासाठी असलेली राज्यपद्धती | लोकशाही |
| लोकांना पुढे नेणारा | पुढारी, नेता |
| लोकांचे पुढारीपण करणारा | पुढारी, नेता |
| लोकांची फसवणूक करून त्याना लुबाडणारा | ठकसेन |
| लोखंडाच्या वस्तू बनविणारा | लोहार |
| लोकांच्या मताने चाललेले राज्य | प्रजासत्ताक |
| वर्णन करता येणार नाही असे | अवर्णनीय |
| वर्षाने प्रसिद्ध होणारे | वार्षिक |
| वर्णन करण्याची हातोटी | वर्णनशैली |
| व्यवहाराविषयी काहीही न कळणारा | व्यवहारशून्य |
| व्यवस्थित आखलेले | रेखीव |
| व्रताप्रमाणे काही नेम करणारा | व्रतस्थ |
| वर्तमानपत्र चालविणारा | संपादक |
| वनात राहणारे लोक | वनवासी |
| वर्तमान पत्रातील संपादकीय मुख्य लेख | अग्रलेख |
| वनस्पतीच्या मुळाशी पाण्यासाठी केलेला खोलगट भाग | अळे |
| वयाने व अधिकाराने सर्वात कमी असलेली व्यक्ती | कनिष्ट |
| वजनदार मनुष्य | धेंड |
| वनात राहणारे प्राणी | वनचर |
| वृत्त पत्रसाठी बातम्या आणून देणारा | वार्ताहर |
| वाजवी पेक्षा कमी खर्च करणारा | कंजूस |

*वाडवडिलांनी मिळविलेली संपत्ती ........................................- ........................................ वडिलोपार्जित*
*वाट दाखविणारा ........................................................- ............................................ वाटाड्या*
*वारस नसलेला ..........................................................- ..............................................बेवारशी*
*व्याख्यान देणारा .......................................................- ............................................ व्याख्याता*
*वाटसरूना पाणी पाजण्यासाठी केलेली सोय ............................- ............................................. पाणपोई*
*वाटेल तसा पैसा खर्च करणे ............................................- ............................................उधळपट्टी*
*वाईट आईबापांच्या पोटी चांगली संतती .................................- .......................................भांगेमध्ये तुळस*
*वारसाचा हक्क नसलेला ..................................................- ............................................ निवारसा*
*वाईट परिस्थितीचे दिवस ................................................- ................................................दुर्दिन*
*वादी प्रतिवादी अशा कोणत्याही पक्षात नसलेला .........................- ................................................त्रयस्थ*
*वाडवडिलांच्या पासून ज्यांचे घरात श्रीमंती आहे असा ...................- ............................................गर्भश्रीमंत*
*वाटेल त्यावेळी वाटेल ते घडणारे ........................................- ...........................................अनियमित*
*वाईट आचरण असलेला ..................................................- ............................................दुराचारी*
*वाईट मार्गाने जाणारा ....................................................- ............................................अधोगामी*
*वाटसरुना राहण्यासाठी धर्मार्थ बांधलेली इमारत .........................- ............................................ धर्मशाळा*
*विशिष्ट ध्येय गाठण्याची जबरदस्त इच्छा ...............................- ......................................... महत्त्वाकांक्षा*
*विक्रीचा माल घेऊन दारोदार हिंडणारा .................................- ............................................फेरीवाला*
*विनयाने बोलणारा .......................................................-.....................................विनयशील, विनम्र*
*विमान चालविणारा .......................................................- ...............................................वैमानिक*
*विशिष्ट ध्येय गाठण्याची जबरदस्त इच्छा असणारा ......................- ......................................... महत्त्वाकांक्षी*
*विशिष्ट ध्येय समोर ठेवून वागणारा .....................................- ............................................ ध्येयनिष्ठ*
*विशिष्ट मर्यादा ओलांडून जाण्याचे केलेले गैरकृत्य ......................- ...........................................अतिक्रमण*
*विवाह समयी नवरानवरीमध्ये धरावयाचे वस्त्र ............................- ..............................................अंतर्पाट*
*विशिष्ट हवामानाचा कालखंड ...........................................- ................................................... ऋतु*
*विहिरीतून पाणी काढणे ...................................................- ..............................................शेंदणे*
*विशिष्ट ध्येयासाठी प्राणत्याग केलेली व्यक्ती ...............................- ..............................................हुतात्मा*
*वेडे वाकडे शब्द ..........................................................- ........................................... मुक्ताफळे*
*शत्रूकडील बातमी काढणारा ............................................- ........................................हेर, गुप्तहेर*
*शरीरात जीव असलेला ...................................................- ................................................ सजीव*
*शत्रूला सामील झालेला ...................................................- ................................................ फितूर*
*शंभर वर्षे आयुष्य असणारा ..............................................- ............................................शतायुषी*
*श्रम न करता खाणारा ....................................................- ............................................ ऐतखाऊ*
*श्रम करून जीवन जगणारे ..............................................- ................................... श्रमजीवी, श्रमिक*
*श्रद्धा ठेवून वागणारा .....................................................- ............................................ श्रद्धाळू*
*शरण आलेला ..............................................................- ............................................शरणागत*
*शक्य असेल त्याप्रमाणे ...................................................- ...........................................यथाशक्ती*
*शर्यतीत एकमेकांच्या सतत पुढे येण्याचा प्रयत्न .........................- ................................................ चुरस*
*शंकराने विश्वसंहारकाली केलेले नृत्य ..................................- ..................................... तांडव, शिवनृत्य*
*शस्त्रे ठेवण्याचे ठिकाण ...................................................- ..........................................शस्त्रभंडार*

*शरीरतील तंतुयुक्त भाग ................................................ - ................................................ स्नायू*

*शापापासून सुटका ................................................ - ................................................ उःशाप*

*शिल्लक राहिलेले ................................................ - ................................................ उर्वरित*

*शिकारीसाठी किंवा निरीक्षण करण्यासाठी*
*रानात बांधलेला सुरक्षित उंच माळा ................................................ - ................................................ मचाण*

*श्रीरामाचे गुणवर्णत करणारे संस्कृत स्त्रोत्र ................................................ - ................................................ रामरक्षा*

*शिक्षा करण्याचे यमपुरीतील स्थान ................................................ - ................................................ नरक*

*शिकण्याची आवड नसलेला, अशिक्षित राहिलेला ................................................ - ................................................ अक्षरशत्रू*

*शुष्क, लांबणीचे व कंटाळा आणणारे भाषण ................................................ - ................................................ चर्पटपंजरी*

*शेतात बांधलेली पडवी ................................................ - ................................................ पडळ*

*शेजाऱ्यांशी वागण्याची पद्धत ................................................ - ................................................ शेजारधर्म*

*शेतकऱ्यांना मिळणारे सरकारी कर्ज ................................................ - ................................................ तगाई*

*सतत काम करणारा (सतत उद्योग करणारा) ................................................ - ................................................ दीर्घोद्योगी, उद्योगी*

*समाजाची सेवा करणारा ................................................ - ................................................ समाजसेवक*

*समुद्राचे पाणी वाढत पुढे जाणे ................................................ - ................................................ भरती*

*समुद्राचे पाणी मागे हटणे ................................................ - ................................................ ओहोटी*

*सहा महिन्यानी प्रसिद्ध होणारे ................................................ - ................................................ षण्मासिक*

*सभेत भाषण करणारा ................................................ - ................................................ वक्ता*

*सत्यासाठी झगडणारा ................................................ - ................................................ सत्याग्रही*

*संकट दूर करणारा (संकटाचे निवारण करणारा) ................................................ - ................................................ विघ्नहर्ता, विघ्नविनाशक*

*समाजात सुधारणा घडवून आणणारा ................................................ - ................................................ समाज सुधारक*

*समाजाकडून उपेक्षिलेले व पीडले गेलेले ................................................ - ................................................ दलित*

*संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम ................................................ - ................................................ दिनक्रम*

*समोरा समोरील कुंपणामुळे तयार झालेली*
*गावातील किंवा शेतातील लहान वाट ................................................ - ................................................ पाणंद, पाणद, पाणंधी, पाणंदी, पाळंद*

*समाजातील परिस्थिती बदलून तिला योग्य वळण लावणारा ................................................ - ................................................ युगपुरूश, युगप्रवर्तक*

*सर्व समाजात समता नांदावी असे म्हणणारा ................................................ - ................................................ साम्यवादी*

*सहज साध्य होऊ शकणारे ................................................ - ................................................ सुसाध्य, सहजसाध्य*

*सर्वांसाठी एकत्र वाचनाची सोय ................................................ - ................................................ वाचनालय*

*सतत पैसे खर्चणारा ................................................ - ................................................ खर्चिक, उधळ्या*

*सतत कष्ट करणारा ................................................ - ................................................ कष्टाळू*

*सहसा न घडणारे ................................................ - ................................................ क्वचित*

*सरकारी कायदे मोडण्याची क्रिया ................................................ - ................................................ कायदेभंग*

*सर्वांचा संहारकर्ता व क्रूर असा शत्रू ................................................ - ................................................ कर्दनकाळ*

*सतत पडणारा पाऊस ................................................ - ................................................ झडी*

*सच्छील व धर्मनिष्ठ मुनष्य ................................................ - ................................................ धर्मराज*

*संसारपाश मोडून टाकणारा ................................................ - ................................................ निःसंग, विरक्त (संसाराचा त्याग केलेला)*

*सतत निंदा करणारा ................................................ - ................................................ निंदक*

*सर्व बाजूनी पाण्याने वेढलेले जमिनीचे क्षेत्र ................................................ - ................................................ बेट*

*सदा रडत बसणारा बेहिमती मनुष्य ................................................ - ................................................ रडतराव*

| | |
|---|---|
| सभेत धीटपणाने भाषण करणारा | सभाधीट |
| संगीतातले सात स्वर (सा, रे, ग, म, प, ध, नि) | सप्तस्वर |
| सहज होऊ शकणारी गोष्ट | हातचा मळ |
| सर्व धंद्याचा कसबी | हरहुन्नरी |
| सर्वांशी मिळून मिसळून वागणारा | मनमिळावू |
| स्वतःच लिहिलेले स्वतः विषयीचे चरित्र | आत्मवृत्त, आत्मचरित्र |
| स्वभावाने अतिशय तापट असा मनुष्य | आग्यावेताळ |
| स्वतःची कोणतीही वस्तू सहज देणारा | उदार |
| स्वतः काही न करता इतराना करण्यांविषयी हुकूमवजा गोष्ट सांगणे | तोंडपाटीलकी |
| स्वर्ग, मृत्यु, पाताळ ह्या तीन लोकांचा समुदाय | त्रिखंड |
| स्वत्व, रजस, तमस या गुणांचा समुदाय | त्रिगुण |
| स्वतःच्या पराक्रमाने चारी दिशातील लोकांना जिंकणे | दिग्विजय |
| स्वतःस मोठा पंडित मानणारा | पंडितमान्य |
| स्वतःच्या फायद्याचा विचार न करता कार्य करणारा | निस्वार्थी |
| स्वतःचा फायदा | स्वार्थ |
| स्वतःचा अभिमान असणारा | स्वाभिमानी |
| स्वतःचा मुळीच अभिमान नसणारा | स्वाभिमानशून्य |
| स्वतःचे काम स्वतःच करणारा | स्वावलंबी |
| स्वतःकष्ट (श्रम) करून मिळविलेले | स्वकष्टार्जित |
| स्वतःच्या हिताचा त्याग करणारा | स्वार्थत्यागी |
| स्वतःच्याच फायद्याचा विचार करणारा | स्वार्थपरायण (स्वार्थी) |
| स्वतःशी केलेले भाषण | स्वगत |
| स्वतःची कामे स्वतः करणे | स्वावलंबन |
| स्वतःविषयी अभिमान | स्वाभिमान |
| स्वतःहून लोकसेवा करणारा | स्वयंसेवक |
| स्वतः संपादन केलेली | स्वसंपादित, स्वार्जित |
| स्वर्गातील इंद्राची बाग | नंदनवन |
| स्वदेशाचा अभिमान असणारा | स्वदेशाभिमानी |
| स्वतःला अक्कल नसून दुसऱ्यांच्या हो ला हो करणारा | होयबा |
| सारे जग पाण्यात बुडून जाणे | प्रलय |
| सांगितलेले तेवढेच काम करणारा | सांगकाम्या |
| सापाचा खेळ करणारा | गारूडी |
| सामान्य लोकात न आढळणारा | लोकोत्तर |
| स्थापना करणारा | संस्थापक |
| साधाभोळा निरुपद्रवी मनुष्य | देवमाणूस |
| सिनेमाच्या कथा लिहिणारा | पटकथालेखक |
| सीमा नाही असे | असीम |
| सुंदर शब्दातील बोधपर वचन (वाक्य) | सुभाषित |
| सुखाच्या मागे लागलेला | सुखलोलुप |

सुखाने काळ कंठणारा ................................................. - ............................................ सुखासीन

सुखाच्या आहारी गेलेला ................................................ - ............................................ सुखासीन

स्तुती करण्यास अयोग्य ................................................. - ............................................ अश्लाघ्य

सूर्योदयापूर्वी देवाला कारावयाची आरती ................................ - ........................................ काकडआरती

सूर्यादय ज्या पर्वतामागून होतो तो पर्वत ................................ - ............................................ उदयगिरी

सूर्योदयापूर्वीची वेळ ...................................................... - ............................उषःकाल (पहाटेची वेळ)

सूर्य उगवल्यानंतर अंथरणातून उठणारा ................................ - ............................................ सूर्यवंशी

सूर्याचे दक्षिणकडे जाणे ................................................... - ............................................दक्षिणायन

सूर्याचे उत्तरेकडे जाणे.................................................... - ............................................उत्तरायण

सूर्योदयापासून पहिले तीन तास ........................................... - ............................................ रामप्रहार

सूचना न देता येणारा पाहुणा............................................... - ............................... अगांतुक, आगंतुक

सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर दिसणारा प्रकाश......................... - ............................................ संधिप्रकाश

सैन्याची केलेली गोलाकार रचना ......................................... - ............................................ चक्रव्यूह

सोन्याचे वस्तू (अलंकार) बनविणारा .................................... - ............................................सोनार

सोन्याचांदीचा व्यापारी ..................................................... - ............................................ सराफ

हळूहळू घडून येणारा बदल ................................................ - ............................................ उत्क्रांती

हट्टीपणा करणारा .......................................................... - ............................................दुराग्रही

हरिणीसारखे डोळे असणारी स्त्री ........................................... - ................................मृगाक्षी, मृगनयना

हृदयाला जाऊन भिडणारे ................................................. - ..............................हृदयंगम, हृदयस्पर्शी

हत्ती बांधण्याची जागा .................................................... - ............................................ हत्तीखाना

हत्तीना काठीने मारून पळविण्याचा जुन्या
राजेरजवाड्यांचा एक खेळ ................................................ - ............................................ साठमारी

हळूहळू एक सारखा पाऊस पडण्याचा प्रकार ............................ - ............................................रिमझिम

हत्तीला काबूत ठेवणारा ................................................... - ............................................माहूत

हातात चक्र असलेला ...................................................... - ............................... चक्रधारी, चक्रपाणी

हाताचे दोन पंजे जवळ आणून केलेला हाताचा पसा ..................... - ............................................ ओंजळ

हातात हात घालून .......................................................... - ............................................सहकाऱ्याने

हात मागे आवळून बांधणे ................................................. - ........................................ मुसक्याबांधणे

हिंडून करावयाचा पहारा .................................................. - ............................................गस्त

हिरव्या रंगाचे रत्न ......................................................... - ............................................ पाचू

क्षणात नाश पावणारे ...................................................... - ................................क्षणायू, क्षणभंगुर

क्षमा करण्याची वृत्ती असणारा ........................................... - ............................................क्षमाशील

क्षुद्र वस्तू चोरणारा ........................................................ - ............................................काडीचोर

क्षुद्र लोकांची ओरडं ........................................................ - ............................................कोल्हेकुई

ज्ञानाची इच्छा करणारा .................................................... - ............................................जिज्ञासू

ज्ञान मिळाण्यासाठी केलेली उपासना .................................... - ........................................ ज्ञानोपासना

ज्ञानाचा अभाव असलेला .................................................. - ............................................अज्ञानी

# भाग २ - (३,४,५)

१) जोड शब्द व त्यांचे अर्थ
२) शब्द समूहाबद्दल एक शब्द
३) म्हणी व त्यांचे अर्थ
४) शून्यात परार्धे भरली आहेत
५) वाक्प्रचार व त्यांचे अर्थ
६) विरुद्ध अर्थाचे शब्द
७) समान अर्थाचे शब्द
८) समूहदर्शक शब्द
९) नर-मादी-अपत्य
१०) पंचेंद्रियांची करामत
११) प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण
१२) वैशिष्ट्ये
१३) अलंकारिक शब्दयोजना
१४) सारवट शब्द
१५) एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ
१७) परंपरागत उपमा

# *(३) म्हणी व त्यांचे अर्थ*

## *म्हणी व त्यांचे अर्थ*

*म्हणी हा आजपर्यंत होऊन गेलल्या लोकांच्या संचित ज्ञानाचा कोश आहे. परंपरेने लोकांच्या बोलण्यात आलेले नीतिपर, अनुभवसिद्ध वाक्यांच्या म्हणी तयार झालेल्या आहेत. वाक्प्रचार व म्हणीनी तयार झालेली भाषा सर्वांना आवडते.*

*सामान्यतः म्हणींच्या मागे  कथेची पार्श्वभूमी असते. म्हणी त्याचा निष्कर्ष असतो.*

***अति तेथे माती*** *- कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा परिणामी दुःखकारक ठरतो.*

***अति शहाणा त्याचा बैल रिकामा*** *- अतिशहाणा मनुष्य वारंवार फसतो.*

***अडला हरी (नारायण) गाढवाचे पाय धरी*** *- बुद्धिमान माणसाला देखील एखाद्या अडचणीच्या वेळी मूर्ख माणसाची विनवणी करावी लागते.*

***अगअग म्हशी मला कुठे नेशी*** *- काहीतरी पोकळ सबब सांगून आपली फजिती लपविण्याचा प्रयत्न करणे.*

***अति रागा भीक मागा*** *- कोणीही अतिराग करू नये, त्याने मनुष्य भिकेला लागतो.*

***अंथरूण पाहून पाय पसरावे*** *- ऐपतीच्या मानाने खर्च करावा.*

***असतील शिते तर जमतील भूते*** *- एखाद्या माणसाकडून फायदा होणार असेल तर लोक त्याच्याभोवती जमतात.*

***असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ*** *- अयोग्य माणसाशी संगत केल्याने जिवाला धोका असतो.*

***अन्नछत्री जेवणे, वर मिरपूड मागणे*** *- दुसऱ्याकडून आवश्यक ती धर्मार्थ मदत घेऊन सुद्धा आणखीन काही गोष्टींची मागणी करायची.*

***अंतकाळापेक्षा मध्यान्हकाळ कठीण*** *- मरणाच्या वेदनापेक्षा भुकेच्या वेदना अधिक दुःखदायक असतात.*

***अती खाणे मसणात जाणे*** *- खाण्यापिण्यात अतिरेक झाल्यास परिणाम वाईट होतो.*

***अन्नाचा मारलेला खाली पाही, तलवारीचा मारलेला वर पाही*** *- सोम्यपणामुळे मनुष्य नरम होतो, उद्धटपणामुळे तो आपला शत्रू बनतो.*

***असेल तेव्हा दिवाळी, नसेल तेव्हा शिमगा*** *- अनुकूलता असेल तेव्हा चैन करणे, विपत्तीचे दिवस आले की रडणे.*

***अर्धी टाकून सगळीला धावू नये*** *- संबंध वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करीत असता हाती असलेली अर्धी वस्तू टाकून देणे मूर्खपणाचे होय.*

***अर्थी दान महापुण्य*** *- संकटात सापडलेल्या माणसाला मदत केल्याने मोठे पुण्य लागते.*

***अर्ध्या वचनात*** *असणे - आज्ञा होईल केव्हा व ती मी पाळीन केव्हा अशा उत्सुकतेने शब्द झेलणे.*

***अडली गाय फटके खाय*** *- संकटात सापडलेल्या माणसाला अपमान सहन करावा लागतो.*

***अंगापेक्षा बोंगा जड कुठे चालला सोंगा ?*** - *खऱ्या गोष्टी पेक्षा दिखाऊपणाच जास्त.*

***अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे*** - *थोडीशी संपत्ती किंवा गुण प्राप्त झाल्याने गर्व होणे.*

***अस्मान ठेंगणे होणे*** - *(स्वर्ग दोन बोटे उरणे) गर्व होणे, ताठ्याचा कळस होणे.*

***आधी पोटोबा मग विठोबा (आधी प्रपंच मग परमार्थ)*** - *आगोदर पोटपूजा मग देवपूजा, आधी स्वार्थ मग परमार्थ.*

***आपलेच दात, आपलेच ओठ*** - *आपल्याच माणसानी केलेल्या चुकांमुळे निर्माण झालेली अडचणीची परिस्थिती.*

***आकारे रंगती चेष्टा*** - *मनुष्याच्या बाह्य स्वरूपावरून तो कोणती कृती करील हे व्यक्त होते.*

***आधी बुद्धी जाते मग लक्ष्मी (भांडवल) जाते*** - *बुद्धी नष्ट झाली की धनाचा ही नाश होतो.*

***आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन*** - *अपेक्षा धरावी त्याहून जास्त लाभ होणे.*

***आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येणार*** *? - न्याय बुद्धीच नाही, तर न्याय कसा मिळेल?*

***आपली पाठ आपणास दिसत नाही*** - *स्वतःचे दोष दुसऱ्यानी दाखविल्यावर कळतात (किंवा) आपल्या मागून केलेली स्तुती किंवा निंदा आपल्याला सांगितल्या शिवाय कळत नाही.*

***आपला हात जगन्नाथ*** - *आपली इच्छा पूर्ण करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी असता, काही कमी पडत नाही.*

***आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना*** - *दोन्ही कडून अडचण.*

***आजा मेला, नातू झाला*** - *घरातील एक माणूस कमी झाले तर दुसरीकडे एक वाढले एकूण सारखेच.*

***आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटले असते*** - *अशक्य गोष्टी बद्दल चिकित्सा करणे योग्य नसते.*

***आपले नाक कापून दुसऱ्याला अपशकुन*** - *दुसऱ्याचे वाईट व्हावे म्हणून अगोदर स्वतःचे नुकसान करून घेणे.*

***आयत्या बिळात नागोबा*** - *एखाद्याने स्वतःसाठी चांगली गोष्ट संपादन करावी आणि दुसऱ्याने त्याचा आयता फायदा घ्यावा.*

***आईजीच्या जिवावर बाईजी उदार*** - *दुसऱ्यांच्या पैशावर स्वतः चैन करणे.*

***आपापाचा माल गपापा*** - *श्रम न करता मिळालेला पैसा निष्काळजीपणाने खर्च करणे.*

***आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास*** - *आधीच एखाद्या गोष्टीची हौस आणि त्यात इतरांचे उत्तेजन.*

***आंधळे दळते कुत्रे पीठ खाते*** - *काम करणार एकजण, पण फायदा उठवणार दुसराच.*

***आधणातले रडतात आणि सुपातले हसतात*** - *दुसऱ्याच्या दुःखाला हसणारे लोक त्याच दुःखाचे धनी होतात.*

***आपल्या कानी सात बाळ्या*** - *एखाद्या कृत्यात आपले अंग नाही म्हणून अज्ञान दाखविणे.*

***आपण हसे लोका, शेंबूड आपल्या नाका*** - *ज्या दोषाबद्दल आपण दुसऱ्यांना हसतो, तोच दोष आपल्या अंगी असणे.*

***आले अंगावर घेतले शिंगावर*** - *आयते मिळते त्याचा फायदा करून घेणे.*

***आपला तो बाळ्या (बाब्या) दुसऱ्याचे ते कारटे*** - *स्वतः संबंधी जी उदार बुद्धी असते ती दुसऱ्यांच्या बाबतीत न ठेवण्याची वृत्ती.*

***आंधळ्या बहिऱ्याशी गाठ*** - *परस्परंना मदत करण्यास असमर्थ असणाऱ्यांची गाठ.*

***आधीच तारे त्यात शिरले वारे*** - *स्वतःच्या हौसेत दुसऱ्यांच्या उत्तेजनाची भर पडणे.*

***आगीतून निघून फोपाट्यात पडणे*** - *लहानशा संकटातून निघून मोठ्या संकटात सापडणे.*

***आठ पुरभय्ये नऊ चौके (व्यक्ति तितक्या प्रकृती)*** *- एकमेकांशी जमवून घेऊ न शकणाऱ्यांनी एकत्र येणे.*

***आभाळास ठिगळ कोठवर लावणार ?*** *फार मोठ्या संकटात सापडल्यावर बाहेर पडणे कसे शक्य होईल ?*

***आकाशपाताळ एक करणे*** *- फार मोठ्याने आरडाओरड करणे.*

***आगळ बुध वाणिया पाछळ बुध बामणिया*** *- वाण्याना जशी दूरदृष्टी असते, तशी ब्राह्मणाना नसते.*

***आठ हात लाकूड व नऊ हात धलपी*** *- अगदी अशक्य अशी गोष्ट सांगणे (कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करणे).*

***आंधळ्या गाईत लंगडी गाय शहाणी*** *- अडाणी माणसात थोडासा जाणता असला तरीही तो पंडित म्हणवून घेतो.*

***आप करे सो काम पदरी होय सो दाम*** *- स्वतःच्या कामावर तसेच स्वतःजवळ असलेल्या पैशावरच फक्त विसंबता येते.*

***आपल्या पोळीवर तूप ओढणे*** *- दुसऱ्यांचा विचार न करता फक्त स्वतःचाच फायदा पहाणे.*

***आवळा देऊन कोहळा काढणे*** *- अल्पशा मोबदल्यात दुसऱ्यापासून मोठे कार्य करून घेणे.*

***आयत्या पिठावर रेघोट्या ओढणे*** *- दुसऱ्यापासून आयत्या मिळालेल्या संपत्तीवर चैन करणे.*

***इकडे आड तिकडे विहीर*** *- दोन्ही बाजूनी सारख्याच अडचणीत सापडणे.*

***इकडचा डोंगर तिकडे करणे*** *- काहीतरी प्रचंड उद्योग करणे.*

***इळा (विळा) मोडून खिळा करणे*** *- अधिक किमतीची वस्तू थोड्याशा लाभाकरिता हातची घालवून देणे.*

***उघड्या डोळ्यांनी प्राण जात नाही*** *- दुसऱ्यांचे नुकसान होत असतानाही त्याचा प्रतिकार न करता स्वस्थ बसणे माणसाच्या हातून होत नाही.*

***उचलली जीभ लावली टाळ्याला*** *- बोलणे सोपे असते, पण करणे कठीण, शक्याशक्यतेचा विचार न करता बोलणे.*

***उपट सूळ घे खांद्यावर*** *- नसती कटकट मागे लावून घेणे.*

***उथळ पाण्याला खळखळाट फार*** *- ज्ञान थोडेसे पण त्याचा गाजावाजा मात्र जास्त अस्तो.*

***उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग*** *- अतिशय उतावळेपणामुळे मुर्खासारखे वागणे.*

***उंदराला मांजर साक्ष*** *- हिताचे संबंध असलेले दोघेही एकमेकांचे साक्षीदार असण्याची परिस्थिती.*

***उखळात डोके घातल्यावर मुसळाला कोण भितो ?*** *- येईल त्या संकटाला तोंड देण्याची तयारी असल्यावर कशाला कोण घाबरणार?*

***उचल पत्रावळी म्हणे जेवणार किती !*** *- हाती घेतलेले काम सोडून भलत्याच गोष्टींची उठाठेव करणे.*

***उंटावरून शेळ्या हाकणे*** *- अतिशय आळस व निष्काळजीपणा करणे.*

***उठता लाथ बसता बुक्की*** *- प्रत्येक कामात एक सारखी शिक्षा करीत राहणे.*

***उधारीचे पोते सव्वा हात रिते*** *- उधार माल घेतल्याने नुकसान जास्त.*

***ऊन पाण्याने घरे जळत नसतात*** *- एखाद्या सभ्य गृहस्थावर खोटे आरोप केल्याने त्याची बेआब्रू होत नाही.*

***ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये*** *- चांगल्या गोष्टीचा कधीही गैर फायदा घेऊ नये.*

***उडत्या पाखराची पिसे मोजणारा*** *- फार हुषार मनुष्य.*

***उंबर फोडून केंबरे काढणे*** *- लहानशा कामाचा अभिमान धरून मोठ्या कामाचा विध्वंस करणे.*

***एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारू नये*** - *एकाने एक मोठी वाईट गोष्ट केली म्हणून दुसऱ्याने लहानशी का होईना ती वाईट गोष्ट करू नये. दोघे ही दोषीच.*

***एका हाताने टाळी वाजत नाही*** - *घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात.*

***एका म्यानात दोन तलवारी राहत नाहीत*** - *एकाच धंद्याची माणसे एकमेकांचा मत्सर केल्याशिवाय राहात नाहीत.*

***ऐकावे जनाचे, करावे मनाचे*** - *लोकांचे मत समजून घ्यावे. पण आपल्याला योग्य वाटेल ते करावे.*

***एक पंथ दो काज*** - *एकाच वाटेवरची दोन कामे एका खेपेत करणेच योग्य.*

***एक घाव दोन तुकडे*** - *पटकन निकाल लावणे.*

***एक ना धड भाराभर चिंध्या*** - *एकाच वेळी अनेक कामे करायला घेतल्यास त्यातले एक ही काम धड होत नाही. सगळेच अपूर्ण राहते.*

***एका माळेचे मणी*** - *सगळे सारखेच.*

***एका कानाने ऐकावे व दुसऱ्या कानाने सोडून द्यावे*** - *एखादी गोष्ट दुसऱ्यांची ऐकावी पण ती मनावर घेऊनये किंवा तसे वर्तन ही करायला जाऊ नये.*

***एकदा कानफाट्या नाव पडले की पडले*** - *लोकांमध्ये एखाद्याचे नाव वाईट झाले तर ते सुधारणे कठीण (अशक्य) असते.*

***एकाची जळते दाढी दुसरा त्यावर पेटवू पाहतो विडी - *** *दुसरा संकटात सापडला असता त्याला मदत करायची सोडून थोडासा का होईना स्वतःचा फायदा होत असल्यास तो करून घेणे.*

***एका पायावर तयार (सिद्ध) असणे - *** *तत्पर असणे, फार उत्कंठित होणे.*

***ओळखीचा चोर जीवे न सोडी - *** *ओळखीचा शत्रू अनोळखी शत्रूपेक्षा भयंकर असतो. ज्याला मर्म माहीत असते, तो घात करू शकतो.*

***ओ म्हणता ठो येईना - *** *अक्षरशत्रू असणे.*

***कर नाही त्याला डर कशाला ? - *** *ज्याने वाईट काम केले नाही त्याला भीती वाटण्याचे कारण नाही.*

***कसायाला गाय धारजिणी (धार्जिण) - *** *कठोर व दुष्ट धन्याशी नोकर गरिबीने वागतात, पण गरीब धन्याची मात्र हेळसांड करतात.*

***कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले, तरी कडू ते कडूच - *** *ज्याचा स्वभाव जन्मतः वाईट असल्यास तो सुधारणे कठीण.*

***करील ती पूर्वदिशा - *** *एखादा माणूस जे काही सांगतो, ते इतरानी निमूटपणे ऐकून घेणे.*

***करावे तसे भरावे - *** *केलेल्या दुष्कृत्यास त्याप्रमाणात शिक्षा भोगण्यास तयार असावे.*

***करील ते कारण आणि बांधील ते तोरण - *** *एखादा माणूस जे सांगतो किंवा करतो तेच खरे मानणे.*

***कधी तुपाशी, कधी उपाशी - *** *सांसारिक स्थिती नेहमी सारखी नसते, त्यात चढउतार असतोच.*

***कशास नाही ठिकाणा, बुधवारचे लग्न - *** *(कसा - पैसे ठेवण्याची छोटी पिशवी) पैशाचा बंदोबस्त व्हायच्या अगोदर लग्न ठरविणे अयोग्य. निरर्थक गोष्टी करू नयेत.*

***कवडी कवडी माया जोडी - *** *काटकसरीने पैसा जमविणे.*

***कंरगळी सुजली म्हणून डोंगराएवढी होईल काय ? - *** *प्रत्येक गोष्टीला काहीतरी मर्यादा असतेच की नाही ?*

***कामापुरता मामा व ताकापुरती आजीबाई - *** *काम होई पर्यंतच गोड गोड बोलणे.*

***काळ आला होता, पण वेळ आली नव्हती - *** *नाश होण्याची वेळ आली होती पण थोडक्यात संकट टळले.*

***कास्तेत कळसा, गावाला वळसा*** - *जवळ असलेल्या वस्तूचा भान नसल्याकारणाने दूरवर जाऊन शोध घेणे.*

***काप गेले आणि भोके रहिली*** - *कीर्ती आणि वैभव गेले तरी त्याचा पोकळ अभिमान मात्र शिल्लक राहतो.*
*(काप - कानातला दागिना)*

***कानामागून आली आणि तिखट झाली*** - *मागून येऊन सुद्धा थोड्याच दिवसात वरचढ होणे.*

***कान आणि डोळे यांच्यात चार बोटांचे अंतर*** - *ऐकलेली गोष्ट व पाहिलेली गोष्ट यात जमीन आस्मानाचा फरक असू शकतो.*

***कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही*** - *वाईट माणसांच्या शापाने चांगल्या माणसांचे काही नुकसान होत नाही.*

***काडी चोर तो माडी चोर*** - *लहान सहान अपराध करणाऱ्या माणसाची मोठा अपराध करायचीही प्रवृत्ती होते.*

***काही सोन्याचा गुण, काही सवागीचा गुण*** - *एखादे मोठे कार्य करीत असता जसे मोठ्या लोकांचे सहाय्य होते तसेच क्षुद्र लोकांचे ही सहाय्य होऊ शकते.*

***काट्याचा नायटा (होतो)*** - *एखादी क्षुल्लक गोष्ट म्हणून दुर्लक्ष करू नये ती विकोपाला जाऊन भयंकर परिणाम होऊ शकतात.*

***काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहीत*** - *थोड्याशा अधिकाराने जे काम होते ते खूपशा पैशाने देखील होऊ शकत नाही.*

***काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही*** - *खरी मैत्री क्षुल्लक कारणाने तुटत नाही.*

***काळ्यापेक्षा पिठा दगड बरा*** - *दोन्ही वस्तू पैकी एक वस्तू अधिक चांगली. (दगडापेक्षा वीट मऊ)*

***कुडी तशी पुडी*** - *जसे शरीर तसा आहार.*

***कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडेच (कुत्र्याचे शेपूट वाकडे)*** - *जातीस्वभाव वाईट असला तर त्याच्यावर उपदेशाचा परिणाम होत नाही.*

***कुडास कान, ठेवी ध्यान (भिंतीलाही कान असतात)*** - *भिंतीच्या आडूनही कोणी ऐकण्याची शक्यता आहे म्हणून सावधगिरीने बोलावे.*

***कुचेष्टे वाचून प्रतिष्ठा नाही*** - *जगात प्रतिष्ठा मिळवायची असेल तर वाईट ऐकण्याचीही तयारी हवी, त्रास सोसल्या शिवाय मोठपणा मिळत नाही.*

***कुंभाराची सून कधीतरी उकिरड्यावर येईलच*** - *एखादी गोष्ट व्हावयाची असेल तर ती आज ना उद्या होईलच.*
*(सत्य गोष्ट लपत नाही)*

***कुंभारणीच्या घरात जाईल तो किडा कुंभारीणच होतो*** - *जर कोणी मनुष्य विरूद्ध मताच्या मंडळीत त्यांची मते खोडून टाकण्यासाठी गेला तर त्यांच्या आदर सत्काराने स्वतःचीच मते सोडून त्यांच्या पक्षात जाण्याची शक्यता असते.*

***कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ*** - *आपलीच माणसे आपल्या नाशास कारणीभूत होतात.*

***कुंपणानेच शेत खाल्ले*** - *ज्याच्या हाती एखाद्या गोष्टीचे रक्षण करण्याचे काम दिले तर त्यानेच त्याचे रक्षण करण्याचे सोडून नुकसान करणे.*

***कुसंतानापेक्षा निसंतान बरे*** - *कुपुत्र असण्यापेक्षा मुळीच संतान नसलेले अधिक बरे.*

***केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी*** - *अत्यंत दरिद्री अवस्था.*

***कोरड्या बरोबर ओले ही जळते*** - *वाईट माणसांच्या संगतीत चांगला माणूस असला तर वाईटाच्या नाशाबरोबर त्याचाही नाश होतो.*

***कोंड्याचा मांडा करून खावा*** - *जे आपल्याला मिळते त्यात सुखासमाधानाने रहावे.*

***कोळसा उगाळावा तितका काळाच (कोळसा किती जरी उगाळला तरी तो काळा तो काळाच)*** - *वाईट गोष्ट नेहमी वाईटच असायची, त्यात सुधारणा अशक्य.*

***कोरडी आग पुरवते, ओली आग पुरवणार नाही*** - *विस्तवाने लागलेली आग बुजविता येते, पण भुकेची आग बुजविता येत नाही.*

***कोठे इंद्राचा ऐरावत आणि कोठे शाम भट्टाची तट्टानी*** - *एक अतिशय थोर व श्रीमंत, दुसरा अतिशय गरीब व क्षुद्र यांची जोडी जमणे अशक्य.*

***कोल्हा काकडीला राजी*** - *क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तू मिळाली तरी तेवढ्यावरच खुष होतात.*

***कोठे राजा भोज आणि कोठे गंगा तेलीण*** - *चांगल्या वस्तू बरोबर क्षुद्र वस्तूची बरोबरी करणे अयोग्य.*

***कोंबडे झाकले म्हणून तांबडे फुटावयाचे रहात नाही*** - *जी गोष्ट व्हावयाचीच आहे त्याच्यावर कोणत्याही अडथळ्याचा परिणाम होत नाही.*

***कोल्ह्यांना द्राक्षे आंबट*** - *जी गोष्ट अशक्य आहे, त्याची निंदा करणे.*

***कोणाची होऊ नये बायको, आणि कोणाचे होऊ नये चाकर*** - *दुसऱ्यांच्या तंत्राने चालणाऱ्यांना स्वतंत्रता नसतेच.*

***कोणाचा पायपोस कोणाचे पायात नसणे*** - *मोठा गोंधळ निर्माण होणे.*

***कानाला खडा लावून घेणे*** - *एकदा झालेली चूक पुन्हा होऊ नये म्हणून स्वतःलाच शिक्षा करून घेणे.*

***कानावर हात ठेवणे*** - *आपल्याला काहीच माहीत नाही असा भाव व्यक्त करणे.*

***खर्चणाऱ्याचे खर्चते आणि कोठावळ्याचे पोट दुखते*** - *दुष्ट माणसे स्वतःहून दानधर्म किंवा परोपकार करीत नाहीत पण उदार माणसानी काही चांगले करायला गेल्यास त्यांच्या कामात अडथळा आणतात.*

***खऱ्याला मरण नाही*** - *खरी गोष्ट कधीही कोणीही लपवू शकत नाही. ती कधीतरी उघडकीस येणारच.*

***खाण तशी माती*** - *बीजाप्रमाणे अंकुर असतो, तसेच आई वडिलाप्रमाणे त्यांची मुले असतात.*

***खाई त्याला खवखवे*** - *जो कोणी अपराध करतो त्याला त्याची सारखी जाणीव होत असते व तो अस्वस्थ होतो.*

***खाजवून अवधान आणणे*** - *आपल्याच हाताने आपल्या जिवाला त्रास करून घेणे.*

***खायला काळ भुईला भार*** - *अत्यंत निरुपयोगी मनुष्य कोणालाही नको असतो.*

***खाऊ जाणे तो पचवू जाणे*** - *जो कोणी वाईट कृत्य करण्यास तयार असतो तो त्याचा परिणामही भोगावयास सिद्ध असतो किंवा जो चांगले काम करण्यास हाती घेतो, तो शेवटही करतो.*

***खाईन तर तुपाशी, नाहीतर उपाशी*** - *एखाद्या गोष्टीबद्दल आग्रह धरणे.*

***खाजवून खरूज काढणे*** - *मिटलेली भांडणे पुन्हा उकरून काढणे.*

***खाऊन माजावे, टाकून माजू नये*** - *अन्न खाल्ले तर शरीराच्या वाढीला उपयोग होतो. पण तेच अन्न टाकले तर त्याचा नाश होतो. सत्कार्य करताना त्याचा दुरूपयोग करू नये.*

***खिळ्यासाठी नाल गेला, नालासाठी घोडा गेला, घोड्यासाठी स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्याने केला*** - *थोड्याशा निष्काळणीपणामुळे भयंकर अनर्थ होऊ शकतो. क्षुल्लक गोष्टीनेही मोठे नुकसान होऊ शकते.*

***खोट्याच्या कपाळी गोटा किंवा कुऱ्हाडीचा घाव*** - *जो मनुष्य वाईट काम करतो त्याचा परिणाम त्याला भोगावाच लागतो.*

***खायचे दात वेगळे, दाखवायचे वेगळे*** - *मनात एक बाहेर दुसरेच रूप. (दुटप्पींपणाने वागणे.)*

***खाल्ल्या घरचे वासे मोजणे*** - *ज्याच्यावर आपण उपकार करतो, त्याने आपल्याबद्दल वाईट चिंतणे, निमकहराम होणे.*

***गरजवंताला अक्कल नसते*** - *एखाद्या संकटात सापडलेल्या गरजवंताला दुसऱ्यांचे वाईट बोलणेही ऐकून ध्यावे लागते.*

***गरज सरो वैद्य मरो*** - *गरज असे पर्यंतच एखाद्याची आठवण ठेवणे, गरज संपली की त्याला विसरणे.*

***गवयाचे पोर रडले तरी सुरातच रडणार*** - *आई वडिलांचे गुण नेहमी मुलांना येतात. (अनुवंशिक संस्कार त्याच्यावर होतात)*

***गर्जेल तो पडेल काय? (गर्जेल तो वर्षेल काय?)*** - *केवळ बडबड करणाऱ्या माणसाच्या हातून कोणतेही कार्य होऊ शकेल का?*

***गर्वाचे घर खाली*** - *गर्वाचा किंवा अभिमानाचा अतिरेक केल्यास त्याचा परिणाम वाईटच होतो.*

***गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ*** - *मुर्ख माणसे एकत्र जमली की त्यांच्या हातून वाईट कृत्ये होण्याचीच शक्यता जास्त असते*

***गाढवाने शेत खाल्ल्याचे ना पाप ना पुण्य*** - *दुर्जनावर उपकार केल्याने काही उपयोग होत नाही. आपलेच श्रम व्यर्थ जातात.*

***गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली*** - *एखादे चांगले काम हाती घेतले तर त्याचा फायदाच होईल, तोटा नाहीच.*

***गाढवापुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता*** - *मूर्ख माणसाचे गोंधळ घालण्यात जितके मन रमते तितके चांगल्या गोष्टी ऐकण्यात किंवा करण्यात रमत नाही.*

***गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी*** - *एखाद्या गोष्टीची अनुकूलता असून उपयोग नाही, त्याचा फायदा करून घेण्याचे सामर्थ्य असावे लागते.*

***गाढवाला गुळाची चव काय माहीत ?*** - *मूर्ख माणसाला चांगल्या गोष्टीचे महत्त्व कळत नाही.*

***गाव करी ते राव न करी*** - *एकजुटीने महान कार्य करता येते, ते पैशांनी ही होणार नाही. (एकीची महती.)*

***गाड्यावर नाव, नावेवर गाडा*** - *सर्व दिवस सारखे नसतात. गरीबाचा श्रीमंत होऊ शकतो व श्रीमंताचा गरीब.*

***गाव आहे तेथे महारवाडा आहेच*** - *प्रत्येक गोष्टीत वाईटाचा भाग असतोच.*

***गाड्याबरोबर नळ्याला यात्रा*** - *मोठ्यांच्या आश्रयामुळे लहानांचाही अनायासे लाभ होतो.*

***गांवढ्या गावात गाढवी सवाष्ण*** - *लहान गावात क्षुद्र माणसालाही महत्व प्राप्त होते. चांगल्या वस्तू नसल्यास टाकवू असल्या तरी चालतात.*

***गाठचा एक बाहेरच्या शंभराबरोबर*** - *जे पूर्णपणे आपल्या ताब्यात आहे ते थोडेसे असले तरी त्याची योग्यता अधिक असते.*

***गुळावरल्या माशा किंवा साखरेवरले मुंगळे*** - *जोपर्यंत एखाद्याचे उत्कर्षाचे दिवस असतात तो पर्यंतच त्याच्याभोवती मित्र जमतात.*

***गुरूची विद्या गुरूलाच*** - *दुसऱ्यांना फसविण्याचा प्रयत्न केल्यास स्वतः फसल्या शिवाय राहात नाही.*

***गूळ नाही पण गुळाची वाचा तरी असावी*** - *गरिबाला पैशाची मदत करणे अशक्य असले तरी गोड बोलणे शक्य असावे.*

***गोगलगाय आणि पोटात पाय*** - *दिसायला गरीब पण असतो कपटी. आत एक आणि बाहेर दुसरेच.*

***गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवेद्य*** - *दोघे दिसायला भिन्न असले तरी वस्तुतः एकच असतात.*

***गोरागोमटा कपाळ करंटा*** - *दिसण्यात सुंदर पण नशीब वाईट.*

***घरोघरी मातीच्या चुली*** - *सामान्यपणे प्रत्येकाच्या घरी सारखीच परिस्थिती असते.*

***घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात*** - *कुटुंबातील प्रमुख पुरूषावर संकट ओढवले तर त्याच्या आश्रितांचा सुद्धा त्याला साथ मिळू शकत नाही.*

***घघाची विद्या येते पर ददाची विद्या येत नाही*** - *घेणे माहीत आहे पण देणे नाही.*

***घरचे झाले थोडे, व्याह्याने धाडले घोडे*** - *मनुष्याला स्वतःच्याच कामाचा व्याप अतोनात असताना दुसऱ्यानी आपलेही काम त्याच्यावर लादणे.*

***घटका पाणी पिते, घड्याळ टोले खाते*** - *वेगवेगळ्या माणसांना आपापल्या कर्मानुसार सुखदुःखाचे अनुभव घ्यावे लागतात.*

***घर बांधून पहावे आणि लग्न करून पहावे (घर पहावे बांधून आणि लग्न पहावे करून)*** - *घर बांधताना किंवा लग्न करताना कोणकोणती संकटे येतील व खर्च किती होईल हे काही सांगता येत नाही. (कोणतीही गोष्ट केल्याखेरीज त्यातील अडचणीची कल्पना येत नाही)*

***घराची ओज अंगण सांगते*** - *एखाद्याच्या अंगणाची परिस्थिती पाहून त्याच्या घरातील टापटीपपणा समजतो.*

***घर ना दार देवळी बिऱ्हाड*** - *घरदार, बायको, मुलेबाळे, नसलेला एकुलता एक प्राणी.*

***घरासारखा पाहुणा होतो, पण पाहुण्यासारखे घर होत नाही*** - *पाहुण्याला घरच्यांच्या चालीरीती स्वीकाराव्या लागतात. घरच्याना पाहुण्याच्या चालीरीती स्वीकाराव्या लागत नाहीत.*

***घर सारव तर म्हणे कोनाडे किती ?*** - *आपल्याला दिलेले काम सोडून भलत्याच गोष्टीची विचारपूस करणे.*

***घुसळती पेक्षा उकळतीच्या घरी अधिक*** - *कष्ट करून पोट भरणाऱ्या माणसांपेक्षा दुसऱ्यांना लुबाडणारी माणसेच अधिक चैन करतात*

***घोडा मैदान जवळ आहे*** - *परीक्षेची वेळ जवळ आलेली आहे.*

***घोडे खाई भाडे*** - *घोड्याच्या भाड्याचे पैसे घोड्याच्या गवतासाठी जातात, फायदा काहीच नाही. तसेच फायदा नसलेला धंदा करण्यात अर्थ नाही.*

***चढेल तो पडेल आणि पोहेल तो बुडेल*** - *आपल्या उत्कर्षासाठी धडपड करीत असता कधी अपयश आले तर कमीपणा वाटण्याचे कारण नाही.*

***चार दिवस सासूचे आणि चार दिवस सुनेचे*** - *प्रत्येकाला केव्हा ना केव्हातरी अनुकूल परिस्थिती प्राप्त होतेच.*

***चालत्या गाडीला खीळ घालणे*** - *व्यवस्थित चाललेल्या कामात अडथळा निर्माण करणे.*

***चावडीवर दरवडा*** - *ज्याला लोकांचे संरक्षण करावयाचे आहे त्याला स्वतःचेच रक्षण करता येत नाही.*

***चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा*** - *जशास तसे या रीतीने वागावे.*

***चुकला फकीर मशिदीत सापडायचा*** - *एखाद्याचे नेहमी जाण्यायेण्याचे ठिकाण.*

***चोराचे पाऊल चोर जाणे*** - *(चोराची पावले चोरांस ठाऊक) - चोरांची दुष्कृत्ये चोरानाच माहीत असतात.*

***चोराच्या वाटा चोराला ठाऊक*** - *चोराचे पाऊल चोर जाणे. चोरांची कृत्ये चोरांसच माहीत असतात.*

***चोराच्या मनात चांदणे*** - *जो कोणी दुष्कर्म करतो त्याला ते उघडकीस येईल अशी सारखी भीती वाटत असते.*

***चोराच्या उलट्या बोंबा*** - *स्वतः गुन्हा करून पुन्हा स्वतःच दुसऱ्यांच्या नावाने आरडा ओरड करणे.*

***चोरावर मोर*** - *चोरापासूनच चोरी करणारा सवाई चोर.*

***चोराच्या हातची लंगोटी*** - *ज्याच्याकडून काहीही मिळण्याची आशा नसते त्याच्याकडूनच काही मिळणे म्हणजे सुदैव.*

***चोराला सोडून संन्याशाला सुळी देणे (फाशी देणे)*** - *खऱ्या अपराधी माणसाला सोडून निरपराधी माणसाला शिक्षा करणे.*

***छडी लागे छम्छम् विद्या येई घम्घम्*** - *शिक्षा केल्याने मुले अभ्यास करतात अशी जुन्या लोकांची समजून होती.*

***जनी जनार्दन*** - *समाजाला जे प्रिय असते तेच परमेश्वरालाही प्रिय असते, बहुसंख्य लोकांचे म्हणणेच खरे मानावे.*

***जन्माला आला हेला, पाणी वाहता मेला*** - *बुद्धीच नसलेल्या माणसांच्या हातून कोणतेही काम धड होऊ शकत नसल्याने त्यांचा जन्म वाया जातो.*

***जगी सर्व सुखी असा कोण आहे ?*** - *आपल्याला सर्व सुखे मिळणे अशक्य, त्यामुळे जे मिळते त्यातच सामाधान मानले पाहिजे.*

***जळते घर भाड्याने कोण घेतो ?*** - *जी वस्तू स्वीकारल्याने आपले नुकसान होते हे स्पष्ट दिसत असता ती कोण स्वीकारील ?*

***जळात (पाण्यात) राहून माशांशी वैर*** - *ज्यांच्या सहवासात आपल्याला राहावयाचे आहे तेथे सलोख्याने राहावे, द्वेश निर्माण होईल असे काही करू नये.*

***जशी देणावळ तशी धुणावळ (दाम तसे काम)*** - *पैसे जास्त दिले तर कामही चांगले होते.*

***जन्मा घाली तो भाकर देईच*** - *जो आपल्याला जन्माला घालतो, तो आपल्या पालन पोषणाची जबाबदारी घेतोच.*

***जळत्या घराचा पोळता वासा*** - *मोठ्या संकटात सापडलेल्या व्यक्तीकडून शक्य तेवढी मदत करून घेणे ही वृत्ती, त्याने सुद्धा त्याला दिलासा मिळतो.*

***जानवे घातल्याने ब्राह्मण होत नाही*** - *बाह्योपचारांनी अंगी गूण येत नाही.*

***ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी*** - *आपणावर जो उपकार करतो त्याच्याशी इमानदारीने वागावे, त्याच्याशी बेइमान होऊ नये.*

***जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे*** - *कोणत्याही गोष्टीची स्वतः अनुभव घेतल्याशिवाय त्याची पूर्ण कल्पना येत नाही.*

***ज्या गावाच्या बोरी त्याच गावच्या बाभळी*** - *एकाच ठिकाणचे लोक एकमेकांना पक्के ओळखून असतात.*

***ज्याचे करावे बरे तो म्हणतो माझेच खरे*** - *भलेपणा सर्वत्र कामाला येत नाही. कोणाचे चांगले केले तर तोच आपल्यावर उलटण्याची शक्यता असते.*

***ज्याचे कुडे त्याचे पुढे*** - *दुसऱ्यांचे वाईट करायला जो जातो त्याचेच वाईट होते.*

***ज्याचे मन त्याला ग्वाही देते*** - *ज्याने पाप केले असेल त्याचेच मन त्याला खात असते.*

***ज्याचे पोट दुखेल तो ओवा मागेल*** - *जो स्वतः दुःखी असतो, तोच ते दुःख नाहीसे करण्याचा प्रयत्न करतो.*

***ज्याच्या हाती ससा तो पारधी*** - *एकाचे कृत्य ते दुसऱ्याच्या नावावर खपविणे.*

***जाईल तेथे हत्ती, नाही तेथे मुंगी सुद्धा जाणार नाही*** - *काही ठिकाणी कारण नसताना अधिक खर्च होतो, पण काही ठिकाणी अगदी क्षुल्लक गोष्टीतही काटकसर केली जाते.*

***ज्याच्या मनगटात जोर तो बळी*** - *मनगटाचे बळ पैशाच्या किंवा अधिकाराच्या बळापेक्षा श्रेष्ठ असते.*

***जी खोड बाळा ती जन्मकाळा*** - *बाळपणी लागलेल्या सवयी जन्मभर टिकतात.*

***जित्याची खोड मेल्यावाचून जात नाही*** - *एखाद्याला वाईट सवय लागली तर ती मरे पर्यंत जाणे अशक्य असते.*

***जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी*** - *मुलांचा सांभाळ करणारी माताच जगाचा उद्धार करू शकते.*

***जेनुं काम तेनु थाय बोजा करे सो गोता खाय*** - *ज्याचे काम आहे ते त्यानेच केले पाहिजे, दुसऱ्याने ते काम केले तर नुकसान होण्याची शक्यता असते.*

***झाकली मूठ सव्वा लाखाची*** - *आपली परिस्थिती गुप्त असे पर्यंतच आपली प्रतिष्ठा राहते.*

***टाकीचे घाव सोसल्या विना देवपण येत नाही*** - *कष्ट केल्याशिवाय मोठेपणा मिळत नाही.*

***टिटवी देखील समुद्र आटविते*** - *अशक्य गोष्ट दीर्घ परिश्रमाने शक्य होऊ शकते. क्षुल्लक माणूस सुद्धा परिश्रम करून पराक्रमाची कामे करू शकतो.*

***डोळ्यात केर आणि कानात फुंकर*** - *रोगाला अनुसरून उपाय न करता भलतेच उपाय करीत राहणे.*

***डोळे पापी*** - *डोळ्याआड कितीही वाईट गोष्टी झाल्या तरी चालतात, पण डोळ्यादेखत एखादी क्षुल्लक चूक झाली तरी ती आपल्याला खपत नाही.*

***डोळा तर फुटू नये आणि काडी तर मोडू नये*** - *आपले वर्तन प्रामाणिकपणाचे असावे, पण त्याचा गर्वही करू नये, त्याबरोबरच स्वतःला कोणापुढे वाकण्याचा प्रसंगही येऊ देऊ नये.*

***डोंगर पोखरून उंदीर काढणे*** - *डोंगरा एवढे (खूप) कष्ट करून लहानसा मोबदला मिळणे.*

***डोंगराचे आवळे व सागराचे (समुद्राचे) मीठ (लोणचे घालताना)***- *दोन असंभवनीय गोष्टी सुद्धा कधी कधी घडू शकतात.*

***डोळ्यापुढे काजवे दिसणे*** - *खूप भीती वाटणे, त्रास होणे.*

***डोळ्यावर कातडे ओढणे*** - *जाणून बुजून दुर्लक्ष करणे.*

***ढवळ्याशेजारी पोवळा बांधला, वाण नाही पण गुण लागला*** - *संगतीमुळे चांगल्यापेक्षा वाईट गोष्टींचा परिणाम लवकर होतो.*

***तळे राखी तो पाणी चाखी*** - *ज्याच्याकडे एखादे काम सोपविले तर तो त्यातून थोडा तरी फायदा करून घेतल्या शिवाय राहत नाही.*

***ताटात काय नि द्रोणात काय!*** - *एकाच हित संबंधातील माणसांचा लाभ एकच*

***ताटात सांडले काय आणि वाटीत सांडले काय एकच*** - *एकाच हित संबंधातील माणसांचा लाभ एकच*

***तहान लागल्यावर विहीर खणणे*** - *दूरदृष्टी नसणे, आयत्यावेळी कोणतीही गोष्ट होत नसते.*

***ताकाला जाऊन भांडे लपविणे*** - *मनातील हेतू स्पष्ट न करता आढेवेढे घेऊन नंतर सांगणे.*

***ताकापुरते रामायण*** - *आपले काम होईपर्यंतच दुसऱ्याला खुष करणे.*

***तण खाई धन*** - *वरवर क्षुल्लक दिसणारी गोष्ट पुढे घातक ठरू शकते.*

***ता म्हणता ताकभात समजावा*** - *थोड्याशा सांगण्यावरून सर्व गोष्टी अंदाजाने समजावून घेणे.*

***तापल्या तव्यावर भाकरी (पोळी) भाजून घ्यावी*** - *संधीचा लाभ उठविणे.*

***ताटावरचे पाटावर, पाटावरचे ताटावर*** - *श्रीमंताच्या बायकांचा डौल व त्यामुळे आळस.*

***तीथ आहे तर भट नाही, भट आहे तर तीथ नाही*** - *दोन आवश्यक गोष्टी पैकी एक अनुकूल असल्यास दूसरी नसणे.*

***तुला फें तुझ्या बापाला फें*** - *दोघांची ही पर्वा न करणे.*

***तुम्ही आम्ही एक, कंठाळीला मेख*** - *महत्त्वाच्या गोष्टी सोडून एरव्ही सगळे सारखेच (एकच). (तोंड बंद केलेल्या पिशवीला मात्र हात लावायचां नाही.)*

***तुरूत दान महापुण्य*** - *योग्य वेळी दानधर्म करणे किंवा देवाण घेवाण करणे केव्हाही चांगले. (तुरूत-त्वरीत)*

***तेरड्याचा रंग तीन दिवस*** - *एखाद्या दुष्ट माणसाने चांगुलपणा दाखवला किंवा कोणी पोकळ श्रीमंतीचा भपका दाखवला तर तो फार काळ टिकत नाही.*

***तेल गेले, तूप गेले, हाती राहिले धुपाटणे*** - *स्वताःच्या मुर्खपणामुळे दोन्ही कडून नुकसान होते व हाती काहीच राहत नाही.*

***तो पाप देणार नाही, तर पुण्य कोठून देणार?*** - *एखादी वाईट गोष्ट सुद्धा दुसऱ्याना न देणारा कंजूस माणूस चांगली गोष्ट कोठून देणार?*

***तोबाऱ्याला पुढे, लगामाला मागे*** - *(चुकारपणा करणे), खाण्यात पुढे, पण कामात मागे.*

***तोंड धरून बुक्क्यांचा मार*** - *स्वतःचा अपराध असूनही दुसऱ्याला विनाकरण शिक्षा करून त्यासाठी त्याला तक्रारही करू न देणे.*

***तोंड करी बाता, ढुंगण खाई लाथा*** - *एखादा मनुष्य स्वतःचे फार कौतुक करून घेतो, पण त्याची खरी योग्यता मात्र लाथा खाण्याचीच असते.*

***तीर्थी गेल्या वाचून मुंडन होत नाही*** - *काहीतरी कष्ट केल्यावाचून फळ मिळत नाही. श्रम केल्याशिवाय विद्या येत नाही.*

***तीळ खाऊन*** *व्रत* ***मोडणे*** - *एखादा क्षुल्लक फायदा होणार म्हणून अयोग्य काम करणे.*

***तळहातास केस आले नाहीत*** - *अजून काम करण्याची अंगात धमक असणे.*

***ताज्या घोड्यावरच्या गोमाशा*** - *जोपर्यंत एखाद्याची भरभराट असते तोपर्यंतच त्याच्यापुढे स्तुती करणारेच लोक जास्त असतात.*

***थेंबे थेंबे तळे साचे*** - *हळूहळू संचय करणे.*

***थोरा घरचे श्वान त्याला सर्व देती मान*** - *मोठ्या माणसांच्या आश्रयाचा प्रभावही मोठा असतो.*

***दगडाचा देव होत नाही*** - *अंगी कर्तृत्व नसल्यास मोठेपणा मिळत नाही.*

***दगडावरची रेघ*** - *खात्रीची गोष्ट.*

***दगडापेक्षा वीट मऊ*** - *निरूपाय म्हणून मोठ्या संकटापेक्षा लहान संकट कमी नुकसानीचे म्हणून स्वीकारणे.*

***दगडाचे नाव धोंडा आणि धोंड्याचे नाव दगड*** - *दगड म्हणा किंवा धोंडा म्हणा एक गोष्ट स्पष्ट आहे की ती वस्तू एकच आहे, वाटाघाटी करण्याचे काही कारण नाही.*

***दसकी लकडी एक का बोजा*** - *प्रत्येक माणसाने थोडातरी हातभार लावला तरी सगळ्यांच्या सहकार्याने एखादे मोठे कार्य होऊ शकते.*

***दगडाचे पेव घालता खळखळ, काढता खळखळ*** - *निरुपयोगी वस्तूसाठी त्रास करून घेणे योग्य नाही.*

***दृष्टीआड सृष्टी*** - *आपल्या मागे काय चालले आहे ते दिसत नाही म्हणून दुर्लक्ष करणे.*

***दाम करी काम, बिबी करी सलाम*** - *पैसा आहे तर मान आहे, पैशाने खूपशी कामे पार पाडता येतात.*

***दांड्याने पाणी तोडले म्हणून निराळे होत नाही*** - *लोकांनी कितीही प्रयत्न केला तरी खरे मित्र वेगळे होऊ शकत नाहीत.*

***दात कोरून कोठे पोट भरत असते ?*** - *मोठ मोठ्या व्यवहारात लहानशा काटकसरीचा कधी उपयोग होतो ?*

***दात आहेत तर चणे नाहीत, चणे आहेत तर दात नाहीत*** - *एक गोष्ट अनुकूल असली तर तिचा उपयोग करून घेण्यास आवश्यक असलेली दुसरी गोष्ट नसते.*

***द्यावे तसे घ्यावे, करावे तसे भोगावे*** - *आपण चांगले काम केल्यास फळ ही चांगले मिळते.*

***दिवस बुडाला, मजूर उडाला*** - *दुसऱ्यांच्या कामाबद्दल कळकळ नसली म्हणजे ते काम यशस्वी होऊ शकत नाही (मनापासून काम न करणारा मनुष्य).*

***दिल में चंगा कथौटी में गंगा*** - *आपले मन निर्मळ असल्यास आपल्या जवळ पवित्र गंगा असल्याप्रमाणेच होय.*

***दिव्याखाली अंधार*** - *दिवा दुसऱ्याना उजेड देत असला तरी त्याच्याखाली अंधारच असतो, तसेच चांगल्या माणसात सुद्धा एखादा दोष असू शकतो.*

***दगडाखाली हात सापडणे*** *- अडचणीत असणे.*

***दाणे टाकून कोंबडे झुंजविणे*** *- मुद्दाम स्वतःचे पैसे खर्च करून दुसऱ्यांचे भांडण लावून देणे.*

***द्राविडी प्राणायाम*** *- सोपे असलेले काम कठीण करून करणे.*

***दुधाने तोंड भाजले, तो ताक सुद्धा फुंकून पितो*** *- एकदा अद्दल घडल्यावर मनुष्य अगदी साध्या गोष्टीत सुद्धा काळजी घेतो.*

***दुरून डोंगर साजरे*** *- अडचणीची गोष्ट लांबून सोपी वाटते, पण प्रत्यक्ष करायला गेल्यास त्यातील अडचणी कळून येतात.*

***दिल्ली तो बहुत दूर है*** *- नसत्या गोष्टींची व्यर्थ चिंता करू नये.*

***दुष्काळात तेरावा महिना*** *- संकटात सापडलेल्या माणसावर आणखीन एका संकटाची भर पडणे.*

***दुनिया झुकती है, झुकाने वाला चाहिए*** *- नादी लावणारा समर्थ असला तर नादाला लागणारे खूप.*

***दुभत्या गाईच्या लाथा गोड*** *- आपल्याला ज्याच्यापासून फायदा होतो, त्याने आपला कितीही तिरस्कार केला तरी तो मुकाट्याने सोसणे.*

***दुसऱ्याच्या डोळ्यात भसकिनी बोट शिरते*** *- दुसऱ्यांच्या दोषांवर टीका करावयास मनुष्य नेहमी तयार असतो.*

***दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसते, पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही*** *- दुसऱ्यांची क्षुल्लक चूक असली तरी ती दिसते, पण स्वतःच्या अंगी असलेला मोठा दोष दिसत नाही.*

***दुधात साखर*** *- चांगल्या गोष्टी घडलेल्या असताना आणखीन चांगल्या गोष्टीची भर पडणे.*

***देखल्या देवा दंडवत*** *- समोर दिसले म्हणून केलेले काम मनापासून होत नाही.*

***दे माय धरणी ठाय*** *- अतिशय त्रास होणे.*

***देणे नास्ति, घेणे नास्ति*** *- देण्याघेण्याचा कोणताही व्यवहार न करणे.*

***देश तसा वेश*** *- परिस्थितीप्रमाणे वागण्यास शिकले पाहिजे.*

***देह त्यागिता कीर्ती मागे उरावी*** *- एखाद्याचे मरणानंतर देह नष्ट होतो, पण त्याने केलेल्या चांगल्या गोष्टीची मात्र कायम लोकांच्या मनात आठवण राहते.*

***दैव देते पण कर्म नेते*** *- सुदैवाने एखादी गोष्ट लाभते, पण स्वतःच्या कृत्यामुळे नुकसानही होऊ शकते.*

***देव कराया दोन डोया, किडवळ कराया तीन डोया*** *- एखाद्याचे चांगले करायला जितका वेळ लागतो, त्याच्यापेक्षा त्याचे वाईट करायला जास्त वेळ लागतो.*

***दोन्ही घरचा पाहुणा उपाशी*** *- दोघांच्या आधारावर अवलंबून असणारा माणूस नेहमी फसतो.*

***दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी*** *- जवळ असलेल्या गोष्टी सहज उपलब्ध न होणे.*

***धर्म करता कर्म उभे राहते*** *- दुसऱ्यावर उपकार करावयास जाऊन स्वतःवरच संकट ओढवून घेणे.*

***धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा*** *- एखाद्या वस्तूवर ज्याचा हक्क आहे, ती वस्तू त्याला न मिळता भलत्याच माणसाला मिळणे किंवा त्याचा उपभोग होणे.*

***धर्माचे गाई आणि दात कामे नाही*** *- फुकट मिळालेल्या वस्तूला कधीही नावे ठेऊ नये.*

***धर्मावर सोमवार सोडणे*** *- स्वतः काही नुकसान न सोसता परस्पर गोष्टी भागविणे.*

***नव्याचे नऊ दिवस*** *- नवीन वस्तूचे आकर्षण थोडेच दिवस टिकते. (नव्याची नवलाई)*

***न कर्त्याचा वार शनिवार*** *- एखादे काम मनापासून करायचे नसले की कोणते तरी क्षुल्लक कारण सांगून ते काम टाळणे.*

***नवरा मरो की नवरी मरो, उपाध्यायाला दक्षिणेशी कारण*** *- पुढे बरे वाईट कोणते ही परिणाम होवोत तुर्त स्वार्थाचाच विचार करावयाचा.*

***नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने*** *- दोषाने युक्त असलेले काम करीत असता एकामागून एक अशा अनेक संकटाना तोंड द्यावे लागते.*

***नकटे व्हावे पर धाकटे होऊ नये*** *- लहानाला सर्व सोसावे लागते. व्यंग असले तरी बरे, लहानपण त्याहून वाईट. परिस्थितीशी जुळवून घ्यावे पण लाचार होऊ नये.*

***न खात्या देवाला नैवेद्य*** *- जो काही घेणार नाही याची खात्री आहे त्यालाच देण्याचा आग्रह करणे.*

***नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ पाहू नये*** *- पूज्यपणा किंवा पवित्रता ह्या सर्व गोष्टी एखाद्याच्या पूर्व परंपरेवर अवलंबून नसून त्याच्या अंगच्या गुणावर किंवा चारित्र्यावर अवलंबून असतात.*

***नखाने काम होते, तेथे कुऱ्हाड कशाला ?*** *- एखादे काम क्षुल्लक साधनाने किंवा थोडीशी शक्ती वापरल्याने होऊ शकते, तेथे मोठे साधन किंवा पुष्कळ शक्ती वापरण्याचे कारण काय?*

***नवी विटी नवे राज्य*** *- सगळीच परिस्थिती नवीन असणे.*

***नरहरदेवाची पालखी*** *- ज्यावर कोणा एकाची सत्ता नसते किंवा एकावर जवाबदारी नसते, पण सर्वानी हातभार लावल्यास ते काम पूर्ण होण्यासारखे असते. लोकांच्या मर्जीनुसार घडणारे काम.*

***नाक दाबले म्हणजे तोंड उघडते*** *- एखाद्याला पेचात अडकविल्या शिवाय तो आपले काम करून देणार नाही किंवा आपले म्हणणे कबूल करणार नाही.*

***नावडतीचे मीठ अळणी*** *- नावडत्या माणसाने कोणतीही गोष्ट कितीही चांगली केली तरी ती वाईटच दिसते.*

***नासली मिरी जोंधळ्याला हार जात नाहीत*** *- कर्तृत्ववान मनुष्य परिस्थितीने कितीही खालावला तरीही नादान माणसापेक्षाही अधिक योग्यतेचा असू शकतो.*

***नाचता येईना अंगण वाकडे*** *- आपल्याला एखादे काम येत नसल्यास स्वतःचा कमीपणा लपविण्यासाठी संबंधीत दुसऱ्या गोष्टीतील दोष दाखविणे.*

***नाव मोठे लक्षण खोटे*** *- कीर्ती मोठी असली तरी, कृती मात्र नावाला खोटेपणा आणणारी.*

***नाका पेक्षा मोती जड*** *- एखाद्या गौण वस्तूला मुख्य वस्तूपेक्षा अधिक महत्त्व द्यावयाचे.*

***नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा*** *- नाव मोठे पण कर्तृत्व मात्र हलक्या दर्जाचे.*

***नालासाठी घोडा मेला*** *- लहानशी चूक वेळेवर सुधारली नाही तर पुढे त्याच चुकीमुळे खूप मोठे नुकसान होऊ शकते.*

***नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणे*** *- एकाला लुबाडून आणलेल्या पैशाने दुसऱ्याला खुष करणे.*

***नाकाने कांदे किंवा वांगी सोलणे*** *- ऐट मिरवणे, वाईट कर्मे करूनही न केल्याचा आव आणणे.*

***न भूतो न भविष्यति*** *- पूर्वी कधी झाली नाही व पुढेही कधी होणार नाही अशी अपूर्व गोष्ट.*

***न ही ज्ञानेनं सदृश्यं पवित्रमिह विद्यते*** *- ज्ञानसारखे पवित्र अशी दुसरी गोष्ट नाही.*

***पळसाला पाने तीनच*** *- सगळीकडे सारखीच परिस्थिती असते.*

***पडलेले शेण माती घेऊन उठते*** *- चांगल्या मनुष्यावर एखादा आरोप आला, आणि त्याने सर्वांशी विचार विनिमय करून त्याचे निरसन केले, तरी त्याची थोही तरी बदनामी होतेच.*

***परदुःख शीतल*** *- दुसऱ्यांच्या दुःखाची खरी कल्पना लोकांना नसते म्हणून त्यांना त्या दुःखाची तीव्रता जाणवत नाही.*

***पळणाऱ्यास एक वाट, शेधणाऱ्यास बारा वाटा*** *- लबाडी करणे सोपे असते. पण ती शोधून काढणे कठीण असते.*

***पडत्या फळाची आज्ञा*** *- तात्काल मान्यता देणे.*

***पदरी पडले, पवित्र झाले*** *- कोणतीही गोष्ट एकदा स्वीकारली की तिला नावे न ठेवता तिच्या बाबतीत समाधान मानावे.*

***परसातली भाजी*** *- श्रम न करता सहजपणे मिळणारी गोष्ट.*

***पंढरीची वारी*** *- सामान्यपणे वारंवार होणारी खेप.*

***पराय घरपर लक्ष्मी नारायण*** *- (आइजीच्या जिवावर बाइजी उदार) दुसऱ्यांच्या जिवावर गंमत करणारा.*

***प्रथमग्रासे मक्षिकापातः*** *- स्वतःच्या मनाप्रमाणे एखादे कार्य करायला जात असतानाच विघ्न येऊन कार्य पूर्ण न होणे.*

***पंचप्राणाची आरती ओवाळणे*** *- एखादे काम अगदी मनापासून करणे. (मनांतील सर्व भावनेने आरती ओवाळणे).*

***पाचामुखी परमेश्वर*** *- अनेक लोक सांगतात तेच खरे मानावे.*

***पालथ्या घड्यावर पाणी*** *- एखाद्याला कितीही उपदेश केला तरी त्याचा उपयोग न होणे.*

***पाद्र्याला पावट्याचे निमित्त*** *- एखादा मनुष्य आपल्या वर्तनाला निमित्तच शोधू लागला, तर ते त्याला कोठे ही सापडू शकेल.*

***पायातली वहाण पायात बरी*** *- प्रत्येकाला त्याच्या दर्जेप्रमाणेच वागवावे.*

***पाचही बोटे सारखी नसतात*** *- कोणतीही एक गोष्ट दुसऱ्या गोष्टी सारखी असू शकत नाही. सर्व माणसे सारख्या स्वभावाची असू शकत नाहीत.*

***पाय धू म्हणे तोडे केवढ्याचे*** *- जे काम आपल्याला करावयाचे आहे ते सोडून भलत्या गोष्टीची उठाठेव करणे.*

***पाण्यात काठी मारली तर, - का पाणी दोन जागी होते?*** *- दृढ मैत्री क्षुल्लक कारणाने तुटते का?*

***पायाखाली मुंगी मरणार नाही*** *- अतिशय सावकाश चालणारा माणूस किंवा अत्यंत निरुपद्रवी माणूस.*

***पानी तेरां रंग कैसा ? जिसमे मिला वैसा*** *- स्वतःची अशी मते नसलेला माणूस आजुबाजूच्या मंडळींच्या मतानुसार किंवा परिस्थितीनुसार आपले मत बदलत असतो.*

***पाठीवर मारा, पोटावर मारू नका*** *- शारीरिक शिक्षा करवी, पण पोटापाण्याचे कमी करू नये.*

***पिंडी ते ब्रह्मांडी*** *- आपल्यावरून जग ओळखावे.*

***पिशाचाच्या हातात कोलीत*** *- (आधीच मर्कट तशातही मद्य प्याला). वाईट माणसांच्या हातात वाईट काम करावयास दिले तर ते वाईटच होणार.*

***पी हळद, हो गोरी*** *- कोणत्याही बाबतीत उतावळेपणा करू नये.*

***पुढच्याला ठेच मागचा शहाणा*** *- दुसऱ्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन मनुष्य स्वतः शहाणा होतो व सावधगिरीने वागतो.*

***पुढे पाठ मागे सपाट*** *- पुढचे धडे शिकत असता मागच्या धड्यातील महत्त्वाच्या गोष्टी विसरणे.*

***पुराणातली वांगी पुराणात*** *- जुने रीतीरिवाज आज उपयोगी पडतीलच असे नाही. उपदेश तिथेच राहतो. मनुष्य स्वतःच्या लहरीप्रमाणे वागू लागतो.*

***पुनरपि जननं पुनरपि मरणं*** *- जन्म मृत्यूचा फेरा नेहमी चालूच असतो. तसेच एखादी गोष्ट (चूक) पुन्हा पुन्हा करणे व तिच्या बद्दल शिक्षा भोगणे.*

***पूर्वेचा सूर्य पश्चिमेला उगवेल*** - *जी अशक्य गोष्ट असते ती सुद्धा शक्य होऊ शकते.*

***पुढे तिखट मागे पोचट*** - *आरंभी मोठ्या बढाया मारणारा माणूस मागून कृतीच्या वेळी माघार घेतो.*

***पैजेचा विडा उचलणे*** - *प्रतिज्ञा करणे.*

***पैठणी आदर - प्रेम - आग्रह*** - *पोकळ आदर, वरवर दाखविलेला आदर किंवा प्रेम.*

***पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा*** - *थोडेसे देऊन त्याबद्दल खूप काम करून घेणे.*

***पोटात एक ओठात एक*** - *लबाड माणसांचे विचार अनेक असतात. त्यांच्या मनात एक असते व बोलतात दुसरेच.*

***पोटात धोंडा उभा राहणे*** - *अतिशय भीती वाटणे.*

***पोटचे द्यावे पण पाठचे देऊ नये*** - *शरण आलेल्या माणसाला स्वतःचे मूल द्यावे पण भावडं देऊ नये. ज्यावर आपली सत्ता आहे त्याचाच वापर करावा.*

***पोट पाठीस लागलेच आहे*** - *पोटाला मिळविण्यासाठी सर्वांनाच उद्योग करावा लागतो.*

***फार झाले, हसू आले*** - *कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला तर तिची सवय पडून पुढे काही वाटेनासे होते.*

***फासा पडेल तो डाव, राजा बोलेल तो न्याव*** - *राजाने दिलेला न्याय सत्याच्या व प्रजाहिताच्या उलट असला, तरी तो नाइलाज म्हणून पत्करावा लागतो.*

***फुटका डोळा काजळाने साजरा करावा*** - *आपल्या अंगी असलेला दोष नाहीसा करणे शक्य नसेल तर त्याचा शक्य होईल तितका उपयोग करून घ्यावा.*

***फुले विकली तेथे गोवऱ्या विकणे*** - *ज्या ठिकाणी मोठ्या प्रतिष्ठेने दिवस घालविले, त्याच ठिकाणी हलकी सलकी कामे करण्याचा प्रसंग येणे.*

***फूल ना फुलाची पाकळी*** - *जितके आपल्याला द्यायला पाहिजे तितके देणे जमत नसल्यास शक्य आहे तेवढेच देणे.*

***फासा सोईचा पडणे*** - *अनुकूल गोष्ट घडणे.*

***फासा उलटा पडणे*** - *प्रतिकूल गोष्ट घडणे.*

***बळी तो कानपिळी*** - *ज्या मनुष्याच्या अंगी पैशाचे, अधिकाराचे, वशिल्याचे व शक्तीचे बळ असते, तो इतराना छळतो किंवा त्यांच्यावर सत्ता चालवितो.*

***बसता लाथ उठता बुक्की*** - *नेहमी शिक्षा करीत असणे.*

***बडा घर पोकळ वासा*** - *(नाव मोठे लक्षण खोटे)- दिसण्यात श्रीमंती. पण प्रत्यक्षात काही नसते.*

***बडे बापके बेटे*** - *बापाच्या मोठेपणावर डौल मिरविणारी मुले.*

***बारभाईची खेती, काय लागेल हाती*** - *अनेक लोकांवर सोपविलेली जबाबदारी कोणीच नीट पार पाडू शकत नाहीत.*

***बापसे बेटा सवाई*** - *वडिलांपेक्षा मुलगा अधिक कर्तबगार.*

***बाप तसा बेटा*** - *जे वडिलांच्या अंगी चांगले किंवा वाईट गुण असतील ते मुलाच्या अंगी उतरणे, (वडील तसा मुलगा).*

***बावळी मुद्रा देवळी निद्रा*** - *एखादा माणूस दिसायला बावळट असला तरी व्यवहारात तो चतुर असतो.*

***बापाला बाप म्हणेना, तर चुलत्याला काका कसा म्हणेल ?*** - *जो मनुष्य जवळच्या नातेवाईकांना ओळखू शकत नाही, तो दूरच्यांना कसा ओळखेल?*

***बापशेटीची पेंड (बापशेट श्रीमंत व उदार गृहस्थ)*** - *ज्यांना पाहिजे त्यांनी ती वस्तू नेणे.*

***बाबया गेला आणि दशम्याही गेल्या*** - *दोन्ही गोष्टी मिळण्यासारख्या नाहीत.*

***बाबा वाक्यम् प्रमाणम्*** - *वडिलांचा शब्द हाच आधार किंवा प्रमाण.*

***बाप दाखव, नाहीतर श्राद्ध कर*** - *एखाद्याला हरलो असे कबूल करायला लावून स्वतःचे मत त्याच्यावर लादणे व त्याला अडचणीत घालणे.*

***बाबूके भाई दरवेशी*** - *कंगाल*

***बायकात पुरूष लांबोडा*** - *बायकांच्या घोळक्यात पुरुषानी जाणे योग्य नसते.*

***बाजारात तुरी भट भटणीला मारी*** - *जी गोष्ट अजून घडायचीच आहे तिच्याबद्दल अगोदरच व्यर्थ वाद घालीत बसणे योग्य नाही.*

***बाजीरावाचा नातू*** - *मिजासखोर माणूस.*

***बारा पिंपळावरचा मुंजा*** - *एके ठिकाणी स्थिर न होणारा व सदा हिंडत असणारा माणूस.*

***बारा बंदराचे पाणी प्यालेला*** - *अनुभविक माणूस, अनेक देश फिरून चतुर बनलेला.*

***बारा घरचे बारा*** - *भिन्न भिन्न स्थळांचे व भिन्न भिन्न अनुभवाचे लोक काही कार्याकरिता एके ठिकाणी जमतात ते.*

***बुडत्याचा पाय खोलात*** - *ज्याचा अपकर्ष (उत्कर्ष X अपकर्ष) व्हायचा असतो त्याला सतत एकामागून एक अशा येणाऱ्या संकटाना तोंड द्यावे लागते.*

***बुगड्या गेल्या, पण भोके राहिली*** - *एखाद्याचे पूर्वीचे वैभव गेले तरी त्याच्या खुणा मागे राहिल्या.*

***बुडत्याला काडीचा आधार*** - *मोठ्या संकटात सापडलेल्या माणसाला वेळप्रसंगी कोणी थोडीशी मदत केली तरी त्याला महत्त्व असते*

***बुढ्ढी घोडी लाल लगाम*** - *अशोभनीय वर्तन करणे.*

***बुंदसे गई सो हौद से नही आती*** - *थोडक्यात बिघडलेली एखादी गोष्ट पुन्हा कितीही प्रयत्न केले तरी आपण सुधारू शकत नाही.*

***बैल गेला नि झोपा केला*** - *एखादी गोष्ट होऊन गेल्यावर तिचे निवारण करण्यासाठी केलेली व्यवस्था व्यर्थ ठरते.*

***बैल गाभणा तर म्हणे नववा महिना*** - *एखाद्या माणसाकडून कार्य करवून घ्यायचे असेल तर तो कितीही वेडेपणाचे बोलला तरी त्याला खुष करण्यासाठी 'हो' म्हणावयाचे.*

***बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले*** - *आपल्या बोलण्याप्रमाणे जो वागतो त्या माणसाला मान दिला पाहिजे.*

***बोलेल तो करील काय*** - *बडबड करणाऱ्या माणसाकडून कोणतीही गोष्ट होऊ शकेल काय?*

***बोलाफुलास गाठ*** - *आपण एखाद्या गोष्टीविषयी बोलत असतानाच ती घडणे. म्हणजेच एकाच वेळी दोन्ही गोष्टी घडणे.*

***बोलणाऱ्याचे तोंड दिसते, करणाऱ्याची कृती मात्र कोणाला दिसत नाही*** - *रागावणाऱ्या माणसाचे शब्द सर्वांना ऐकू येतात, पण ज्याला रागवतो त्याने केलेली चूक किंवा कृती मात्र कोणाला दिसत नाही.*

***बोलाचीच कढी व बोलचाच भात*** - *नुसतीच बडबड. कृती मात्र काहीच नसते.*

***बिगारीचे घोडे, तरवडाचा फोक*** - *(बिगार-पैसे न देता करून घेतलेले काम) (तरवड-झाड, फोक-सरळ फांदी) - दुसऱ्यांच्या वस्तूची काळजी सहसा कोणी घेत नाही.*

***भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी*** - *मागणाऱ्या मनुष्याला एखादी वस्तू दिली तर तो तृप्त न होता जास्तच मागत असतो.*

***भरवशाच्या म्हशीस टोणगा*** - *ज्याच्यावर आपण अवलंबून असतो त्याने आयत्या वेळी दगा देणे.*

***भरल्या गाड्यास सूप जड नाही*** *- एखाद्याच्या अंगावर अनेक कामांचा बोजा असतो. त्याच्या अंगावर आणखीन थोडे काम येऊन पडले तर तो घाबरत नाही.*

***भांडणाचे तोंड काळे*** *- भांडणाचा परिणाम लाजिरवाणा असतो.*

***भाड्याचे घोडे ओझ्याने मेले*** *- स्वतःच्या वस्तूसारखी भाड्याच्या वस्तूची कोणी काळजी घेत नाही.*

***भिंतीना कान असतात*** *- दुसऱ्यानी ऐकण्याची शक्यता असते म्हणून नेहमी सावधगिरीने बोलावे.*

***भित्याच्या पाठी ब्रह्मराक्षस*** *- भित्रा माणूस भीतीचे कारण नसताना सुद्धा घाबरत असतो.*

***भिकेची हंडी शिंक्यास चढत नाही*** *- दुसऱ्यावर अवलंबून असणारा माणूस मोठे कार्य करू शकत नाही.*

***भीक नको पण कुत्रा आवर*** *- एखाद्याने उपकार केले नाही तरी चालतील, पण मार्गांत विघ्न (अडथळे) मात्र आणू नये.*

***भीड भिकेची बहीण*** *- भिडस्तपणाने माणसाचे फार नुकसान होते.*

***भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा*** *- अडचणीच्या वेळी कोणत्याही साधनाने गरज भागविण्याची माणसाची तयारी असते.*

***मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये*** *- दुसऱ्यांच्या मेहरबानीमुळे मिळालेल्या सवलतीचा दुरूपयोग करू नये.*

***मन जाणे पापा*** *- आपण पाप केले आहे की नाही, हे प्रत्येकाचे मनच स्वतःला सांगत असते.*

***मन राजा मन प्रजा*** *- कोणाचेही बरे वाईट करणे आपल्या इच्छेवर अवलंबून असते.*

***मन चिंती ते वैरी न चिंती*** *- कधी कधी आपल्या मनात जेवढ्या वाईट गोष्टी येतात तेवढ्या शत्रूच्याही मनात येत नसतील.*

***मनात मांडे पदरात धोंडे*** *- फक्त मनात मोठमोठी मनोराज्ये करायची, पण प्रत्यक्षात मात्र पदरात काही पडत नसते.*

***मनाएवढी ग्वाही त्रिभुवनात नाही*** *- मनासारखा खरे सांगणारा साक्षीदार साऱ्या दुनियेत सापडणारा नाही.*

***मनास मानेल तोच सौदा*** *- आपणास आवडेल तोच सौदा करावा. कोणी विरोध केल्यास तिथे दुर्लक्ष करावे.*

***मनी वसे ते स्वप्नी दिसे*** *- एखादी गोष्ट व्हावी असे आपल्या मनाला सारखे वाटत असते. तीच प्रबळ इच्छा आपल्या स्वप्नाच्या रूपाने पूर्ण झालेली असते.*

***मनात एक जनात एक*** *- मनात एक गोष्ट असते, पण बाहेरून निरळीच दाखविली जाते. (दुटप्पीपणा)*

***मरावे परी कीर्ती रूपी उरावे*** *- मनुष्य देहाने मरतो. पण त्याने केलेल्या चांगल्या कामाच्या रूपाने जीवंत राहतो.*

***मनाची नाही, पण जनाची तरी ठेवावी*** *- एखादी चूक केल्यावर दुसऱ्यांच्या पुढे त्याची लाज तरी वाटावी.*

***मळमळीत (मिळमिळीत) सौभाग्यापेक्षा झळझळीत वैधव्य बरे*** *- ज्या स्त्रीला नवऱ्याने टाकलेले असते तिची स्थिती एखाद्या विधवेपेक्षाही कठीण असते.*

***मस्करीची होते कुस्करी*** *- थट्टेचा परिणाम काही वेळा भयंकर होऊन त्याचे भांडणात रूपांतर होते.*

***मनात पाल चुकचुकणे*** *- शंका येणे, संशय उत्पन्न होणे.*

***मातीचे कुल्ले लावल्याने लागत नाहीत*** *- परक्या माणसाला आपला असे नुसते म्हणून तो आपला होत नाही. प्रेम स्वाभाविक असेल तरच ते टिकते.*

***माझे जेवण चुलीत-*** *बाह्यतः- निरिच्छपणा दाखविणारी माणसे कधी कधी लबाडही असू शकतात.*

***मान सांगावा जना आणि अपमान सांगावा मना*** *- आपला सन्मान झाला तर तो लोकांना सांगावा, पण अपमान झाला त्याची वाच्यता न करता मनातल्या मनांतच ठेवावा.*

***मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधावी ?*** *- एखादी दिसण्यात सोपी व करण्यास कठीण अशी गोष्ट कोणी सहसा करायला पुढे येत नाही.*

***मांजराचे पाय कुत्र्यावर करणे*** *- काहीतरी गडबड करून आपली सुटका करून घेणे.*

***मारणाऱ्याचा हात धरवतो, पण बोलणाऱ्याचे तोंड धरवत नाही*** *- एखाद्या धडधाकट माणसास आवरणे सुध्दा सोपे असते, पण मनात येईल ते वाईट असे काहीतरी बोलणाऱ्या माणसास गप्प करणे कठीण असते.*

***मागून आलेले लोण पुढे पोचविणे*** *- मागून चालत आलेल्या चालीरिती तशाच पुढे चालू ठेवणे.*

***मानला तर देव नाहीतर धोंडा*** *- एखाद्याचा मान ठेवला तर ठेवला नाहीतर नाही.*

***म्हशीची शिंगे म्हशीला जड नसतात*** *- आपलीच माणसे आपल्याला जड वाटत नाहीत.*

***म्हातारीने कोंबडे झाकून ठेवले म्हणून उजेडावयाचे राहत नाही*** *- ज्या गोष्टी व्हावयाच्या असतात त्या एखाद्या क्षुल्लक कारणाने थांबवता येत नाहीत.*

***माशाने गिळलेला माणिक*** *- कधीही भरून न येणारी हानी.*

***माळ दुसऱ्यांच्या गळ्यात घालणे*** *- आपले सर्वस्व त्याला अर्पण करणे.*

***मागुन पुढून बाप नवरा*** *- जे काही येईल ते स्वतःच घ्यावयाचे, दुसऱ्याला काही मिळू द्यावयाचे नाही अशी प्रवृत्ती असणे.*

***मिशा मूठ भर दाढी हातभर*** *- (नाकापेक्षा मोती जड) मुख्य वस्तूपेक्षा तिचे गौण अंगास जास्त महत्त्व देणे.*

***मुंगी होऊन साखर खावी, हत्ती होऊन लाकडे फोडू नये*** *- नम्रपणे वागून आपला फायदा करून घ्यावा, ताठरपणाने वागून दुःख भोगू नये.*

***मुलाचे पाय पाळण्यात दिसतात*** *- लहानपणीच मोठेपणीच्या कर्तृत्वासंबंधी किंवा गुणदोषासंबंधी अंदाज लागतो.*

***मुसळाला अंकुर फुटणे*** *- अशक्य म्हणून मानली गेलेली गोष्ट घडून येणे.*

***मूठभर मिशा हातभर दाढी*** *- एखाद्याचा एकच अवयव प्रमाणाबाहेर असतो, तेव्हा त्याच्या बेडौलपणाचा उपहास करतात.*

***मेले मेंढरू आगीला भीत नाही*** *- एखाद्याची एकदा अब्रू गेली की त्याला बेअब्रूची भीती वाटेनाशी होते.*

***मेल्या म्हशीला मणभर दूध*** *- मुनष्य जीवंत आहे तोपर्यंत त्याच्या गुणाचे चीज होत नाही. तो मरण पावला म्हणजे त्याचे ते गुण वाढवून त्याची प्रशंसा केली जाते.*

***मोर नाचतो म्हणून लांडोरही नाचते*** *- अंगी योग्य गुण असल्याशिवाय अनुकरण करणे अयोग्य.*

***यथा राजा तथा प्रजा*** *- अधिकारावरील लोक जसे वागतात, तसेच सामान्य लोकही वागतात.*

***या कानाचे त्या कानास न कळू देणे*** *- अतिशय गुप्त ठेवणे.*

***या बोटाची थुंकी त्या बोटावर करणे*** *- काहीतरी लबाडी करून वस्तूचे स्वरूप निरनिराळे करून दुसऱ्याना फसविणे.*

***येवढ्याशा तेवढ्याशावरून*** *- अगदी थोडक्याशा कारणावरुन.*

***ये रे माझ्या मागल्या, ताक कण्या चांगल्या (कण्या भाकरी चांगल्या)*** *- एखाद्याने केलेला उपदेश व्यर्थ ठरून पुन्हा पुर्वीप्रमाणेच वागणे.*

***रात्र थोडी सोंगे फार*** *- वेळ अपुरा, पण काम मात्र भरपूर.*

***राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले*** *- समर्थ माणसांच्या शब्दाला मान मिळतो, क्षुल्लक माणसाच्या शब्दाला मिळत नाही (समर्थाचे श्वान, त्याला सर्व देती मान).*

***राजाला दिवाळी काय माहीत*** - *जो मनुष्य नेहमी सुखात असतो त्याला अमकाच एक दिवस आनंदाचा असा नसतोच.*

***राज्याअंती नरक आणि नरकाअंती राज्य*** - *पापे केल्यावाचून राज्य प्राप्त होत नाही आणि राज्य चालविणे आणि टिकविणे पापे केल्याशिवाय शक्य होत नाही. म्हणून शेवटी नरकात जावे लागते.*

***रिकामा न्हावी, भिंतीला तुंबड्या लावी*** - *रिकामा उद्योग करीत बसणे.*

***रोज मरे त्याला कोण रडे*** - *रोजच संकटे येऊ लागली की त्याचे काहीच वाटेनासे होते.*

***लकडी वाचून मकडी वठणीस येत नाही*** - *व्दाड माणसाला सुधारण्यास कडकच उपाय योजावे लागतात.*

***लंकेत सोन्याच्या विटा*** - *दुसरीकडे असलेल्या फायद्याच्या गोष्टीचा आपल्याला उपयोग  नसतो. दुसऱ्यांच्या श्रीमंतीचा आपल्याला फायदा नसतो.*

***लष्कराच्या भाकरी भाजणारा*** - *निष्कारण दुसऱ्यांच्या उठाठेवी करणारा.*

***लाथ मारीन तेथे पाणी काढीन*** - *सामर्थ्यवान व हुशार मनुष्य.*

***लाज नाही मना कोणी काही म्हणा*** -*निर्लज्ज माणूस दुसऱ्यांच्या टीकेची पर्वा करीत नाही.*

***लागो भागो दिवाळी*** -  *नफा होवो या तोटा, तिकडे दुर्लक्ष करून व्यापार करणे व नशिबाची परीक्षा पाहणे.*

***लाडे लाडे केले वेडे*** - *मुलाचे फार लाड केले म्हणचे ते वेडे चाळे करू लागते.*

***लेकीस बोले सुनेस लागे*** - *एकाला उद्‌देशून पण दुसऱ्याला लागेल असे बोलणे.*

***लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण*** - *इतरांना उपदेश करायचा, आपण मात्र त्याप्रमाणे वागायचे नाही.*

***वराती मागून घोडे*** - *योग्य वेळ निघून गेल्यावर काम करणे.*

***वड्याचे तेल वांग्यावर काढणे*** - *एकावरचा राग दुसऱ्यावर काढणे.*

***वडाची साल पिंपळाला लावणे*** - *खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करून सांगणे.*

***वळचणीचे पाणी आढ्याला जात नाही*** - *हलक्या माणसाने कितीही थोर होण्याचा प्रयत्न केला तरी ते होणे शक्य नाही.*

***वासरात लंगडी गाय शहाणी*** - *अडाणी माणसात थोडासा शिकलेला माणूस ही पंडित म्हणून घेतो.*

***वाघ म्हटले तरी खातो, वाघोबा म्हटले तरी खातो*** - *एखाद्याशी उर्मटपणाने वागणे किंवा सौम्यपणाने वागणे दोन्ही सारखेच व्यर्थ ठरते.*

***वाकड्या बोटाशिवाय तूप निघत नाही*** - *सरळ मार्गाने योग्य कार्य साधत नसेल तर वक्र मार्गाचा अवलंब करावा लागतो.*

***वारा पाहून पाठ द्यावी*** - *देश, काल, वर्तमान पाहून वर्तन (वागणूक) करीत रहावे.*

***वळणाचे पाणी वळणानेच जाणार*** - *निसर्ग नियमाप्रमाणेच सर्व गोष्टी होतात.*

***वाहत्या गंगेत हात धुवून घ्यावे*** - *सर्व गोष्टींची संधी आली असता, होईल तो फायदा करून घ्यावा.*

***वाहिली ती गंगा राहिले ते तीर्थ*** - *पैसे दानधर्म केले तर पुण्यसंचय होईल, तेच आपल्याजवळ राहिले तर आपल्यालाच उपयोगी पडतील.*

***वाऱ्यावर वरात आणि दर्यावर घाला*** - *बेजबाबदारपणे काम करणे.*

***वाणला तितका घाणला*** - *एखाद्याची जितकी जास्त स्तुती करावी तितका अधिक तो बिघडण्याची शक्यता.*

***व्याप तितका संताप*** - *जितका पसारा जास्त असतो, तितकी अधीक काळजी असते.*

***विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर*** *- निश्चित निवारा नसणे, थोडासाच संसार नेहमी आपल्या बरोबर बाळगणे.*

***विटले मन आणि फुटले मोती सांधत नाहीत*** *- एखादी वस्तू आपल्याला आवडेनाशी झाली की पुन्हा आवडती होणे शक्य नसते.*

***विशी विद्या तिशी धन*** *- एखाद्या माणसाला विद्या कितपत आली याचा अंदाज वीस वर्षानंतर व पैसा कितपत कमाऊ शकेल याचा अंदाज तीस वर्षानंतर करता येतो.*

***विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणे*** *- आपल्या मागे मुद्दाम काहीतरी उपद्व्याप किंवा लचांड लावून घेऊन त्रास भोगीत बसणे.*

***व्यक्ती (मूर्ती) तितक्या प्रकृती*** *- माणसा माणसांच्या स्वभावात फरक असतो.*

***शहाण्याला शब्दांचा मार*** *- शहाण्या माणसाला त्याच्या चुकीबद्दल शब्दांनी समज दिली तरी पुरेसे असते.*

***शिकाविलेली बुद्धी आणि बांधलेली शिदोरी फार वेळ पुरत नाही*** *- मनुष्याला उपजत बुद्धीच पाहिजे. दुसऱ्याने दिलेले पुरत नाही.*

***शितावरून भाताची परीक्षा*** *- थोड्याशा गोष्टीवरून मोठ्या गोष्टीची कल्पना करता येते.*

***शिळ्या कढीला ऊत आणणे*** *- जुन्या गोष्टीला नवे स्वरूप देऊन किंवा स्मरणातून गेलेले प्रसंग उकरून काढून, त्याबद्दल वाटाघाटी करणे.*

***शिंक्याचे तुटले बोक्याचे पटले*** *- अकल्पित रीतीने एखादी गोष्ट झाली व त्याच्यामुळे एखाद्याला पाहिजे होते, ते आयतेच मिळणे.*

***शेजी देईल काय आणि मन धायेल काय ?*** *- दुसऱ्यानी (शेजारणीने) कितीही दिले तरी आपले मन तृप्त होऊ शकेल काय ?*

***शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड*** *- कष्ट करणारा कष्ट करीत राहतो. पण ज्याच्यासाठी कष्ट करतो त्याला त्याचे काहीच वाटत नसते. उलट तो दोषच काढीत  असतो.*

***शेंडी तुटो, की पारंबी तुटो*** *- कसलाही प्रसंग आला तरी, किती अडचणी किंवा संकटे आली तरी, जिवावर उदार होणारा माणूस धाडसी व दृढनिश्चयी असतो.*

***शेरास सव्वाशेर*** *- प्रतिपक्षापेक्षा वरच्या प्रतीचा, एक वस्ताद तर दुसरा त्याहून सरस.*

***शीर सलामत तर पगड्या पचास*** *- जिवंत राहिलो तर पैसे कसेही मिळविता येतात.*

***षटकर्णी करणे आणि घोटाळ्यात पडणे*** *- एखाद्या गोष्टीचा गाजावाजा केल्याने कार्यनाश होतो. दोन माणसात एखादी गोष्ट गुप्त राहू शकते, पण तीन माणसात तीच गोष्ट गुप्त राहू शकत नाही.*

***सत्तेपुढे शहाणपणा नाही*** *- ज्याच्या हाती अधिकाराचे बळ असते, त्याच्यापुढे शहाण्या माणसाचे काही चालत नाही.*

***सब घोडे बारा टक्के*** *- प्रत्येकाच्या गुणावगुणाप्रमाणे प्रत न लावता सर्वांना सारखे समजणे.*

***सरड्याप्रमाणे घटकेत तीन रंग पालटणे*** *- वरचेवर आपले स्वरूप बदलत राहणे.*

***सरड्याची धाव कुंपणापर्यंत*** *- अल्प बद्धीच्या माणसाच्या कार्याची झेप अल्पच असते.*

***स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग मिळत नाही*** *- स्वतः अनुभवल्या शिवाय एखाद्या गोष्टीची पूर्ण कल्पना येत नाही.*

***सगळे मुसळ केरात*** *- महत्त्वाच्या मुख्य गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे केलेले सर्व काम व्यर्थ होते.*

***समुद्राच्या खाऱ्या पाण्याने तोंड धुवून ये*** *- एखादी गोष्ट आपणाला करावयाची नसली, आणि ती करण्याविषयी एखाद्याचा फार आग्रह असला तर काहीतरी भलतीच अट घालून आपले काम टाळणे.*

***सरासरी गुडघाभर पाणी*** *- 'सरासरी' ही पुष्कळ वेळा फसवणूक करणारी गोष्ट असते.*

***सारी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही*** *- सर्व प्रकारच्या स्थितीची जुळवाजुळव करता येते, पण श्रीमंतीची बतावणी करता येत नाही.*

***समुद्रात जाऊन कोरडा*** - *अनुकूल परिस्थिती असून सुद्धा एखाद्याने स्वतःचा फायदा करून न घेणे.*

***सगळ्या गलबतात अर्धी सुपारी माझी*** - *भलतीच एखादी मागणी करून तिच्यासाठी हट्ट धरून बसणे.*

***सांगितल्या कामाचा आणि दिल्या भाकरीचा*** - *सांगकाम्या. सांगितलेले काम व दिलेले वेतन मुकाट्याने घेणारा.*

***साळ्याची गाय आणि माळ्याचे वासरू*** - *एखाद्या कार्याला लागणारी साधन सामग्री भिन्नभिन्न ठिकाणापासून गोळा करणे.*

***साखरेचे खाणार त्याला देव देणार*** - *भाग्यवान माणसाला सर्व परिस्थितीची अनुकूलता असते.*

***साखरेवरले मुंगळे*** - *जोपर्यंत आपले उत्कर्षाचे दिवस असतात तोपर्यंत मित्र गोळा होतात.*

***साप म्हणून दोरखंड झोडपणे*** - *(साप साप म्हणून भुई धोपटणे) - एखाद्यावर निष्कारण आळ घेऊन शिक्षा करणे.*

***सांग काम्या ओ नाम्या*** - *सांगेल तेवढेच काम करणे.*

***सुतासाठी मणी फोडणे बरोबर नाही*** - *क्षुल्लक वस्तू वाचविण्यासाठी मौल्यवान वस्तूचा नाश पत्करणे योग्य नाही.*

***सुंभ जळेल पण पीळ जळणार नाही*** - *हट्टी मनुष्याचे हट्टामुळे नुकसान झाले, तरी त्याचा हट्ट नाहीसा होत नाही.*

***सुताने स्वर्ग गाठणे*** - *क्षुल्लक गोष्टीवरून नको त्या गोष्टींचा उठाठेव करणे.*

***सूर्याच्या पोटी शनीश्वर*** - *चांगल्या बापाच्या पोटी वाईट मुलगा जन्मास येणे.*

***सोन्याहून पिवळे*** - *फारच उत्तम.*

***सोनाराने कान टोचणे*** - *तिऱ्हाईताने कान उघडणी करणे.*

***सोन्याचा धूर निघणे*** - *अतिशय संपत्तीमान होणे.*

***स्वर्ग दोन बोटे उरणे*** - *वैभवाचा कळस झाल्यासारखे वाटून गर्व होणे.*

***संन्याशाच्या लग्नाला शेंडी पासून तयारी*** - *एखादे कार्य करावयाचे झाल्यास त्याची अगदी प्राथमिक अवस्थपासून सुरुवात करणे.*

***हत्तीच्या पायी येते आणि मुंगीच्या पायी जाते*** - *आजार किंवा विपत्ती येताना लवकर येतात, पण जाताना सावकाश जातात.*

***हजीर तो वजीर*** - *जो ऐन वेळेला हजर असतो, त्याचा फायदा होतो.*

***हत्ती दारात झुलणे*** - *एखाद्याची स्थिती वैभव संपन्न असणे.*

***हलवायाच्या घरावर तुळशीपत्र*** - *दुसऱ्याची वस्तू परस्पर तिसऱ्याला देणे, (स्वतःला झीज लागू न देणे).*

***हत्ती गेला पण शेपूट राहिले*** - *कामाचा बहुतेक भाग पूर्ण झाला आणि थोडासा भाग व्हायचा राहिला.*

***हपापाचा माल गपापा*** - *लोकांचा तळतळाट घेऊन मिळविलेले द्रव्य झपाट्याने नाहिसे होते.*

***हरी जेवण आणि मठी निद्रा*** - *स्वतःचे घरदार सोडून कोठे तरी जेवायचे आणि कोठे तरी झोपायचे.*

***हसतील त्याचे दात दिसतील*** - *लोकांच्या हसण्याची पर्वा न करणे.*

***हात ओला तर मित्र भला*** - *जोपर्यंत मनुष्य दुसऱ्याला काही ना काही देऊ शकतो तोपर्यंत त्याच्याशी सगळे मित्रत्वाने वागतात.*

***हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागू नये*** - *जे खात्रीने आपले आहे ते सोडून जे अनिश्चित आहे ते मिळविण्याच्या नादी लागू नये.*

***हातच्या काकणाला आरसा कशाला*** - *जी गोष्ट स्पष्ट किंवा उघड आहे ती दाखविण्यासाठी पुराव्याची जरूरी लागत नाही.*

***ह्या हाताचे याच हातावर*** - *(येथल्या येथेच) वाईट कृत्याची फळे ताबडतोब मिळतात.*

***हात फिरे तेथे लक्ष्मी फिरे आणि तोंड फिरे तिथे अवदसा फिरे*** - *उद्योगशील मनुष्याच्या घरी संपत्ती नांदते, उद्योग न करता नुसती वटवट करतो त्याच्या घरी दारिद्र्य येते.*

***हा सूर्य हा जयद्रथ*** - *प्रत्यक्ष पुरावा दाखवून एखादी गोष्ट सिद्ध करणे.*

***हात दाखवून अवलक्षण*** - *शहाणपणा दाखविण्यासाठी बोललेली गोष्ट अंगाशी येते.*

***हाती धरल्या रोडका, आणि डोई धरल्या बोडका*** - *ज्याच्यापासून कोणत्याही उपायानी काहीही प्राप्त व्हावयाचे नाही.*

***हां हां म्हणता*** - *अत्यल्प काळात.*

***हिरा तो हिरा आणि गार ती गार*** - *साधू कितीही विपन्न स्थितीत असला आणि दुष्ट किती ही वैभवशाली असला तरी ही मनाच्या उदारतेवरून साधू आपणास सहज ओळखता येतो.*

# (४) शुन्याची करामत

| | | | |
|---|---|---|---|
| १० | एकावर एक शून्य | - | दहा |
| १०० | एकावर दोन शून्ये | - | शंभर |
| १,००० | एकावर तीन शून्ये | - | हजार |
| १०,००० | एकावर चार शून्ये | - | दहा हजार |
| १,००,००० | एकावर पांच शून्ये | - | एक लाख |
| १०,००,००० | एकावर सहा शून्ये | - | दशलक्ष |
| १,००,००,००० | एकावर सात शून्ये | - | एक कोटी |
| १०,००,००,००० | एकावर आठ शून्ये | - | दहा कोटी |
| १,००,००,००,००० | एकावर नऊ शून्ये | - | अब्ज |
| १०,००,००,००,००० | एकावर दहा शून्ये | - | खर्व |
| १,००,००,००,००,००० | एकावर अकरा शून्ये | - | निखर्व |
| १०,००,००,००,००,००० | एकावर बारा शून्ये | - | महापद्म |
| १,००,००,००,००,००,००० | एकावर तेरा शून्ये | - | शंकू |
| १०,००,००,००,००,००,००० | एकावर चौदा शून्ये | - | जलधी |
| १,००,००,००,००,००,००,००० | एकावर पंधरा शून्ये | - | अंत्य |
| १०,००,००,००,००,००,००,००० | एकावर सोळा शून्ये | - | मध्य |
| १,००,००,००,००,००,००,००,००० | एकावर सतरा शून्ये | - | परार्ध |

# *(५) 'वाकप्रचार' व त्यांचे अर्थ*

## *'वाकप्रचार' व त्यांचे अर्थ*

*मूळ अर्थापेक्षा भिन्न अशा विशिष्ठ अर्थाने रूढ झालेल्या शब्दसमूहाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात.*

***अवलंब करणे*** - *स्वीकार करणे, आधार घेणे.*

***अकांड तांडव करणे (आकांड तांडव करणे)*** - *रागाने आदळआपट करणे.*

***अंग चोरणे*** - *अंग राखून काम करणे.*

***अंग टाकणे*** - *शरीराने कृश होणे, रोडावणे.*

***अक्कल पुढे करणे*** - *बुद्धीचा भलताच उपयोग करणे.*

***अंगावर शेकणे*** - *मोठी हानी शिक्षा म्हणून भोगावी लागणे, हानिकारक होणे.*

***अंगाचा तीळपापड होणे*** - *अतिशय संताप येणे.*

***अंगाची लाही लाही होणे*** - *क्रोधाने क्षुब्ध होणे, मनाचा जळफळाट होणे.*

***अंगावर मूठभर मांस चढणे*** - *धन्यता वाटणे.*

***अंगावर रोमांच उभे राहणे (अंगावर कांटा उभा राहणे)*** - *भीतीनें किंवा आनंदाने अंगावर शहारे येणे.*

***अग्निदिव्य करणे*** - *कठीण कसोटीतून पार पडणे, प्राणांतिक संकटातून जाणे.*

***अंगवळणी पडणे*** - *सवय होणे.*

***अंगावर मास नसणे*** - *कृश होणे, प्रकृती खालावणे, खूप थकणे.*

***अंग शहारून टाकणे*** - *अंगावर रोमांच उभे राहणे.*

***अंग चोरून बसणे (अंग मारून बसणे)*** - *अवघडून बसणे.*

***अंगीकारणे*** - *स्वीकारणे.*

***अंगाचा खुर्दा होणे*** - *शरीराला त्रास होणे.*

***अंगावर घेणे*** - *एखाद्या गोष्टीचा स्वीकार करणे.*

***अंगाचे पाणी पाणी होणे*** - *घाम येणे.*

***अंग मोडून काम करणे*** - *खूप मेहनत करणे.*

***अंग काढून घेणे (अंग काढणे)*** - *अलिप्त राहणे, संबंध तोडणे.*

***अंगाचा भडका उडणे*** - *क्रोधामुळे अंगाची आग आग होणे.*

***अंतर देणे*** - *सोडून देणे, त्याग करणे.*

***अंग झाडून मोकळे होणे*** - *संबंध तोडणे.*

***अंगात त्राण नसणे*** - *अंगातील शक्ती नाहीशी होणे.*

***अंगाने चांगला आडवा असणे*** - *सशक्त असणे.*

***अंगात कापरे सुटणे*** - *भीतीने थरथरणे.*

***अंगावर धावून येणे*** - *मारावयास येणे.*

***अंगावर तुटून पडणे*** - *जोराचा हल्ला करणे.*

***अटकेपार झेंडा लावणे*** - *फार मोठा पराक्रम गाजविणे.*

***अटीतटीने खेळणे*** - *चुरशीने खेळणे.*

***अठरा विश्वे दारिद्र्य असणे*** - *अतिशय गरिबी असणे.*

***अडकित्त्यात सापडणे*** - *पेचात सापडणे, मोठ्या अडचणीत सापडणे.*

***अडचणींचा डोंगर असणे*** - *अनेक अडचणी येणे.*

***अवाक्षर न काढणे*** - *एकही अक्षर न बोलणे.*

***अंतःकरण भरून येणे*** - *हृदयात भावना दाटून येणे, भावनानी गहिवरून येणे.*

***अनुमती विचारणे*** - *परवानगी मागणे.*

***अंतःकरणाला पाझर फुटणे (अंतःकरण विरघळणे)*** - *दया येणे.*

***अंतःकरण तीळतीळ तुटणे*** - *अतिशय वाईट वाटणे.*

***अंतःकरण विदीर्ण होणे*** - *अतिशय दुःख होणे.*

***अंतःकरणाचा कोठा साफ असणे*** - *मन स्वच्छ असणे.*

***अंतरीचा तळीराम गार होणे*** - *इच्छा तृप्त होणे.*

***अंतर्मुख होणे*** - *खोलवर विचार करणे.*

***अंतर्धान पावणे*** - *नाहीसे होणे.*

***अंकित राहणे*** - *गुलाम होणे, वश होणे.*

***अंत पाहणे*** - *अखेरची मर्यादा येईपर्यंत थांबणे.*

***अंथरूण पाहून पाय पसरणे*** - *ऐपतीच्या मानाने खर्च करणे.*

***अत्तराचे दिवे जाळणे*** - *भरपूर उधळपट्टी करणे.*

***अद्वा तद्वा बोलणे*** - *एखाद्याच्या मनाला लागेल असे बोलणे.*

***अन्नास जागणे*** - *उपकार स्मरणे, उपकाराची जाणीव ठेवणे.*

***अनर्थ गुदरणे (ओढवणे)*** - *भयंकर संकट येणे.*

***अनावर होणे*** - *भावविवश होणे.*

***अन्नास मोताद होणे*** - *उपासमार होणे, अन्न मिळण्यास कठीण होणे.*

***अवगत असणे*** - *ठाऊक असणे.*

***अन्नावर तुटून पडणे*** - *खूप भूक लागल्याने भराभर जेवणे.*

***अन्नास लावणे*** - *उपजीविकेचे साधन मिळवून देणे.*

***अदृश्य होणे*** - *लुप्त होणे, नाहीसे होणे.*

***अनुमताने चालणे*** - *संमतीने वागणे.*

***अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे*** - *थोड्याशा यशानेच गर्व करणे.*

***अर्ध्या वचनात असणे*** - *पर्णू कह्यात असणे, आज्ञेचे नेहमी पालन करणे.*

***अवदसा आठवणे*** - *वाईट बुद्धी सुचणे.*

***अवगत होणे*** - *प्राप्त होणे.*

***अवहेलना करणे*** - *दुर्लक्ष करणे, अपमान करणे.*

***अवाक् होणे*** - *स्तब्ध होणे.*

***अळम टळम करणे*** - *टाळाटाळ करणे.*

***अपराध पोटात घालणे*** - *क्षमा करणे.*

***अपाय करणे*** - *नुकसान करणे.*

***अभंग राहणे*** - *भंग न होणे.*

***अंमल बनावणी करणे*** - *अंमलात आणणे.*

***अभय देणे*** - *सुरक्षितपणाची हमी देणे.*

***अभिवादन करणे*** - *वंदन करणे.*

***अर्पण करणे*** - *वाहणे.*

***अवसान चढणे*** - *स्फुरण चढणे.*

***अनुग्रह करणे*** - *उपकार करणे, कृपा करणे.*

***अधःपात होणे*** - *विनाश होणे.*

***अवलोकन करणे*** - *निरीक्षण करणे, पाहणे.*

***अवकळा येणे*** - *वाईट अवस्था येणे.*

***अडकित्यात धरणे*** - *अडचणीत टाकणे.*

***अद्दल घडणे*** - *शिक्षा मिळणे.*

***अक्षत देणे*** - *बोलावणे.*

***अक्षता पडणे*** - *विवाह उरकणे.*

***अन्न अन्न करणे*** - *अन्नासाठी फिरणे.*

***अवतार संपणे*** - *मारणे, स्थित्यंतर होणे.*

***अळवावरचे पाणी*** - *क्षणभंगूर.*

***अमर होणे*** - *कायमची कीर्ती प्राप्त होणे.*

***अनिमिषपणे पाहणे*** - *टक लावून पाहणे.*

***अस्वस्थता शिगेला जाणे*** - *अस्वस्थता पराकोटीला पोहोचणे.*

***अग्निदिव्य करणे*** - *प्राणांतिक संकटातून जाणे.*

***अति परिचयात अवज्ञा*** - *एखाद्याच्या घरी सतत जाण्याने आपले महत्त्व कमी होणे.*

***अरेरावी करणे*** - *मग्रुरीने वागणे.*

***अव्हेर करणे*** - *दूर लोटणे.*

***अनुलक्षून असणे*** - *एखाद्याला उद्देशून असणे.*

***अगतिक होणे*** - *उपाय न चालणे, निरुपाय होणे.*

***अतिप्रसंग करणे*** - *अयोग्य वर्तन करणे.*

***अति तेथे माती होणे*** - *कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट होणे.*

***आकाश कोसळणे*** - *(आभाळ कोसळणे) फार मोठे संकट येणे.*

***आकाश ठेंगणे होणे*** - *अतिशय गर्व होणे, गर्वाने फार फुगून जाणे.*

***आकाश पाताळ एक करणे*** - *आरडाओरड करुन गोंधळ घालणे.*

***आकाश फाटणे*** - *चारही बाजूंनी संकटे येणे.*

***आक्रोश करणे*** - *शोक करणे.*

***आकाशाला गवसणी घालणे*** - *अशक्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणे.*

***आकर्षक असणे*** - *मोह असणे.*

***आकृष्ट होणे*** - *आकर्षित होणे.*

***आकाशमातीचे संवाद होणे*** - *श्रेष्ठ कनिष्ठ एकत्र येणे.*

***आखाड्यात उतरणे*** - *विरोधकांशी सामना देण्यास तयार होणे.*

***आगीत तेल ओतणे*** - *अगोदर झालेल्या भांडणात भर घालणे, भांडण विकोपाला जाईल असे करणे.*

***आगीतून निघून फोफाट्यात जाणे*** - *लहान संकटातून मोठ्या संकटात सापडणे.*

***आघाडीवर असणे*** - *मुख्य व महत्त्वाचे असे गणले जाणे, पुढे असणे.*

***आच लागणे*** - *झळ लागणे.*

***आचरणात आणणे*** - *अमलात आणणे.*

***आक्रमण करणे*** - *हल्ला करणे.*

***आकांत करणे*** - *आरडाओरड करणे.*

***आकाशाचा ठाव घेणे*** - *असाध्य ते साध्य करण्याचा प्रयत्न करणे.*

***आर्जवे करणे*** - *पुन्हा पुन्हा विनविणे.*

***आग पाखडणे*** - *चहाड्या सांगून नाशास कारण होणे.*

***आठवण ठेवणे*** - *ध्यानात ठेवणे.*

***आठवणींना उजाळा देणे*** - *जुन्या आठवणी पुन्हा येणे.*

***आहारी जाणे*** - *पूर्णपणे स्वाधीन होणे.*

***आवृत्ती करणे*** - *पुन्हा पुन्हा नाचणे, नाव झळकणे.*

***आडव्यात बोलणे*** - *कोणतीही गोष्ट सरळपणे न बोलणे.*

***आंधळ्याची माळ लावणे*** - *विचार न करता जुन्या परंपरेनुसार वागणे.*

***आठवणींचा स्पंदक असणे*** - *स्मरण शक्तीचा अभाव असणे.*

***आढेवेढे घेणे*** - *एकदम तयार न होणे.*

***आण घेणे*** - *शपथ घेणे.*

***आनंदाला पारावार न उरणे*** - *अतिशय आनंद होणे, अमर्याद आनंद होणे.*

***आनंद गगनात न मावणे*** - *अतिशय आनंद होणे, अमर्याद आनंद होणे.*

***आनंदाला सीमा न उरणे*** - *अतिशय आनंद होणे, अमर्याद आनंद होणे.*

***आनंदाला उधाण येणे*** - *अतिशय आनंद होणे, अमर्याद आनंद होणे.*

***आनंदाचे भरते येणे*** - *अतिशय आनंद होणे, अमर्याद आनंद होणे.*

***आधार देणे*** - *सांभाळ करणे.*

***आनंदाने डोळे डबडबणे*** - *डोळे आनंदाश्रूंनी भरून येणे.*

***आपल्या पोळीवर तूप ओढणे*** - *साधेल तेवढा स्वतःचाच फायदा करून घेणे.*

***आडवे होणे*** - *निजणे.*

***आडून गोळी मारणे*** - *स्वतः पुढाकार न घेता दुसऱ्यांच्या हातून हवे ते काम करवून घेणे.*

***आत्मसात करणे*** - *पूर्णपणे माहीत करून घेणे.*

***आत्मा जळणे*** - *खूप दुःख होणे.*

***आदर सत्कार करणे*** - *मान सन्मान करणे.*

***आभाळ पेलणे*** - *अशक्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणे.*

***आपुलकी वाटणे*** - *प्रेम व आस्था वाटणे.*

***आपल्याच पायावर घाव घालणे*** - *स्वतःच आपले नुकसान करून घेणे.*

***आबाळ होणे*** - *दुर्लक्ष होणे, हाल होणे.*

***आयत्या पिठावर रेषा (रेघोट्या) ओढणे*** - *आयत्या मिळालेल्या संपत्तीवर चैन करणे.*

***आयुष्य वेचणे*** - *एखाद्या गोष्टीसाठी आयुष्यभर झटणे.*

***आवळा देऊन कोहळा काढणे*** - *स्वल्प (लहानशी) देणगी देऊन त्याच्या मोबदल्यात दुसऱ्यांकडून मोठे कार्य करून घेणे.*

***आश्रय घेणे*** - *मदत घेणे.*

***आश्चर्यचकित होणे*** - *आश्चर्याने थक्क होणे.*

***आश्चर्याने तोंडात बोट घालणे*** - *फार आश्चर्य वाटणे.*

***आवाज लागणे*** - *प्रसंगाला साजेल असा आवाज गळ्यातून येणे.*

***आश्वासन देणे*** - *कबूल करणे.*

***आमूलाग्र बदलणे*** - *संपूर्णपणे बदलणे.*

***आडवे येणे*** - *अडवणे.*

***आवाज चढविणे*** - *रागावून खूप मोठ्याने बोलणे.*

***आड येणे*** - *अडथळा निर्माण करणे.*

***आहुती देणे*** - *प्राण अर्पण करणे.*

***आस्वाद घेणे*** - *आनंद लुटणे.*

***आव आणणे*** - *खोटा अविर्भाव करणे, उसने अवसात आणणे.*

***आसमान ठेंगणे होणे*** - *ताठ्याचा कळस होणे (स्वर्ग दोन बोटे उरणे).*

***आळा घालणे*** - *नियम लावून देणे, नियंत्रण ठेवणे.*

***आ वासणे*** - *आश्चर्याने तोंड उघडणे.*

***आळोखे पिळोखे देणे*** - *आळस झाडणे.*

***आळ घालणे*** - *आरोप करणे.*

***इंगा जिरणे*** - *गर्व नाहीसे होणे, खोड मोडणे.*

***इंगा दाखविणे*** - *धाक बसविणे, जरब बसविणे.*

***इकडचा डोंगर तिकडे करणे*** - *फार मोठे कार्य पार पाडणे.*

***इरेला पेटणे*** - *ईर्षेने खेळू लागणे.*

***इशारा देणे*** - *सावधगिरीची सूचना देणे.*

***इन्कार करणे*** - *नकार देणे.*

***इरेस पडणे*** - *एखादी गोष्ट करण्याची जिद्द असणे.*

***इतिश्री करणे*** - *शेवट करणे.*

***इमानास जागणे*** - *इमान कायम ठेवणे.*

***इकडचे तोंड तिकडे करून टाकणे*** - *अतिशय जोराने थोबाडात मारणे.*

***इंगळ्या डसणे*** - *मनाला झोंबणे, वेदना होणे.*

***इहलोक सोडणे*** - *मरणे.*

***इनमीन साडेतीन*** - *थोडेसे, नगण्य.*

***उकळी फुटणे*** - *खूप आनंद होणे.*

***उखळ पांढरे होणे*** - *खूप द्रव्य मिळणे.*

***उखाळ्या पाखाळ्या काढणे*** - *एकमेकांचे उणेदुणे काढणे.*

***उघडा पडणे*** - *खरे स्वरूप प्रकट होणे.*

***उचल खाणे*** - *एखादी गोष्ट करण्याची अनिवार इच्छा होणे.*

***उचल बांगडी करणे*** - *जबरदस्तीने हलविणे.*

***उच्चाटन करणे*** - *घालवून देणे, नष्ट करणे.*

***उच्छाद मांडणे*** - *उपद्रव देणे.*

***उचंबळून येणे*** - *भावना तीव्र होणे.*

***उजाड माळरान*** - *ओसाड जमीन.*

***उजेड पडणे*** - *मोठे कृत्य करणे.*

***उल्लेख करणे*** - *उच्चार करणे, सांगणे.*

***उंटावरून शेळ्या हाकणे*** - *मनापासून काम न करणे.*

***उठून दिसणे*** - *शोभून दिसणे, नजरेत भरणे.*

***उत्तेजन देणे*** - *पाठिंबा देणे.*

***उतराई होणे*** - *उपकार फेडणे.*

***उत्तीर्ण होणे*** - *यशस्वी होणे.*

***उत्कंठा असणे*** - *उत्सुक असणे.*

***उदक सोडणे*** - *त्याग करणे.*

***उदरी शनी येणे*** - *संपत्तीचा लाभ होणे.*

***उदास वाटणे*** - *फार खिन्न वाटणे.*

***उद्धार करणे*** - *प्रगती करणे.*

***उधाण येणे*** - *चेव येणे, ओसंडून वाहणे, भरती येणे.*

***उध्वस्त होणे*** - *नाश पावणे.*

***उधळून देणे*** - *पसरून देणे.*

***उन्मळून पडणे*** - *मुळासकट कोसळून पडणे.*

***उन्हाची लाही फुटणे (उन्हाचा जाळ पेटणे)*** - *अतिशय कडक ऊन पडणे.*

***उद्योगात चूर होणे*** - *कामात गुंग असणे, मग्न असणे.*

***उतू जाणे*** - *कल्पनेपेक्षाही अधिक असणे.*

***उपासना करणे*** - *पूजा करणे, आराधना करणे.*

***उपसर्ग होणे*** - *त्रास होणे.*

***उपपादन करणे*** - *बाजू मांडणे.*

***उपद्व्याप करणे*** - *खूप त्रास सहन करणे.*

***उपदेशाचा डोस पाजणे*** - *उपदेश करणे.*

***उंबरठा चढणे*** - *प्रवेश करणे.*

***उबगणे*** - *कंटाळा येणे.*

***उमाळा येणे*** - *तीव्र इच्छा होणे.*

***उमज पडणे*** - *समजणे.*

***उभ्या उभ्या चक्कर टाकणे*** - *सहज जाऊन पाहून येणे.*

***उरकून घेणे*** - *पार पाडणे.*

***उराशी बाळगणे*** - *अंतःकरणात जतन करून ठेवणे.*

***उरापोटावर बाळगणे*** - *सांभाळ करणे.*

***उरस्फोड करणे*** - *काळीज फाटेपर्यंत कष्ट करणे.*

***उरी फुटणे*** - *अतिशय दुःख होणे.*

***उरकून घेणे*** - *आटोपणे, संपवणे.*

***उलगडा होणे*** - *अगदी स्पष्टपणे समजणे.*

***उलटी अंबारी हाती येणे*** - *भीक मागण्याची पाळी येणे.*

***उष्ट्या हाताने कावळा न हाकणे*** - *कधी कोणाला काहीही मदत न करणे.*

***उसळी घेणे*** - *जोराने वर येणे.*

***उसासा सोडणे*** - *विश्वास सोडणे.*

***ऊत येणे*** - *अतिरेक होणे, चेव येणे.*

***ऊन खाली येणे*** - *सायंकाळ होणे.*

***ऊर दडपणे*** - *अतिशय भीती वाटणे.*

***ऊर भरून येणे*** - *भावना दाटून येणे.*

***ऊर बडवून घेणे*** - *आक्रोश करणे.*

***ऊर फाटणे*** - *अतिशय दुःख होणे.*

***ऊस मळे फुलणे*** - *ऊसमळे चांगले वाढीस लागणे.*

***ऊहापोह करणे*** - *चर्चा करणे (उहापोह करणे).*

***एक घाव दोन तुकडे करणे*** - *ताबडतोब निर्णय घेऊन गोष्ट निकालात आणणे.*

***एकजीव होणे*** - *पूर्णपणे मिसळून जाणे.*

***एकटक पाहणे*** - *स्थिर नजरेने पाहणे.*

***एकमत होणे*** - *सर्वांचा सारखा विचार असणे.*

***एकमेवाव्दितीय असणे*** - *अतुलनीय व सर्वोत्कृष्ठ असणे.*

***एका पायावर तयार असणे*** - *फार उत्कंठीत होणे.*

***एकाग्रचित्त होणे*** - *मन केंद्रित करणे.*

***एका वट्टात बोलणे*** - *एका दमात बोलणे.*

***एकेरीवर येणे*** - *भांडायला तयार होणे.*

***एखाद्या वस्तूवर डोळा असणे*** - *एखादी वस्तू प्राप्त करून घेण्याची इच्छा असणे.*

***ओस होणे*** - *रिकामे होणे.*

***ओढ घेणे*** - *आकर्षण वाटणे.*

***ओली सुकी करणे*** - *नाणे फेक करून निर्णय घेणे.*

***ओटीत घालणे*** - *संगोपनासाठी दुसऱ्यांच्या हवाली करणे.*

***ओवाळून टाकणे*** - *तुच्छ समजून फेकून देणे.*

***ओक्शा बोक्शी रडणे*** - *खूप रडणे.*

***औषध नसणे*** - *उपाय नसणे.*

***औषधालाही नसणे*** - *अजिबात नसणे, मुळीच नसणे.*

***ओढ लागणे*** - *तीव्र इच्छा होणे.*

***कणीक तिंबणे*** - *खूप मारणे.*

***कंठ दाटून येणे*** - *गहिवरून येणे, दुःखाचा आवेग येणे.*

***कंठस्नान घालणे*** - *ठार मारणे, शिरच्छेद करणे.*

***कच खाणे*** - *माघार घेणे.*

***कणीक मऊ होणे*** - *मार बसणे.*

***कट करणे*** - *कारस्थान करणे.*

***कडुसे पडणे*** - *सायंकाळ होणे.*

***कटाक्ष टाकणे*** - *एक नजर टाकणे, नजर फिरविणे.*

***कंठशोष करणे*** - *ओरडून गळा सुकविणे, उगाच घसाफोड करणे.*

***कणव येणे*** - *दया येणे.*

***कपाळ फुटणे*** - *दुर्दैव ओढवणे, मोठी आपत्ती कोसळणे.*

***कपाळमोक्ष होणे*** - *मरणे, नाश पावणे, डोके फुटून मृत्यू येणे.*

***कपाळ उठणे*** - *कपाळ दुखू लागणे.*

***कपाळ ठरणे*** - *नशिबात लिहिण्यासारखी एकादी गोष्ट घडणे.*

***कपाळ पांढरे होणे*** - *वैधव्य येणे.*

***कपाळी येणे*** - *नशीबी येणे.*

***कपाळाला आठ्या पडणे*** - *नाराजी दिसणे.*

***कपाळी (भाळी) लिहिलेले नसणे*** - *नशिबात नसणे.*

***कंबर कसणे (कंबर बांधणे)*** - *हिंमत दाखविणे, तयार होणे.*

***कष्टाने विद्या करणे*** - *परिश्रम करून विद्या संपादन करणे.*

***कपाळावर हात मारणे*** - *दुःख होणे, निराश होणे.*

***कपाळावर हात लावणे*** - *निराश होणे.*

***कःपदार्थ असणे*** - *क्षुल्लक वाटणे.*

***कपोतवृत्तीने वागणे*** - *काटकसरीने वागणे.*

***कपाळाचे कातडे नेणे*** - *सगळया जन्माचे मातेरे करणे.*

***कसोटीस उतरणे*** - *अपेक्षित गोष्ट यशस्वीपणे करून दाखविणे.*

***करुणा भाकणे*** - *विनविणे.*

***कबूल करणे*** - *मान्य करणे.*

***कसाला लागणे*** - *कसोटी पाहणे, एखाद्याची परीक्षा होणे.*

***कसास लावणे*** - *कसोटी पाहणे, एखाद्याची परीक्षा होणे.*

***कंबर खचणे*** - *धीर संपणे, धीर खचणे.*

***कळसास पोचणे*** - *शेवटच्या टोकाला जाणे, पूर्णत्वाला पोहोचणे.*

***कळी उमलणे*** - *चेहरा प्रफुल्लीत होणे.*

***कमाल करणे*** - *मर्यादा वा सीमा गाठणे.*

***करणी करणे*** - *चेटूक करणे.*

***कलुषित करणे*** - *मलीन बनविणे, गढूळ करणे, एखाद्या विषयी वाईट मत करणे.*

***कळ लावणे*** - *भांडण लावणे.*

***करकर दात चावणे*** - *क्रोधाचा अविर्भाव करणे.*

***कलम होणे*** - *पकडणे.*

***कसूर न करणे*** - *आळस न करणे, चूक न करणे.*

***कब्जा घेणे*** - *ताब्यात घेणे.*

***कळस होणे*** - *चांगल्या किंवा वाईट गोष्टीचा अतिरेक होणे.*

***कस धरणे*** - *सत्व निर्माण होणे.*

***करार मदार करणे*** - *लेखी स्वरुपात निर्णय घेणे.*

***कळा पालटणे*** - *स्वरूप बदलणे.*

***कढी पातळ होणे*** - *दुखण्यामुळे जर्जर होणे.*

***कल्पांत करणे*** - *मोठा कल्लोळ करणे.*

***कल्ला फाडणे*** - *गोंगाट करणे.*

***कसर काढणे*** - *एकीकडे झालेली कमतरता दुसरीकडे भरून काढणे.*

***कष्टी होणे*** - *खिन्न होणे, दुःखी होणे.*

***कवडीही हातास न लागणे*** - *एका पैशाचीही प्राप्ती न होणे.*

***करंट येणे*** - *झटका येणे, आवेश येणे.*

***कृत कृत्य होणे*** - *धन्यता वाटणे.*

***का कू करणे*** - *मागे पुढे पाहणे, काम करण्यास टाळाटाळ करणे.*

***काटा काढणे*** - *दुःख देणारी गोष्ट काढून टाकणे, समूळ नाहीसे होणे.*

***काडीमोड करणे (देणे)*** - *संबंध तोडणे.*

***काळझोप घेणे*** - *मृत्यू येणे.*

***काट्याने काटा काढणे*** - *एका शत्रूच्या सहाय्याने दुसऱ्या शत्रूचा पराभव करणे.*

***काथ्याकूट करणे*** - *व्यर्थ चर्चा करणे.*

***कापूस महाग होणे*** - *कृश होणे.*

***कान उपटणे*** - *चुकीबद्दल शिक्षा करणे.*

***काढण्या लावणे*** - *दोरीने बांधणे.*

***कान टवकारून ऐकणे*** - *अगदी लक्षपूर्वक ऐकणे.*

***कान देणे*** - *लक्षपूर्वक ऐकणे.*

***कान धरणे*** - *शासन करणे.*

***कान फुंकणे (कान भरणे)*** - *चुकली (चुगली) करणे, चहाड्या करणे, मनात किल्मिश निर्माण करणे.*

***कान उघाडणी करणे*** - *खरमरीत उपदेश करणे, कडक शब्दात चूक दाखवून देणे.*

***कानठळ्या बसणे*** - *मोठा आवाज ऐकल्याने काही काळ काहीच ऐकू न येणे.*

***काना डोळा करणे*** - *दुर्लक्ष करणे.*

***कानावर पडणे*** - *सहजगत्या माहीत होणे, ऐकण्याचा योग येणे.*

***कानावर येणे*** - *माहीत असणे, ऐकणे, कळणे.*

***काळे करणे*** - *देशांतरास जाणे.*

***कानावर हात ठेवणे*** - *नाकबूल करणे, नकारात्मक भूमिका घेणे.*

***कानोसा घेणे*** - *दूरवरचे लक्षपूर्वक ऐकणे, चाहूल घेणे.*

***कानीकपाळी ओरडणे*** - *वारंवार बजावून सांगणे.*

***कास धरणे*** - *आश्रय घेणे.*

***कानाशी लागणे*** - *चहाड्या करणे.*

***कानाला खडा लावणे*** - *पुन्हा एखादी चूक न करण्याचा निश्चय करणे, धडा शिकणे.*

***कान टवकारणे*** - *ऐकण्यास उत्सुक होणे.*

***काडी मोडून घेणे*** - *विवाहसंबंध तोडून टाकणे.*

***कामगिरी पार पाडणे*** - *सोपविण्यात आलेले काम पूर्ण करणे.*

***कामगिरी बजावणे*** - *काम पार पडणे.*

***कानशील रंगविणे*** - *मारणे.*

***कानशिलात देणे*** - *मारणे.*

***कालवा कालव होणे*** - *मनाची चलबिचल होणे.*

***काळीमा लागणे*** - *कलंक लागणे, अपकीर्ती होणे.*

***कान फुटणे*** - *ऐकू न येणे.*

***काट्याचा नायटा करणे*** - *साधी गोष्ट वाईट थराला जाणे.*

***काट्याचा नायटा होणे*** - *क्षुल्लक गोष्टीचा भयंकर परिणाम होणे.*

***कामाला भिडणे*** - *जोरात काम करू लागणे.*

***कानात घुमून राहणे*** - *आठवणीत पक्के रुजून राहणे.*

***कायापालट होणे*** - *पूर्णपणे स्वरूप बदलणे.*

***कावरा बावरा होणे*** - *बावरणे, घाबरणे.*

***काळजाचे पाणी पाणी होणे*** - *दुःखी होऊन धैर्य व उत्साह नाहीसा होणे, अतिशय घाबरणे.*

***काळाची पावले ओळखणे*** - *बदलत्या परिस्थितीची भान असणे.*

***काळजाचा ठेवा असणे*** - *अत्यंत आवडती गोष्ट असणे.*

***काळाच्या उदरात गडप होणे*** - *नष्ट होणे.*

***कानामागे टाकणे*** - *दुर्लक्ष करणे.*

***कानात मंत्र सांगणे*** - *गुप्त रीतीने सल्लामसलत करणे.*

***कान टोचणे*** - *एखादी गोष्ट समजावून सांगणे.*

***कानाने आवाज टिपणे*** - *लक्षपूर्वक ऐकणे.*

***काळजाचा लचका तुटणे*** - *अत्यंत दुःख होणे.*

***कानाचा चावा घेणे*** - *कानात सांगणे.*

***कानी घालणे*** - *सांगणे, लक्षात आणून देणे.*

***कान लांब होणे*** - *ऐकण्यासाठी उत्सुक असणे, अक्कल कमी होणे (गाढवाचे कान?)*

***काखा वर करणे*** - *आपल्या जवळ काही नाही असे दाखविणे, ऐनवेळी अंग काढून घेणे.*

***काळजाचे कोळसे होणे*** - *मनाला अतिशय वेदना होणे.*

***काळीज फत्तराचे होणे*** - *अंतःकरणातील दया, माया इ. कोमल भावना नाहीशा होणे.*

***काकण भर सरस ठरणे*** - *थोडेसे जास्त वा अधिक असणे.*

***कागाळी करणे*** - *तक्रार किंवा गाऱ्हाणे करणे.*

***कागदी घोडे नाचविणे*** - *ज्याच्या पासून काही लाभ होण्याजोगे नाही अशा लेखनाचा खटाटोप करणे.*

***काळे करणे*** - *निघून जाणे.*

***कान किटणे*** - *तीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगून कंटाळा आणणे.*

***कामास येणे*** - *उपयोगी पडणे, लढाईत मारले जाणे.*

***काकदृष्टीने पाहणे*** - *अतिशय बारकाईने पाहणे.*

***कासावीस होणे*** - *व्याकूळ होणे.*

***कालवश होणे*** - *मरण पावणे.*

***काडीने औषध लावणे*** - *दुरून दुरून दुसऱ्याचे उपयोगी पडणे.*

***काहूर माजणे*** - *विचारांचा गोंधळ होणे.*

***किमया करणे*** - *जादू करणे.*

***कित्ता गिरविणे*** - *अनुकरण करणे.*

***किळस वाटणे*** - *शिसारी वाटणे.*

***किल्ली फिरविणे*** - *युक्तीने मन बदलणे.*

***किडून घोळ होणे*** - *कीड लागल्यामुळे खराब होणे.*

***किंतु येणे*** - *संशय वाटणे.*

***कीस काढणे*** - *बारकाईने चर्चा करणे.*

***कुंपणाने शेत खाणे*** - *विश्वासातील माणसाने फसविणे, रक्षणकर्त्याने भक्षण करणे.*

***कुत्र्याच्या मोलाने मरणे*** - *मरताना माणूस म्हणून काहीही किंमत न राहणे.*

***कुर्बानी करणे*** - *बलिदान करणे.*

***कुजत पडणे*** - *आहे त्या स्थितिपेक्षा अधिक वाईट अवस्था प्राप्त होणे.*

***कुजबूज करणे*** - *आपापसात हळूहळू बोलणे.*

***कुकारा घालणे*** - *मोठ्याने हाक मारणे.*

***कुत्रा हाल न खाणे*** - *अतिशय वाईट स्थिती येणे.*

***कुत्र्यासारखे मळा धरून पडणे*** - *घरातील कटकटींना कंटाळून सारखे घराबाहेर राहणे.*

***कुरघोडी करणे*** - *वर्चस्व स्थापित करणे.*

***कुंद होणे*** - *उदास होणे.*

***कुरुक्षेत्र माजविणे*** - *भांडण तंटे करणे.*

***कुणकुण लागणे*** - *चाहूल लागणे.*

***कुरापत काढणे*** - *भांडण उकरून काढणे.*

***कूस धन्य करणे*** - *जन्म दिल्याबद्दल सार्थक वाटणे.*

***कूच करणे*** - *पुढे जाणे, कामगिरीवर निघणे.*

***केसाने गळा कापणे*** - *विश्वासघात करणे.*

***केसालाही धक्का न लावणे*** - *अजिबात त्रास न होणे.*

***केसांच्या अंबाड्या होणे*** - *वृद्धावस्था येणे.*

***क्लेश पडणे*** - *यातना सहन कराव्या लागणे.*

***कोणाच्या अध्यांत मध्यांत नसणे*** - *कोणाच्या कामात विनाकारण भाग न घेणे.*

***कोंडीत पकडणे*** - *पेचात सापडणे.*

***कोड पुरविणे*** - *कौतुकाने हौस पुरविणे.*

***कोरड पडणे*** - *सुकून जाणे.*

***कोंड्याचा मांडा करणे*** - *काटकसरीने संसार करणे.*

***कोलाहल माजणे*** - *आरडाओरड होणे.*

***कोपऱ्यापासून हात जोडणे*** - *संबंध न यावा अशी इच्छा करणे.*

***कोंडी फोडणे*** - *वेढा तोडून बाहेर जाणे.*

***कोपऱ्याने खणणे*** - *दारवाद्याच्या चांगुलपणाचा फायदा घेणे.*

***कोंडमारा होणे*** - *मन अस्वस्थ होणे.*

***कोंबडे झुंजविणे*** - *दुसऱ्यांचे भांडण लावून आपण मजा बघणे.*

***कोपऱ्यात घेणे*** - *एका टोकाला घेऊन कोंडी करणे.*

***कोणाचा पायपोस कोणाचे पायात नसणे*** - *मोठा गोंधळ होणे.*

***कौशल्य पणास लावणे*** - *अतिशय चतुराईने काम करणे.*

***कौतुक करणे*** - *तारीफ करणे.*

***खच्चून जाणे*** - *धीर सुटणे.*

***खर्ची पडणे*** - *वापरावी लागणे.*

***खच्चून भरणे*** - *पूर्णपणे भरणे.*

***खनपटीस बसणे*** - *सारखे एखाद्या गोष्टीच्या मागे लागणे.*

***खट्टू होणे*** - *नाराज होणे.*

***खटपट करणे*** - *प्रयत्न करणे.*

***खजील होणे*** - *लाज वाटणे.*

***खडा पहारा होणे*** - *काळजीपूर्वक करणे.*

***खडसून विचारणे*** - *ताकीद देऊन विचारणे.*

***खंड नसणे*** - *सतत चालू राहणे.*

***खंड पडणे*** - *मध्येच काही काळ बंद असणे.*

***खंत वाटणे*** - *खेद वा दुःख वाटणे.*

***खडा टाकून पाहणे*** - *अंदाज घेणे.*

***खटाटोप चालविणे*** - *प्रयत्न करणे.*

***खडे चारणे*** - *शरण येण्यास भाग पाडणे, पराभव करणे.*

***खल करणे*** - *खोलवर चर्चा करणे.*

***खबर नसणे*** - *माहिम नसणे.*

***खस्ता खाणे*** - *खूप कष्ट करणे.*

***खड्यासारखा बाहेर पडणे*** - *निरूपयोगी ठरून वगळला जाणे.*

***खसखस पिकणे*** - *खूप हसणे.*

***खडे फोडणे*** - *दूषण देणे.*

***खर्ची पडणे*** - *लढाईत मृत्यूमुखी पडणे.*

***खळखळ करणे*** - *हट्ट करणे.*

***खरवड काढणे*** - *कान उघडणी करणे.*

***खरपूस ताकीद करणे*** - *निक्षून सांगणे.*

***खडी ताजीम देणे*** - *उभे राहून शिस्तीने मानवंदना देणे.*

***खरडपट्टी काढणे*** - *रागावून बोलणे.*

***खाल्ल्या मिठाला जागणे*** - *उपकाराची जाणीव ठेवणे.*

***खाजवून खरुज काढणे*** - *मुद्दाम भांडण उकरून काढणे.*

***खांदा देऊन काम करणे*** - *झटून काम करणे.*

***खापर फोडणे*** - *दोष देणे.*

***खायला काळ अन् भुईत्या भार असणे*** - *स्वतः काही ही काम नकरता दुसऱ्यावर भार होऊन राहणे.*

***खायला उठणे*** - *असह्य होणे.*

***खाल्ल्या घरचे वासे मोजणे*** - *उपकार करणाऱ्यांचे वाईट चिंतणे.*

***खार लागणे*** - *झीज सोसावी लागणे.*

***खाईत पडणे*** - *संकटात किंवा दुःखात पडणे.*

***खाऊन ढेकर देणे*** - *गिळंकृत करणे.*

***खा खा सुटणे*** - *खाण्याची एकसारखी इच्छा होणे, अधाशीपणाने खूप खात जाणे.*

***खिळवून ठेवणे*** - *एकाच जागी स्थिर करून ठेवणे.*

***खिळखिळी होणे*** - *मोडकळीला येणे.*

***खुट्ट होणे*** - *अचानक बारीक आवाज होणे.*

***खुळे करणे*** - *वेड लावणे.*

***खूणगाठ बांधणे*** - *पक्के ध्यानात ठेवणे.*

***खो घालणे*** - *अडचण आणणे, विघ्न निर्माण करणे.*

***ख्याली-खुशाली विचारणे*** - *हालहवाल विचारणे.*

***खो खो हसणे*** - *हसू न आवरणे, जोर जोराने हसणे.*

***खोऱ्याने पैसे ओढणे*** - *पुष्कळ पैसे मिळविणे.*

***खोड मोडणे*** - *एखाद्याची वाईट सवय तीव्र उपायाने घालविणे.*

***खोड ठेवणे*** - *दोष ठेवणे.*

***'ग' ची बाधा होणे*** - *गर्व होणे.*

***गजर करणे*** - *एकाच तालात सर्वांनी एकदम जयजयकार करणे.*

***गणना करणे*** - *समाविष्ट करणे.*

***गढून जाणे*** - *रंगून जाणे.*

***गंगार्पण करणे*** - *कायमचे विसरणे.*

***गाणित पक्के बसणे*** - *ठाम समजूत होणे.*

***गतप्राण होणे*** - *मरणे.*

***गर्क असणे*** *- गुंग असणे.*

***गर्क होणे*** *- गढून जाणे.*

***गळ घालणे*** *- आग्रह करणे.*

***गळ्यात पडणे*** *- अतिशय आग्रह करणे.*

***गंगेत घोडे न्हाणे*** *- एखादे मोठे काम पूर्ण होणे.*

***गहिवरून जाणे*** *- दुःखाने कंठ दाटून येणे.*

***गयावया करणे*** *- दीनवाणी प्रार्थना करणे, विनवणी करणे.*

***गडप होणे*** *- नाहीसे होणे.*

***गटांगळ्या खाणे*** *- नाकातोंडात पाणी जाऊन जीव घाबरा होणे.*

***गत्यंतर नसणे*** *- नाईलाज असणे, दुसरा उपाय नसणे.*

***गंध नसणे*** *- अजिबात माहीत नसणे.*

***गर्भगळीत होणे*** *- अतिशय घाबरणे, भयभीत होणे.*

***गमजा करणे*** *- हुशारी मारणे.*

***गृहीत धरणे*** *- मनात निश्चित कल्पना करणे.*

***गराडा घालणे*** *- वेढा घालणे, घेराव घालणे.*

***गळा कापणे*** *- विश्वासघात करणे.*

***गळा गुंतणे*** *- अडचणीत सापडणे, अडचणीत घालणे.*

***गळ्याशी येणे*** *- नुकसानी बाबत अतिरेक होणे.*

***गळ्यात धोंड पडणे*** *- इच्छा नसताना जबाबदारी अंगावर पडणे.*

***गळी उतरणे*** *- पटणे.*

***गवऱ्या मसणात जाणे*** *- मृत्यूकाल जवळ असणे.*

***गळ्याशी पाणी लागणे*** *- पराकाष्ठेचे कर्ज होणे.*

***गळा भरून येणे*** *- गहिवरून येणे.*

***गहजब करणे*** *- फार बोभाटा करणे.*

***गळा काढून रडणे*** *- मोठा आवाज काढून रडणे.*

***गळून पडणे*** *- मरणे.*

***गप्प राहणे*** *- काहीही न बोलणे.*

***गडगडून हसणे*** *- मोकळ्या मनाने हसणे.*

***गम खाणे*** *- धीर धरणे.*

***गळ्याला कोरड पडणे*** *- अतिशय घाबरणे.*

***गम्य असणे*** *- थोडेसे ज्ञान असणे.*

***गदगदून येणे*** *- अंतःकरण भरून येणे.*

***गळा धरणे*** *- मारावयात प्रवृत्त होणे.*

***गळा काढणे*** *- रडणे.*

***गळ्यात येणे*** *- जबरदस्तीमुळे एखादी गोष्ट स्वीकारणे.*

***गळ्यात गळा घालणे*** *- अलिंगन देणे.*

***गय करणे*** *- क्षमा करणे.*

***गलित गात्र होणे*** - *शरीराचा अवयव न अवयव थकणे.*

***गळी पडणे*** - *एखाद्याच्या मागे लागणे.*

***गहाण ठेवणे*** - *कर्जाऊ घेतलेल्या पैशाबद्दल सावकाराकडे (बँकेत) एकादी मौल्यवान वस्तू ठेवणे.*

***गळ्यात माळ घालणे*** - *विजय मिळविणे, विवाह होणे.*

***गळ्याला फास लागणे*** - *प्राणघातक संकटात सापडणे.*

***गंडा बांधणे*** - *शिष्य होणे.*

***ग्रह सुटणे*** - *संकट दूर होणे.*

***गंडांतर येणे*** - *संकट येणे.*

***गंध नसणे*** - *मुळीच ज्ञान नसणे.*

***गाई पाण्यावर येणे*** - *डोळ्यात अश्रू उभे राहणे.*

***गाजावाजा करणे*** - *प्रसिद्धी देणे.*

***गाशा गुंडाळणे*** - *एकदम पसार होणे, निघून जाणे.*

***गाडी पुन्हा रुळावर येणे*** - *चुकीच्या मार्गावरून पुन्हा पूर्ववत योग्य मार्गाला येणे.*

***गाळण उडणे*** - *फार घाबरणे.*

***गाठीस असणे*** - *शिल्लक असणे, जवळ असणे. (गाठीला ठेवणे)*

***गावी नसणे*** - *लक्ष नसणे.*

***गारुड करणे*** - *जादू करणे.*

***गावचा नसणे*** - *काही एक संबंध न दाखवणे.*

***गाढवाचा नांगर फिरणे*** - *जमीनदोस्त करणे.*

***गाळण होणे*** - *भीतीने गांगरून जाणे.*

***गाडा वळणावर येणे*** - *सर्व सुरळीत होणे.*

***गाठ पडणे*** - *भेटणे.*

***गाडी अडणे*** - *कामात अडथळा येणे.*

***गाल फुगविणे*** - *रूसणे.*

***गिरकी घेणे*** - *स्वतःभोवती वर्तुळाकार फिरणे.*

***गिल्ला करणे*** - *गोंधळ करणे.*

***गुण दाखविणे*** - *खरे स्वरूप प्रकट करणे.*

***गुंजत असणे*** - *दुमदुमत असणे.*

***गुजराण करणे*** - *निर्वाह करणे.*

***गुदगुल्या होणे*** - *आनंदाच्या उकळ्या फुटणे.*

***गुळणी फोडणे*** - *लपवून ठेवलेली गोष्ट अखेरीस सांगून टाकणे.*

***गुढी धरणे*** - *नव्या उपक्रमाला सुरवात करणे.*

***गुंगारा देणे*** - *फसवून पळून जाणे.*

***गुणगान करणे*** - *स्तुती करणे.*

***गोत्यात आणणे*** - *संकटात घालणे.*

***गोडवे गाणे*** - *स्तुती करणे.*

***गोंधळ उडणे*** -*गडबडून जाणे.*

***गोंडा घोळणे*** - *खुशामत करणे.*

***गोरामोरा होणे*** - *भांबावणे.*

***गोपाळकाला करणे*** - *सर्व शिदोऱ्या एकत्र करणे.*

***गौरव करणे*** - *सन्मान करणे, स्तुती करणे.*

***गौडबंगाल असणे*** - *गूढ गोष्ट असणे.*

***घर डोक्यावर घेणे*** - *घरात अतिशय गोंगाट करणे.*

***घर धुवून नेणे*** - *सर्वस्वी लुबाडणे, सर्वस्वाचा अपहार करणे.*

***घडी भरणे*** - *विनाशकाल जवळ येणे.*

***घर सुने सुने वाटणे*** - *उदास वाटणे.*

***घर बुडविणे*** - *सर्व कुलाचा घात करणे.*

***घर भरणे*** - *फायदा करून घेणे.*

***घर बसणे*** - *कुटुंबास विपत्ती येणे.*

***घडा भरणे*** - *परिणाम भोगण्याची वेळ येणे.*

***घामाघूम होणे*** - *खूप घाम येणे.*

***घायाळ करणे*** - *जखमी करणे.*

***घाम न फुटणे*** - *दया न येणे.*

***घामाचे पाझर फुटणे*** - *खूप घाम येणे.*

***घाम गाळणे*** - *खूप कष्ट करणे.*

***घाट घालणे*** - *बेत करणे.*

***घाव घालणे*** - *प्रहार करणे.*

***घाला घालणे*** - *हल्ला करणे.*

***घात होणे*** - *नाश होणे.*

***घालून पाडून बोलणे*** - *दुसऱ्याला लागेल असे बोलणे.*

***घोडे मारणे*** - *नुकसान करणे.*

***घोडे मध्येच अडणे*** - *प्रगतीत खंड पडणे.*

***घोडे थकणे (घोडे दामटणे)*** - *उद्योग धंदा मंदावणे.*

***घोडे पुढे ढकलणे*** - *स्वतःच्या फायद्यासाठी पुढे सरसावणे.*

***घोडे पेंड खाणे*** - *अडचण निर्माण होणे.*

***घोडा मैदान जवळ असणे*** - *एखाद्या गोष्टीबाबत  कसोटीची वेळ जवळ येणे.*

***घोर लागणे*** - *काळजी निर्माण होणे.*

***घोटाळा होणे*** - *गोंधळ होणे, गडबड होणे.*

***घोषित करणे*** - *जाहीर करणे.*

***घोळ घालणे*** - *त्वरित निर्णय न घेता विचार करीत बसणे.*

***घोरपड येणे*** - *संकट येणे.*

***घोरपडी सारखे चिकटणे*** - *न थकता चिवटपणे काम करीत राहणे.*

***चक्कर मारणे*** - *सहज फिरायला जाणे.*

***चतुर्भुज होणे*** - *लग्न होणे, कैद होणे.*

***चकीत करणे*** - *थक्क करणे, आश्चर्य वाटायला लावणे.*

***चंग बांधणे*** - *निश्चय करणे, निर्धार करणे.*

***चढवून ठेवणे*** - *एखाद्याला वाजवीपेक्षा जास्त महत्व देणे.*

***चव्हाट्यावर आणणे*** - *उघडकीस आणणे, जाहीर करणे.*

***चकित होणे*** - *आश्चर्य वाटणे.*

***चकरा मारणे*** - *फेऱ्या मारणे.*

***चलबिचल सुरू होणे*** - *अनिश्चिता निर्माण होणे.*

***चटका बसणे*** - *फार दुःख होणे.*

***चहा असणे*** - *आस्था असणे.*

***चकाट्या पिटणे*** - *गप्पा-गोष्टी करणे.*

***चकार शब्द ही न काढणे*** - *जराही न बोलणे.*

***चहा करणे*** - *वाहवा करणे.*

***चऱ्हाट वळणे*** - *कंटाळा आणण्याजोगी गोष्ट सांगणे.*

***चटणी उडविणे*** - *नाश करणे.*

***चढाओढ सुरू होणे*** - *स्पर्धा लागणे.*

***चंदन करणे*** - *नाश करणे.*

***चक्री गुंग होणे*** - *अक्कल गुंग होणे.*

***चाहूल लागणे*** - *हालचालीची जाणीव होणे.*

***चालून जाणे*** - *हल्ला करणे.*

***चाकांवर पट्टा चढणे*** - *वेग येणे*

***चारांचा पोशिंदा असणे*** - *कर्ता पुरुष असणे*

***चार पैसे गाठीला बांधणे*** - *थोडी फार बचत करणे*

***चारी दिशा मोकळ्या होणे*** - *पूर्ण स्वातंत्र्य असणे.*

***चालत्या गाड्याला (गाडीस) खीळ घालणे*** - *व्यवस्थित चाललेल्या कामात व्यत्यय येणे.*

***चालना देणे*** - *प्रोत्साहन देणे.*

***चाहूल लागणे*** - *माहीत होणे.*

***चाड असणे*** - *जाणीव असणे.*

***चाड न वाटणे*** - *जाणीव नसणे.*

***चांदी उडणे*** - *त्रेघा उडणे.*

***चालना मिळणे*** - *गती मिळणे.*

***चाळा लावणे*** - *नाद लावणे.*

***चारी मुंड्या चीत होणे*** - *संपूर्ण पराभव होणे.*

***चार हात दूर असणे*** - *एकाद्या गोष्टीपासून हेतू पुरस्सर दूर राहणे.*

***चिंता लागणे*** - *काळजी वाटणे.*

***चिंतातूर होणे*** - *अतिशय काळजी वाटणे.*

***चिरडून टाकणे*** - *नाश करणे.*

***चित्त खेचून घेणे*** - *मन आकर्षित करणे.*

***चित्रा सारखे स्तब्ध असणे*** - *फार शांत असणे.*

***चित्त विचलित होणे*** - *काय करावे ते न सुचणे.*

***चिरी मिरी घेणे*** - *बक्षीस घेणे.*

***चिंताक्रांत बनणे*** - *आत्यंतिक काळजी वाटणे.*

***चिमणीसारखे तोंड करणे*** - *एवढेसे तोंड करणे.*

***चिटपाखरू नसणे*** - *पूर्ण शांतता असणे.*

***चीज करणे*** - *सार्थक करणे.*

***चीतपट मारणे*** - *पूर्ण पराभव करणे.*

***चुटपुट लागणे*** - *मनास टोचणी लागणे, हुरहुर लागणे.*

***चुकल्या चुकल्यासारखे होणे*** - *अस्वस्थता प्राप्त होणे.*

***चुणूक दाखविणे*** - *झलक दाखविणे.*

***चुलीतून निघून वैलात पडणे*** - *आगीतून निघून फोफाट्यात पडणे, लहान संकाटातून मोठ्या संकटात सापडणे.*

***चूल पेटणे*** - *स्वयंपाक केला जाणे.*

***चूल खोळंबणे*** - *उपवास पडणे.*

***चूर होणे*** - *गढ़ूत जाणे, बुडून जाणे.*

***चेव चढणे*** - *जोर चढणे.*

***चेहरा उजळणे*** - *संकट टळल्यामुळे आनंदित होणे.*

***चेहरा आंबट करणे*** - *नाराजी दर्शविणे.*

***चेहरा खुलणे*** - *अतिशय आनंदित होणे.*

***चेहरा पालटणे*** - *रंगरुप बदलणे.*

***चेहरा काळवंडणे*** - *चिंतेने मन खिन्न होणे.*

***चेहऱ्यावर चिंतेची काळजी पसरणे*** - *काळजीने भरून जाणे.*

***चैन न पडणे*** - *अस्वस्थ होणे.*

***चोहोंचा आकडा घालणे*** - *प्रशस्तपणे मांडी घालून बसणे.*

***चोख बजावणे*** - *अगदी बरोबर पार पाडणे.*

***चोरावर मोर होणे*** - *वाईट गोष्टीच्या बाबतीत एखाद्यावर वरकडी करणे.*

***चोराला सोडून संन्याशाला सुळी देणे*** - *खऱ्या अपराध्यास सोडून निरपराधी व्यक्तीस शिक्षा करणे.*

***चौगडे अडणे*** - *जयजयकार अथवा प्रशंसा होणे.*

***चौदावे रत्न दाखविणे*** - *शिक्षा करणे, खूप मार देणे.*

***चौखुर उधळणे*** - *स्वैर सुटणे.*

***छक्के पंजे करणे*** - *हात चलाखीने फसविणे.*

***छत्तीसाचा आकडा असणे*** - *मतभेद असणे.*

***छाती आनंदाने फुलणे*** - *खूप आनंद होऊन अभिमान वाटणे.*

***छाती करणे*** - *धैर्य दाखविणे.*

***छाती धडधडणे*** - *खूप भीती वाटणे.*

***छात्र हरवणे*** - *पोरके होणे.*

***छाती दडपणे*** - *भीती वाटणे.*

***छाती न होणे*** - *धीर न होणे, न धजणे, हिंमत न होणे.*

***छाती दारवत बसणे*** - *भीती न बाळगता बसणे.*

***छाती फुगणे*** - *अभिमान वाटणे.*

***छातीला हात लावून सांगणे*** - *खात्रीपूर्वक सांगणे.*

***छातीचा कोट करणे*** - *प्राणपणाने संकटाशी मुकाबला करणे.*

***छातीत कालवायला लागणे*** - *जीव कासावीस होणे.*

***छाप पडणे*** - *मनावर खोल परिणाम होणे.*

***छेड काढणे*** - *मुद्दाम चिडविणे.*

***जंगजंग पछाडणे*** - *निरनिराळ्या रीतीने प्रयत्न करणे.*

***जगाचा निरोप घेणे*** - *मरण पावणे.*

***जवळीक वाटणे*** - *आपलेपणा वाटणे.*

***जवळ करणे*** - *आपलेसे करणे.*

***जन्माचे दारिद्र्य फिटणे*** - *गरिबी कायमची नाहीशी होणे.*

***जन्माचे सार्थक होणे*** - *सफलता लाभणे.*

***जमीन अस्मानाचे अंतर (फरक) असणे*** - *खूप मोठा फरक असणे.*

***जमीनदोस्त होणे*** - *पूर्णपणे नष्ट होणे.*

***जयजयकार करणे*** - *आनंदाने जयघोष करणे, गुणगान करणे. (जयघोष करणे).*

***जय्यत तयारी करणे*** - *अगदी पूर्ण तयारी करणे.*

***जन्माचे कल्याण करणे*** - *कायमचे हित होणे.*

***जड पावलांनी निघणे*** - *व्यथित होऊन निघणे.*

***जगजाहीर करणे*** - *सर्वांना माहिती करणे.*

***जतन करून ठेवणे*** - *काळजीपूर्वक सांभाळ करणे (जपून ठेवणे)*

***जखमेवर मीठ चोळणे*** - *दुःखद स्थितीत अधिक भर घालणे.*

***जगातून उठणे*** - *सर्वस्वी बुडणे.*

***जगणे जनावरांचे असणे*** - *अत्यंत निकृष्ट प्रतीचे जीवन जगणे.*

***जन्माची माती होणे*** - *जीवन व्यर्थ जाणे.*

***जशास तसे असणे*** - *तोडीस तोड असणे.*

***जगणे नकोसे होणे*** - *जीव त्रासणे.*

***जमदग्नीचा अवतार असणे*** - *अतिशय संतापणे.*

***जाळ्यात गोवणे*** - *अडचणीत पकडणे.*

***जाब विचारणे*** - *उत्तर विचारणे.*

***जावे त्याच्या वंशा तेव्हा कळणे*** - *स्वतः अनुभवून सुखदुःख जाणणे.*

***जिभेस हाड नसणे*** - *वाटेल तसे अमर्याद बोलणे, बेजबाबदारपणे बोलणे.*

***जिवाची तगमग होणे*** - *बेचैन होणे, अस्वस्थ होणे.*

***जिवाचा कान करून ऐकणे*** - *लक्षपूर्वक ऐकणे.*

***जिवावर बेतणे*** - *जीव धोक्यात येणे.*

***जिवापाड सांभाळणे*** - *काळजीपूर्वक सांभाळणे.*

***जिवापाड श्रम करणे*** - *अतिशय कष्ट करणे.*

***जिवात जीव घालणे*** - *धैर्य देणे, काळजी नाहीशी होणे.*

***जिवाचा धडा करणे*** - *निश्चय करणे.*

***जिवाची उलाघाल होणे*** - *जीव खालीवर होणे.*

***जिवाला घोर लागणे*** - *खूप काळजी वाटणे.*

***जिवाचा आटापिटा करणे*** - *खूप धडपड करणे.*

***जिवाची मुंबई करणे*** - *खूप चैन करणे.*

***जिवाचे रान करणे*** - *अतिशय कष्ट करणे.*

***जिवाला जीव देणे*** - *एखाद्यासाठी प्राण देण्याची तयारी असणे.*

***जिवावर उठणे*** - *आत्यंतिक नुकसान करण्यास तयार होणे.*

***जिवात जीव येणे*** - *काळजी नाहीशी होऊन पुन्हा धैर्य येणे, हायसे वाटणे.*

***जिवाची पर्वा न करणे*** - *प्रत्यक्ष प्राणाचीही फिकीर न करणे.*

***जिवावर उदार होणे*** - *प्राण देण्यास तयार असणे.*

***जिवास खाणे*** - *मनाला लागणे.*

***जिव्हारी लागणे*** - *अतिशय वाईट वाटणे.*

***जिद्द असणे*** - *ईर्षा असणे.*

***जिंदगी बरबाद होणे*** - *जीवन नष्ट होणे.*

***जिभेला पाणी सुटणे*** - *खाण्याची इच्छा होणे.*

***जिज्ञासा वाटणे*** - *जाणून घेण्याची तीव्र इच्छा होणे.*

***जिवा पलीकडे जपणे*** - *खूप काळाजी घेणे.*

***जिवावर येणे*** - *नकोसे वाटणे.*

***जिवात जीव असणे*** - *जिवंत असणे, शरीरात प्राण असणे.*

***जिवावर उड्या मारणे*** - *दुसऱ्यावर अवलंबून राहून चैन करणे.*

***जीव अधीर होणे*** - *उतावीळ होणे.*

***जिवाचा हिय्या करणे*** - *हिम्मत बांधणे.*

***जीव की प्राण असणे*** - *प्राणाइतके प्रिय असणे.*

***जीव खाली पडणे*** - *काळजीतून मुक्त होणे.*

***जीव खालीवर होणे*** - *अतिशय काळजी वाटणे, अत्यंत अस्वस्थ वाटणे.*

***जीव गहाण ठेवणे*** - *कोणत्याही त्यागास तयार असणे, सर्वस्व अर्पण करणे.*

***जीव घेऊन पळणे*** - *प्राणाच्या रक्षणासाठी पळणे.*

***जीव टांगणीला लागणे*** - *चिंताग्रस्त होणे, अतिशय काळजी वाटणे.*

***जीव तीळतीळ तुटणे*** - *एखाद्या गोष्टीसाठी तळमळणे, खूप हळहळ वाटणे.*

***जीव धोक्यात घालणे*** - *संकटात उडी घेणे.*

***जीव थोडा थोडा होणे*** - *अतिशय काळजी वाटणे.*

***जीव असणे*** - *प्रेम असणे.*

***जीव मेटाकुटीस येणे*** - *त्रासाने अगदी कंटाळून जाणे.*

***जीव भांड्यात पडणे*** - *काळजी दूर होणे.*

***जीवदान देणे*** - *वाचविणे.*

***जीवनज्योत विझणे*** - *मरण पावणे, आयुष्य संपणे.*

***जीव पाण्यात पडणे*** - *शांत होणे.*

***जीव ओतणे*** - *मनापासून एखादे काम करणे.*

***जीव कासावीस होणे*** - *जीव तळमळणे.*

***जीव लावणे*** - *लळा लावणे.*

***जीवन सर्वस्व देणे*** - *संपूर्ण आयुष्य अर्पण करणे.*

***जीव अर्धा होणे*** - *भयभीत होणे.*

***जीव झाडामाडात असणे*** - *झाडामाडाविषयी विलक्षण जिव्हाळा वाटणे.*

***जीव कानात गोळा करणे*** - *सर्व शक्ती कानात केंद्रित करून ऐकणे.*

***जीव अधीर होणे*** - *उतावीळ होणे.*

***जीव ओवाळून टाळणे*** - *अतिशय प्रेम करणे.*

***जीव गोळा होणे*** - *कासावीस होणे.*

***जीव नकोसा होणे*** - *त्रासणे, कंटाळून जाणे.*

***जीव मुठीत घेणे*** - *अंतःकरण धडधडत असणे.*

***जीभ लांब करून बोलणे*** - *वरिष्ठांशी मर्यादेच्या बाहेर बोलणे.*

***जीभ चावणे (पाघळणे)*** - *एखादी गोष्ट बोलायची नसताना बोलून जाणे.*

***जेरीस आणणे*** - *शरण यायला भाग पाडणे.*

***जेवणावर हात मारणे*** - *भरपूर जेवणे.*

***जोडे फाटणे*** - *खेटे घालणे.*

***जेर करणे*** - *कैद करणे.*

***जो जो करणे*** - *निजविणे.*

***जोखडात बांधणे*** - *बंधनात बांधणे.*

***जोम येणे*** - *शक्ती येणे.*

***जोपासना करणे*** - *काळजीपूर्वक संगोपन करणे.*

***ज्योत पेटवणे*** - *भावना चेतावणे.*

***ज्योतीसम जीवन जगणे*** - *हुतात्मे स्वतः नष्ट होतात व दुसऱ्यांचे कल्याण साधतात तसे करणे.*

***झडप घालणे*** - *अचानक उडी मारणे.*

***झळ लागणे (पोहोचणे)*** - *एखाद्या गोष्टीचा थोडाफार परिणाम भोगावा लागणे.*

***झटापट करणे*** - *झगडणे.*

***झाडून नेणे*** - *जवळ असलेंले सर्व नेणे.*

***झिंग चढणे*** - *नशा चढणे.*

***झक मारणे*** - *मूर्खपणा करणे.*

***झक मारीत करणे*** - *इच्छा असो नसो करणे.*

***झुलत ठेवणे*** - *काही निर्णय न घेता अडकवून ठेवणे.*

***झुंजूमुंजू होणे*** - *उजाडणे.*

***झुंबड उडणे*** - *खूप गर्दी व रेटारेटी होणे.*

***झुलू लागणे*** - *लयीत तालावर डोलणे.*

***झेप घेणे*** - *काही अंतरावरून उडी टाकणे.*

***झेंडा फडकविणे*** - *विजय मिळविणे.*

***झेंडा नाचविणे*** - *मोठे कृत्य केले असे जाहीर करणे.*

***झोप उडविणे*** - *अस्वस्थ करुन सोडणे.*

***झोट धरणी होणे*** - *मारामारी होणे.*

***झोप उडणे*** - *अतिशय भयभीत होणे.*

***टक लावून पाहणे*** - *बारीक नजरेने न्याहाळणे, एकसारखे रोखून पाहणे.*

***टकामका (टकमका) पाहणे*** - *चकित होऊन पाहणे.*

***टंगळमंगळ करणे*** - *काम टाळणे, कामचुकारपणा करणे.*

***टक्केटोणपे खाणे*** - *ठेचा खाणे, चांगल्या वाईट अनुभवाने शहाणपण येणे.*

***ट, फ करणे*** - *अक्षर ओळख होणे.*

***ट ला ट जुळविणे*** - *अक्षराला अक्षर जुळविणे.*

***टकाटका पाहणे*** - *एकासारखे लक्ष देऊन पाहणे.*

***टाहो फोडणे*** - *मोठ्याने आकांत करणे.*

***टाके ढिले होणे*** - *अतोनात श्रमामुळे कोणतेही काम करण्याची अंगी ताकद न राहणे.*

***टाकीचे घाव सोसणे*** - *त्रास सहन करणे.*

***टाकून बोलणे*** - *लागेल असे बोलणे.*

***टाळूवर मिऱ्या वाटणे*** - *अंमल गाजविणे.*

***टाचा घासणे*** - *चरफडणे.*

***टाप असणे*** - *हिंमत असणे.*

***टिवल्या बावल्या करणे*** - *कसातरी वेळ घालविणे.*

***टुरटुर लावणे*** - *थोडा वेळ कर्तृत्वाची ऐट मिरविणे.*

***टेकू देणे*** - *पाठिंबा देणे.*

***टेकीला येणे*** - *दमणे, थकणे, त्रासून जाणे.*

***टेंभा पाजळणे*** - *डौल मारणे.*

***टेंभा मिरविणे*** - *दिमाख दाखविणे, ऐट दाखविणे.*

***टोमणा मारणे*** - *मनाला लागेल असे बोलणे.*

***ठपका देणे*** - *दोष देणे.*

***ठाण मांडणे*** - *निर्धाराने उभे राहणे, निश्चयपूर्वक स्थिर राहणे.*

***ठाव घेणे*** - *मनाची परीक्षा करणे.*

***ठाणबंद करणे*** - *एका जागेवर उभे करणे.*

***ठिय्या देणे*** - *(एका जागेवरून) मुळीच न हलणे.*

***डबघाईला येणे*** - *वाईट अवस्था येणे.*

***डल्ला मारणे*** - *लुटणे.*

***डांगोरा पिटणे*** - *जाहीर करणे.*

***डाव साधणे*** - *संधीचा फायदा घेऊन इच्छित कार्य साधणे, योजलेल्या युक्तीने इष्ट वस्तू मिळविणे.*

***डाळ शिजणे*** - *दाद लागणे.*

***डाळ शिजू देणे*** - *चालू देणे.*

***डागडुजी करणे*** - *दुरुस्ती करणे.*

***डावे उजवे करणे*** - *व्यवहार ज्ञान कळणे.*

***डुलत डुलत चालणे*** - *आळसावलेल्या मनःस्थितीत हळूहळू चालणे.*

***डुबी देणे*** - *पाण्यात खाली क्षणभर बुडविणे.*

***डोळे वटारणे (करणे)*** - *डोळे मोठे करून रागाने पाहणे.*

***डोळे पांढरे होणे*** - *अत्यंत घाबरणे, मरायला टेकणे.*

***डोळयात प्राण आणणे*** - *एखाद्या गोष्टीसाठी अतिशय आतुर होणे.*

***डोळे फाडून बघणे*** - *तीक्ष्ण नजरेने पाहणे, टक लावून पाहणे.*

***डोळे चढवून बोलणे*** - *संतापाने बोलणे.*

***डोळे निवणे*** - *समाधान होणे.*

***डोळ्याचे पारणे फिटणे*** - *एखादे दृश्य पाहून मनाचे समाधान होणे.*

***डोळा चुकविणे*** - *भेट घेण्याचे टाळणे, हातोहात फसविणे.*

***डोळ्यात धूळ फेकणे*** - *सहजा सहजी फसविणे.*

***डोळ्यात खुपणे (सलणे)*** - *सहन न होणे.*

***डोळ्यास डोळा लागणे*** - *झोप येणे.*

***डोळ्यात खून चढणे*** - *त्वेश येणे.*

***डोळे फाटणे*** - *आश्चर्यचकित होणे.*

***डोळे आनंदाने डबडबून जाणे*** - *डोळयात आनंदाश्रू येणे.*

***डोळ्यात प्राण ठेवणे*** - *अंतसमयी आतुरतेने वाट पाहणे.*

***डोळ्यावर कातडे ओढणे*** - *जाणूनबुजून दुर्लक्ष करणे.*

***डोळे खिळून राहणे*** - *एकसारखे एखाद्या गोष्टीकडे बघत राहणे.*

***डोळे दिपविणे (दिपणे)*** - *थक्क करून सोडणे, आश्चर्यचकित होणे.*

***डोळे पाणावणे*** - *डोळ्यात पाणी येणे, डोळ्यात आनंदाश्रू येणे.*

***डोळ्यात प्राण येणे*** - *मरायला टेकणे, अतिशय आतूर होणे.*

***डोळा लागणे*** - *डुलकी लागणे, झोप लागणे.*

***डोळे उघडणे*** - *अनुभवाने शहाणे होणे, सावध होणे, पश्चात्ताप होणे.*

***डोळे खडकन उघडणे*** - *ताबडतोब खरे काय ते समजणे, जागे होणे.*

***डोळे भरून येणे*** - *भावना दाटून आल्यामुळे डोळयात पाणी येणे.*

***डोळे भरून पाहणे*** - *समाधान होईपर्यंत पाहणे.*

***डोळे झाक करणे*** - *दुर्लक्ष करणे.*

***डोळ्यात भरणे*** - *पसंत पडणे.*

***डोळे फुटणे*** - *आंधळे होणे.*

***डोळे ताणून पाहणे*** - *लक्षपूर्वक पाहणे.*

***डोळे फिरणे*** - *गर्वाने ताठणे.*

***डोळे विस्फारून बघणे*** - *आश्चर्याने बघणे.*

***डोळ्यात तेल घालून जपणे*** - *अतिशय काळजी घेणे, दक्ष राहणे.*

***डोळ्यातून आगीच्या ठिणग्या पडणे*** - *अतिशय राग येणे.*

***डोळे थंड होणे*** - *समाधान होणे.*

***डोळे घालणे*** - *खुणेने सुचविणे.*

***डोळ्यांत साठविणे*** - *चौकशी करणे.*

***डोळे वाटेकडे लागणे*** - *आतुरतेने वाट पाहणे.*

***डोळे मिटणे*** - *मृत्यू येणे.*

***डोळ्यांच्या खाचा होणे*** - *आंधळे होणे.*

***डोळ्यात गंगा यमुना येणे*** - *रडू येणे, अश्रू ओघळणे.*

***डोळ्यात प्राण उरणे*** - *अगदी मृत्यू पंथाला लागणे.*

***डोळ्यावर धूर येणे*** - *संपत्ती वगैरे गोष्टींनी उन्माद येणे.*

***डोळ्याशी डोळा भिडविणे*** - *नजर भिडविणे.*

***डोळा असणे*** - *एखादी वस्तू मिळावी अशी इच्छा असणे.*

***डोक्यात घोळणे*** - *एक सारखे मनात येणे.*

***डोक्यावर खापर फोडणे*** - *एखाद्यावर निष्कारण ठपका ठेवणे.*

***डोक्यावर मिरी वाटणे*** - *वरचढ होणे.*

***डोके खाजविणे*** - *विचार करणे.*

***डोक्याला हात लावून बसणे*** - *चिंताग्रस्त होऊन बसणे.*

***डोक्यावर बसविणे*** - *लायकीपेक्षा अधिक मान देणे.*

***डोक्यावरचे खांद्यावर येणे*** - *ओझे, कर्ज इ. हलके होणे.*

***डोके टेकणे*** - *हताश होणे.*

***डोके सुन्न होणे*** - *काही एक विचार न सुचणे.*

***डोक्यात थैमान घालणे*** - *एकच विचार पुन्हा पुन्हा मनात येऊन मन अस्वस्थ होणे.*

***डोके वर काढणे*** - *उदयास येणे.*

***डोके मारणे*** - *शिरच्छेद करणे.*

***डोके बधीर होणे*** - *काय करावे ते न सुचणे.*

***डोक्यावरून पाणी फिरणे*** - *एखाद्या गोष्टीचा कळस होणे, परमावधी होणे.*

***डोईजड वाटणे*** - *शिरजोर होणे, भारी असणे.*

***डोईवर हात ठेवणे*** - *आशीर्वाद देणे.*

***डोक्यावरून पाणी जाणे*** - *व्यर्थ जाणे.*

***डोक्यावर बसणे*** - *वरचढ होणे.*

***डोईवर हात फिरविणे*** - *फसविणे.*

***डोईवर शेकणे*** - *नुकसान पोचणे.*

***डोंगर पोखरून उंदीर काढणे*** - *मोठे प्रयास करून थोडी कार्यनिष्पत्ती होणे.*

***ढवळाढवळ करणे*** - *हस्तक्षेप करणे.*

***ढसढसा रडणे*** - *खूप रडणे.*

***ढुंकून पाहणे*** - *मुद्दाम डोके वळवून पाहणे.*

***ढोर कष्ट करणे*** - *खूप कष्ट करणे.*

***तळपायाची आग मस्तकात जाणे*** - *अतिशय संताप होणे.*

***तहान लागली की विहीर खणणे*** - *गरज लागली की धावाधाव करणे.*

***तळहातावर शीर घेणे*** - *जिवाची पर्वा न करता लढणे, जिवावर उदार होणे.*

***तंबी देणे*** - *धाक घालणे, दटावणे.*

***तटस्थ राहणे*** - *अलिप्त राहणे, आश्चर्याने स्तब्ध होणे.*

***तडीस नेणे (जाणे)*** - *यशस्वी रीतीने एखादे काम पूर्ण करणे.*

***तहान भूक विसरणे*** - *तन्मय होणे, तल्लीन होणे.*

***तळ देऊन बसणे*** - *सैन्याचा मुक्काम देणे.*

***तडाखा देणे*** - *प्रहार करणे, आघात करणे.*

***तळ देणे*** - *मुक्काम करणे.*

***तलवार गाजवणे*** - *पराक्रम करणे.*

***तळहाताच्या फोडासारखे वागविणे*** - *काळजीपूर्वक सांभाळणे.*

***तळीराम गार करणे*** - *जवळ द्रव्य जमवून मनाची तृप्ती करणे.*

***तरातरा चालणे*** - *भरभर चालणे.*

***तडाख्यापासून सुटणे*** - *तावडीतून सुटणे.*

***तत्वज्ञान लंगडे पडणे*** - *कोणताही विचार लंगडा (अपुरा) वाटणे.*

***तळी भरणे*** - *मदत करणे.*

***तमा न वाटणे*** - *पर्वा न वाटणे. (तमा नसणे)*

***तळी उचलणे*** - *अनेकजण मिळून एखाद्याला अधिकारच्युत करणे.*

***तदाकार होणे*** - *एकरुप होणे.*

***तारांबळ उडणे*** - *अतिशय घाई होणे, गडबड उडणे.*

***ताणून देणे*** - *निवांत झोपणे.*

***तावडीत सापडणे*** - *कचाट्यात सापडणे.*

***तापल्या तव्यावर पोळी भाजून घेणे*** - *मिळालेल्या संधीचा फायदा उठविणे.*

***ताकाला जाऊन भांडे लपविणे*** - *एखाद्या गोष्टीबद्दल इच्छा असूनही लज्जेने ती इच्छा नाही असे दाखविणे.*

***ताव चढणे*** - *जोर चढणे, राग येणे.*

***तावडीतून सुटणे*** - *कचाट्यातून सुटणे.*

***ताळमेळ नसणे*** - *एका गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीशी काहीही संबंध नसणे.*

***ताळ्यावर आणणे*** - *योग्य समज देणे.*

***ताटाखालचे मांजर होणे*** - *अंकित जाणे, लाचार होणे.*

***ताल (ताळ) सोडणे*** - *घरबंद नसणे.*

***तारे तोडणे*** - *वेड्यासारखे भाषण करणे.*

***तार छेडली जाणे*** - *भावना उत्कटपणे जागृत होणे.*

***तांडवनृत्य करणे*** - *थयथयाट करणे.*

***ताप देणे*** - *त्रास देणे.*

***ताबूत थंडे होणे*** - *आवेश ओसरणे.*

***त्राण न उरणे*** - *थकून जाणे.*

***तिष्ठत बसणे*** - *वाट पहात बसणे.*

***तिलांजली देणे*** - *वस्तूवरचा हक्क सोडणे.*

***तिखटमीठ लावून सांगणे*** - *अतिशयोक्ती करून सांगणे.*

***तिरपीट उडणे*** - *गोंधळून जाणे.*

***तिळपापड होणे*** - *अंगाचा संताप होणे.*

***तुटून पडणे*** - *निकाराचा हल्ला करणे, जोराने कामास लागणे.*

***तुणतुणे वाजवणे*** - *क्षुल्लक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगत सुटणे.*

***तुच्छ लेखणे*** - *हलके मानणे, कमी मानणे.*

***तुच्छतेंने पाहणे*** - *तिरस्काराने पाहणे.*

***तूट येणे*** - *नुकसान होणे.*

***तेळपट येणे*** - *नाश होणे.*

***त्रेधा तिरपीट उडणे*** - *धांदल उडणे.*

***त्रेधा उडणे*** - *हाल होणे.*

***तोरा मिरविणे*** - *दिमाख दाखविणे.*

***तोलास तोल देणे*** - *बरोबरी करणे.*

***तोफ डागणे*** - *रागावून खूप बोलणे, तोफेतून गोळे सोडणे.*

***तोल सुटणे*** - *ताबा सुटणे.*

***तोफेच्या तोंडी देणे*** - *संकाटात लोटणे.*

***तोड नसणे*** - *उपाय नसणे.*

***तोडगा काढणे*** - *मार्ग शोधून काढणे. (तोड काढणे)*

***तोंड टाकणे*** - *वाटेल ते बोलणे.*

***तोंड गोड करणे*** - *आनंद व्यक्त करण्यासाठी गोड पदार्थ खायला देणे.*

***तोंड शिवणे (मूग गिळून गप्प)*** - *गप्प राहणे, काही न बोलणे.*

***तोंड देणे*** - *सामना करणे, झुंजणे.*

***तोंडात काही न राहणे*** - *माहीत असलेली गोष्ट मनात ठेवता न येणे.*

***तोंडाचा पट्टा सुरु करणे*** - *एक सारखे बोलत राहणे.*

***तोंडचे पाणी पळणे*** - *अतिशय घाबरणे, भयभीत होणे.*

***तोंडाची वाफ दवडणे*** - *निष्फळ बोलणे.*

***तोंडात बोट घालणे*** - *आश्चर्य वाटणे, अश्चर्यचकित होणे.*

***तोंडाला पाने पुसणे*** - *चांगलेच फसविणे, दगा देणे.*

***तोंडाला पाणी सुटणे*** - *हाव निर्माण होणे, लोभ उत्पन्न होणे.*

***तोंडावाटे ब्र न काढणे*** - *एक ही शब्द न उच्चारणे.*

***तोंड लागणे*** - *युद्धास सुरुवात होणे.*

***तोंड सोडणे*** - *अपशब्द बोलणे, वाटेल तसे बोलणे.*

***तोंडाला कुलूप लावणे*** - *एकदम गप्प बसणे.*

***तोंडात शेण घालणे*** - *समाजात छिःथू होणे, फजिती होणे.*

***तोंडावर येणे*** - *अगदी जवळ येणे.*

***तोंड काळे करणे*** - *दृष्टीआड होणे, नाहीसे होणे.*

***तोंडाला मिठी बसणे*** - *वीट येणे, कंटाळा येणे.*

***तोंड गोरेमोरे होणे*** - *ओशाळणे.*

***तोंड चुकविणे*** - *तोंड लपविणे.*

***तोंड रंगविणे*** - *मारणे.*

***तोंडी लागणे*** - *उलट उत्तर देणे.*

***तोंडी खीळ पडणे*** - *तोंड बंद होणे.*

***तोंडास तोंड लागणे*** - *भांडणाला सुरवात करणे.*

***तोंड फिरविणे*** - *नाराजी प्रकट करणे.*

***तोंड दाबून बुक्क्यांचा मार*** - *मुकाट्याने दुःख सहन करणे.*

***तोंड आवरणे*** - *गप्प बसणे.*

***तोंडावाटे ब्र काढण्याची चोरी असणे*** - *एकही शब्द उच्चारण्याची सोय नसणे.*

***तोंडावर सांगणे*** - *समक्ष सांगणे.*

***तोंडास तोंड देणे*** - *प्रत्युत्तर करून भांडण वाढविणे.*

***तोंड सुख घेणे*** - *यथेच्छ बोलणे.*

***तोंड सुरु होणे*** - *बोलणे सुरू होणे.*

***तोंड सांडणे*** - *अमर्याद बोलणे.*

***तोंडाचे बोळके होणे*** - *तोंडातले दात पडणे.*

***तोंडावर तुकडा टाकणे*** - *गप्प बसावे म्हणून थोडेसे काही देणे.*

***तोंडावर हात फिरविणे*** - *गोड बोलून फसविणे.*

***तोंड धरणे*** - *बोलण्याची मनाई करणे.*

***तोंड दिसणे*** - *बोलणारा वाईट ठरणे.*

***तोंड दाबणे*** - *उलट बोलू न देणे.*

***तोंड घालणे*** - *दोघांच्या संभाषणात तिसऱ्याने बोलू लागणे.*

***तोंड पहात बसणे*** - *विवंचनेत पडणे.*

***तोंड वाजविणे*** - *बडबडणे.*

***तोंड करणे*** - *रागावणे.*

***तोंडघशी पाडणे*** - *फशी पडणे, जाळ्यात अडकणे, विश्वासघात करणे.*

***तोंड उतरणे*** - *तोंड निस्तेज दिसणे.*

***तोंड उजळ करणे*** - *कलंक काढून टाकणे, कीर्ती मिळविणे.*

***तोंड आंबट करणे*** - *निराशेमुळे तोंड वाईट करणे.*

***तोंड पसरणे*** - *याचना करणे.*

***तोंड पूजा करणे*** - *खोटी स्तुती करणे.*

***थयथय नाचणे*** - *अधीरपणे नाचणे.*

***थक्क होणे*** - *आश्चर्य वाटणे, चकित होणे.*

***थंडा फराळ करणे*** - *काही न खाता राहणे.*

***थांग न लागणे*** - *कल्पना न येणे.*

***थुंकी झेलणे*** - *हांजी हांजी करणे, खुशामत करणे.*

***थेर करणे*** - *वाईट गोष्ट करणे.*

***थैमान घालणे*** - *आरडाओरड करणे.*

***थोपवून धरणे*** - *थांबवून ठेवणे.*

***थोबाड रंगविणे*** - *तोंडात मारणे.*

***थोतांड निर्माण करणे*** - *लबाडीने खोट्या गोष्टी करणे.*

***थोबाड फोडणे*** - *तोंडात मारणे.*

***दंडवत घालणे*** - *नमस्कार घालणे.*

***दरारा वाटणे*** - *जरब वाटणे.*

***दगा देणे*** - *फसविणे.*

***दबा धरून बसणे*** - *एखादी गोष्ट अनपक्षित रीतीने पार पाडण्यासाठी टपून बसणे, आड लपून बसणे.*

***दरबार बरखास्त करणे*** - *दरबार संपविणे.*

***दणाणून जाणे*** - *व्यापून जाणे, भरून जाणे.*

***दृष्ट लागणे*** - *नजर लागणे.*

***दृग्गोचर होणे*** - *दिसणे.*

***दवंडी पिटणे*** - *जाहीर करणे.*

***दृष्टीआड होणे*** - *नजरे आड होणे, दुर्लक्षित होणे.*

***दृष्टीभेट होणे*** - *एकमेकाकडे पाहणे.*

***दगाबाजी करणे*** - *विश्वासघात करणे.*

***दृष्टीच्या टप्प्याय येणे*** - *दिसू शकेल इतके जवळ येणे.*

***दत्त म्हणून उभे राहणे*** - *एकाएकी हजर होणे, अचानक उपस्थित होणे.*

***दम न निघणे*** - *अतिशय आतुर होणे.*

***दशा होणे*** - *स्थिती होणे.*

***दृष्टीत न मावणे*** - *अपेक्षेपेक्षा खूप मोठे जाणवणे.*

***दृष्टीला दृष्टी भिडविणे*** - *टक लावून पाहणे.*

***दडी मारणे*** - *लपून बसणे.*

***दम धरणे*** - *धीर धरणे.*

***दम मारणे*** - *झुरका घेणे, एखाद्यावर रागावणे.*

***दृष्टी खिळून राहणे*** - *नजर स्थिर होणे.*

***दगडाखाली हात सापडणे*** - *अडचणीत सापडणे.*

***दाद न देणे*** - *पूर्णपणे दुर्लक्ष करणे, न जुमानणे.*

***दाद लागणे*** - *न्याय मिळणे.*

***दाद लावून घेणे*** - *न्याय मिळविणे.*

***दाद मागणे*** - *तक्रार करून किंवा गाऱ्हाणे सांगून न्याय मागणे.*

***दातखिळी (दातखीळ) बसणे*** - *बेशुध्द होणे, तोंड उघडता न येणे, गप्प राहणे, खूप घाबरणे.*

***दात धरणे*** - *वैर बाळगणे, व्देश करणे.*

***दाढी धरणे*** - *विनवणी करणे.*

***दात कोरून पोट भरणे*** - *मोठ्या व्यवहारात कृपणपणाने थोडीशी काटकसर करणे.*

***दातास दात लावून बसणे*** - *काही न खाता उपाशी बसणे.*

***दाताच्या कण्या करणे*** - *अनेकवेळा विनंती करून सांगणे.*

***दाती तृण धरणे*** - *शरणागती पत्करणे, अभिमान सोडून शरण जाणे.*

***द्राविडी प्राणायाम करणे*** - *सरळ मार्ग सोडून लांबच्या मार्गाने जाणे.*

***दातओठ खाणे*** - *रागाने चरफडने.*

***दादाबाबा करणे*** - *गोड बोलून मन वळविणे.*

***दाणे टाकून कोंबडे झुंजविणे*** - *पदरचे खर्चून भांडण लावून देणे.*

***दाद देणे*** - *प्रतिसाद देणे.*

***दात काढणे*** - *हसणे.*

***दातावर मांस नसणे*** - *द्रव्यानुकूलता नसणे.*

***दाताच्या घुगऱ्या होणे*** - *फार बोलावे लागणे.*

***दाताच्या कण्या होणे*** - *एखाद्या गोष्टीमुळे त्रास होणे.*

***दात विचकणे*** - *याचना करणे.*

***दात वासून पडणे*** - *दुखण्याने अंथरूणाला खिळून राहणे.*

***दात खाणे*** - *द्वेषाचा अविर्भाव दाखविणे.*

***दात पाडणे*** - *वादात पराजय करणे.*

***दावणीला बांधणे*** - *ताब्यात ठेवणे.*

***दामटी भरणे*** - *दुरवस्ता होणे.*

***दिवस फिरणे*** - *वाईट दिवस येणे.*

***दिवस पालटणे*** - *चांगले दिवस येणे.*

***दिग्विजय करणे*** - *स्वतःच्या पराक्रमाने चारी दिशातील लोकांना जिंकणे.*

***दिङ्मूढ होणे*** - *काय करावे ते न सुचणे.*

***दिरंगाई करणे*** - *उशीर करणे.*

***दिवे लावणे*** - *दुर्लौकिक संपादन करणे.*

***दिवसा मशाल लावणे*** - *पैशाची उधळपट्टी करणे.*

***दिवे ओवाळणे*** - *कमी किमतीचा समजणे.*

***दिव्यत्वचा साक्षत्कार होणे*** - *दैवी अनुभव येणे.*

***दिव्य करणे*** - *लोकोत्तर गोष्ट करणे.*

***दीनवाणे होणे*** - *काकुळतीला येणे.*

***दीक्षा घेणे*** - *एखादी आचार पद्धती स्वीकरणे.*

***दुधात साखर पडणे*** - *अधिक चांगले घडणे.*

***दुःखावर डागण्या देणे*** - *दुःखी माणसाला वाईट वाटेल असे बोलून आणखीन दुःख देणे.*

***दुकान काढणे*** - *दुकान सुरू करणे.*

***दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिणे*** - *दुसऱ्यांच्या तंत्राने चालणे.*

***दुःखाची छाया पसरणे*** - *सगळीकडे दुःखी वातावरण निर्माण होणे.*

***दुवा देणे*** - *एखाद्याचे भले व्हावे असे मनापासून चिंतणे.*

***दुसरी गती नसणे*** - *दुसरा उपाय नसणे.*

***दुर्दशा होणे*** - *अत्यंत वाईट अवस्था होणे.*

***दुसऱ्यांच्या तोंडाकडे बघणे*** - *दुसऱ्यांच्या आश्रयाची अपेक्षा करणे.*

***दुःख वेशीला टांगणे*** - *सर्वांना कळेल असे वागणे.*

***दुधाचे बळ पणाला लावणे*** - *आईला धन्य वाटणे.*

***दुरावा निर्माण करणे*** - *अंतर निर्माण करणे.*

***दुधाचे दात जाऊन पक्के दात येणे*** - *बालपण संपून कुमार अवस्था येणे.*

***दुरान्वघे संबंध नसणे*** - *कुठल्याही अर्थाने संबंध नसणे.*

***दुखणे विकोपास जाणे*** - *आजार खूप वाढणे.*

***दूर लाथाडणे*** - *तिरस्कार करणे.*

***देवाघरी निघून जाणे*** - *निधन पावणे.*

***देखभाल करणे*** - *काळजी घेणे.*

***देश पेटणे*** - *एखादी चळवळ देशभर पसरणे.*

***देव्हाऱ्यात बसविणे*** - *एखाद्या व्यक्तीस देव समजून पूजा करणे.*

***देव देवऱ्यात नसणे*** - *जो मालक तो स्थानावर नसणे, फिकिरीत असणे.*

***देहभान विसरणे*** - *स्वतःची जाणीव न राहणे.*

***दैना उडणे*** - *दुर्दशा होणे.*

***दोन हात करणे*** - *सामना देणे, मारामारी करणे.*

***दोन हातांचे चार हात होणे*** - *विवाह होणे.*

***धडे देणे*** - *शिकविणे.*

***धरणे धरणे*** - *हट्ट धरून बसणे.*

***धस्स होणे*** - *अतिशय भीती वाटणे, अचानक वाईट गोष्ट ऐकताच जिवाला धक्का बसणे.*

***धन शून्यावर येणे*** - *संपत्ती नाहीशी होणे.*

***धडक देणे*** - *जाऊन आदळणे.*

***धन्यता वाटणे*** - *मोठेपणा वाटणे.*

***धन्य वाटणे*** - *पार पडलेल्या कामामुळे समाधान वाटणे, आनंद होणे.*

***धर्मावर सोमवार सोडणे*** - *परभारे गोष्टी भागवून स्वतःला मोठेपणा मिळविणे.*

***धमाल उडणे*** - *एकच गडबड उडणे.*

***धाय मोकलून रडणे*** - *जोरजोराने रडणे.*

***धारातीर्थी पडणे*** - *शूराचे मरण येणे, रणांगणावर मृत्यू येणे.*

***धाबे दणाणणे*** - *खूप घाबरणे.*

***ध्यास घेणे*** - *अतिशय उत्कट इच्छा बाळगणे. (ध्यास लागणे)*

***धाब्यावर बसविणे*** - *एखादी गोष्ट मान्य न करणे, पूर्णपणे दुर्लक्षकरणे.*

***धापा टाकणे*** - *खूप दमल्यामुळे जोराते श्वासोच्छ्वास करणे.*

***धाव घेणे*** - *मदत घेण्यासाठी जवळ जाणे.*

***ध्यानात बाळगणे*** - *लक्षात ठेवणे.*

***धास्ती खाणे*** - *भीती वाटणे.*

***धिंडवडे काढणे*** - *अप्रतिष्ठा करणे, दुर्दशा करणे.*

***धि:कार करणे*** - *निषेध करणे.*

***धीर खचणे (धीर सुटणे)*** - *हिंमत नाहीशी होणे.*

***धीर चेपणे*** - *भीती जाणे.*

***धीर होणे*** - *हिंमत होणे.*

***धीर सोडणे*** - *हिंमत सोडणे.*

***धीर धरणे*** - *चिकाटी बाळगणे.*

***धुव्वा उडविणे*** - *फार मोठा पराभव करणे, नाश करणे.*

***धुंद होणे*** - *मग्न होणे, गुंग होणे.*

***धुमश्चक्री घालणे*** - *गोंधळ घालणे, दांडगाई करणे.*

***धूम ठोकणे*** - *वेगाने पळून जाणे.*

***धूळ चारणे*** - *पराभव करणे.*

***धूळ खात पडणे*** - *वाया जाणे.*

***धूळधाण करणे*** - *संपूर्ण नाश करणे.*

***नजर टाकणे*** - *एक क्षण पाहणे, हेतुतः पाहणे.*

***नड भागविणे*** - *गरज भागविणे.*

***नजरेत भरणे*** - *उठून दिसणे.*

***नजर रोखून बघणे*** - *बारीक नजरेने बघणे.*

***नजर करणे*** - *भेट देणे.*

***नक्राश्रू ढाळणे*** - *खोटे अश्रू ढाळणे (नक्र - सुसर).*

***नजर खिळून राहणे*** - *विशिष्ट गोष्टीकडे सतत बघणे.*

***नक्षा उतरविणे*** - *गर्व उतरविणे, घमेंड जिरविणे.*

***नवे करणे*** - *शुभारंभ करणे.*

***नस्ती उठाठेव करणे*** - *नको असलेला उद्योग करणे.*

***नरडीचा घोट घेणे*** - *ठार मारणे.*

***नशा चढणे*** - *धुंद होणे.*

***नजर फाटणे*** - *भीषण दृश्य पाहून स्तिमित होणे.*

***नजर असणे*** - *लक्ष असणे.*

***नजरेआड करणे*** - *डोळेझाक करणे, दुर्लक्ष करणे.*

***नमूद करणे*** - *दाखल करणे.*

***नशिबातील वणवण संपणे*** - *आयुष्यातील कष्ट व दगदग संपणे.*

***नंगानाच सुरु होणे*** - *धुमाकूळ घालणे.*

***न भूतो न भविष्यती होणे*** - *मागे कधी झाली नही व पुढे कधी ही होणार नाही अशी अपूर्व गोष्ट होणे.*

***नाक कापणे*** - *पराभव करणे, गर्व उतरणे.*

***नाक घासणे*** - *स्वतःचे कार्य साधण्यासाठी दुसऱ्यांचे पाय धरणे, शरण जाणे.*

***नाक ठेचणे*** - *खोड मोडणे, नक्षा उतरणे.*

***नाक मुरडणे*** - *नापसंती दाखविणे.*

***नाक वर असणे*** - *ऐट किंवा दिमाख असणे.*

***नाकाला मिरच्या झोंबणे*** - *एखाद्याचे वर्म काढल्यामुळे त्याला राग येणे, चिडणे, मनाला फार लागणे.*

***नाकाने कांदे (वांगी) सोलणे*** - *स्वतःमध्ये दोष असूनही उगाच बढाया मारणे, खोटी प्रतिष्ठा मिरविणे.*

***नाकापेक्षा मोती जड होणे*** - *गौण वस्तूला मुख्य वस्तूपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होणे.*

***नाकाशी सूत धरणे*** - *मृत्यूपंथास लागणे.*

***नाकी नऊ येणे*** - *फार त्रास होणे, मेटाकुटीस येणे.*

***नाक खाली होणे*** - *गर्व नाहीसा करणे.*

***नाक खाली पाडणे*** - *गर्व नाहीसा करणे.*

***नाकावर राग येणे*** - *लवकर चिडणे.*

***नाकासमोर चालणे*** - *सरळ वागणे.*

***नाकेबंदी करणे*** - *पक्का बंदोबस्त करणे.*

***नाकदुराई काढणे*** - *नम्रतेने प्रार्थना करणे.*

***नाक धरून बसणे*** - *एखाद्या कामात गुंतलेला असणे.*

***नाकात काड्या घालणे*** - *चीड येईल असे कृत्य करणे.*

***नाकावर माशी बसू न देणे*** - *चिडीस जाणे, अपमान सहन न करणे.*

***नाकास चुना लावणे*** - *विरोध असूनही कार्य साधणे.*

***नाकावर असणे*** - *अगदी तयार असणे.*

***नाकातले केस जळणे (नाक जळणे)*** - *फार दुर्गंधी येणे.*

***नांगी टाकणे*** - *हातपाय गाळणे.*

***नाखुष होणे*** - *नाराज होणे.*

***नावे ठेवणे*** - *टीका करणे, दोष देणे.*

***नामकरण करणे*** - *विधीपूर्वक नाव ठेवणे, नाव जाहीर करणे.*

***नाव काढणे*** - *कीर्ती मिळविणे.*

***नाव होणे*** - *प्रसिद्ध होणे.*

***नावाला बट्टा लावणे*** - *कमीपणा आणणे.*

***नावाखाली मोडणे*** - *समाविष्ट करणे.*

***नाद सोडणे*** - *एखादी गोष्ट मनातून काढून टाकणे.*

***नामोहरण करणे*** - *पराभूत करणे.*

***नादी लावणे*** - *वाईट मार्गाला लावणे.*

***नांदी करणे*** - *शुभारंभ करणे.*

***नामानिराळे राहणे*** - *अलिप्त राहणे.*

***नाकावर पाय देणे*** - *पर्वा न करणे.*

***नाक झाडणे*** - *फजिती करणे.*

***नाका ओठावर जेवणे*** - *चोखंदळपणाने जेवणे.*

***नाड्या ओढू लागणे*** - *नाशाचा काळ जवळ येऊन ठेपणे.*

***नामशेष होणे*** - *नावही न राहणे.*

***नावलौकिक मिळविणे*** *- कीर्ती संपादन करणे.*

***नाट लावणे*** *- अपशकून करणे.*

***नाव न घेणे*** *- अलिप्त राहणे.*

***न्याहाळून पाहणे*** *- बारकाईने पाहणे.*

***निपचित पडणे*** *- हालचाल न करता पडणे.*

***निधन होणे*** *- मरण पावणे.*

***निश्वास सोडणे*** *- सुस्कारा सोडणे.*

***निभावून जाणे*** *- सुरळीतपणे पार पडणे.*

***निभावून नेणे*** *- कशीबशी वेळ काढणे.*

***निश्चल उभे राहणे*** *- स्तब्ध उभे राहणे.*

***निश्चेष्ट पडणे*** *- हालचाल न करता पडणे.*

***निद्रेच्या आधीन होणे*** *- गाढ झोपी जाणे.*

***निर्णय घेणे*** *- ठरविणे.*

***निवास करणे*** *- वास्तव्य करणे.*

***निवारण होणे*** *- दूर केले जाणे.*

***निष्पन्न न होणे*** *- काही परिणाम न होणे.*

***निष्क्रीय बनणे*** *- काहीही न करता स्वस्थ बसणे.*

***निकाल लावणे*** *- शेवट करणे.*

***निभाव लागणे*** *- टिकाव लागणे*

***निवळू लागणे*** *- शुद्ध होणे, स्पष्ट होणे*

***निक्षून सांगणे*** *- आग्रहपूर्वक सांगणे, बजावून सांगणे.*

***निश्चय करणे*** *- निर्धार करणे.*

***निजकवेत घेणे*** *- स्वतःच्या मिठीत घेणे.*

***नियम धाब्यावर बसविणे*** *- नियम मुद्दाम पालन न करणे.*

***निर्भर्त्सना करणे*** *- उपहास करणे.*

***निगा राखणे*** *- काळजी घेणे.*

***निर्वाणीचा संदेश देणे*** *- अखेरचा इशारा देणे.*

***निःपात करणे*** *- नाश करणे, नायनाट करणे (निःपात होणे).*

***नेत्रा समोर सूर्य फिरणे*** *- दुःखाने अस्वस्थ होणे.*

***नेतृत्व करणे*** *- पुढारीपण पत्करणे.*

***नेटाने काम करणे*** *- निश्चयाने काम करणे.*

***पडझड होणे*** *- जमिनीवर कोसळणे.*

***पणाला लावणे*** *- प्रयत्नाची शर्त करणे.*

***पदरचे घालणे*** *- भरती करणे.*

***पदरी असणे*** *- आश्रयास असणे.*

***पदरात घालणे*** *- चूक पटवून देणे, स्वाधीन करणे.*

***पदरी पडणे*** *- मिळणे, प्राप्त होणे.*

***पराचा कावळा करणे*** - *एखादी गोष्ट फुगवून सांगणे, अतिशयोक्ती करणे.*

***पदरमोड करणे*** - *स्वतःचा पैसा खर्च करणे.*

***पगडा (पडणे, बसणे, असणे)*** - *खूप प्रभाव पडणे.*

***पश्चात्ताप होणे*** - *हातून घडलेल्या चुकीबद्दल वाईट वाटणे.*

***पत्ता नसणे*** - *माहीत नसणे.*

***पचका होणे*** - *काम बिघडणे.*

***पदरात घेणे*** - *स्वीकारणे, अपराध माफ करणे.*

***पदर पसरणे*** - *विनवणी करणे.*

***पराक्रमाची शर्त करणे*** - *जास्तीत जास्त शौर्य दाखविणे.*

***परिधान करणे*** - *अंगावर घालणे.*

***पर्वा करणे*** - *काळजी घेणे, विशेष विचार करणे.*

***पर्वा नसणे*** - *काळजी नसणे, फिकीर नसणे.*

***पळ काढणे*** - *पळून जाणे.*

***पसार होणे*** - *निघून जाणे.*

***प्रकट करणे*** - *व्यक्त करणे.*

***प्रणाम करणे*** - *वंदन करणे.*

***प्रतिस्पर्ध्यास लोळवणे*** - *आपल्या विरुद्ध लढणाऱ्याचा पूर्ण पराभव करणे.*

***प्रतिकार करणे*** - *विरोध करणे.*

***प्रदर्शन करणे*** - *देखावा करणे.*

***प्रज्वलित होणे*** - *पेटणे.*

***प्रभाव पाडणे*** - *विशेष छाप पाडणे.*

***प्रश्नांची सरबत्ती करणे*** - *एक सारखे प्रश्न विचारणे.*

***प्रसंग ओढवणे*** - *संकट येणे.*

***प्रक्षुब्ध होणे*** - *खवळणे, रागाने बेभान होणे.*

***प्रभुत्व मिळविणे*** - *वर्चस्व मिळविणे, काबू मिळविणे.*

***प्रचीती येणे*** - *अनुभव येणे, खात्री पटणे.*

***प्रत्यय येणे*** - *अनुभव येणे.*

***परावर्तित होणे*** - *मागे फिरणे.*

***प्रकर्षाने जाणवणे*** - *जवळून अनुभव घेणे.*

***प्रस्थ माजणे*** - *अकारण महत्तव येणे.*

***प्रवाहप्रतित बनणे*** - *परिस्थिती बरोबर अगतिकपणे वाहत जाणे.*

***प्रदान करणे*** - *देणे.*

***प्रचार करणे*** - *एखाद्याचा गुण सांगणे.*

***प्रशंसा करणे*** - *स्तुती करणे.*

***प्रतीक्षा करणे*** - *वाट पाहणे.*

***प्रतिबिंबीत होणे*** - *उमटणे.*

***प्रसंग बाका येणे*** - *अवघड प्रसंग येणे.*

***प्रभावित होणे*** - *मनावर चांगला परिणाम होणे.*

***पथ्थावर पडणे*** - *हितावह होणे.*

***पदरचे खाणे*** - *स्वतः कष्ट करून खाणे.*

***पदरी माप घालणे*** - *खात्री करून देणे.*

***पसरले जाणे*** - *विखुरणे.*

***परका असणे*** - *दुरावा निर्माण होणे.*

***पगडी फिरविणे*** - *करार मोडणे.*

***पळता भुई थोडी होणे*** - *अतिशय वेगाने पळणे.*

***पदरास गाठ बांधणे*** - *लग्न करून देणे, लक्ष्यात ठेवण्यासाठी खूणगाठ बांधणे.*

***पत्ता काढणे*** - *माहिती करून घेणे.*

***परिमार्जन होणे*** - *धुवून निघणे.*

***पड खाणे*** - *माधार घेणे.*

***परावृत्त करणे*** - *मन वळविणे.*

***परिवर्तन होणे*** - *बदल होणे.*

***परिपाठ सुरु करणे*** - *चाल (वहिवाट) सुरु करणे.*

***परिस्थितीला तोंड देणे*** - *आलेल्या आपत्तीस तोंड देणे/सामोरे जाणे.*

***परिसावर घासून उजळ करणे*** - *कसोटीला लावून अधिक तेजस्वी करणे.*

***पाऊल वाकडे पडणे*** - *वाईट मार्गाने जाणे.*

***पाणी पडणे*** - *केलेले काम फुकट जाणे.*

***पाणी सोडणे*** - *आशा सोडणे, त्याग करणे.*

***पाणी पाजणे*** - *पराजित करणे.*

***पाणी ओळखणे*** - *अंगातील गुण ओळखणे.*

***पाणी दाखविणे*** - *सामर्थ्य दाखविणे.*

***पाठ मोडून येणे*** - *पाठ दुखणे, कळ लागणे.*

***पाणी पाणी होणे*** - *अतिशय मेहनत करणे.*

***पाणी भरणे*** - *घरातील सगळी कामे करणे.*

***पाणी मुरणे*** - *वैगुण्य असणे, भानगड असणे.*

***पाण्यासारखा पैसा खर्च करणे*** - *अतोनात पैसे खर्च करणे.*

***पाठ थोपटणे*** - *शाबासकी देणे, उत्तेजन देणे.*

***पाचवीला पुजणे*** - *कायमची सोबत असणे.*

***पाठ दाखविणे*** - *पळून जाणे (घाबरून).*

***पाठ न सोडणे*** - *एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविणे.*

***पांग फेडणे*** - *उतराई होणे, मनोरथ पूर्ण करणे.*

***पाठिंबा देणे*** - *संमती दर्शविणे.*

***पाठ पुरविणे*** - *पिच्छा पुरविणे.*

***पाठीशी घालणे*** - *संरक्षण देणे, आश्रय देणे, बचाव करणे.*

***पात जुंपणे*** - *मळणीचे काम सुरु करणे.*

***पाठ देणे*** - *मुकाट्याने सहन करणे.*

***पाठ थोपटून घेणे*** - *दुसऱ्याकडून वाहवा मिळविणे.*

***पाठ सडकणे*** - *चोप देणे, मार देणे.*

***पाठीशी उभे राहणे*** - *मदत करणे.*

***पाठ सोडणे*** - *नाद सोडणे.*

***पाठीचे धिरडे काढणे*** - *फार मारणे.*

***पाठीचे साल जाणे*** - *नुकसान होणे.*

***पाढा वाचणे*** - *सविस्तर हकीकत सांगणे.*

***पाचावर धारण बसणे*** - *अतिशय भयभीत होणे, खूप घाबरणे.*

***पाण्यात जाणे*** - *प्रयत्न वाया जाणे.*

***पाण्यात पाहणे*** - *व्देश करणे.*

***प्राणावर उदार होणे*** - *जिवाची पर्वा न करणे.*

***प्राण खर्ची घालणे*** - *मरण पत्करणे.*

***प्राणावर संकट बेतणे*** - *जीव धोक्यात येणे.*

***प्राण कानात गोळा होणे*** - *एखादी गोष्ट ऐकण्यासाठी अतिशय उत्सुक होणे.*

***प्राशन करणे*** - *पिणे.*

***पाय उचलणे*** - *चालणे, भरभर चालणे.*

***प्राप्त करणे*** - *मिळविणे.*

***पाय जमिनीवर न टेकणे (ठरणे)*** - *अतिशय वेगाने धावणे*

***पाय धरणे*** - *विनवणी करणे, शरण जाणे, आश्रय मागणे. (पाया पडणे)*

***पायपीट करणे*** - *चालण्याचे श्रम घेणे.*

***पायमल्ली करणे*** - *उपमर्द करणे.*

***पायमल्ली होणे*** - *अपमान होणे, हेटाळणी करणे.*

***पायाखाली घालणे*** - *चालत जाणे, पार करणे.*

***पाय निघता न निघणे (पाय न निघणे)*** - *जाण्याची इच्छा न होणे.*

***पार पाडणे*** - *यशस्वी रीतीने पूर्ण करणे.*

***पाय शिवणे*** - *नमस्कार करणे.*

***पायरी ओळखून असणे*** - *आपली क्षमता जाणून असणे.*

***पार उतरणे*** - *पूर्णपणे कमी होणे.*

***पार मावळणे*** - *पूर्णपणे नाहीसे होणे.*

***पालवी फुटणे*** - *अंकुर फुटणे, नवी पाने फुटणे.*

***पाठ फिरविणे*** - *मनाविरुद्ध वागणे.*

***पाठीस पोट लागणे*** - *अतिशय कृश होणे.*

***पाठ मऊ करणे*** - *पाठीवर भरपूर चोप देणे.*

***पागोटे गमावणे*** - *व्यवहारात नुकसान होणे.*

***पागोट्याची लाज धरणे*** - *स्वतःच्या नावलौकिकाची चाड बाळगणे.*

***पागोट्याचे पेच गळ्यात येणे*** - *केलेले कर्म अंगावर येणे.*

***पासंगाला न पुरणे*** - *कमी योग्यतेचा असणे.*

***पांगापांग होणे*** - *विखुरणे.*

***पारा वर चढणे*** - *अतिशय राग येणे.*

***पाय पसरणे*** - *व्यापणे.*

***पायरीला पाय लावणे*** - *बरोबरी करणे.*

***पाया घालणे*** - *प्रारंभ करणे.*

***पाळेमुळे घेणे*** - *रुजणे.*

***पायाची आग मस्तकाला जाणे*** - *अतिशय संतापणे.*

***पाड नसणे*** - *कःपदार्थासारखा असणे.*

***पायाखालची जमीन हादरणे*** - *नाश होण्याची वेळ आली असे वाटून अतिशय घाबरणे.*

***पायाला चाक लागणे*** - *एकसारखे चालत राहणे. (पायाला भोवरा असणे).*

***पायावर घाव घालून घेणे*** - *स्वतःच्या हाताने स्वतःचे नुकसान करून घेणे.*

***पाय रोवून उभे असणे*** - *पूर्णपणे सज्ञ असणे.*

***पाण उतार करणे*** - *मानखंडना करणे.*

***पाप उभे राहणे*** - *नशीब आडवे येणे.*

***पायबंद घालणे*** - *अडकवून टाकणे.*

***पायावर धोंडा पाडून घेणे*** - *आपल्या हातानी स्वतःवर संकट आणणे.*

***पारणे फिटणे*** - *समाधान होणे.*

***पारावर नसणे*** - *मर्यादा नसणे.*

***पाळतीवर असणे*** - *गुप्तपणे नजर ठेवणे.*

***पारणे फेडणे*** - *उपवास सोडणे.*

***पान खाऊन तोंडावर थुंकणे*** - *उघडपणे अपमान करणे.*

***पाळण्यात जोजावणे*** - *वात्सल्याने वाढविणे.*

***पायदळी तुडविणे*** - *लाथाडणे.*

***पांढऱ्यावर काळे करणे*** - *लिहिणे.*

***पांघरुण घालणे*** - *उघडकीस येऊ न देणे.*

***पारखा होणे*** - *गमावून बसणे.*

***पांग फिटणे*** - *उणीव दूर होणे.*

***पायपोस पायात नसणे*** - *अंदाधुंदी माजणे.*

***पाठीमागे भुंगा लावणे*** - *एकसारखा त्रास देणे.*

***पायाखाली जळणे*** - *ज्यामुळे इतराना बोल लावता तो दोष स्वतःजवळ असणे.*

***प्रायश्चित घेणे*** - *केलेल्या चुकीबद्दल शिक्षा भोगणे.*

***प्राणपणाने लढणे*** - *प्राणाची पर्वा न करता लढणे.*

***प्राण प्रतिष्ठा करणे*** - *स्थापना करणे.*

***प्राण पणाला लावणे*** - *ध्येयासाठी मृत्यू पत्करण्याची तयारी असणे, शौर्याने लढणे.*

***प्राणार्पण करणे*** - *मरण स्वीकारणे.*

***प्राण कानाशी येणे*** - *इच्छित वार्ता ऐकण्यास आतुर होणे.*

***पिच्छा सोडणे*** - *नाद सोडणे.*

***पिच्छा पुरविणे*** - *सारखे मागे लागणे.*

***पिच्छा न सोडणे*** - *सतत प्रयत्नशील राहणे.*

***पित्त खवळणे*** - *संताप होणे.*

***पीट घेणे*** - *परीक्षा घेणे.*

***पुंडावा करणे*** - *दांडगाईने वागणे.*

***पूर्णविराम देणे*** - *संपविणे.*

***पुलकित होणे*** - *रोमांचित होणे.*

***पूजा बांधणे*** - *पूजा करणे.*

***प्रेमाचे भरते येणे*** - *खूप प्रेम वाटणे.*

***पेचात पडणे*** - *अडचणीत सापडणे.*

***पैजेचा विडा उचलणे*** - *प्रतिज्ञा करणे.*

***पैशापासरी होणे*** - *अतिशय स्वस्थ होणे, सहज साध्य होणे.*

***पैसा उकळणे*** - *अवाजवी पैसा गोळा करणे.*

***पैसे उभे करणे*** - *पैसे जमविणे.*

***पैदा करणे*** - *मिळविणे.*

***पोटात कावळे काव काव करणे (पोटात कावळे कोकावणे)*** - *अतिशय भूक लागणे, भुकेने जीव व्याकूळ होणे.*

***पोटात घालणे*** - *क्षमा करणे.*

***पोटात न राहणे*** - *गुप्त ठेवू न शकणे.*

***पोटाला चिमटा घेणे*** - *पोटाला न खाता राहणे, अतिशय काटकसरीने राहणे, उपाशी राहणे.*

***पोटाची दामटी वळणे*** - *खायला न मिळणे.*

***पोटात ठेवणे*** - *एखादी गोष्ट मनात ठेवणे, बोलून न दाखविणे, गुप्त ठेवणे.*

***पोटात भीतीचा गोळा उभा राहणे*** - *खूपच भीती वाटणे.*

***पोटाशी धरणे*** - *प्रेमाने जवळ घेणे.*

***पोटात शिरणे*** - *मर्जी संपादन करणे.*

***पोटावर पाय देणे*** - *उदरनिर्वाहाचे साधन काढून घेणे.*

***पोटात ब्रह्मराक्षस उठणे*** - *अतिशय खावेसे वाटणे.*

***प्रोत्साहन देणे*** - *उत्तेजन देणे.*

***पोटातून भडभडून येणे*** - *दुःखाने ऊर भरून येणे.*

***पोवाडे गाणे*** - *गुणगान करणे.*

***पोटाची खळगी भरणे*** - *कसेतरी पोट भरणे.*

***पोटातून कळवळा येणे*** - *मायेचा पाझर फुटणे.*

***पोट भरणे*** - *जीवन जगणे.*

***पोटात आग पडणे*** - *भूक लागणे (पोटात खळगा पडणे).*

***पोटात धडकी भरणे*** - *भितीने धक्का बसणे.*

***पोट पाठीस लागणे*** - *उदरनिर्वाहाची काळजी लागणे.*

***पोट बांधून चाकरी करणे*** - *पोटाला न खाता चाकरी करणे.*

***पोट बाहेर येणे*** - *जेवणाचा खर्च बाहेर निघणे.*

***पोटात धोंडा उभा राहणे*** - *घाबरणे.*

***पोट धरधरून हसणे*** - *अतिशय हसणे.*

***पोटावरी राहणे*** - *जेवण हेच वेतन समजून राहणे.*

***पोवाडे गाणे*** - *स्तुती करणे.*

***पोपटपंची करणे*** - *अर्थ न कळता पाठ केलेले म्हणून दाखविणे.*

***फन्ना उडविणे*** - *संपवून टाकणे.*

***फस्त करणे*** - *चाटून पुसून खाणे.*

***फडशा पाडणे*** - *खाऊन संपविणे.*

***फतकल मारून बसणे*** - *अव्यवस्थितपणे बसणे.*

***फत्तराला पाझर फुटणे*** - *कठोर मनाच्या माणसाला देखील दुःख होणे.*

***फत्ते होणे*** - *यशस्वी होणे.*

***फटफटणे*** - *उजाडणे.*

***फंदात न पडणे*** - *एखाद्याच्या बाबतीत लक्ष न देणे.*

***फंदात पडणे*** - *भानगडीत अडकणे.*

***फरारी होणे*** - *पळून जाणे.*

***फशी पाडणे*** - *फसवून अडचणीत गुंतविणे.*

***फाटे फोडणे*** - *अडचणी निर्माण करणे.*

***फारकत होणे*** - *निराळे होणे.*

***फाटा देणे*** - *सोडणे.*

***फासा टाकून पाहणे*** - *धाडस करून पाहणे.*

***फुटाण्यासारखा उडणे*** - *रागाने एकदम एखाद्या कार्यास प्रवृत्त होणे.*

***फुलून जाणे*** - *भरून येणे, मन दाटून येणे.*

***फुटाणे भाजणे*** - *जुलूम करणे.*

***फुली (फुटी) घालणे*** - *व्यत्यय करणे.*

***फुशारी मिरविणे*** - *बढाई मारणे.*

***फुणगी टाकणे*** - *वादात भर घालणे.*

***फुंकून पाय टाकणे*** - *दूरवर विचार करून कोणतेही कृत्य करणे.*

***फुटका डोळा काजळाने साजरा करणे*** - *युक्तीने अवगुण झाकणे.*

***फुटका मणी नसणे*** - *अतिशय दारिद्र्य असणे.*

***फू करणे*** - *उधळपट्टीने खर्च करणे.*

***बट्ट्याबोळ होणे*** - *विचका होणे.*

***बभ्रा करणे*** - *बोभाटा करणे, सगळीकडे प्रसिद्धी करणे.*

***बत्तिशी दाखविणे*** - *हसणे.*

***बत्तिशी रंगविणे*** - *जोरात थोबाडीत मारणे.*

***बदनामी होणे*** - *अपकीर्ती होणे.*

***ब्रह्मांड आठवणे*** - *मोठ्या संकटाची जाणीव होणे, अतिशय दुःख होणे.*

***बहिष्कार घालणे (टाकणे)*** - *सर्व संबंध तोडून टाकणे, वाळीत टाकणे (बहिष्कृत करणे).*

***बहिरेपणाचे सोंग करणे*** - *ऐकून न ऐकल्यासारखे करणे.*

***बहाल करणे*** - *देणे, अर्पण करणे.*

***बॅटरी चार्ज होणे*** - *प्रेरणा मिळणे.*

***बलिदान करणे*** - *त्याग करणे.*

***ब्रह्मानंद होणे*** - *फार आनंद होणे.*

***बतावणी करणे*** - *सोंग करणे, बहाणा करणे.*

***बस्तान बसणे*** - *जम बसणे, व्यवस्था लागणे.*

***बस्तान बिघडणे*** - *व्यवस्था फुकट जाणे.*

***बजबजपुरी माजणे*** - *गोंधळ होणे.*

***बाजू उचलून धरणे*** - *बाजू घेणे.*

***बादरायण संबंध असणे*** - *ओढून ताणून संबंध आणला जाणे.*

***बारा वाजणे*** - *पूर्ण नाश होणे.*

***बारा पंधरा करणे*** - *बोलण्यात मेळ नसणे.*

***बाऊ वाटणे*** - *भीती वाटणे.*

***बाजू राहणे*** - *अब्रू राहणे.*

***बाढ झोकणे*** - *गप्पा मारणे.*

***बाणा मिरविणे*** - *अभिमान व्यक्त करणे.*

***बार उडविणे*** - *कार्यभाग उरकून टाकणे.*

***बाडबिस्तार गुंडाळणे*** - *निघण्याची तयारी करणे.*

***बाजाराच्या भाकरी खाणे*** - *दुसऱ्यांच्या उठाठेवी करणे.*

***बाध न येणे*** - *अडथळा न येणे.*

***बांगडी फुटणे*** - *वैधव्य येणे.*

***बिंग फुटणे*** - *सोंग उघडकीस येणे.*

***बिशाद नसणे*** - *हिम्मत नसणे.*

***बिऱ्हाड उचलणे*** - *निघून जाणे.*

***बिब्बा घालणे*** - *काम बिघडणे.*

***बीज पेरणे*** - *भावी गोष्टाची सुरूवात होणे.*

***बुचकळ्यात पडणे*** - *गोंधळून जाणे.*

***बुद्धी चालविणे*** - *बुद्धीचा उपयोग करणे.*

***बुद्धी फाकणे*** - *डोक्यात गोंधळ होणे.*

***बुद्धीचा किरण पाडणे*** - *आपल्या ज्ञानाचा इतराना उपयोग करून देणे.*

***बूड जमविणे*** - *मांडी घालून बसणे.*

***बेचैन होणे*** - *मनाला अस्वस्थता वाटणे.*

***बेत हाणून पाडणे*** - *बेत सिद्धीला न जाऊ देणे.*

***बेदम झोडपणे*** - *खूप मारणे.*

***बेभान होणे*** - *धुंद होणे, भान हरपणे.*

***बेहोष होणे*** - *बेशुद्ध होणे, धुंद होणे.*

***बेंड फुटणे*** - *रहस्य बाहेर पडणे.*

***बेजार होणे*** - *त्रासित होणे.*

***बेल भंडार उचलणे*** - *शपथ घेणे.*

***बेगमी करणे*** - *साठा करून ठेवणे.*

***बोचणी लागणे*** - *एखादी गोष्ट मनाला लागून राहणे.*

***बोटावर नाचविणे*** - *आपल्या इच्छेप्रमाणे वागावयास लावणे, (बोटाच्या अग्रावर नाचविणे).*

***बोबडी वळणे*** - *घाबरणे, घाबरून गोंधळून जाणे.*

***बोऱ्या वाजणे*** - *फजिती होणे.*

***बोलात बोल नसणे*** - *बोलण्यात मेळ नसणे.*

***बोलबाला होणे*** - *उत्कर्ष होणे.*

***बोळवण करणे*** - *निरोप देणे.*

***बोबडी वळणे*** - *घाबरून गोंधळून जाणे.*

***बोध घेणे*** - *शिकणे.*

***बोल लावणे (देणे)*** - *दोष देणे.*

***बोळ्याने दूध पिणे*** - *बुद्धीहीन असणे, दुसऱ्यांच्यां सांगण्याप्रमाणे वागणे.*

***बोला फुलाला गाठ पडणे*** - *दोन गोष्टींची सहजा सहजी एक वेळ जमून येणे.*

***बोट शिरकणे*** - *चंचुप्रवेश होणे.*

***बोट पकडणे*** - *आधार घेणे.*

***बोटे मोडणे*** - *नावे ठेवणे, चरफडणे.*

***भगीरथ प्रयत्न करणे*** - *चिकटीने प्रयत्न करणे.*

***भरून पावणे*** - *पूर्ण समाधान होणे.*

***भ्रमाचा भोपळा फुटणे*** - *अपेक्षाभंग होणे.*

***भडका उडणे*** - *एकाएकी तीव्र परिणाम दिसून येणे.*

***भर देणे*** - *उत्तेजन देणे, जोर देणे.*

***भर घालणे*** - *काहीतरी जास्त मिळविणे.*

***भरारी मारणे*** - *फार जलद प्रवास करणे.*

***भंडार उधळणे*** - *स्तुती करणे.*

***भडभडून येणे*** - *मन दुःखाने भरून येणे.*

***भ्रम होणे*** - *शुद्ध गेल्याने बडबडणे, वेडे होणे.*

***भान नसणे*** - *जाणीव नसणे.*

***भावना हेलावणे*** - *भावना उचंबळून येणे.*

***भानावर येणे*** - *एखाद्या विचाराच्या तंद्रीतून पूर्वस्थितीत येणे, शुद्धीवर येणे, सावध होणे.*

***भांडवल उभारणे*** - *धंद्याला आवश्यक पैसा गोळा करणे.*

***भान हरपणे*** - *सावधपणा नष्ट होणे, स्वतःला विसरून जाणे.*

***भारून टाकणे*** - *पूर्णपणे मोहून टाकणे.*

***भारावून जाणे*** - *मोहून जाणे.*

***भांबावून जाणे*** - *गोंधळून जाणे.*

***भान विसरणे*** - *मग्न होणे, आठवण विसरणे.*

***भाकरी चालविणे*** - *जीवन चालविणे.*

***भिकेचे डोहाळे लागणे*** - *हलाखीची परिस्थिती ओढवून घेणे, दरिद्रीपणाने वागणे.*

***भीड धरणे*** - *दुसऱ्याचा मनोभंग होऊ नये म्हणून जपणे.*

***भीड घालणे*** - *आर्जव करून अनुकूलता मिळविणे.*

***भीतीने कापरे भरणे*** - *भयामुळे शरीर थरथरु लागणे.*

***भीक न घालणे*** - *न जुमानणे.*

***भुरळ पाडणे*** - *आकर्षित करणे.*

***भुकेचा डोंब उसळणे*** - *खूप भूक लागणे, (भुकेने कासावीस होणे).*

***भूमिगत होणे*** - *कायद्याच्या कंचाट्यातून सुटण्यासाठी गुप्त रीत्या वावरणे.*

***भेद करणे*** - *फोडणे.*

***भूक मारणे*** - *खाण्याची इच्छा नाहिशी होणे, (भूक तहान जाणे).*

***भोग येणे*** - *दुःख नशिबी येणे.*

***भोवऱ्यात सापडणे*** - *अडचणीत गुंतले जाणे.*

***भोजनाची सर न येणे*** - *भोजनाची बरोबरी न करणे.*

***भोक्ते असणे*** - *अत्यंत आवडीचे असणे.*

***मनन करणे*** - *विचार करणे, ध्यानात ठेवणे.*

***मनात घोळत राहणे*** - *एखाद्या गोष्टीबद्दल मनात वारंवार विचार येणे.*

***मन भरून येणे*** - *मनात आत्यंतिक प्रेमाची भावना निर्माण होणे.*

***मन दाटून येणे*** - *एखाद्या गोष्टीबद्दल मनात मोठ्या प्रमाणात विचार जमा होणे.*

***मनाने घेणे*** - *मनात पक्का विचार येणे.*

***मनाला चुटपुट लागणे*** - *मनाला हुरहुर वाटणे, मन तळमळणे, मन व्याकुळ होणे.*

***मनाला भिडणे*** - *मनावर खोलवर परिणाम होणे.*

***मनात मांडे खाणे*** - *व्यर्थ मनोराज्य करणे.*

***मन द्विधा होणे*** - *मनाचा निश्चय न होणे.*

***मरगळणे*** - *अंगी त्राण नसणे.*

***मन जिंकणे*** - *आपलेसे करणे.*

***मस्तक फिरणे*** - *अतिशय राग येणे*

***मरगळून जाणे*** - *उदास होणे.*

***मन वळविणे*** - *आपलेसे करणे.*

***मन गांगरून जाणे*** - *गोंधळून जाणे.*

***मनधरणी करणे*** - *खूश करण्याचा प्रयत्न करणे.*

***मनात चरकणे*** - *एकाएकी भीती वाटणे.*

***मन खात राहणे*** - *अपराधाची सतत जाणीव होत राहणे.*

***मजल मारणे*** - *चालून येणे.*

***मर्जी बसणे*** - *विशेष कृपादृष्टी होणे.*

***मन संतापाने पेटून उठणे*** - *अतिशय संताप येणे.*

***मन साशंक होणे*** - *मनात शंका किंवा संशय वाटू लागणे.*

***मदतीचा हात देणे*** - *सहाय्य करणे.*

***मनातल्या मनात विरघळणे*** - *मनातील योजना प्रत्यक्ष बाहेर न येता नाहीशी होणे.*

***मनात अढळ स्थान मिळविणे*** - *मनात पक्के टिकून राहणे.*

***मनाला खात बसणे*** - *मन दुःखी करणे.*

***मनाला लावून घेणे*** - *वाईट वाटून घेणे.*

***मर्यादा घालणे*** - *थांबवणे, आवरणे.*

***मशागत करणे*** - *मेहनत करून निगा राखणे.*

***मग्न होणे*** - *पूर्णपणे गुंतून राहणे, तल्लीन असणे.*

***मनावर ठसणे*** - *मनावर जोरदारपणे बिंबणे.*

***मधून विस्तव न जाणे*** - *अतिशय वैर असणे.*

***मधाचे बोट लावणे*** - *आशा दाखविणे.*

***मनात घर करणे*** - *मनात कायमचे राहणे.*

***मन मोकळे करणे*** - *सुखदुःखाच्या गोष्टी बोलून दाखविणे (मन खुले करणे).*

***मन भारावून जाणे (मन मोहून जाणे)*** - *आकर्षित होणे.*

***मन पालटणे*** - *मन विकसित करणे.*

***मन करपून जाणे*** - *वाईट वाटणे, (मन कळवळणे).*

***मन बसणे*** - *अतिशय आवडणे.*

***मन पाहणे*** - *मनाची परीक्षा करणे.*

***मन मोठे करणे*** - *उदारपणा धारण करणे.*

***मट्ट करणे*** - *खाऊन टाकणे.*

***मढ्यावरचे लोणी खाणे*** - *बऱ्यावाईटचा विचार न करता स्वतःचा स्वार्थ साधणे.*

***मनावर घेणे*** - *एखाद्या कामाविषयी अगत्य वाटणे.*

***मनात गाठ बांधणे*** - *मनात गोष्ट पक्की ठेवणे.*

***मनातल्या मनात जळणे*** - *आतल्या आत चरफडणे.*

***मनातून उतरणे*** - *एखादी गोष्ट नावडती होणे.*

***मन वश करून घेणे*** - *मन जिंकणे.*

***मन खट्टू होणे*** - *नाराज होणे.*

***मन विषण्ण होणे*** - *दुःखी होणे.*

***मनावर दडपण येणे*** - *चिंतित होणे.*

***मनात उलथापालथ होणे*** - *अस्वस्थ होणे.*

***मनाला काच लागणे*** - *मनातले दुःख सलत राहणे.*

***मन द्रवणे*** - *दया येणे.*

***मन मोहरून जाणे*** - *आनंदीत होणे.*

***मनाशी खूणगाठ बांधणे*** - *मनात पक्का बेत करणे.*

***मनाला येणे*** - *पसंत पडणे, आवडणे.*

***मनात सलणे*** - *मनाला बोचत राहणे.*

***मनमुराद खाणे*** - *यथेच्छ खाणे.*

***मन खाणे*** - *मनाला टोचणी लागणे.*

***मनगटास केस येणे*** - *हातातला जोर नाहीसा होणे.*

***मक्ता घेणे*** - *हमी देणे, काम स्वीकारणे.*

***मक्ता असणे*** - *मालकी असणे.*

***मन्वंतर होणे*** - *क्रांती होणे.*

***मरणकळा येणे*** - *दुःखी व उदास वातावरण निर्माण होणे.*

***मनात भरणे*** - *पसंत पडणे.*

***मान ताठ ठेवणे*** - *स्वाभिमानाने जगणे.*

***मातीमोल होणे*** - *निरुपयोगी होणे, वाया जाणे.*

***माश्या (माशा) मारणे*** - *कोणताही उद्योग न करणे, रिकामे बसणे.*

***माशी शिंकणे*** - *अडथळा येणे.*

***मात्रा चालणे*** - *परिणाम होणे.*

***मात्रा न चालणे*** - *काही उपयोग न होणे.*

***माया दाटून येणे*** - *हृदय उचंबळून येणे.*

***मान लवणे*** - *नम्र होणे.*

***मार्गदर्शन करणे*** - *आवश्यक सूचना देणे.*

***मारा चालणे*** - *वर्षाव होणे.*

***मानबिंदू जागृत करणे*** - *अभिमान उसळून आणणे.*

***मात करणे*** - *प्रयत्नपूर्वक यश मिळविणे.*

***माती हाती घेणे*** - *स्वतःच्या हाताने स्वतःचे नुकसान करणे.*

***मान कापणे*** - *मोठी हानी करणे.*

***माघार घेणे*** - *मागे फिरणे.*

***मारक्या म्हशीसारखे पाहणे*** - *रागाने पाहणे.*

***मान टाकणे*** - *शक्ती नाहीशी होणे.*

***मागे टाकणे*** - *च्या पुढे जाणे, पेक्षा सरस ठरणे.*

***मानेवर सुरी ठेवणे*** - *मारण्याचा धाक घालून एखादे कार्य करावयास लावणे.*

***माती करणे (मातेरे करणे)*** - *नासाडी करणे.*

***मान उंच होणे*** - *विशेष कामगिरीमुळे स्वाभिमानात भर पडणे.*

***मातीला मिळविणे*** - *संपूर्ण नाश करून टाकणे.*

***मागोवा घेणे*** - *मागे फिरून पाहणे.*

***मान झुकणे*** - *मोठेपणा मान्य करणे.*

***मागेपुढे न पाहणे*** - *कशाचाही विचार न करणे.*

***माधुकरी मागणे*** - *गरीब विद्यार्थ्याने घरोघर जाऊन अन्नाची भिक्षा मागणे.*

***मान तुकविणे*** - *पसंती दर्शविणे.*

***मारून मुटकून आणणे*** - *जबरदस्तीने आणणे.*

***मारामार पडणे*** - *उणीव जाणवणे.*

***माणसे जोडणे*** - *माणसे आपलीशी करणे.*

***माया पातळ करणे*** - *प्रेम कमी करणे.*

***मावळतीकडे झुकणे*** - *संध्याकाळ होणे.*

***मांजराच्या गळ्यात घंटा बांधणे*** - *अशक्य गोष्ट घडून येणे.*

***मांडीवर घेणे*** - *दत्तक घेणे.*

***मांडीवर मांडी टाकून बसणे*** - *निरुद्योगी बसणे.*

***मांडीस मांडी टेकून बसणे*** - *बरोबरीने बसणे.*

***मानगुटीस बसणे*** - *एकसारखा पाठपुरावा करणे.*

***मांडी ठोकणे*** - *बैठक मांडणे, बसणे.*

***मांडलिक होणे*** - *सार्वभौम राजाच्या ताब्यातील राजा होणे.*

***मागमूस नसणे*** - *ठावठिकाणा नसणे.*

***मिशीला पीळ देणे*** - *ऐट मिरविणे.*

***मिशांना तूप लावणे*** - *उगाच ऐट करणे, खोटा आव आणणे.*

***मिशीवर ताव मारणे*** - *बढाई मारणे.*

***मिंधे बनणे (होणे)*** - *लाचार बनणे, उपकारबद्ध होणे.*

***मिटक्या मारीत सांगणे*** - *रंगवून सांगणे.*

***मिशी खाली होणे*** - *मानखंडना होणे.*

***मिरास होणे*** - *मक्तेदारी घेणे.*

***मुभा असणे*** - *परवानगी असणे, मोकळीक असणे.*

***मुसळाला अंकूर फुटणे*** - *अशक्य गोष्ट घडून येणे.*

***मुजरा करणे*** - *वंदन करणे.*

***मुलखाचे कडक*** - *अतिशय रागीट स्वभावाचे.*

***मुलखाचे लागट*** - *विशेष आपलेपणाने वागणारे.*

***मुहूर्त मेढ रोवणे*** - *प्रारंभ करणे.*

***मुठीत ठेवणे*** - *ताब्यात ठेवणे.*

***मुभा नसणे*** - *परवानगी नसणे.*

***मुसंडी मारणे*** - *जोरात पुढे जाणे.*

***मुखरस पाघळणे*** - *वेड्यासारखे काहीतरी बोलणे.*

***मुकाट्याने येणे*** - *न बोलता येणे.*

***मुखरीत होणे*** - *व्यक्त होणे.*

***मुसक्या बांधणे*** - *हात मागे आवळून बांधणे.*

***मुळावर येणे*** - *नाशास कारण होणे.*

***मुलाहिजा बाळगणे*** - *पर्वा करणे.*

***मुग्ध होणे*** - *भान हरवून जाणे.*

***मुद्रेत पाहणे*** - *चेहऱ्यावरील भावावरून अनुमान करणे.*

***मुंगी होऊन साखर खाणे*** - *लहानपण पत्करून सुस्थितीत राहणे.*

***मूग गिळणे*** - *उत्तर न देता स्वस्थ बसणे.*

***मूठ भरणे*** - *लाच देणे.*

***मूठमाती देणे*** - *अंतक्रिया उरकणे, शेवट करणे.*

***मेख मारणे*** - *अडकवून ठेवणे.*

***मेतकूट जमणे*** - *एकजीव होणे.*

***मेळ घालून पाहणे*** - *जुळवून पाहणे.*

***मेळ न बसणे*** - *विचार न जुळणे.*

***मेल्याशिवाय स्वर्ग मिळत नसणे*** - *स्वतःअनुभव घेतल्या शिवाय एखादी गोष्ट पूर्णपणे न कळणे.*

***मोकाट सुटणे*** - *अविचाराने वागणे, कसलीही आडकाठी नसणे.*

***मोर्चा बांधणे*** - *जय्यत तयारी करणे.*

***मोकाट सुटलेले पाणी*** - *वाट फुटेल तिकडे वाहत जाणारे पाणी.*

***मोडकी तोडकी भाषा येणे*** - *एखादी भाषा चुकतमाकत लिहिता बोलता येणे.*

***मोह होणे*** - *एखादी गोष्ट हवीहवीशी वाटणे.*

***मोहोर उठविणे*** - *ठसा उमटविणे.*

***मोहून टाकणे*** - *आकर्षित करणे.*

***मोडकळीस येणे*** - *वाईट स्थिती प्राप्त होणे.*

***मोट बांधणे*** - *एखाद्याच्या इच्छेविरूद्ध एखाद्या कार्यास प्रवृत्त होणे.*

***मोका साधणे*** - *संधीचा पूरेपूर फायद घेणे.*

***मोठेपणाचे दडपण येणे*** - *मोठेपणामुळे आलेल्या जबाबदारीचे ओझे वाटणे.*

***मोठी उडी घेणे*** - *एखादी मोठी गोष्ट करायला तयार होणे.*

***मोकाट जनावरे*** - *स्वच्छंदी स्वैर जनावरे.*

***या कानाचे त्या कानास न कळणे*** - *कोणालाही कळू न देणे, (अतिशय गुप्त ठेवणे).*

***याचना करणे*** - *विनवणी करणे.*

***योग येणे*** - *संधी मिळणे.*

***युक्ती सुचणे*** - *इलाज सुचणे.*

***युद्धास तोंड लागणे*** - *युद्ध सुरू होणे.*

***येता जाता ठेच लागणे*** - *दुःखाची सतत जाणीव होणे.*

***योगक्षेम चालविणे*** - *उदरनिर्वाहाची तजवीज करणे, चरितार्थ चालविणे.*

***रक्ताची ओढ असणे*** - *आंतरिक ओढ असणे.*

***रस्ता तुडविणे*** - *दूरवर चालत जाणे.*

***रक्ताचे पाणी करणे*** - *खूप परिश्रम करणे.*

***रंग दिसणे*** - *संभव असणे.*

***रंगात येणे*** - *आनंदात मग्न होणे.*

***रमत गमत जाणे*** - *थांबत थांबत जाणे.*

***रस घेणे*** - *एखाद्या गोष्टीचा आनंद लुटणे.*

***रडवेला होणे*** - *रडण्याच्या बेतात येणे.*

***रद्द करणे*** - *काढून टाकणे.*

***रडकुंडीला येणे*** - *वाईट वाटणे, रडण्याच्या स्थितीत येणे.*

***रंगून जाणे*** - *गुंग होऊन जाणे.*

***रसातळाला जाणे*** - *संपूर्ण नष्ट होणे.*

***रसभंग होणे*** - *मध्येच अडथळा आल्याने एखाद्या गोष्टीचा आनंद कमी होणे.*

***रक्त सळसळणे*** - *आवेश येणे.*

***रक्ताचा अर्घ्य देणे*** - *प्राण अर्पण करणे.*

***रक्त आटविणे*** - *फार मेहनत करणे.*

***रजाचा गज करणे*** - *अतिशयोक्ती करणे.*

***रडतराव घोड्यावर बसविणे*** - *कामाची नावड असलेल्या माणसाला आग्रहाने कामाविषयी प्रवृत्त करणे.*

***रंगास येणे*** - *शोभा प्राप्त होणे.*

***रंगरूपास आणणे*** - *चांगल्या स्थितीला आणणे.*

***रग जिरविणे*** - *खोड मोडणे.*

***रवाना करणे*** - *पाठविणे.*

***रागारागाने ओठ चावणे*** - *खूप रागावणे.*

***रंजीस येणे*** - *कंटाळणे, त्रासणे.*

***रवानगी होणे*** - *पाठविणे.*

***रागाने लाल होणे*** - *खूप राग येणे.*

***रामराम ठोकणे*** - *कायमचा निरोप घेणे.*

***राम म्हणणे*** - *मरणे, शेवट होणे, मृत्यू येणे.*

***राम नसणे*** - *अर्थ नसणे, अर्थहीन असणे.*

***राईचा पर्वत (डोंगर) करणे*** - *क्षुल्लक गोष्ट फुगवून सांगणे, अतिशयोक्ती करणे.*

***राख होणे*** - *जळून पूर्णपणे नष्ट होणे.*

***राबराब राबणे*** - *सतत खूप श्रम करणे.*

***राशीस लागणे*** - *वैरभाव धरणे.*

***राखरांगोळी करणे*** - *सत्यानाश करणे.*

***राग खवळणे*** - *क्रोधाने किंवा भुकेने कावरेबावरे होणे.*

***राबता नसणे*** - *ये जा नसणे.*

***राग नाकावर असणे*** - *लवकर चिडणे.*

***रानभरी होणे*** - *रानात पळणे.*

***रिवाज असणे*** - *पद्धत किंवा चाल असणे.*

***रीघ लागणे*** - *गर्दी होणे.*

***रूद्रावतार धारण करणे*** - *रागावणे, अतिशय संतापणे.*

***रूकार पडणे*** - *संमती मिळणे, होकार मिळणे.*

***रेषा उमटणे*** - *दैव उघडणे.*

***रेलचेल होणे*** - *विपुलता असणे.*

***रे रे करीत चालणे*** - *रडत रडत कसेबसे पुढे जाणे.*

***रेवडी उडविणे*** - *फजिती करणे.*

***रोजचं मढ त्याला कोण रडं*** *- नेहमीच दुःख ज्याच्या वाट्याला येते त्याला त्याचे वाईट वाटेनासे होते.*

***रोष मावळणे*** *- राग जाणे.*

***लक्ष उडणे*** *- मन न लागणे.*

***लक्ष्मी घरी येणे*** *- पैसे मिळणे, श्रीमंती येणे.*

***लळा लागणे*** *- प्रेम वाटणे.*

***लक्ष वेधून घेणे*** *- लक्ष ओढून घेणे, मन आकर्षून घेणे.*

***लकडा लावणे*** *- निकड लावणे.*

***लक्ष्मीचा वरदहस्त असणे*** *- लक्ष्मीची कृपा असणे.*

***लहान तोंडी मोठा घास घेणे*** *- आपणास न शोभेल असे वरिष्ठाशी वरचढपणाने बोलणे.*

***लंपास करणे*** *- पळवणे, लांबवणे.*

***लष्काराच्या भाकऱ्या भाजणे*** *- दुसऱ्यांच्या उठाठेवी करणे.*

***लख्ख करणे*** *- घासून पुसून स्वच्छ करणे.*

***लवलेश नसणे*** *- थोडे ही न राहणे.*

***लंबाचीत होणे*** *- पराभूत होणे.*

***लागवड करणे*** *- पीक काढणे.*

***लाहा लाहा करणे*** *- खूप तहान लागणे.*

***लाथ मारणे*** *- झिडकारणे.*

***लाळ घोटणे*** *- एखादी वस्तू मिळावी अशी अभिलाषा धरणे.*

***लाड पुरविणे*** *- हौस पुरविणे.*

***लाचारी पत्करणे*** *- स्वतःला असहाय्य मानणे.*

***लावालावी करणे*** *- भांडण लावणे.*

***लाही होऊन जाणे*** *- संतापणे.*

***लावण्याची मूर्ती असणे*** *- खूप सुंदर असणे.*

***लाख मोलाची*** *- अतिशय महत्त्वाची.*

***लागवडी खाली आणणे*** *- पीक काढण्यासाठी जमीन उपयोगात आणणे.*

***लांच्छन लावणे*** *- कलंक लावणे.*

***लांडगेतोड करणे*** *- शत्रूवर तुटून पडणे.*

***लुप्त होणे*** *- नाहीसे होणे.*

***लोकप्रिय होणे*** *- लोकांना आवडणे.*

***लोण पसरविणे*** *- प्रसार करणे.*

***लोप होणे (पावणे)*** *- नाहीसे होणे, दिसेनासे होणे.*

***लोकांची घरे पुजणे*** *- लोकांच्या घरोघर जाणे.*

***लोकांत प्रगट करणे*** *- प्रसिद्ध करणे.*

***लौकिक मिळविणे*** *- सर्वत्र मान मिळविणे.*

***लोभ लागणे*** *- हाव असणे.*

***वडीलकी गाजविणे*** *- मोठेपणाचा अधिकार दाखवणे.*

***वरचष्मा करणे*** *- श्रेष्ठता मिळविणे.*

***वनवास सोसणे*** - *हालअपेष्टा सहन करणे.*

***वश होणे*** - *ताब्यात जाणे.*

***वरवंटा फिरविणे*** - *नाश करणे.*

***वठणीला आणणे*** - *धाक दाखवून योग्य मार्गावर आणणे, ताळ्यावर आणणे.*

***वर लोण चढणे*** - *संघातील सर्व गडी बाद होणे.*

***वकील पत्र घेणे*** - *एखाद्याचे बाजूने बोलण्याचे पत्करणे.*

***वणवण भटकणे*** - *एखादी गोष्ट मिळण्यासाठी खूप फिरणे.*

***वड्याचे तेल वांग्यावर काढणे*** - *एकाचा राग दुसऱ्यावर काढणे.*

***वहिवाट असणे*** - *पद्धत असणे.*

***वर्दळ घालणे*** - *भांडत बसणे.*

***वर्तुळ जोडणे*** - *एकता साधणे.*

***वचपा काढणे*** - *उट्टे काढणे.*

***वर्दळीवर येणे*** - *हमरीतुमरीवर येणे.*

***वर्ज्य करणे*** - *टाकून देणे, वगळणे.*

***वज्रलेप होणे*** - *पक्के होणे.*

***वणवा पेटणे*** - *जंगलात आग पसरणे.*

***वय होणे*** - *म्हातारपण येणे.*

***व्यथित होणे*** - *दुःखी होणे.*

***व्यग्र होणे*** - *दंग होणे.*

***वर्दी देणे*** - *बातमी देणे.*

***वरात काढणे*** - *धिंड काढणे.*

***वरची कडी असणे*** - *एखाद्या गोष्टीबद्दल पुढची मजल गाठणे.*

***वस्तीला राहणे*** - *काही वेळ मुक्काम करणे.*

***वटवट करणे*** - *बडबड करणे.*

***वृद्धिंगत करणे*** - *वाढविणे.*

***वसा घेणे*** - *व्रत घेणे.*

***व्यत्यय येणे*** - *अडथळा निर्माण होणे.*

***व्यक्त करणे*** - *सांगणे, प्रकट करणे.*

***व्याकूळ होणे*** - *वेदना सहन कराव्या लागणे.*

***वाटेकडे डोळे लावून बसणे*** - *सारखी वाट पाहणे.*

***वाळीत टाकणे*** - *संबंध न ठेवणे, बहिष्कार टाकणे.*

***वार करणे*** - *उपवास करणे.*

***वाईट वाटणे*** - *दुःख होणे.*

***वाटेत काटे पेरणे*** - *मार्गात अढथळे निर्माण करणे.*

***वाण लुटणे*** - *पीक भरभरून घेणे, पीक लुटणे.*

***वादळ विसावणे*** - *वादळ शांत होणे.*

***वाहत्या गंगेत हात धुणे*** - *फायदा करून घेणे.*

***वारे लागणे*** - *संसर्ग होणे.*

***वारा वाहील तशी पाठ देणे*** - *परिस्थितीनुसार वागणे.*

***वारा पडणे*** - *वारा बंद होणे.*

***व्यासंग करणे*** - *एखाद्या विषयाचा खोल अभ्यास करणे.*

***वारा न घेणे*** - *अगदी अलिप्त होणे.*

***वाऱ्यावर सोडणे*** - *पूर्णपणे त्याग करणे.*

***वास्तपूस्त करणे*** - *चौकशी करणे.*

***वाली नसणे*** - *रक्षणकर्ता नसणे, कैवारी नसणे.*

***वारे वाहू लागणे*** - *एखादा विचार किंवा कल्पना समाजात पसरू लागणे.*

***वाऱ्याची माट बांधणे*** - *कठीण अशा कार्याला प्रवृत्त होणे.*

***वाटेवर पडणे*** - *सहज प्राप्त असणे.*

***वाट लावणे*** - *निकालात काढणे, मोडून तोडून टाकणे.*

***वाटेस लावणे*** - *पाठवून देणे.*

***वाऱ्या करणे*** - *सारखे ये जा करणे.*

***वाटोळे करणे*** - *नाश करणे.*

***वाटेस जाणे*** - *खोड्या करणे.*

***वाटेवर येणे*** - *योग्य मार्गाला येणे.*

***वाटाण्याच्या अक्षता लावणे*** - *स्पष्टपणे नाकारणे.*

***वाखाणणी करणे*** - *स्तुती करणे.*

***वाताहत लावणे*** - *नाश करणे.*

***वाच्यता करणे*** - *मनातील गुपीत अनेकासमोर उघड करणे.*

***वाकडे पाऊल टाकणे*** - *दुर्वर्तन घडणे.*

***वाकड्या नजरेने पाहणे*** - *वाईट हेतू धरून पाहणे.*

***वाचा बसणे*** - *बोलण्याची शक्ती नाहीशी होणे, एक शब्दही बोलता न येणे.*

***वाचा फुटणे*** - *बोलण्याची शक्ती येणे.*

***वाचा विटाळणे*** - *शब्द खर्चणे.*

***वाचाळपंचविशी लावणे*** - *फोल बोलणे.*

***वासना उडणे*** - *इच्छा नाहिशी होणे.*

***वांड वासरासारखे उधळणे*** - *कशाचीही पर्वा न करना स्वैरपणे पळत सुटणे.*

***वाघाचे कातडे पांघरणे*** - *ढोंग करणे.*

***वाट मारणे*** - *वाटेत गाठून मारणे.*

***वायू होणे*** - *वात झाल्यामुळे बरळणे.*

***वाहून घेणे*** - *आयुष्यभर एकाच कार्यात गुंतून जाणे.*

***वाकुल्या दाखविणे*** - *वेडावणे.*

***वावर असणे*** - *ये जा असणे, वहिवाट असणे.*

***व्याख्यान झोडणे*** - *व्याख्यान देणे.*

***वाटणीला येणे*** - *हिस्सा मिळणे.*

***विचलित होणे*** - *मनाची चलबिचल होणे.*

***विकासाची चाके फिरणे*** - *विकास होऊ लागणे.*

***विक्रम करणे*** - *मोठा पराक्रम करणे.*

***विचारांना पंख फुटणे*** - *विचारांना गती येणे, विचारशक्ती वाढणे.*

***विसंवाद असणे*** - *एकमेकांशी न जमणे.*

***विडा उचलणे*** - *निश्चय किंवा प्रतिज्ञा करणे.*

***विराजमान होणे*** - *प्रतिष्ठेचे स्थान लाभणे, बसणे.*

***विरस होणे*** - *मनोभंग होणे, आनंद नाहीसा होणे.*

***विस्मय होणे (विस्मित होणे)*** - *आश्चर्याने थक्क होणे, नवल वाटणे.*

***विस्मयचकित होणे*** - *आश्चर्याने थक्क होणे, नवल वाटणे.*

***विचार पडणे*** - *चिंता वाटणे.*

***विसर पडणे*** - *विसरून जाणे.*

***विचारपूस करणे*** - *चौकशी करणे.*

***विचारात गढणे*** - *विचारात गुंग होणे.*

***विन्मुख होणे*** - *सहाय्य न करता जाऊ देणे, तोंड फिरविणे.*

***विरून जाणे*** - *नष्ट होणे.*

***वियोग होणे*** - *ताटातूट होणे.*

***विल्हेवाट लावणे*** - *संपविणे.*

***विचारविनिमय करणे*** - *सल्लामसलत करणे.*

***विल्हेवाट लावणे*** - *निकालात काढणे.*

***विषाद वाटणे*** - *चुकीबद्दल वाईट वाटणे.*

***विश्वासघात करणे*** - *दिलेला शब्द ऐनवेळी न पाळणे.*

***विस्फारून बघणे*** - *आश्चर्याने बघणे.*

***विरजण घालणे*** - *निरूत्साह करणे.*

***विकोपास जाणे*** - *मर्यादेबाहेर जाणे.*

***वीरगती मिळणे*** - *वीराचे मरण मिळणे.*

***वीरश्री येणे*** - *अंगात शौर्य संचारणे.*

***वीट येणे*** - *कंटाळा येणे.*

***व्यूह रचणे*** - *एखाद्याच्या विरूद्ध मसलत तयार करणे.*

***व्यूह ढासळून टाकणे*** - *केलेले बेत फुकट जातील असे करणे.*

***वेड असणे*** - *नाद असणे.*

***वेच करणे*** - *खर्च करणे.*

***वेसण घालणे*** - *मर्यादा घालणे.*

***वेध घेणे*** - *चौकस नजरेने पाहणे.*

***वेड घेऊन पेडगावास जाणे*** - *मुद्दाम ढोंग करणे, सोंग करणे.*

***वेळ निभावून नेणे*** - *कशीबशी वेळ काढणे.*

***वेध लागणे*** - *पुढच्या एखाद्या गोष्टीचा ध्यास घेणे.*

***वेड पांघरणे*** - *वेड्याचे सोंग घेणे.*

***वेड भरणे*** - *वेडा होणे.*

***वेड लागणे*** - *ध्यास घेणे.*

***वेडे होणे*** - *देहभान विसरून जाणे.*

***वेळ मारून नेणे*** - *प्रसंगाला उणे पडू न देणे.*

***वैषम्य वाटणे*** - *हेवा वाढणे.*

***शब्द खाली (जमिनीवर) पडू न देणे*** - *दुसऱ्यांच्या इच्छेनुसार लगेच कार्यवाही होणे.*

***शहनिशा करणे*** - *एखाद्या गोष्टीबाबत चौकशी करून खात्री करून घेणे.*

***शहर गजबजणे*** - *शहरात माणसांची गर्दी खूप असणे.*

***शंभर वर्षे भरणे*** - *नाश होण्याची वेळ जवळ येणे.*

***शपथ घेणे*** - *प्रतिज्ञा करणे.*

***शंख करणे*** - *ओरड करणे.*

***शर्थ करणे*** - *पराकाष्ठा करणे.*

***शर्थीची तरवार करणे*** - *कठोर श्रम करणे.*

***शरमिंदे होणे*** - *लाजणे, ओशाळे होणे.*

***शरपंजरी पडणे*** - *मरणासन्न अवस्थेत असणे.*

***शब्द झेलणे*** - *प्रत्येक आज्ञा मानणे.*

***शक्ती एकवटणे*** - *पाठिंबा देणे.*

***शह देणे*** - *लाभ करून घेण्यासाठी संधान लावून बसणे.*

***शतपावली करणे*** - *भोजनानंतर थोडेसे घरातल्या घरात चालणे.*

***शाबासकी देणे*** - *पाठ थोपटणे, वाहवा करणे.*

***शाश्वती वाटणे*** - *खात्री वाटणे.*

***श्वास रोखून पुढे जाणे*** - *चाहूल लागू न देता शत्रूवर चाल करणे.*

***शिगेला पोचणे*** - *शेवटच्या टोकाला जाणे.*

***शितावरून भाताची परीक्षा करणे*** - *थोड्यावरून संपूर्ण गोष्टीची परीक्षा येणे.*

***शिकस्तीने प्रयत्न करणे*** - *आटोकाट प्रयत्न करणे.*

***शिकस्त करणे*** - *आटोकाट प्रयत्न करणे.*

***शिखरास हात पोचणे*** - *कृतकृत्य होणे.*

***शिष्टाई करणे*** - *मध्यस्थी करून भांडण मिटविणे.*

***शिरकमल वाहणे*** - *प्राण अर्पण करणे.*

***शिरा ताणणे*** - *मोठ्याने बोलणे.*

***शिळ्या कढीला ऊत येणे*** - *उसने अवसान येणे.*

***शिंतोडा उडणे*** - *कलंक लावणे.*

***शीर सलामत बाहेर पडणे*** - *काहीही शारीरिक अपाय न होता सुटणे.*

***शीण पळणे*** - *थकवा नाहिसा होणे.*

***श्रीगणेशा होणे*** - *आरंभ होणे.*

***श्रीमुखात देणे*** - *मारणे.*

***श्रेयस्कर होणे*** - *हितकार होणे.*

***श्रम प्रतिष्ठा वाढविणे*** - *कष्टाचे महत्व वाढविणे.*

***शुभारंभ होणे*** - *एखाद्या शुभकार्याची सुरुवात होणे.*

***शुद्‌ध हरपणे*** - *काही सुचेनासे होणे.*

***शून्य दृष्टीने पाहणे*** - *उदासपणे पाहणे.*

***शेरेबाजी करणे*** - *मत व्यक्त करणे.*

***शेंडीला गाठ देणे*** - *वरचष्मा करणे.*

***शेंडीला फुले बांधणे*** - *आपला मतलब साधणे.*

***शेपूट घालणे*** - *भिऊन माघार घेणे.*

***शेफारून जाणे*** - *हुरळणे, स्तुतीने चढून जाणे.*

***शोभा करणे*** - *फजिती करणे.*

***शोषण करणे*** - *पिळवणूक करणे.*

***शोभा येणे*** - *सौंदर्य प्राप्त होणे.*

***षट्‌कर्णी कळणे*** - *एखादी गोष्ट तिसऱ्या माणसास कळणे.*

***सही सलामत सुटणे*** - *दोष न येता सुटका होणे.*

***सळो की पळो करणे*** - *अतिशय हैराण करणे.*

***समरस होणे*** - *एखाद्या गोष्टीशी एकरूप होणे.*

***सर्वस्व पणाला लावणे*** - *सर्व शक्य मार्गांचा अवलंब करणे.*

***सहमत असणे*** - *एखाद्याच्या म्हणण्याला दुजोरा देणे.*

***समजूत घालणे*** - *समजाऊन सांगणे.*

***सतीचे नशीब घेणे*** - *समर्पित वृत्ती असणे.*

***सर करणे*** - *काबीज करणे.*

***समाचार घेणे*** - *चौकशी करणे.*

***सती जाणे*** - *पतीच्या शवाबरोबर स्वतःस जाळून घेणे.*

***सर्वस्व वेचणे*** - *आपल्या जवळचे सर्व काही एखाद्या गोष्टीसाठी खर्ची घालणे.*

***संकल्प करणे*** - *बेत करणे.*

***संधान बांधणे*** - *जवळीक निर्माण करणे.*

***संपादन करणे*** - *प्राप्त करून घेणे.*

***संभ्रमात पडणे*** - *गोंधळात पडणे.*

***समर्पित करणे*** - *अर्पण करणे, देणे.*

***सर्वतोमुखी होणे*** - *माहीत होणे.*

***स्वप्ने रंगविणे*** - *खोटी आशा मनाशी बाळगून त्यात रंगून जाणे (कल्पना करीत बसणे).*

***स्वप्न भंगणे*** - *मनातील विचार कृतीत न येणे, इच्छा पूर्ण न होणे.*

***स्वर्ग दोन बोटे उरणे*** - *गर्वाने अतिशय फुलून जाणे, थोड्याशा यशानेही अतिशय हर्ष होणे.*

***सत्व घेणे*** - *कसून परीक्षा घेणे.*

***स्वर फुटणे*** - *बोलता येणे, गाणे.*

***संतापाने भान विसरणे*** - *खूप संतापणे.*

***सन्मान करणे*** - *गौरव करणे.*

***सडा पडणे*** - *इतस्ततः विखुरणे.*

***समाधी घेणे*** - *साधुपुरूष मरण पावणे.*

***सर्द होणे*** - *वरमणे, थिजून जाणे.*

***सर्व दूर पसरणे*** - *सगळीकडे पसरणे.*

***ससेमिरा लागणे*** - *एखाद्या गोष्टीमुळे सतत त्रास होत राहणे.*

***सव्यापसव्य करणे*** - *यातायात करणे.*

***सर पावणे*** - *बरोबरी करता येणे.*

***समुद्रात सुई शोधणे*** - *निष्फळ होण्याची खात्री असूनही त्या कार्याला हात घालणे.*

***सत्वास जागणे*** - *(प्रामाणिकपणाशी) खरेपणाशी एकनिष्ठ राहणे.*

***सपसप विळे फिरविणे*** - *विळ्याच्या सहाय्याने ज्वारीची ताटे भराभर कापणे.*

***संगनमत करणे*** - *गुप्त बेत रचणे, एकमेकाशी बेत ठरविणे.*

***सद्‌गदित होणे*** - *अंतःकरण भरून येणे.*

***संकट कोसळणे*** - *आपत्ती येणे.*

***संपन्न होणे*** - *समृद्ध होणे.*

***स्मरण असणे*** - *आठवण असणे.*

***संपुष्टात येणे*** - *संकोच पावणे, संख्येने कमी होणे.*

***संन्यस्त होणे*** - *सर्वस्वाचा त्याग करणे, संन्याशी होणे.*

***संकोच होणे*** - *आकुंचित होणे, लज्जित होणे.*

***संकेत करणे*** - *इशारा करणे.*

***सहीसलामत सुटणे*** - *सुरक्षितपणे बाहेर पडणे.*

***स्वप्न साकार होणे*** - *मनोरथ पूर्ण होणे.*

***स्वर्गास हात पोचणे*** - *कृतकृत्यता वाटणे.*

***स्तंभित करणे*** - *आश्चर्यचकित करणे.*

***स्वप्नात सुद्धा खरे न वाटणे*** - *पूर्णपणे अविश्वसनीय वाटणे.*

***सामोरे जाणे*** - *एखाद्याच्या समोर जाणे, संकटास धैर्याने तोंड देणे.*

***स्वाधीत करणे*** - *ताब्यात देणे, देऊन टाकणे.*

***साता समुद्रा पलीकडे*** - *खूप दूर, जगाच्या कानाकोपऱ्यात.*

***साक्षर होणे*** - *लिहिता वाचता येणे.*

***सामील होणे*** - *समावेश करून घेणे, मिसळून जाणे, भाग घेणे.*

***सामना देणे*** - *चार हात करणे, स्पर्धा करणे.*

***सार्थकी लागणे*** - *योग्य उपयोग होणे, चीज होणे.*

***साद घालणे*** - *हाक मारणे, बोलावणे, आवाज देणे.*

***सामावून घेणे*** - *आपलेसे करून घेणे.*

***सावळा गोंधळ उडणे*** - *पूर्णपणे गोंधळ माजणे.*

***सापासारखे सरसर चढणे*** - *सहजगत्या पार पाडणे.*

***सापाला दूध पाजणे*** - *दुष्ट माणसावर उपकार करणे.*

***साकार होणे*** - *प्रत्यक्षात येणे, सत्य सृष्टीत उतरविणे.*

***सास्वर पेरणे*** - *गोड गोड बोलून आपलेसे करणे, मोहपाशात अडकविणे.*

***साक्षात्कार होणे*** - *प्रत्यक्ष ज्ञान होणे.*

***सास्वळी धरणे*** - *हातात हात घालून एक फळी तयार करणे.*

***सामना रंगायला सुरूवात करणे*** - *खेळात चुरस निर्माण होणे.*

***साज चढविणे*** - *दागदागिने अंगावर घालणे.*

***स्वाहा करणे*** - *घशांत टाकणे, गिळंकृत करणे.*

***साताजन्माचा दावेदार होणे*** - *मोठा शत्रू होणे.*

***साद मनात वाजणे*** - *पूर्वीच्या आठवणी येणे.*

***सांगड घालणे*** - *मेळ बसविणे.*

***साष्टांग दंडवत घालणे*** - *शरीराची आठही अंगे जमिनीला टेकवून नमस्कार घालणे.*

***सिद्धीस जाणे*** - *यशस्वी रीतीने पार पडणे.*

***सिद्धधीस नेणे*** - *तडीस नेणे.*

***सिंहाची छाती असणे*** - *निर्भय असणे.*

***सिद्धी प्राप्त होणे*** - *हवे ते मिळणे.*

***सिंहावलोकन करणे*** - *मागील गोष्टीचा आढावा घेणे.*

***सीमा न उरणे*** - *मर्यादा नाहीशी होणे.*

***सुगावा लागणे*** - *कळून येणे, शोध लागणे.*

***सुसाट पळणे*** - *वेगाने पळणे.*

***सुटकेचा निःश्वास टाकणे (सुटकेचा श्वास घेणे)*** - *कठीण प्रसंगातून सुटल्यामुळे मन शांत होणे.*

***सुपंथ धरणे*** - *चांगल्या मार्गाने जाणे.*

***सुताने स्वर्गाला जाणे*** - *थोडा सुगावा लागताच संपूर्ण गोष्टीचे स्वरुप तर्काने जाणण्याचा प्रयत्न करणे.*

***सुन्न होणे*** - *काही न सुचणे, बधिर होणे.*

***सुस्कारा टाकणे*** - *दम घेणे.*

***सुपारी देणे*** - *नेमणूक करणे.*

***सुतास लागणे*** - *व्यवस्थेस लागणे, नीट सुरळीत होऊ लागणे.*

***सुळावर चढणे*** - *उच्च ध्येयासाठी स्वेच्छेने प्राणार्पण करणे.*

***सुतकी वातावरण असणे*** - *दुःखी वातावरण असणे.*

***सुकाळ होणे*** - *समृद्धी होणे, वाढ होणे.*

***सुवर्णमध्य साधणे*** - *तडजोड साधणे.*

***सुरूंग लागणे*** - *उध्वस्त करणे.*

***सूतोवाच करणे*** - *प्रारंभ करणे, पुढील गोष्टीची प्रस्तावना करणे.*

***सूक्ष्म निरीक्षण करणे*** - *बारकाईने पाहणे.*

***स्फूर्ति देणे*** - *उत्तेजन देणे.*

***सूर्य आग ओकणे*** - *खूप उकाडा होणे.*

***सेवा रूजू होणे*** - *चाकरी करणे.*

***सैरावैरा धावणे*** - *वाट फुटेल तिकडे धावणे.*

***सोन्याचे दिवस येणे*** - *चांगले दिवस येणे.*

***सोने होणे*** - *चांगले होणे, सार्थक होणे, उत्तम गती प्राप्त होणे.*

***सोयरीक जमविणे*** - *लग्न जमविणे.*

***सोय लावणे*** - *व्यवस्था करणे.*

***सोनाराने कान टोचणे*** - *तिऱ्हाईताने कान उघाडणी करणे.*

***सोक्षमोक्ष करणे*** - *निकाल लावणे, कायमचा शेवट करणे.*

***सोन्याचा धूर निघत असणे*** - *अतिशय श्रीमंत असणे, खूप संपत्ती असणे.*

***सोस करणे*** - *लोभ धरणे.*

***सोनेरी अक्षराने नोंदणे*** - *महत्त्वपूर्ण घटना म्हणून नोंदले जाणे.*

***स्तोम माजविणे*** - *निष्कारण प्रतिष्ठा वाढविणे.*

***हरभऱ्याच्या झाडावर चढविणे*** - *खोटी स्तुती करून मोठेपणा देणे.*

***हट्टाला पेटणे*** - *हट्ट मुळीच न सोडणे, आग्रह धरणे.*

***हमरीतुमरीवर येणे*** - *जोराने भांडू लागणे, एकेरीवर येणे.*

***हसू खेळणे*** - *हास्य विलसणे.*

***हसता हसता पुरेवाट होणे*** - *अनावर हसू येणे.*

***हस्तगत करणे*** - *ताब्यात घेणे, काबीज करणे.*

***हसू होणे*** - *कुचेष्टा होणे.*

***हसू फुटणे*** - *हसायला येणे.*

***हताश होणे*** - *निराश होणे.*

***हरताळ पाडणे*** - *रोजचा व्यवहार बंद ठेवणे.*

***हृदय उचंबळून येणे*** - *मनात प्रेम दाटून येणे.*

***हवाली करणे*** - *ताब्यात देणे.*

***हृदय जिंकणे*** - *मन वळविणे.*

***हल्ला चढविणे*** - *एखाद्यावर तुटून पडणे.*

***हृदयाला इंगळ्या डसणे*** - *अपमानामुळे राग येणे.*

***हृदयाला पाझर फुटणे*** - *दया येणे.*

***हृदय कळवळणे*** - *मनात दया उत्पन्न होणे.*

***हद्दीबाहेर जाणे*** - *मर्यादा सोडून वागणे.*

***हर्ष हृदयात न मावणे*** - *खूप आनंदीत होणे.(हर्षभरीत होणे).*

***हृदयाशी धरणे*** - *जवळ करणे.*

***हरवून बसणे*** - *स्वतःला विसरणे.*

***हरभऱ्याच्या झाडावर चढणे*** - *स्तुतीला भुलणे.*

***हवालदिल होणे*** - *घाबरणे.*

***हतबल होणे*** - *निराश होणे.*

***हताश होणे*** - *निराश होणे.*

***हवा खात पडणे*** - *उपयोग न करता राहणे.*

***हजेरी लावणे*** - *न चुकता येणे.*

***हट्ट जिरणे*** - *हट्ट जाऊन मनाच्या शुद्ध स्थितीला येणे.*

***हबेलहंडी उडणे*** - *त्रेधा उडणे, फजिती होणे.*

***हस्तक्षेप करणे*** - *ढवळाढवळ करणे.*

***हसत हसत दात पाडणे*** - *गोड गोड बोलून फजिती करणे.*

***हत्याराला पाणी देणे*** - *धार काढणे, सिद्ध होणे, धार पाजळणे.*

***हृदयाची पकड घेणे*** - *मनाचा ताबा घेणे.*

***हृदय हलणे*** - *मन उचंबळून येणे.*

***हृदय नाचू लागणे*** - *आनंदित होणे.*

***हृदय फाटणे, हृदयास बोच लागणे, हृदयाला खोंच लागणे*** - *अतिशय दुःख होणे.*

***हातपाय गळणे*** - *धीर सुटणे.*

***हातचा मळ असणे*** - *सहज शक्य होणे.*

***हाताचा पाळणा करून सांभाळणे*** - *अत्यंत काळजीपर्वूक पालनपोषण करणे.*

***हात ओला करणे*** - *फायदा होणे, लाच घेणे.*

***हात टेकणे*** - *नाईलाज झाल्याने माघार घेणे, निरुपाय होणे.*

***हात देणे*** - *मदत करणे.*

***हात मारणे*** - *ताव मारणे, भरपूर खाणे.*

***हात दाखविणे*** - *फसवणे, चोप देणे, आपले सामर्थ्य दाखविणे, धडा शिकविणे.*

***हाय खाणे*** - *धास्ती घेणे.*

***हात चोळणे*** - *चरफडणे.*

***हातावर तुरी देणे*** - *डोळ्यादेखत फसवून निसटून जाणे.*

***हात हलवीत परत येणे*** - *काम न होता परत येणे, रिकामे येणे.*

***हात झाडून मोकळे होणे*** - *अंगाबाहेर टाकणे, जबाबदारी टाळून मोकळे होणे.*

***हातपाय गाळणे*** - *धीर सोडणे, नाउमेद होणे, निराश होणे.*

***हातापाया पडणे*** - *गयावया करणे.*

***हातात कंकण बांधणे*** - *प्रतिज्ञा करणे.*

***हातास हात लागणे*** - *द्रव्य मिळणे.*

***हादरून टाकणे*** - *भीतीने धक्का देणे.*

***हातात पैसा खेळणे*** - *समाधानकारक पैसा असणे.*

***हाय खाणे*** - *धसका घेणे.*

***हात दाबणे*** - *लाच देणे, लाच घेणे.*

***हातावर पोट धरणे*** - *रोजच्या रोज मोलमजुरी करून पोट भरणे.*

***हातभार लावणे*** - *सहाय्य करणे.*

***हात राबणे*** - *मेहनत करणे.*

***हातवारे करणे*** - *हातांनी हावभाव करणे.*

***हात शिवशिवणे*** - *काही करण्याची जबर इच्छा होणे, स्फुरण येणे.*

***हात पसरणे*** - *विनवणी करणे, विनंती करणे.*

***हार जाणे*** - *मागे राहणे.*

***हाका मारणे*** - *ओरडू करीत बसणे, बोलविणे.*

***हायसे वाटणे*** - *सुटका झाल्यासारखे वाटणे.*

***हाडे खिळखिळी होणे*** - *अंग ढिले होणे.*

***हाडाची काडे करणे*** - *खूप कष्ट करणे.*

***हालवून सोडणे*** - *अस्वस्थ होणे.*

***हाळी देणे*** - *हाक देणे.*

***हाहाःकार होणे*** - *गोंधळ माजणे, मोठी आपत्ती येणे.*

***हाहाकार करून सोडणे*** - *घाबरवून सोडणे.*

***हांजी हांजी करणे*** - *खुशामत करणे.*

***हात उगारणे*** - *मारण्यासाठी हात वर करणे.*

***हात भरून येणे*** - *कामामुळे हात दुखणे.*

***हात चलाखी करणे*** - *हातोहात फसविणे.*

***हात कापून देणे*** - *लेखी करार करून देणे.*

***हात आखडणे*** - *देण्यासाठी पुढे केलेली वस्तू एकाएकी मागे घेणे.*

***हाल सोसणे*** - *कष्ट सहन करणे.*

***हात चालणे*** - *सामर्थ्य असणे, काम करणे.*

***हात टाकणे*** - *मारणे.*

***हात आखडता घेणे*** - *देण्याचे प्रमाण कमी करणे.*

***हाताला हात लावणे*** - *मेहनत न घेता फुकटचे श्रेय मिळणे.*

***हातात पैसा खुळखुळणे*** - *खूप पैसा असणे.*

***हां हां म्हणता*** - *बघता बघता, लगेच.*

***हात धरणे*** - *वरचढ होणे.*

***हात पोचणे*** - *कृतकृत्य होणे.*

***हाताशी धरणे*** - *मदतीला घेणे.*

***हाडीमांशी भिनणे*** - *अंतर्बाह्य व्यापून टाकणे.*

***हाडे दिसणे*** - *अशक्त होणे.*

***हात धुवून पाठीस लागणे*** - *एखाद्याचा नाश करण्यासाठी आग्रहाने प्रवृत्त होणे.*

***हास्यास्पद ठरणे*** - *लोकांना हसण्याचा विषय होणे.*

***हात राखून खर्च करणे*** - *काटकसरीने खर्च करणे.*

***हात मिळवणी करणे*** - *संगनमत करणे.*

***हातातोंडाशी गाठ पडणे*** - *जेमतेम खाण्यास मिळणे.*

***हातातोंडास येणे*** - *फल देण्याच्या स्थितीला येणे, मिळण्याची आशा असणे.*

***हात घाईवर येणे*** - *मारामारी करणे.*

***हातपाय मोकळे होणे*** - *मुक्त होणे.*

***हातघाईचा हल्ला चढविणे*** -*जोरदार चढाई करणे.*

***हात तोकडे पडणे*** - *मदत करण्याची क्षमता नसणे.*

***हाय हाय म्हणणे*** - *दुःख व्यक्त करणे.*

***हातावर शीर घेणे*** - *जिवाची पर्वा न करणे.*

***हातावर हात देऊन पळणे*** - *डोळ्यादेखत (उघडपणे) पळणे.*

***हातचे राखून काम करणे*** - *कामचुकारपणा करणे.*

***हातावर संसार करणे*** - *भिक्षा मिळवून संसार करणे.*

***हाती पायी उतरणे*** - *संकटातून मुक्त होणे, मोकळे होणे.*

***हाती भोपळा घेणे*** - *भीक मागू लागणे.*

***हाता पायातून वारे जाणे*** - *शरीरातील सर्व शक्ती नाहीशी होणे.*

***हाडे खिळखिळी करणे*** - *अतिशय त्रास देणे.*

***हाडाला खिळणे*** - *पक्का चिकटणे.*

***हिडीसफिडीस करणे*** - *दुसऱ्याला कमी लेखून एक सारखे टोचून बोलणे, तुसडेपणाने वागणे.*

***हिय्या करणे*** - *धाडस करणे.*

***हिरावून घेणे*** - *हिसकावून घेणे.*

***हिरमुसला होणे*** - *विरस होणे.*

***हिशेबात घेणे*** - *विचारात घेणे.*

***हुकमी एक्का*** - *खात्रीचा खेळाडू.*

***हुरूप वाढणे*** - *एखादे काम अधिक वेगाने करण्याची इच्छा होणे.*

***हुरहुर लागणे*** - *मनाला अस्वस्थता वाटणे.*

***हुंदका गिळणे*** - *दुःख गिळणे.*

***हुसकून लावणे*** - *घालवून देणे.*

***हुज्जत घालणे*** - *उगाच वाद करीत बसणे.*

***हुकुमाची तालीम होणे*** - *हुकुमाची अंमलबजावणी करणे.*

***हुकुमत गाजविणे*** - *अंमल करणे.*

***हुतूतू घालणे*** - *आरडाओरड करून दंगामस्ती करणे.*

***हूल देणे***- *चकविणे.*

***हूं की चू न करणे*** - *गप्प बसणे.*

***हेवा वाटणे*** - *मत्सर किंवा द्वेष वाटणे, एखाद्याजवळ असलेल्या वस्तूची ओढ लागणे.*

***हेटाळणी करणे*** - *कमी लेखणे.*

***हेळसांड करणे*** - *दुर्लक्ष करणे.*

***हेका सोडणे*** - *हट्ट सोडणे.*

***होळी करणे*** - *नाश करणे.*

***होस हो देणे*** - *संमती दर्शविणे.*

***होरपळून निघणे*** - *पोळून निघणे.*

***होळी होणे*** - *जळून नष्ट होणे.*

***क्षणाचाही उशीर न लावणे*** - *किंचितही वेळ न लावणे.*

***क्षिति न बाळगणे*** - *पर्वा न करणे.*

***क्षितीजापर्यंत जाणे*** - *कोणत्याही कृत्याच्या अंतापर्यंत जाणे.*

***क्षुब्ध होणे*** - *रागाने चवताळणे.*

# भाग २ - (६ ते १६)

१) जोड शब्द व त्यांचे अर्थ
२) शब्द समूहाबद्दल एक शब्द
३) म्हणी व त्यांचे अर्थ
४) शून्यात परार्धे भरली आहेत
५) वाक्प्रचार व त्यांचे अर्थ
६) विरुद्ध अर्थाचे शब्द
७) समान अर्थाचे शब्द
८) समूहदर्शक शब्द
९) नर-मादी-अपत्य
१०) पंचेद्रियांची करामत
११) प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण
१२) वैशिष्ट्ये
१३) अलंकारिक शब्दयोजना
१४) सारवट शब्द
१५) एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ
१७) परंपरागत उपमा

## प्रश्नसंग्रह

# (६) विरूद्ध अर्थाचे शब्द

## विरूद्ध अर्थाचे शब्द

अग्रज X अनुज

अकल X बेअकल

अतिवृष्टी X अनावृष्टी, अवर्षण

अजस्त्र X चिमुकले

अजाण X सुजाण

अधिक X उणे

अध्ययन X अध्यापन

अनाथ X सनाथ

अन्य X अनन्य

अनुकुल X प्रतिकुल

अपराधी X निरपराधी

अपेक्षित X अनपेक्षित

अब्रू X बेअब्रू

अबोल X वाचाळ, बोलका

अभिमान X दुरभिमान

अभिमानी X निरभिमानी

अमाप X अल्पसे

अमृत X विष

अमीर (श्रीमंत) X गरीब

अल्प X बहु

अल्पसंख्य X बहुसंख्य

अमूल्य X मौल्यवान

अल्लड X पोक्त

अलीकडे X पलीकडे

अवघड X सवघड, सुलभ, सोपे

अवजड X हलके

अवसर X अनवसर

अवधान X अनवधान

अस्सल X नक्कल

*असह्य X सुसह्य*

*असली X नकली*

*अज्ञान X सज्ञान*

*अंधार, काळोख X उजेड, प्रकाश*

*अंधुक X स्पष्ट, सुस्पष्ट*

*अहंकार X निरहंकार, नम्र*

*आकुंचित X विस्तारित*

*आखूड, जवळ X लांब, लांबलचक*

*आकलनीय X अनाकलनीय*

*आकाश X पाताळ*

*आगमन X निर्गमन, गमत*

*आगेकूच X माघार*

*आघाडी X पिछाडी*

*आठवण X विसर, विस्मृती, विस्मरण*

*आठवणे (स्मृती) X विसरणे*

*आडवा X उभा*

*आत X बाहेर*

*आदर X अनादर*

*आदि X अंत*

*आदी X अनादी*

*आधी X नंतर*

*आधार X निराधार*

*आधुनिक X जुनी*

*आंधळा X डोळस*

*आनंद X दुःख, शोक*

*आपुलकी X दुरावा*

*आमंत्रित X अगांतुक, आगंतुक*

*आयात X निर्यात*

*आरोहण X अवरोहण*

*आरंभ (प्रारंभ) X शेवट, अखेर, अंत*

*आवक X जावक*

*आवड X नावड*

*आवडता X नावडता*

*आवश्यक X अनावश्यक*

*आशा X निराशा*

*आसक्त X अनासक्त, विरक्त*

*आस्था X अनास्था*

*आस्तिक X नास्तिक*

*आळस X उत्साह*

*आळशी X उद्योगी, कष्टाळू, उत्साही*

*आज्ञा X विनंती*

*इकडे X तिकडे*

*इतके X तितके*

*इच्छा X अनिच्छा*

*इथे X तिथे*

*इमान X बेइमान*

*इमानी X बेइमानी*

*इलाज X नाइलाज*

*इष्ट X अनिष्ट*

*इहलोक X परलोक*

*उगवता X मावळता*

*उघड (प्रकट) X गुप्त, गूढ*

*उघडे X बंद*

*उच्च X नीच*

*उच्चारित X अनुच्चारित*

*उंच X ठेंगू, ठेंगणा, सखल*

*उचित X अनुचित*

*उजवा X डावा*

*उणे X दुणे, अधिक*

*उतरण X चढण*

*उत्तर X दक्षिण, प्रत्युत्तर, प्रश्न*

*उत्कर्ष X अपकूर्ष, ऱ्हास, अधोगती*

*उत्कृष्ट X निकृष्ट, कनिष्ठ*

*उतरणे X चढणे*

*उतार X चढ*

*उताणे X उपडे*

*उताणा X पालथा*

*उत्तरायण X दक्षिणायण*

*उत्पन्न* X *खर्च*

*उत्सुक* X *अनुत्सुक*

*उत्साह* X *निरुत्साह, अनुत्साह*

*उत्साही* X *निरुत्साही*

*उत्तीर्ण* X *अनुत्तीर्ण*

*उथळ* X *खोलगट, खोल*

*उद्धट* X *नम्र, विनयशील*

*उपयोगी* X *निरुपयोगी*

*उदय* X *अस्त*

*उदार* X *अनुदार, कृपण, कद्रु, कंजूस, संकुचित*

*उधळ्या* X *कंजूस, काटकसरी, मितव्ययी*

*उधार* X *रोख*

*उन्नती* X *अवनती*

*उन्नत* X *अवनत*

*उपकार* X *अपकार*

*उपमेय* X *अनुपमेय*

*उपस्थित* X *अनुपस्थित*

*उपद्रवी* X *निरुपद्रवी*

*उपयुक्त* X *अनुपयुक्त, निरुपयोगी*

*उद्योगी* X *निरुद्योगी*

*उपाय* X *निरुपाय*

*उभी* X *बसलेली*

*उलटा* X *सुलटा*

*उशीरा (सावकाश)* X *लवकर*

*उष्ण तप्त* X *थंड, शीतल*

*उन* X *सावली*

*एक* X *अनेक*

*एकजूट* X *फूट, फाटाफूट*

*एकम* X *वेगवेगळे*

*एकदा* X *अनेकदा*

*एकमत* X *दुमत*

*एकवचन* X *अनेकवचन*

*एकी* X *दुफळी, बेकी*

*एहिक* X *पारमार्थिक*

*ऐक्य X दुही, फूट*

*ऐच्छिक X अनैच्छिक, अपरिहार्य*

*ऐलतीर X पैलतीर*

*ओळखी X अनोळखी*

*ओला X कोरडा, सुका*

*ओवळा X सोवळा*

*औरस X अनौरस*

*कच्चा X पक्का,*

*कठीण (अवघड) X सोपे, मऊ, कोमल, मृदू*

*कठोर X मृदू, कोमल, सौम्य, कनवाळू*

*कडक X सौम्य, नरम, मऊ*

*कडू X गोड*

*कर्णमधुर X कर्णकटू*

*कबूल X नाकबूल*

*कमी X जास्त*

*कलंक X भूषण*

*कल्पित X अकल्पित*

*कल्याण X अकल्याण*

*कळस X पाया, पायरी*

*कळा X अवकळा*

*काटकसर X उधळपट्‌टी*

*काटकुळे X जाड*

*कायम X तात्पुरते*

*कायदेशीर X बेकायदेशीर*

*काळा X गोरा, पांढरा*

*काळोख X उजेड, प्रकाश*

*किमान X कमान*

*कीर्ती X अपकीर्ती*

*कुंठित X अकुंठित*

*कुशल X अकुशल*

*कोरडे X ओले*

*कोवळा (कोवळी) X जून, निबर*

*कृतज्ञ X कृतघ्न*

*कृत्रिम X नैसर्गिक, स्वाभाविक, अकृत्रिम*

*कृपा X अवकृपा, रोष*

*कृश (बारीक) X स्थूल, धट्टाकट्टा, लट्ठ*

*खर्चिक X कंजूस*

*खंडन X मंडन*

*खरा X खोटा*

*खरेदी X विक्री*

*खात्री X संशय*

*खाली X वर*

*खिन्न X प्रसन्न*

*खुळा X शहाणा*

*खूप (पुष्कळ) X थोडे*

*खूष, खुष, खुश, खूश X नाखूष, नाखुष, नाखूश, नाखुश*

*खोटी X खरी*

*मढूल X स्वच्छ*

*गडद, भडक, गहिरा X फिकट*

*गतकाळ X भविष्यकाळ*

*गद्य X पद्य*

*गंभीर (पोक्त) X पोरकट, अवखळ*

*गम्य X अगम्य*

*गरम X थंड, गार*

*गरिबी X श्रीमंती*

*ग्रामीण X नागरी, शहरी*

*ग्राहक X विक्रेता*

*ग्राह्य X अग्राह्य, न्याज्य*

*गुण X दोष, अवगुण*

*गुरू X शिष्य*

*गुळगुळीत X खडबडीत, खरबरीत*

*गोरेपन X काळेकुट्ट*

*घट्ट X पातळ, सैल, ढिला, ढगळ*

*घटणे X वाढणे*

*घाऊक (ठोक) X किरकोळ*

*चंचल X स्थिर*

*चटाई X माधार*

*चपल, चपळ X मंद, अचपळ*

*चल X अचल, स्थिर*

*चवदार X बेचव*

*चांगले X वाईट*

*चिमुकले, लहानसे, थोडे X प्रचंड, विशाल, अवाढव्य, भव्य*

*चिरकाल X अल्पकाल*

*चूक X बिनचूक, बरोबर*

*चैन X बेचैन*

*चोर X साव*

*छोटा X मोठा*

*छोटेसे X मोठेसे*

*जगणे X मरणे*

*जड X हलके*

*जन्म X मृत्यू, मरण*

*जवाबदार X बेजवाबदार*

*जमा X खर्च*

*जय, विजय X पराजय, पराभव, अपजय*

*जाणता X अजाणता*

*जलद, भराभर X हळू, सावकाश, हळूहळू*

*जवळ X दूर*

*जहाल X मवाळ*

*जागृत X निद्रिस्त*

*जागा X झोपलेला*

*जाणे X येणे*

*जास्त X कमी, थोडे*

*जिंकणे X हरणे*

*जित X जेता, विजयी, अजित*

*जिवंत X मृत, मेलेला*

*जीर्ण X मजबूत*

*जीवन X मरण*

*जोड X विजोड*

*जोडणे X मोडणे*

*झपाझप (झरझर) X सावकाश*

*ज्येष्ठ X कनिष्ठ*

*टंचाई X विपुलता, रेलचेल, समृद्धी*

*टणक* X *मऊ, मृदू*

*टपोरे* X *बारिक*

*टवटवीत* X *मलूल, निस्तेज*

*तर्क* X *वितर्क*

*तृप्त* X *अतृप्त*

*तप्त* X *थंड*

*तथ्य* X *मिथ्य*

*तरूण* X *वृद्ध*

*तळ* X *माथा*

*ताजा* X *शिळा*

*तारक* X *मारक*

*तिरका, तिरपा* X *सरळ*

*तीव्र* X *सौम्य, कोमल*

*तीक्ष्ण* X *बोथट*

*तेजस्वी (लखलखीत)* X *निस्तेज*

*तेजी* X *मंदी*

*तोड* X *बिनतोड*

*थंडी* X *उष्णता, गरमी*

*थांग* X *अथांग*

*थोर* X *सान, लहान*

*थोरला* X *धाकटा*

*दयाळू* X *निर्दयी, निर्दय, क्रूर*

*दृश्य* X *अदृश्य*

*दाट, घनदाट* X *विरळ, फतळ*

*दारिद्र्य* X *श्रीमंती*

*दिन* X *रजनी, रात*

*दिवस* X *रात्र*

*दीर्घ* X *ऱ्हस्व*

*दीर्घकाळ* X *अल्पकाळ*

*दीर्घायुषी* X *अल्पायुषी*

*दुरुस्त* X *नादुरुस्त*

*दुष्ट* X *सुष्ट, सुष्ठ*

*दूर* X *जवळ, निकट*

*दूरवर* X *जवळपास*

*देव X दैत्य, दानव, राक्षस*

*देश X विदेश*

*देशभक्त X देशद्रोही*

*दोषी X निर्दोषी*

*दोस्ती X वैर*

*धष्टपुष्ट X रोड, रोडका*

*धनाढ्य X गरीब, दरिद्री*

*धनिक, धनवंत X निर्धन, गरीब*

*धर्म X अधर्म*

*धिटाई X भित्रेपणा, भ्याडपणा*

*धीट X भित्रा, भेकड, भ्याड*

*धूर्त X भोळा*

*धाडस X भित्रेपणा*

*धैर्यवान, भेकड*

*नफा, फायदा, लाभ X तोटा, नुकसान, हानी*

*नम्रता X गर्विष्टपणा, उद्धटपणा, उर्मटपणा*

*नम्र X उद्धट*

*नर X नारी*

*नवी X जुनी*

*नाजूक, कोमल X राठ, राकट*

*न्याय X अन्याय*

*निर्दयता X सदयता, सहृदयता*

*नियमित X अनियमित*

*निरभ्र X अभ्राच्छादित*

*निश्चय X अनिश्चय*

*निश्चीत X अनिश्चत*

*नियंत्रित X अनियंत्रित*

*निश्चिंत X सचिंत*

*निर्लज्ज X सलज्ज*

*निष्काम X सकाम*

*नीटनेटका X गबाळ्या*

*नीती X अनीती*

*नैसर्गिक X अनैसर्गिक*

*नोकर, चाकर (सेवक) X मालक, धनी*

*पक्के X कच्चे*

*पगारी X बिनपगारी*

*परवानगी X मनाई, बंदी*

*पर्वा X बेपर्वा*

*पराजित X अपराजित*

*परिचित X अपरिचित*

*परिहार्य X अपरिहार्य*

*पवित्र X अपवित्र*

*पसंत X नापसंत*

*पहिला X शेवटचा, अखेरचा*

*प्रखर, उग्र X सौम्य*

*प्रगत X अप्रगत*

*प्रगती X अधोगती, परागती*

*प्रत्यक्ष X अप्रत्यक्ष*

*प्रतिबंध X अप्रतिबंध*

*प्रतिष्ठा X अप्रतिष्ठा*

*प्रफुल्लित X म्लान, सुकलेले*

*प्रशंसा X निंदा, अप्रशंसा*

*प्रसन्न X अप्रसन्न, खिन्न, खट्टू, विषण्ण*

*प्रवृत्त X परावृत्त, निवृत्त*

*प्रसरण X आकुंचन*

*प्रस्तुत X अप्रस्तुत*

*प्रसिद्ध X अप्रसिद्ध*

*पात्र X अपात्र*

*पाठिंबा X विरोध*

*पांढराशुभ्र X काळाकुट्ट*

*पाप X पुण्य*

*पारदर्शक X अपारदर्शक*

*पायथा X माथा, शिखर*

*प्राचीन X अर्वाचीन*

*प्रामाणिक X अप्रामाणिक*

*पास X नापास*

*प्रिय X अप्रिय*

*पुढारलेले X मागासलेले*

*पुढारी (नेता)* X *अनुयायी*

*पुढील* X *मागील*

*पुढे (समोर)* X *मागे*

*पुण्यवान* X *पापी*

*पुरेसे* X *अपुरे*

*पुरोगामी* X *कर्मठ, सनातनी*

*पूर्ण* X *अपूर्ण*

*पूर्णांक* X *अपूर्णांक*

*पूर्व* X *पश्चिम*

*पूर्वी* X *नंतर*

*प्रेम* X *द्वेष, राग, तिटकारा*

*प्रेमळ* X *रागीट*

*पोकळ* X *भरीव, भरलेला*

*पाअर्वात्य* X *पास्विमात्य, पाश्चात्य*

*पौर्णिमा* X *अमवास्या, अमावस्या*

*फरक* X *साम्य*

*बंधु* X *भगिनी*

*बरे* X *वाईट*

*बारीक* X *जाड*

*बिंब* X *प्रतिबिंब*

*बिकट* X *सुगम, सुलभ, सोपे*

*बुद्धिमान (हुशार)* X *बुद्धिहीन, मठ्ठ*

*बेरीज* X *वजाबाकी*

*बोलका, वाचाळ* X *अबोल, मुका, मूक*

*भद्र* X *अभद्र*

*भरती* X *ओहोटी*

*भय* X *निर्भय*

*भरपूर* X *थोडे*

*भर* X *झीज*

*भरभर* X *हळूहळू*

*भरभराट* X *ऱ्हास*

*भाग्य* X *दुर्भाग्य*

*भाग्यवान* X *भाग्यहीन, अभागी*

*भेद, तफावत* X *अभेद, साम्य*

*मंगल X अमंगल*

*मंजुळ X कर्कश*

*मंजूर X नामंजूर*

*मतभेद X मतैक्य*

*मर्त्य X अमर*

*मृत X जिवंत*

*मर्द X नामर्द*

*मनोरंजक X कंटाळवाणे, नीरस*

*महात्मा X दुरात्मा*

*महान X लहान, सान*

*मागासपणा X पुढारलेपणा*

*माजी X आजी, विद्यमान*

*मान, मानसन्मान X अपमान*

*मान्य X अमान्य*

*माहेर X सासर*

*मित्र X शत्रू, अमित्र*

*मित्रत्व X शत्रुत्व*

*मुख्य X गौण*

*मोठा X लहान*

*यश X अपयश*

*यशस्वी X अयशस्वी*

*येथे X तेथे*

*योग्य X अयोग्य*

*रणशूर X रणभीरू*

*रसाळ X नीरस*

*रसिक X अरसिक*

*राग X लोभ*

*राजमार्ग X आडमार्ग*

*राजा X प्रजा*

*राव X रंक*

*रिकामा X भरलेला*

*रूचकर X बेचव, रुचिहीन*

*रुची X अरुची*

*रुंद X अरुंद*

रेखीव X ओबड धोबड

रोगी, रोगट X निरोगी

लघु X गुरु, विशाल

लवचिक X ताठर

लक्ष X दुर्लक्ष

लक्ष्मीपुत्र X दरिद्री

लागू X गैरलागू

लाजरा X निलाजरा

लाज X निर्लज्ञपणा

लायक X नालायक

लिखित X अलिखित

लोभ X निर्लोभ

लोक X परलोक

लौकिक X दुर्लौकिक

वरिष्ठ X व्यनिष्ठ

वर्णनीय X अवर्णनीय

व्यंग X अव्यंग

वंद्य X निंद्य

व्यवस्था X अव्यवस्था

व्यवस्थित X अव्यवस्थित

व्यवहार X अव्यवहार

वादी X प्रतिवादी

वाजवी X गैरवाजवी

विकसित X अविकसित

विकास X ऱ्हास

विकार X निर्विकार

विचार X अविचार

विजयी X पराभूत, पराजित

विधायक X विधातक, विघातक

विनाशी X अविनाशी

विपुल X थोडे, थोडेसे, कमी, अल्प

विपुलता X कमतरता, तुटवडा

विभक्त X अविभक्त, एकम

वियोग, विरह X संयोग, मीलन, सहवास

*विवाहित X अविवाहीत*

*विवेक X अविवेक*

*विरोध X संमती, मान्यता*

*विवाद X निर्विवाद*

*विश्वास X अविश्वास*

*विसंवाद X सुसंवाद*

*वेध X निर्वेध*

*वेगडे X सारखे*

*वेळी X अवेळी*

*वैयक्तिक X सार्वजनिक, सामुहिक, सामुदायिक*

*शकुन X अपशकुन*

*शक्य X अशक्य*

*शंका X खात्री, निश्शंक*

*शत्रुत्व X मैत्री*

*शहाणा X वेडा, मूर्ख, मूढ*

*शहर X खेडे*

*शांत X अशांत, तापट, रागीट*

*शांती X अशांती*

*शाप X वर, वरदान, आशीर्वाद*

*श्वास X निश्वास, उच्छ्वास*

*श्रांत X अविश्रांत*

*शाश्वत X अशाश्वत, क्षणभंगुर, नश्वर*

*शिकणे X शिकविणे*

*शिस्त X बेशिस्त*

*शिष्ट X अशिष्ट, असभ्य*

*शीघ्र X मंद*

*शुक्लपक्ष X कृष्णपक्ष*

*शुद्ध X अशुद्ध*

*शुद्धपक्ष X वद्यपक्ष*

*श्रुत X अश्रुत*

*शुभ X अशुभ*

*शुभशकुन X अपशकुन*

*शूर X भिमा*

*शेंडा X बुडखा, मूळ*

*शेष* X *निःशेष, निश्शेष*

*श्रेष्ठ* X *कनिष्ठ*

*शोभिवंत* X *विशोभित*

*सकर्मक* X *अकर्मक*

*सकृत* X *अकृत*

*सकारण* X *अकारण*

*सकाळ* X *संध्याकाळ, सायंकाळ*

*सख्त* X *सौम्य*

*संकुचित* X *व्यापक, उदार, विशाल*

*सगुण* X *निर्गुण*

*संघटन* X *विघटन*

*संघटित* X *असंघटित*

*सचेतन* X *अचेतन*

*सज्जन* X *दुर्जन*

*सजातीय* X *विजातीय*

*सजीव* X *निर्जीव*

*सत्कर्म* X *दुष्कर्म*

*सत्य* X *असत्य*

*संतुष्ट* X *असंतुष्ट*

*संतोष* X *असंतोष*

*सतेज* X *निस्तेज*

*सदय* X *निर्दय*

*सदाचार* X *दुराचार, अनाचार*

*सदाचारी* X *दुराचारी*

*सदाचरण* X *दुराचरण*

*सद्‌गती* X *दुर्गती*

*सद्‌गुण* X *दुर्गुण*

*सगुण* X *दुर्गुण*

*सदुपयोग* X *दुरुपयोग*

*सदोष* X *निर्दोष*

*सधन* X *निर्धन*

*सनदशीर* X *बेसनदशीर*

*सधवा* X *विधवा*

*सनातनी* X *सुधारक, पुरोगामी*

सन्मार्ग X कुमार्ग

सन्मुख X विन्मुख

संन्यासी X संसारी

स्पष्ट X अस्पस्ट

संदिग्ध X असंदिग्ध

संपन्न X असंपन्न

स्पृश्य X अस्पश्य

सफल X असफल, विफल, निष्फल

सविकारी X निर्विकारी, अविकारी

सबळ, सबल, प्रबळ X दुर्बळ, दुर्बल

संबंध X असंबंध

संभव X असंभव

सम X विषम, व्यस्त

समज X गैरसमज, नासमज

समता X विषमता

समान X असमान

समर्थ X असमर्थ

समाधान X असमाधान

स्मरण X विस्मरण

स्मृती X विस्मृती

सरळ, धोपट X वक्र, वाकडा, तिरपा, वेडावाकडा

सलग X विलग, अलग

स्वकीय X परकीय

स्वर्ग X नरक

स्वच्छ X अस्वच्छ, घाणेरडी

स्वतंत्र X परतंत्र

स्वदेश X परदेश

स्वस्थ X अस्वस्थ

स्वदेशी X परदेशी

स्वधर्म X परधर्म

स्वराज्य X परराज्य

सशक्त X अशक्त, दुर्बल

संशय X निःसंशय

सशस्त्र X निःशस्त्र

*स्वस्त* X *महाग*

*सहकार* X *असहकार*

*सहकार्य* X *असहकार्य*

*सहज* X *मुद्दाम*

*सह्य* X *असह्य*

*सहेतुक* X *निर्हेतुक*

*सज्ञान* X *अज्ञान*

*साकार* X *निराकार*

*साध्य* X *असाध्य*

*साधारण* X *असाधारण*

*साधार* X *निराधार*

*सार्थक* X *निरर्थक*

*सामान्य* X *असामान्य*

*सारखे* X *निराळे*

*सावकाश* X *झपाझप, झटकन*

*सावध* X *बेसावध, असावध*

*साव* X *चोर*

*स्वातंत्र्य* X *पारतंत्र्य*

*स्वार्थी* X *निःस्वार्थी*

*स्वाधीन* X *पराधीन*

*स्वाभाविक* X *अस्वाभाविक*

*स्वाभिमानी* X *स्वाभिमान शून्य*

*सायास* X *विनासायास*

*सावत्र* X *सख्खा*

*स्वावलंबी* X *परावलंबी*

*स्वावलंबन* X *परावलंबन*

*स्वामी* X *दास*

*स्वावलंबी* X *परावलंबी*

*साशंक* X *निःशंक*

*साक्षर* X *निरक्षर*

*साक्षरता* X *निरक्षरता*

*स्थिर* X *अस्थिर*

*स्थिरता* X *अस्थिरता*

*स्वीकार* X *अव्हेर, धिक्कार*

सुकर्म X कुकर्म, दुष्कर्म

सुकर X दुष्कर

सुकाळ X दुष्काळ

सुकीर्ती X दुष्कीर्ती

सुख X दुःख

सुखद X दुःखद

सुखकारक X दुःखकारक

सुगम X दुर्गम

सुगंध X दुर्गंध

सुचिन्ह X दुश्चिन्ह

सुजन X दुर्जन

सुजाण X अजाण

स्तुती X निंदा, निर्भत्सना

सुदैव X दुर्दैव

सुदैवी X दुर्दैवी

सुंदर,देखणा (सुरूप) X कुरूप

सुपीक X नापीक, ओसाड, वैराण

सुपुत्र X कुपुत्र

सुप्रसिद्ध X कुप्रसिद्ध

सुबक X बेढब, ओबडधोबड

सुबत्ता X दुर्भिक्ष, दैन्य

सुबुद्धी X दुर्बुद्धी

सुबोध X दुर्बोध, गहन

सुयोग X कुयोग

सुमती X दुर्मती, कुमती

सुर X असुर

सुरस X नीरस

सुरक्षित X असुरक्षित

सुरेल X बेसूर

सुलभ X दुर्लभ

सुलक्षणी X कुलक्षणी

सुव्यवस्था X गैरव्यवस्था, अव्यवस्था

सुवार्ता X दुर्वार्ता

सुविख्यात X कुविख्यात

*सुविचार X कुविचार*

*सुशिक्षित X अशिक्षित*

*सुशोभित X विशोभित*

*सुसंगत X विसंगत, असंगत*

*सुसंस्कृत X असंस्कृत*

*सुसंवाद X विसंवाद*

*सुज्ञ X अज्ञ*

*सूर्योदय X सूर्यास्त*

*सूक्ष्म (कृश) X स्थूल*

*सोवळे X ओवळे*

*सोय X गैरसोय*

*सौंदर्य X कुरुपता*

*सौभाग्य X वैधव्य*

*हजर X गैरहजर*

*हरकत X बिनहरकत*

*हर्ष X खेद, विषाद*

*हसणे X रडणे*

*हसू X रडू*

*हार X जीत*

*हित X अहित*

*हिमती X बेहिमती*

*हिंसा X अहिंसा*

*हिशेबी X बिनहिशेबी*

*हितकारक X अहितकारक*

*होकार (रुकार) X नकार*

*क्षय X वाढ*

*क्षणभंगुर X चिरकालीन*

*क्षुद्र X महत्तवपूर्ण*

*ज्ञान X अज्ञान*

*ज्ञात X अज्ञात*

*ज्ञानी X अज्ञानी*

*ज्ञेय X अज्ञेय*

# (७) समान अर्थाचे शब्द (एकाच अर्थाचे अनेक शब्द)

## समान अर्थाचे शब्द (एकाच अर्थाचे अनेक शब्द)

*अक्राळविक्राळ - भेसूर, भयंकर, राक्षसी, उग्र.*

*अग्नी - अनल, पावक, वन्ही, विस्तव, वैश्वानर*

*अचानक - अनपेक्षित, अकस्मात, एकाएकी*

*अर्जुन - पार्थ, धनंजय, फाल्गुन*

*अनमान - हयगय, उपेक्षा, दुलर्क्ष, अनादर*

*अघटित - विलक्षण, चमत्कारिक, असंभाव्य*

*अभिनय - हावभाव, अंगविक्षेप*

*अघोर - भीतिदायक, भयंकर, वाईट*

*अनुक्रमणिका - यादी, सूची*

*अभिनव - नवीन, नूतन, अपूर्व*

*अभिप्रेत - अर्थ, हेतू, उद्देश*

*अमृत - पीयुष, सुधा, संजीवनी*

*अपंग - व्यंग, लुळा, विकलांग, पांगळा*

*अमाप - पुष्कळ, विपुल, भरपूर*

*अडथळा - मनाई, मज्जाव, आडकाठी*

*अगत्य - अस्था, कळकळ, आपुलकी, कळवळा, आदर*

*अमित - असंख्य, अगणित, अमर्याद, अपार*

*अरण्य - वन, कानन, विपिन, जंगल*

*अवघड - कठीण, विकट, दुर्घट*

*अवकाश - अवधी, समय, वेळ, काल*

*अश्व - घोडा, हय, तुरग, तुरंग, तुरंगम, वारू, वाजी*

*अही - सर्प, साप, भुजंग, व्याल, तक्षक*

*अशुभ - वाईट, अमंगल*

*असामी - इसम, व्यक्ती, माणूस*

*अस्त - अंतर्धान, लोप, शेवट*

*अशक्त - रोडका, दुर्बल, क्षीण*

*अंग - शरीर, तनू, काया*

*अहंकार - गर्व, ताठा, घमेंड*

*अस्थिर - चंचल, क्षणिक*

*अनुकरण - नक्कल, माकडचेष्टा*

*अंधार - तम, काळोख, तिमिर*

*आई - माता, माय, जननी, माऊली, जन्मदात्री*

*आकाश - गगन, नभ, अंबर, आभाळ, व्योम, अंतराळ*

*आधी - अगोदर, प्रथम*

*आकांत - आक्रंद, आक्रोश*

*आठवण - स्मरण, स्मृती*

*आजार - रोग, पीडा, व्याधी*

*आनंद - संतोष, मोद, हर्ष, तोष, प्रमोद*

*आरंभ - प्रारंभ, सुरूवात, आदि, आदी*

*आकर्षण - मोह, ओढ, पाश*

*आवाज - नाद, निनाद, रव*

*आवश्यकता - गरज, जरूरी*

*आवड - हौस*

*आग्रह - हट्ट, अट्टहास, हेका*

*आक्रमण - हल्ला, चढाई, स्वारी, मोहीम*

*आवाहन - विनंती, बोलवणे, आमंत्रण*

*आश्चर्य - नवल, विस्मय, अचंबा*

*आहार - खाणे, भोजन, अन्न*

*इंद्र - सुरेंद्र, देवेंद्र, शक्र, पुरंदर, वज्रपाणी, वासव, सहस्त्राक्ष*

*इशारा - सूचना, खूण*

*इन्कार - नापसंती, नाकबूली, निषेध*

*इतराज - नाखूष, रुष्ट, नाराज, अप्रसन्न*

*इतमाम - सरंजाम, थाट, व्यवस्था, लवाजमा*

*इमानी - प्रामाणिक, नेक, एकनिष्ठ*

*इन्साफ - न्याय, निर्णय*

*उत्पन्न - मिळकत, प्राप्ती*

*उपासना - भक्ती, पूजा, आराधना, सेवा*

*उत्साह - आवेश*

*उसंत - फुरसत, विसावा, विश्रांती, आराम*

*उषा - उषःकाल, पहाट, अरुणोदय, प्रातःकाल, प्रभात, सकाळ*

*उणीव - कमतरता, दोष, न्यूनता*

*उपहास - चेष्टा, थट्टा, मस्करी*

*उभा - सरळ, खडा*

*उमेद - हिंमत, धैर्य, उत्साह*

*उद्दाम - उद्धट, उर्मट, असभ्य*

*उत्सुक - उत्कांठित, आसक्ती, आतुर, अधीर*

*ऋषी - मुनी, साधू, वली, बैरागी, संन्यासी, तापसी, संत, तपस्वी*

*ऋण - कर्ज, उपकार, रीण*

*एकटा - एकाकी, एकला*

*एकमोडी - एककल्ली, एकमार्गी*

*एकवार - एकडा, एकवेळ*

*एकाएकी - एकदम, अपचित*

*एकाग्र - एकतान, एकचित्त, स्थिर*

*एहसान - उपकार, दया, कृपा*

*ऐक्य - एकी, मिलाफ, सूट, एकत्व, एकोपा*

*ऐदी - आळशी, मंद, सुस्त, जड*

*ऐट - नखरा, डौल, ताठा, मिजास, दिमाख, रुबाब*

*ऐषआराम - स्वस्थता, चैन, सुखोपभोग, सुख*

*ऐच्छिक - इच्छिलेले, इष्ट*

*ऐसपैस - विस्तीर्ण, प्रशस्त, अमर्याद*

*ओबडधोबड - बेढव, बेडौल, खरबरीत, रांगडे*

*ओटा - नाला, प्रवाह*

*ओझे - भार, बोजा, वजन, जबाबदारी, काळजी*

*ओंड - लोंगर, टरफल, खोल*

*ओढाळ - अनिर्बंध, उनाड, भटक्या*

*ओढी - सवय, माया, लळा, कल*

*औखळ - अवखळ, खोडकर*

*औस - अमवास्या, अवस*

*औक्ष - आयुष्य, जीवित*

*अंत - शेवट, मरण, मृत्यू, अखेर*

*अंगारा - विस्तव, निखास, इंगळ, भस्म*

*अंधार - काळोख, तम, तिमिर*

*अंधुक - पुसट, अस्पष्ट, मंद*

*कथा - गोष्ट, हकीकत, हकीगत*

*कपाळ - ललाट, भाल, निढळ, निटिल*

*कबूल - मान्य, संमत, पसंत, अभिमत*

*कमळ - पंकज, अंबुज, कमल, नीरज, पदम, नलिनी*

*कन्या - मुलगी, पुत्री, सुता, तनया, तनुजा, आत्मजा, दुहिता, नंदिनी, लेक*

*कल्याण - हित, कुशल, क्षेम*

*करार - वचन, ठराव, कबुली*

*कठोर - निर्दयी, निष्ठूर*

*कच - माघार, अडचण, संकट, अरिष्ट*

*कवच - आच्छादन, आवरण, टरफल*

*कष्ट - श्रम, मेहनत*

*कळस - शिखर, टोक, घुमट, कलश*

*कसूर - कुचराई, चूक, न्यूनता, दोष*

*कज्ञा - खटला, भांडण, लढाई, तंटा, वैर*

*कणव - दया, माया, कृपा, कीव, करूणा*

*कपडा - वस्त्र, वसन, पट, अंबर*

कपट - लबाडी, खोटेपणा, कावा, डाव, डावपेच

कबूल - संमत, मान्य, पसंत, मंजूर, अनुकूल

करडा - कठोर, कडक, निष्ठूर, निर्दय

करणी - कृती, कृत्य, क्रिया

कठीण - अवघड, बिकट

कसरत - व्यायाम, सराव, सवय, मेहनत

कलागत - भांडण, वैर, कळ, लावालावी

कर्मयोग - प्रारब्ध, योगायोग, दैव

काळजी - चिंता, विवंचना, फिकीर, पर्वा, तमा

कान - कर्ण, श्रवण, श्रोत्र

काम - कार्य, कर्तव्य, कृत्य

कावळा - काक, एकास, वायस

कारस्थान - कट, खल, गुप्त, मसलत

किनारा - काठ, तीर

किरण - कर, अंशु, रश्मी

किरकोळ - अशला, रोडका, बारीक, हडकुळा

किल्ला - तट, गड, दुर्ग, कोट

किंमत - मोल, भाव, मुल्य, दर

कीर्ती - लौकिक, प्रसिद्धी, ख्याती

कीड - खोटे, वाईट, कीटक, गंज

कील - मेख, खिळा, अडसर, पाचर

कीव - दया, कृपा, करूणा

कुशल - हुशार, चतुर, बुद्धिमान

कुटाळ - कुचेष्टा, टवाळी, निंदा, उपहास

कुत्रा - श्वान

कुभांड - आळ, कट, कारस्थान, लबाडी

कुरापत - खोडी, कुचाळी, थट्टा, टवाळकी

कुशल - सुखरूप, खुशाल, बुद्धिमान, चतुर

केश - केस, लव, रोम, बाल

कोमल - नाजूक, मऊ, मृदू, सुंदर

कोंडा - भुगा, भूय, चुरा, तूस

कोंभ - अंकुर, मोड, खांब, कोंब

क्रम - अनुक्रम, रांग, ओळ, पद्धती

कृपण - चिकू, कंजूष, चिक्कू, कद्रू

कल्पना - युक्ती, तोड, उपाय, पेच, शक्कल

खग - पक्षी, विहंग, अंडज, द्विज, पाखरू

खरा - सच्चा, प्रामाणिक, सरळ, विश्वास

खबर - बातमी, वार्ता, संदेश, माहिती

खलाशी - नावाडी, नाखवा, खारवा, कोळी

खरमरीत - प्रखर, खणखणी, तीक्ष्ण, सडेतोड

खट्याळ - खोडकर, द्वाड, उनाड, हूड, उपद्व्यापी

खटारा - बैलगाडी, धूड, छकडा

खटका - भांडण, वाद, झगडा, तंटा, कलह

खजीटर - शरमिंदा, लज्जित, शरमलेला, ओशाळा

खचित - निश्चित, खात्री, खरोखर

खुषी - संतोष, तोष, समाधान, आनंद, प्रसन्नता

खुळा - मूर्ख, वेडा, अक्कलशून्य, बावळा

खुळचट - पुळचट, नेभळा, भित्रा

खूप - पुष्कळ, भरपूर, विपुल

खेद - वैषम्य, विषाद, दुःख

खेडे - ग्राम, गाव

खेडूत - गावकरी, ग्रामस्थ

खेड - ग्रंथ, अध्याय, व्यत्यय, अडथळा

खेत - खेद, खिन्नता, हुरहुर

खंदा - साहसी, धाडसी, सामर्थ्यवान

खंक - दीन, दरिद्री, द्रव्यहीन, निर्धन

गणपती - गजानन, एकदंत, गणेश, गौरीनंदन, विघ्नहर्ता, गौरीसुत, विनायक, वक्रतुंड

गरज - जरूरी, आवश्यकता, निकड, अडचण

गरम - उष्ण, उबदार, तप्त

गरूड - खगेंद्र, द्विजराज, वैनतेय

गरीब - दीन, लाचार, पामर, दुबळा

गडप - अदृश्य, बेपत्ता, नष्ट

गबाळा - अजागळ, बावळट, मूर्ख, बावळा

गस्त - पहारा, रखवाली, राखण

गयावया - काकुळती, करूणा, विनवणी, याचना

गदारोळ - गोंधळ, ओरड, खटाटोप, दंगा, हुल्लड

गाय - धेनू, गो, गोमाता

गार - थंड, शीतल, शीत

गाथा - कविता, आर्या, काव्य

गिरी - पर्वत, डोंगर, अचल

गुच्छ - झुबका, घोस, तुरा

गुद्दा - बुक्का, ठोसा, रट्टा

गोत - गोत्र, वंश, पिढी, कूळ

गोळ - मधुर

गोषवारा - सारांश, संक्षेप, तात्पर्य

ग्रह - कल्पना, समजूत, भावना

गोपाळ - कन्हैया, कृष्ण, मोहन, मुरलीधर, गोविंद, गिरीधर

घत - मेघ, ढग, जलह, पयोधर

घर - गृह, सदन, निवास, भवन, गेह, आलय, निकेतन, धाम

घडी - दुमड, संच, बस्तान, रचना

घडामोड - खटाटोप, उलथापालथ, फेरफार, व्यवहार

घाव - प्रहार, वार, आघात, तडाखा

घाई - गडबड, त्वरा, तातडी, जलदी

घाट - आकार, घडण, रचना, ठेवण

घास - कवळ, ग्रास

घास - गवत, तृण, चारा, शब्प

घान - संहार, नाश, विध्वंस, वध

घेर - वर्तुळ, परिसर, परीध, लेढा

घोडा - अश्व, हय, तुरग, तुरंग, तुरंगम, वाजी, वारु

चपल - चलाख, वेगवान, तल्लख, हुशार

चंद्र - शशी, सोम, निशानाथ, चंद्रमा, हिमांशु, सुधाकर, निशापति, इंदू

चंचल - उतावळा, स्वैर, अधीर, उच्छृंखल

चव - स्वाद, आस्वाद, रूची

चप - गप्प, शांत, चूप, चीप, स्तब्ध

चकणा - तिरळा, काणा, तिरपा, तिरवा

चबुतरा - चौथरा, कट्टा, उंचवटा, ओटा

चटकन - झपाझप, झरझर, त्वरीत, चटदिशी, झटपट

चट्टा - व्रण, डाग, वण

चप्पल - वहाणा, जोडा, पायताण, पायतण, पादत्राण

चाकर - नोकर, सेवक, गडी, दास, गुलाम

चाचणी - परीक्षा, तपासणी, पारख

चाणाक्ष - हुशार, चतुर, धूर्त, चलाख, चालाख

चांदी - रूपे

चांदणे - कौमुदी, ज्योत्सना, चंद्रिका

चिमुकले - लहान, छोटे, सान

चिळकांडी - पिचकारी, चिरकांडी, चिपनळी

चिलट - डास, मशक, मच्छर

चिवट - चिकट, वातड, चामट

चिळस - किळस, तिटकारा, वीट, तिरस्कार

चिल्लापिल्ली - मुलेबाळे, पोरे, कच्चीबच्ची, बालबच्ची

चुटपुट - काळजी, तळमळ, खुरखुर, चडफड, हुरहुर

चूर - गर्क, मग्न, गुंग, तल्लीन

चेहरा - चर्या, मुद्रा, तोंडावळा, रूप, मुख

चेपणे - दाबणे, पिळणे, आवळणे

चौकशी - विचारपूस

चौचाल - लहरी, भटक्या, भणंग, स्वच्छंदी

चंगळ - मुबलक, विपुल, विपुलता, पुष्कळ

*चांगले - सुंदर, सभ्य, मनोहर*

*चिंता - काळजी, विवंचना, फिकीर*

*छंद - नाद, आवड, शोक*

*छान - सुरेख, सुंदर, उत्तम*

*छेदणे - कापणे, तोडणे, चिरणे, छाटणे*

*जन - लोक, माणसे*

*जय - विजय, यश, सफल, सिद्धी, यशस्वी*

*जड - मंद, आळशी, मूर्ख*

*जरठ - वृद्ध, म्हातारा, जीर्ण*

*जलद - शीघ्र, लवकर, ताबडतोब, त्वरेने*

*जवळ - तिकट, नजीक, समीप, संनिध, सानिध्य*

*जहर - विष, विख, गर*

*जरब - दरारा, दहरात, वचक, धाक*

*जमीन - भू, भूमी, धरणी, भुई, धरित्री, धरा, धरती*

*जल - नीर, पाणी, जीवन, अंबू, पय, सलील, तोय, उदक, वारी*

*जागा - स्थळ, स्थान, ठिकाण*

*जाहीर - प्रसिद्ध, प्रगट, सर्वश्रुत*

*जवाहीर - सोने, अलंकार, जडजवाहीर, रत्ने, आभरण*

*जाड - लठ्ठ, स्थूल, दांडगा, धष्टपुष्ट*

*जादू - इंद्रजाल, मंत्रतंत्र, मंत्रविद्या*

*जिद्द - हट्ट, आग्रह, दुराग्रह, हेका*

*जिणे - जीवन, आयुष्य, जीवीत, अस्तित्व*

*जिगर - जिवलग, जीवश्चकंठश्च, प्यारा, प्रिय*

*जुना - प्राचीन, जीर्ण, पुरातन*

*जुलूम - अन्याय, छळ, जबरदस्ती*

*जोखीम - हमी, जबाबदारी, धोका*

*जोतिष्य - भविष्य, जातक, कुंडली, भाकीत*

*झकपक - झगमग, चकाळी, चमक, झळक*

*झपाझप - झटपट, लवकर, जलद, झरझर*

*झगडा - भांडण, वाद, तंटा, कलह, संघर्ष, झुंज*

*झरणे - वाहणे, पाझरणे, झिरपणे*

*झडती - तपासणी, तपास, शोध*

*झरोका - गवाक्ष, जाळी, झरूका*

*झाड - वृक्ष, तरू, वनस्पती, द्रुम, झुडूप*

*झीट - मुर्च्छा, घेरी, भोवळ*

*झुंबड - गर्दी, जमाव, दाटी*

*झेंडा - निशाण, पताका, ध्वज*

*झोप - निद्रा, शयन, नीज*

*झोकणे - कलणे, वाकणे, झुकणे*

*झंझावात - तुफान, वावटळ, वादळ*

*टवटवीत - सतेज, प्रफुल्लित, ताजा, तेजस्वी*

*टणक - कणखर, मजबूत, बळकट*

*टकळी - वटवट, बडबड, रडारड*

*टापू - प्रांत, प्रदेश, टप्पा*

*टाहो - आक्रोश, हंबरडा*

*टोलेगंज - भव्य, अजस्त्र, प्रचंड*

*टंगळमंगळ - टाळाटाळ, दिरंगाई, हयगय*

*टाकाऊ - निरुपयोगी, कुचकामी, गुणहीन, व्यर्थ*

*ठग - लुच्चा, फसवा, लुटारु, भामटा*

*ठळक - जाड, स्पष्ट, मोठा, भरीव*

*ठाम - निश्चित, दृढ, बिनचूक, खचित, निर्विवाद*

*ठाव - तळ, बूड, खोली*

*ठीक - बरोबर, उचित, योग्य, सम्पर्क*

*ठेका - आवाज, ताल, ताळ*

*ठेव - संचय, निधी, साठा*

*ठोसा - धपाटा, रपाटा, तडाखा*

*डाकू - चोर, दरोडेखोर, लुटारू*

*डोळा - नयन, लोचन, नेत्र, अक्ष, चक्षू*

*डोके - शीर, मस्तक, शीर्ष, कपाळ, माथा, मूर्धा*

*डौल - दिमाख, ऐट, रुबाब*

*ढवळाढवळ - लुडबूड, उलाढाल, गोंधळ*

*ढग - मेघ, घन, जलन, अंबुद, पयोधर, अब्द, अभ्र, नीरद*

*ढिला - सैल, मऊ, अघळपघळ*

*ढोर - गुरे, जनावरे (गाय, बैल, म्हैस, रेडा, इ.)*

*ढोंग - सोंग, पाखंड, लबाडी*

*ढेकूण - मत्कुण, खटमल*

*तलवार - खडग, समशेर*

*तसवीर - छबी, प्रतिमा, चित्र, तसवीर*

*तपास - चौकशी, शोध, तलास, विचारपूस*

*तफावत - फरक, अंतर*

*तलाव - तटाक, तडाग, कासार*

*तऱ्हा - रीत, पद्धती, मार्ग*

*तकवा - बळ, जोर, शक्ती, ताकद*

*तकलादी - बनावट, नकली, तकलुबी*

*तक्ता - नकाशा, कोष्टक*

*तख्त - सिंहासन, आसन, गादी, तक्त*

*तगडा - सशक्त, बळकट, धिप्पाड, धट्टाकट्टा*

*तज्ञ - माहितगार, जाणता, पंडित, कुशल*

*तड - शेवट, अखेर*

*तड - अडचण, तंगी*

*तडक - नेट, जोर, आवेग, वेग, गती*

*तडजोड - समेट, सलोखा*

*तडफ - उत्साह, चपलता, चलाखी*

*तडा - भेग, चीर, फट*

*तन - शरीर, देह, अंग, काया, तनू*

*तृप्त - संतुष्ट, समाधानी, सुखी*

*तृप्ती - समाधान, संतोष, प्रसन्नता, तोष*

*तृषा - तहान, तृष्णा, इच्छा*

*तप - ध्यान, मनन, आचरण*

*तरतूद - व्यवस्था, सिद्धता, योजना*

*तरबेज - निष्णात, कुशल, वाकबगार, पारंगत, निपूण*

*तंतु - धागा, दोरा, सूत, सूत्र*

*तारू - नौका, नाव, जहाज, गलबत*

*तारीफ - वाहवा, स्तुती, प्रशंसा, वाखाणणी*

*ताडा - मेळ, ताळा, जुळणी*

*तारांबळ - धांदल, घाई*

*ताकीद - समज, हुकूम, जरब, जबर, दरारा*

*तारूण्य - यौवन, जवानी, तरूणपणा*

*तालेवार - श्रीमंत, धनिक*

*तिरसट - त्रासिक, चिडखोर, तुसडा, चिडका*

*तिरपीट - त्रेधा, धांदल, तारांबळ, घाई*

*तीव्र - प्रखर, कडक, उग्र, भयंकर*

*तोटा - नुकसान, हानी*

*तोंड - मुख, वदन, आनन, तुंड*

*तोरा - दिमाख, डौल, ऐट, नखरा*

*थट्टा - चेष्टा, मस्करी, विनोद*

*थंड - शीत, शीतल, गार*

*थंडी - गारठा, गारवा*

*थवा - समदाय, जमाव, गर्दी, चमू*

*थक्क - आश्चर्य, नवल, विस्मय, अचंबा*

*थकणे - दमणे, भागणे, श्रमणे, शिणणे*

*थांग - ठाव, पत्ता, माग, तळ*

*थाट - डामडौल, शोभा, थाटमाट*

*थाळा - ताट, पात्र, परात*

*थिटा - आखूड, अपुरा, अरूंद*

*थीर - शांत, स्तब्ध, सौम्य, निवांत*

*थेट - सरळ, नीट, बरोबर, योग्य*

*थोर - मोठा, श्रेष्ठ, पूज्य*

*थोडा - अल्प, किंचित, थोडका*

*दगड - धोंडा, शिळा, पाषाण, खडक, फत्तर, शिला*

*दंड - काठी, सोटा, छडी, दंडा*

*दृष्टी - नजर, नदर, दृष्ट*

*दागिना - आभूषण, अलंकार, आभरण*

*दार - दरवाजा, कवाड, ताटी, द्वार*

*दांत - दंत, रदन, द्विज (दोनदा जन्मलेला)*

*दाट - घन, घट्ट, निबिड, गर्द*

*दिवस - दिन, वार, वासर, अह*

*दिवा - दीप, दीपक*

*दुनिया - जग, पृथ्वी, इहलोक*

*दुर्ग - किल्ला, कोट, गढी*

*दूध - दुग्ध, पर, क्षीर*

*दुबळा - दुर्बल, सामर्थ्यहीन, अशक्त*

*दुर्दैव - दुर्भाग्य*

*दुर्दैवी - अभागी, दैवहीत, भाग्यहीत, दुर्भाग्यशाली*

*दुःखी - कष्टी, खिन्न, त्रस्त*

*देऊळ - मंदिर, देवालय, देवघर, राऊळ*

*देव - सुर, अमर, ईश्वर, भगवान, ईश, परमेश्वर, प्रभू, निर्जर*

*देखणी - सुंदर, रूपवती, सुरूप*

*देह - शरीर, तनू, तन, काया, वपु*

*दैन्य - हलाखी, गरिबी, हीनपणा*

*दैव - नशीब, भाग्य, प्रारब्ध, ललाट, तकदीर*

*धनी - मालक, स्वामी, पती, हेतू*

*धन - संपत्ती, दौलत, द्रव्य, संपदा, पैसा, वित्त*

*धनिक - श्रीमंत, सावकार, धनवान, धनाढ्य*

*धनुष्य - चाप, कोदंड, तिरकमठा, कमठा, धनू, कार्मुक*

*धंदा - व्यापार, व्यवसाय, उद्योग, उदीम*

*धिटाई - धैर्य, हिम्मत, धीटपणा, धाडस*

*धूळ - धुरळा, माती, रजःकण*

*नदी - सरिता, तटिनी, जलवाहिनी, तरंगिणी*

*नफा - फायदा*

*नव - नवीन, नूतन, नवे*

*नवरा - पती, कांत, भर्तार, धनी, वल्लम, नाथ*

*नमस्कार - वंदन, नमन, प्रणिपान, अभिवादन*

*नवीन - नूतन, नव*

*नृप - राजा, भूप, भूपती, नरेश, नरेंद्र, भूपाल, लोकपाल, प्रजापती*

*नृत्य - नाच, नर्तन*

नाचार - गरीब, कंगाल, दरिद्री, लाचार

नाजूक - कोमल, मुलायम, नरम

नायक - नेता, पुढारी, अग्रणी, म्होरक्या

नारळ - श्रीफळ, नारिकेल

नापास - अनुत्तीर्ण, अयशस्वी, अमान्य

निर्धार - निश्चय, खातरी, विश्वास

नाते - रक्तसंबंध, आप्तपणा, नातलग

निकड - लकडा, तगादा, हव्यास

निखालस - स्पष्ट, साफ, निश्चित

नित्य - नेहमी, सतत, सदा, सदोदित

निधन - मृत्यू, अंत, मरण

निपुण - निष्णात, कुशल, प्रवीण

निबिड - दाट, गडद, घनदाट

निलाजरा - निर्लज्ज, बेशरम

निश्चय - निर्धार, निग्रह, दृढता

निमंत्रण - आमंत्रण, आवतण, बोलावणे

नुकसान - हानी, तोटा, खोट

नौबत - नगारा, डंका, प्रसिद्धी, कीर्ती

पत्नी - भार्या, बायको, अर्धांगी, कांता, दारा, जाया, कलम

पक्षी - विहग, खग, द्विज, विहंगम, पाखरू

पगडा - वर्चस्व, सत्ता, अधिकार

पणती - दिवली, दिवलाणी

पगार - वेतन, तनखा, मेहनताना

पथारी - अंथरूण, बिछाना, शेज, शय्या

पदवी - बिरूद, किताब, कीर्ती

पद्धत - चाल, रीत, आचार, रिवाज, प्रघात

परका - अपरिचित, अनोळखी

परंतु -  पण, किंतु, शिवाय, लेकीन, लेकिन

परमार्थ - ब्रह्म, मोक्ष, ब्रह्मज्ञान

पर्वत - गिरी, अचल, शैल, नग, अद्री

परवानगी - संमती, मान्यता

पद - पाय, पाऊल, चरण, पाद

पद - श्लोक, काव्य

पराणी - आर, टोचणी

पंथ - मार्ग, रस्ता, वाट, पथ

पंक्ती - ओळ, रांग, पंगत

पंडीत - विद्वान, शास्त्रज्ञ, तज्ञ

पृथ्वी - भू, धरती, भवनी, वसुंधरा, क्षिती, भूमी, मही

पराक्रम - शौर्य, विक्रम, प्रताप, बहादुरी

परिश्रम - कष्ट, महेनत, श्रम

प्रकाश - उजेड

प्रताप - शौर्य, पराक्रम, विक्रम, बहादुरी

प्रबंध - व्यवस्था, तजवीज, उपाययोजना

प्रवीण - निपुण, कुशल, हुशार, पटू, तरबेज, निष्णात, चतुर

प्रवासी - वाटसरू, पांथ, पांथस्थ

प्रचीती - अनुभव, पडताळा, प्रत्यय, खात्री

प्रबळ - बलवान, बलशाली, सामर्थ्यवान, शक्तीशाली, समर्थ

प्रचंड - विशाल, अजस्त्र, अवाढव्य, विस्तृत, महान

प्रसिद्ध - प्रख्यात, विख्यात, नामांकित, ख्यातनाम

प्रशंसा - स्तुती, वाखाणणी, शाबासकी, वाहवा

पान - पर्ण, पत्र, पल्लव

पाय - पद, चरण, पाद

पावन - पवित्र, निर्मळ, शुद्ध,

पाऊस - वर्षाव, पर्जन्य, वृष्टी

परितोषिक - बक्षीस, इनाम

पात्र - लायक, योग्य, भांडे, ताट

प्राण - जीव, आत्मा, श्वास

प्रारब्ध - दैव, नशीब

प्रासाद - वाडा, महाल, राजवाडा, राजमंदिर, देऊळ

पुरूष - नर, मनुष्य, मर्द

पुष्प - फूल, कुसूम, सुमन, सुम

प्रेम - प्रीती, लोभ, अनुराग, ममता

पोपट - राघु, शुक, कीर, रावा

फट - भेग, चीर, तडा

फत्ते - जय, सरशी, यश, यशस्वी

फरक - अंतर, भेद, तफावत, भिन्नता

फजीत - लज्जित, विरमलेले, ओशाळलेले

फर्मान - हुकूम, आज्ञापत्र, राजपत्र, सनद

फडतूस - टाकाऊ, गचाळ, क्षुद्र

फायदा - नफा, लाभ, किफायत

फणकार - सपाटा, आघात, प्रहार, तडाखा

फिदा - खूष, प्रसन्न, संतुष्ट

फुलोरा - बहर, मोहोर

फुकट - निरर्थक, व्यर्थ, फुका, मोफत

फुशारकी - बढाई, शेखी, आत्मस्तुती

फूल - पुष्प, सुमन, कुसुम

फैसला - निकाल, निर्णय, निवाडा

फोल - निरर्थक, व्यर्थ, रिकामे, पोकळ, निष्फळ

फोड - गळू, उठाणू, बेंड

बळ - शक्ती, जोर, सामर्थ्य, ताकद, क्षमता

बहाणा - सोंग, ढोंग, मिष

बरोबर - सम, सारखा, समान, योग्य

बरदास्त - आदरसत्कार, पाहुणचार, निगा

बजरंग - हनुमान, पवनपुत्र, मारुती

बखर - बातमी, हकीकत, इतिहास, चरित्र

बटीक - मोलकरीण, दासी, कुणबीण

बडगा - सोहा, सोडगा, दंडुका

बहादूर - वीर, शूर, धाडसी, धीट

बरकत - भाग्य, सुदैव, लाभ

बरखास्त - समाप्त, विसर्जित, संपणे

बाप - पिता, जनक, जन्मदाता, वडील, तात

बाग - बगीचा, उद्यान, उपवन, वाटिका

बातमी - वार्ता, संदेश, वृत्तांत, मजकूर, हकीकत, वृत्त

बालक - बाल, अर्भक, मूल

बारीक - बारका, सूक्ष्म, लहान

बाण - तीर, शर, सायक

ब्राह्मण - विप्र, द्विज

बुटका - गिड्डा, आखूड, ठेंगू, ठेंगणा, खुजा

ब्रह्मदेव - ब्रह्म, चतुरानन, कमलासन, प्रजापती, विरंची, विधी

बिगर - वाचून, खेरीज, शिवाय

बेडूक - मंडूक, बेडकी, बॅबॉ

बिकट - कठीण, अवघड, त्रासदायक

बंड - अराजक, गोंधळ, दंगा, गडबड

बंदी - मज्जाव, मनाई, प्रतिबंध, आडकाठी

बंधू - भ्राता, भाऊ, भाई, भय्या, सहोदर

बंदोबस्त - व्यवस्था, तजवीज, प्रबंध

ब्रह्म - सत्तत्व, जगत्कारण, परब्रह्म

भरभराट - उत्कर्ष, प्रगती, चलती, विकास

भस्म - राख, रक्षा, विभूती

भक्कम - मजबूत, बळकट, टिकाऊ

भराभर - पटापट, झरझर, जलद, शीघ्र

भाऊ - बंधू, भ्राता

भांडण - तंटा, झगडा, कलह, कज्जा, संघर्ष

भीती - घबराट, धास्ती, भय

भुंगा - भ्रमर, भृंग, अली, मधुप, मिलिंद, मधुकर, बंभर

भेद - फरक, अंतर, विभागणे, विभक्त

मजा - मौज, गंमत, करमणूक

*मदत - साह्य, सहाय्य*

*मन - मानस, चित्त, अंतर, अंतःकरण*

*महती - महत्त्व, थोरपणा, मोठेपणा*

*महा - महान, मोठा*

*महिना - मास*

*मगर - सुसर, नक्र*

*मच्छ - मासा, मत्स्य, मीन*

*मंगल - शुभ, पवित्र*

*मंजूर - कबूल, संमत, मान्य, पसंत*

*माकड - वानर, मर्कट, कपि, शाखामृग*

*माणूस - मनुष्य, मनुज, मानव, नर*

*मान्य - मंजूर, कबुल, संमत*

*माया - दया, कृपा, मायाळू, करूणा*

*मित्र - दोस्त, सवंगडी, साथीदार, सोबती, स्नेही, सखा*

*मुलगा - पुत्र, सुत, तनय, तनुज, आत्मज, नंदन*

*मुलगी - कला, सुता, तनया, नंदिनी, दुहिता, तनुजा*

*मेळ - संयोग, संगम, मीलन, मिलाफ*

*मोर - मयुर*

*मोसम - हंगाम, ऋतु, समय*

*मेंदू - मगज, बुद्धी, अक्कल*

*यश - जय, विजय, सुदैव*

*यत्न - प्रयत्न, खटपट, उद्योग, परिश्रम*

*यज्ञ - याग, मख, होम, धर्मकृत्य*

*यान - जात, वर्ण, भेद, वर्ग*

*यहसान - कृपा, उपकार*

*याद - स्मरण, आठवण, स्मरणार्थ*

*यातना - कष्ट, हाल, अपेष्टा*

*युद्ध - लढाई, संगर, झुंज, संग्राम, समर, रण*

*योध - वीर, लढवय्या, योद्धा*

*योग्य - लायक, रास्त, अनुरूप, उचित*

*रस्ता - मार्ग, वाट, पथ*

*रक्षण - बचाव, संरक्षण*

*रजक - धोबी, परीट*

*रजा - परवानगी, अनुमती, सम्मती*

*राग - क्रोध, त्वेष, कोप, संताप, रोष, क्षोभ*

*रात्र - रजनी, यामिनी, निशा, तमिस्त्रा, रात*

*रागीट - संतापी, कोपिष्ट, क्रोधी, तमासी*

*राक्षस - असुर, दैत्य, दानव*

*रम्य - सुंदर, सुरेख, रमणीय, मनोहर*

*रीण - कर्ज, ऋण*

*रौनक - सौंदर्य, शोभा*

*लता - वेल, वल्लरी, लतिका, वेली*

*लघू - हलका, लहान, ऱ्हस्व, क्षुल्लक, क्षुद्र*

*लज्जत - रूची, स्वाद, गोडी, खुमारी*

*लाचार - अगतिक, दीन, निरूपाय*

*लवण - मीठ, क्षार, खार, खारट*

*लक्ष्मी - संपत्ती, वैभव, उत्कर्ष, श्री, रमा, इंदिरा, कमला, पदमा*

*वखार - कोठार, गोदाम*

*वकील - प्रतिनिधी, मुखत्यार*

*वय - उमर, वर्ष, साल*

*वर्दी - निरोप, बातमी, (लष्करी), पोषाख*

*वस्त्र - वसन, अंबर, पट, कपडा, कापड*

*वाघ - व्याघ्र, शार्दूल*

*वारा - वायू, वात, अनिल, मरूत, पवन, समीर, समीरण*

*वास - गंध, सुगंध, परिमल, परिमळ, सुवास*

*वास - सुगावा, खूण*

*वास्तव - खरे, प्रत्यक्ष, यथार्थ, सत्य*

*वाळू - रेती, रज, कंकर*

*वास्तपुस्त - चौकशी, विचारणा, विचारपूस*

*विघ्न - संकट, अडचण, प्रतिबंध, आपत्ती*

*विपुल - पुष्कळ, खूप, भरपूर*

*विशाल - मोठे, प्रचंड, विस्तृत*

*विकल्प - भेद, संशय, भ्रम*

*विष्णू - श्रीपती, केशव, अच्युत, नारायण, रमापती, रमेश, माधव, पद्मनाभ, पीतांबर*

*विहार - खेळणे, क्रीडा, सहल*

*विषाद - खेद, दुःख, निरूत्साह, निराशा*

*विजोड - विसंगत, विशोभित, बेडौल*

*विडंबन - उपहास, फजिती, टवाळी*

*विध्वंस - नाश, मोडतोड, संहार, नष्ट*

*विश्वास - भरवसा, खात्री, इमान*

*विनंती - प्रार्थना, विनवणी, आर्जव*

*विस्तीर्ण - विशाल, विस्तृत, अफाट*

*वीज - विद्युत, विद्युल्लता, चपला, चंचला, तडित, बिजली, सौदामिनी*

*वेडा - खुळा, मूर्ख*

*वेष - पोषाख, पेहराव, कपडे*

*वेदना - यातना, कळ, दुःख, व्यथा, शूळ, क्लेश, पीडा*

*वैभव - ऐश्वर्य, श्रीमंती, थाटमाट*

*व्याधी - रोग, आजार, संकट, आपत्ती, पीडा*

*वृद्धत्व - म्हातारपण, वार्धक्य*

*व्यवस्था - तयारी, योजना, प्रबंध, तजवीज*

*शक - शंका, संशय, संदेह*

*शस्त्र - हत्यार, आयुध*

*शंकर - महेश, महादेव, शिव, सांब, उमाकांत*

*शत्रू - अरि, रिपू, दुश्मन, वैरी*

*शहर - पूर, पुरी, नगर*

*शासन - सरकार, राज्यकारभार, राज्यसंस्था*

*शरम - लाज, लज्जा*

*शर्यत - स्पर्धा, चढाओढ*

*शागीर्द - शिष्य, विद्यार्थी, चेला, अनुयायी*

*शिकस्त - प्रयत्न, कमाल, पराकाष्टा*

*शिकस्त - पराजीत, पराभूत*

*शिक्षा - शासन, दंड, मार, सजा*

*शेखी - प्रौढी, बढाई, फुशारकी, ऐट*

*शेतकरी - कृष, कृषीक, कृषीवल, किसान*

*शेष - अनंत, वासुकी*

*श्लोक - पद्य, कविता*

*श्रद्धा - निष्ठा, आदर, विश्वास*

*श्रेष्ठ - उत्तम, उत्कृष्ठ*

*श्रांत - दमलेला, थकलेला, कंटाळलेला, कष्टी*

*सकल - समस्त, सर्व, अखिल*

*संगत - साथ, सोबत, सहवास*

*संग्राम - युद्ध, समर, संगर, लढाई*

*संशय - शंका, संदेह, वहमा, वहीम*

*संमती - अनुमती, मान्यता, सहमत, होकार, रूकार*

*संपर्क - संबंध, सहवास, संसर्ग*

*सतत - नेहमी, सदा, सर्वदा, निरंतर, अविश्रांत*

*संग्रह - साठा, निधी, संचय*

*संपत्ती - धन, वित्त, संपदा, दौलत*

*समस्त - सकल, सर्व, संपूर्ण, सगळे*

*सत्कार - मान सन्मान, मानमरातब, आदरसत्कार*

*सशक्त - बलवान, नलिष्ठ*

*सरदार - उमराव, मानकरी, खवास*

*समीप - जवळ, निकट, नजीक*

*समुद्र - सागर, दर्या, सिंधू, रत्नाकर, अंबुधी, जलधी, नीरराशी, पयोधी, अर्णव, उदधी*

*संहार - नाश, विध्वंस, विनाश, सर्वनाश*

*सहयाद्री - सह्यपर्वत, सह्याचल, सह्यगिरी,सह्य*

*सफर - प्रवास, यात्रा*

*सराई - हंगाम, सुगी*

*सकल - समस्त, सर्व, अखिल, निखिल*

*सावध - जागरूक, दक्ष, सावधान*

*साच - खरा, खरोखर, खराखुरा*

*साहस - धाडस, धारिष्ट*

*सामील- समाविष्ट, अंतर्भूत, प्रविष्ट*

*स्नान - आंधोळ, न्हाण, नहाण*

*स्वागत - आदरसत्कार, आदरातिथ्य*

*सिंह - मृगेश, वनराज, केसरी, मृगेंद्र, मृगराज, पंचानन*

*सीता - जानकी, वैदेही*

*सीमा - हद्द, मर्यादा*

*स्त्री - अबला, महिला, वनिता, ललना, नारी, भार्या*

*सुगंध - सुवास, परिमल*

*सुवासिनी - सौभाग्यवती, सवाष्ण, सुहाशीण*

*सुरेख - सुंदर, रम्य, मनोहर, रमणीय, ललित*

*सूर्य - रवि, भास्कर, मित्र, भानू, दिनकर, आदित्य, सविता, अर्क, दिनमणी*

*सेनापती - सेनानी, सेनानायक*

*सेवा - चाकरी, नोकरी*

*स्नेह - मैत्री, मित्रत्व, प्रेम*

*स्वेत - पूल, सेतू, सांकव*

*सैनिक - शिपाई, जवान*

*सैन्य - फौज, लष्कर, सेना, कटक, चमू*

*सोने - सुवर्ण, कनक, कांचन, हेम, हिरण्य*

*सोमट - कोमट, कोंबट*

*सोबत - संगत, मैत्री*

*सोबती - सवंगडी, मित्र, स्नेही*

*सौख्य - सुख, समाधान*

*साकर्य - सुलभता, सुकरपणा, सुकरता*

*सौदा - व्यापार, व्यवहार, देवघेव*

*हक्क - अधिकार, मालकी, वारसा*

*हत्ती - गज, कुंजर, हस्ती, सारंग, वारण, नाग*

*हरिण - मृग, सारंग, कुरंग, काळवीट*

*हत्या - वध, खून, हिंसा*

*हयगय - हेळसांड, दुर्लक्ष, ढिलाई, दिरंगाई*

*हरळी - आरोळी, हाक, हाळी*

*हव्यास - हाव, तीव्र इच्छा*

*हर्ष - आनंद, मोद, आमोद, उल्हास*

*हृदय - अंतर, अंतःकरण, मन*

*हात - कर, हस्त, पाणि, भुज, बाहू*

*हिकमत - युक्ती, चातुर्य, मसलत, कावा*

*हुरुप - उत्साह, हुशारी, जोम*

*हुरहुर - रूखरूख, चिंता, काळजी, चुटपुट*

*हेळसांड - सुस्ती, दिरंगाई, अळंटळं*

*हैबन - दहशत, दरारा, धास्ती*

*होडी - नाव, नौका, तर, तरी*

*क्षय - नाश, ऱ्हास, झीज*

*क्षुद्र - क्षुल्लक, उणेपणा, हलके*

*क्षोद - पूड, चूर्ण, भुकटी*

*ज्ञान - बुद्धी, विद्या*

*ज्ञाता - सुज्ञ, शहाणा, जाणकार, विद्वान*

# *(८) समूहदर्शक शब्द*

## *समूहदर्शक शब्द*

*किल्ल्यांचा - जुडगा*

*केळ्यांचा - लोंगर*

*खेळाडूंचा - संघ*

*गवताचा - भारा*

*गवताची - गंजी*

*गाईचे - खिल्लार*

*गुरांचा - कळप*

*उंटांचा - तोडा, काफिला*

*उतारुंची - झुंड*

*आंब्यांची - राई*

*जहाजांचा - काफिला*

*तारकांचा - पुंज*

*द्राक्षांचा - घड*

*दुर्वांची - जुडी*

*धान्याची - रास*

*केसांचा - झुपका*

*नारळांची - पेंड*

*पक्ष्यांचा - थवा*

*पाखरांचा - थवा*

*पुस्तकांचा - गठ्ठा*

*फळांचा - घोस*

*फुलझाडांचा - ताटवा*

*फुलांचा - गुच्छ*

*बांबूचे - बेट*

*मुलांचा - घोळका*

*यात्रेकरूंचा - लोंढा*

*रुपयांची, नाण्यांची - चवड*

*रोपांची - पेंडी*

*लमणांचा - तांडा*

*लाकडाची - मोळी*

*लोकांची - झुंड, जमाव*

*विटांचा - ढीग*

*विमानांचा - ताफा*

*वेलींचा - कुंज*

*सैनिकांचे - पथक*

*हरणांचा - कळप*

*लोकरीचा - झुपका*

*हत्तीचा - कळप*

*मेंढरांचा - कळप*

*शिपायांची - फलटण*

*बारकऱ्यांची - दिंडी*

*मडक्यांची - उतरंड*

*गुलाबांचा - ताटवा*

*माणसांचा - धोळका*

*पोत्यांची - थप्पी*

*दरोडेखोरांची - टोळी*

*करवंदीची - जाळी*

# *(९) नर मादी अपत्य*

## *नर मादी अपत्य*

*हत्ती - हत्तीण - छावा*

*बैल - गाय - वासरू, गोहरा, पाडस*

*घोडा - घोडी - शिंगरू*

*रेडा - म्हैस - रेडकू, रेडूक, पारडू*

*वाघ - वाघीण - बच्चा*

*बोकड - शेळी - करडू*

*बकरा - बकरी - करडू*

*ससा - ससीण - पिल्लू*

*हरिण - हरिणी - पाडस, शावक*

*मेंढा - मेंढी - कोकरू, करडू, मेंढरू*

*सिंह - सिंहीण - छावा*

*गाढव - गाढवी - शिंगरू*

# *(१०) पंचेंद्रियांची करामत*

## *पंचेंद्रियांची करामत*

***चव दाखविणारे शब्द -*** *आंबट, गोड, तिखट, कडू, तुरट, खारट, झणझणीत, मिळमिळीत, गुळचट*

***गती दाखविणारे शब्द -*** *लुटुपुटु, दुडूदुडू, वेगवान, गतिमान, लगबग, सुसाट, झरकन*

***वास दाखविणारे शब्द -*** *तळकट, तेलकट, मातट, धुरकट, कोंदट, जळकट, करपट, सुगंध, दुर्गंध*

***आवाज दाखविणारे शब्द -*** *टिकटिक, सरसर, दणदण, सळसळ, घणघण, धाडधाड, काडकाडल खाडखाड, फाडफाड, ताडता ड*

***स्पर्श दाखविणारे शब्द -*** *गुळगुळीत, खरखरीत, गार, गरम, ओलसर, खडबडीत, मुलायम, कोमट, कढत, थंड, ओले*

# *(११) प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण*

## *प्राण्यांचे राहण्याचे ठिकाण*

*उंदीर - बीळ*

*मुंग्या - वारूळ*

*घोडा - तबेला*

*कोळी - जाळे*

*कोंबडी - खुराडे*

*माकड - झाड*

*वाघ, सिंह - गुहा*

*पक्षी - घरटे*

*मधमाशा - मोहोळ*

*माणूस - घर*

*पोपट - ढोल*

*साप - वारूळ*

*गाय, बैल, म्हैस - गोठा*

*लांडगा, कोल्हा, अस्वल - जंगल*

*बेडूक - विहीर, तलाव*

*मासे - नदी, समुद्र*

# *(१२) वैशिष्ट्ये*

## *वैशिष्ट्ये*

*सिंह - आयाळ, गर्जना*

*हत्ती - सुळा, सांड*

*जिराफ - उंची, उंच मान*

*झेब्रा - अंगावरील पट्टे*

*वाघ - डरकाळी*

*गाय - हंबरणे*

*उंट - मान*

*कोंबडा - तुरा*

*पोपट - चोच*

*कुत्रा - वाकडे शेपूट*

*सांबर - शिंगे*

*हरीण - डोळे, चपळाई*

*मासे - डोळे*

*कांगारू - पोटाखाली पिशवी*

*शहामृग - जोरात पळणे*

*अस्वल - लांब केस*

# *(१३) भाषेचे सौंदर्य वाढविण्यासाठी अलंकारिक शब्दयोजना*

## *भाषेचे सौंदर्य वाढविण्यासाठी अलंकारिक शब्दयोजना*

*अत्यंत हट्टी मनुष्य - अडेलतट्टू*

*अश्रू - गंगायमुना*

*अतिशय झोपाळू - कुंभकर्ण*

*अनेक चांगल्या गुणांनी युक्त - अष्टपैलू*

*अगदी दुर्मिळ झालेली व्यक्ती - उंबराचे फूल*

*अतिशय संपत्तीमान पुरूष - कुबेर*

*अत्यंत उदार मनुष्य - कर्णाचा अवतार*

*अतिशय चैनी मनुष्य - खुशाल चेंडू*

*अत्यंत प्रिय असलेली व्यक्ती - गळ्यातील ताईत*

*अत्यंत गरीब स्वभावाची व्यक्ती - गोगलगाय*

*अतिशय रागीट मनुष्य - जमदग्नी*

*अतिशय उग्र स्वरूप धारण करणारा - नृसिंहावतार*

*अतिशय दुर्मिळ असा आलेला अनुकूल योग - पर्वणी*

*अतिशय खोल मसलत करणारा - पाताळयंत्री*

*अत्यंत रोड अशी व्यक्ती - पाप्याचे पितर*

*अतिशय वृद्ध झालेला मनुष्य - पिकले पान*

*अतिशय मोठे प्रयत्न - भगीरथ प्रयत्न*

*अतिशय सुंदर पुरुष - मदनाचा पुतळा*

*अचुक गुणकारी - रामबाण*

*अंगावर एकही अलंकार नसलेली स्त्री - लंकेची पार्वती*

*अक्कलशून्य, हो ला हो करणारा - नंदीबैल*

*आपले घर सोडून न जाणारा - घर कोंबडा*

*आपले कार्य साधण्यापुरते आर्जव - ताकापुरते रामायण*

*आपापसातील कलह - यादवी*

*आपल्या कामात जागरूक व भयप्रद - कामात वाघ*

*उग्र व पराक्रमी मनुष्य - नरसिंह*

*एका माणसाला एकाच कामासाठी अनेक ठिकाणी जाण्याचे प्रसंग - त्रिस्थळी यात्रा*

*एखाद्या गोष्टीचा आरंभ - श्रीगणेशा*

*कपटी व कृष्ण कारस्थाने करणारा मनुष्य - शकुनिमामा*

*कुरूप अशी स्त्री - शूर्पणखा, हिडिंबा*

*केवळ शोभेची, आयतेवेळी खाऊ मंडळी - भोजनभाऊ*

*कधी न बदलणारे वाक्य - दगडावरची रेघ*

*कठीण प्रतिज्ञा - भीष्म प्रतिज्ञा*

*कंटाळवाणे लांबलचक भाषण - एरंडाचे गुऱ्हाळ*

*काही निमित्ताने भांडण लावून देणारा - कळीचा नारद*

*कसलीही पारख नसलेला - गाजर पारखी*

*चांगला धष्टपुष्ट, पण बुद्धीने मंद असा मनुष्य - शुंभ*

*जीव धोक्यात आणण्यासारखे काम - सुळावरची पोळी*

*जड, बुद्धीहीन, अजागळ मनुष्य - मेषपात्र*

*जहाबांज स्त्री - महामाया*

*ज्याला अक्षर ओळख देखील नाही तो - अक्षरशत्रू*

*ज्याच्यापाशी अपार द्रव्य आहे तो - नवकोट नारायण*

*दुसऱ्यांना तुच्छतेने वागविणारा गर्विष्ठ मनुष्य - अरेराव*

*दुष्ट स्त्री - कैकयी*

*दाराशी हत्ती झुलण्या इतकी संपत्ती - गजान्तलक्ष्मी*

*दुष्ट माणसांची जूट - चांडाळ चौकडी*

*धाड ना इकडे ना तिकडे - त्रिशूंक*

*त्रासदायक गोष्ट - घोरपड*

*तात्पुरती विरक्ती - स्मशान वैराग्य*

*निष्फळ, रिकाम्या गोष्टी - भाकडकथा*

*धड ना इकडे ना तिकडे - त्रिशंकू*

*निरूपद्रवी प्राणी - गोगलगाय*

*निरूपयोगी माणसे आणून केलेली भरती - खोगीरभरती*

*पूर्णपणे अंकित किंवा ओशाळा - ताटाखालचे मांजर*

*फाजील शहाणा, अर्थात मूर्ख - दीड शहाणा*

*फारच दुर्मिळ, पुष्कळ काळाने येणारी संधी - कपिलाषष्ठीचा योग*

*बाहेरून डौल न दाखविणारा पण खरोखरी गुणी मनुष्य - झाकले माणिक*

*बळेच दाखविलेला संबंध - बादरायण संबंध*

*बिनचूक वजनाचा काटा - धारवाडी काटा*

*बुद्धिमान व्यक्ती - बृहस्पती*

*बेअकली माणूस - गाढव*

*भांडण - खडाष्टक*

*भाग्यवान - शिकंदर*

*भोळा मनुष्य - भोळा सांब, सांबाचा अवतार*

*मार - चौदावे रत्न*

*मूर्खपणाची मसलत देणारे - उंटावरचा शहाणा*

*मुका नसताही अगदी न बोलणारा - मुखस्तंभ*

*मुद्दाम वाकडे जाण्याचा खटाटोप - द्राविडी प्राणायाम*

*मुर्ख मनुष्य - अकलेचा कांदा*

*लहानवणी मिळालेले वळण अथवा शिक्षण - बाळकडू*

*लांबत जाणारे काम - मारूतीची शेपूट*

*वाईट आईबापांच्या पोटी चांगली संतती - भांगेमध्ये तुळस*

*वेडे वाकडे शब्द - मुक्ताफळे*

*शुष्क, लांबणीचे व कंटाळा आणणारे भाषण - चर्पट पंजरी*

*स्वतः काही न करता व स्वतः समर्थ नसता इतरांना करण्याविषयी हुकुमवजा गोष्ट सांगणे - तोंडपाटीलकी*

*स्वतःला अक्कल नसून दुसऱ्यांच्या हो ला हो करणारा - होयबा*

*स्वभावाने अतिशय तापट असा मनुष्य - आग्यावेताळ*

*संकुचित दृष्टीचा - कूप मंडूक*

*साधा सरळ माणूस - देव माणूस*

*सदा रडत बसणारा बेहिमती मनुष्य - रडतराव किंवा रडतराऊत*

*सहज होऊ शकणारी गोष्ट - हातचा मळ*

*सूर्य उगवल्या नंतर झोपेतन जागणारा - सूर्यवंशी*

*सच्छील व धर्म निष्ठ मनुष्य - धर्मराज*

*क्षुद्रलोकांची ओरड किंवा वटवट कोल्हेकुई*

# (१४) सारवट शब्द (सारखे वाटणारे परंतु अर्थ भिन्न असणारे शब्द)

## शब्दा शब्दातील फरक

| | | |
|---|---|---|
| अनल व अनिल - | अनल - अग्नि | अनिल - वारा |
| अगर व आगर - | अगर - किंवा | आगर - साठा |
| अभिनव व अभिनय - | अभिनव - नवीन | अभिनय - हावभाव |
| अनमान व अनुमान - | अनमान - हयगय | अनुमान - तर्क |
| आसामी व असामी - | आसामी - आसाम मधला | असामी - इसम, व्यक्ती |
| अज्ञान व अज्ञात - | अज्ञान - मूर्खपणा, दुर्लक्ष | अज्ञात - माहीत नसलेला |
| अर्भक व अभ्रक - | अर्भक - मूल | अभ्रक - पारदर्शक पदार्थ |
| अध्ययन व अध्यापन - | अध्ययन - शिकणे | अध्यापन - शिकविणे |
| आवाहन व आव्हान - | आवाहन - विनंती करून बोलावणे | आव्हान - सामन्यास दिलेले निमंत्रण |
| इमान व इनाम - | इमान - विश्वास | इनाम - बक्षीस |
| उदार व उधार - | उदार - मोठ्या मनाचा | उधार - रोख पैसे न देता |
| उपहार व उपाहार - | उपहार - बक्षीस | उपाहार - फराळ |
| उपकार व उपचार - | उपकार - दुसऱ्याच्या उपयोगी पडणे | उपचार - उपाय |
| उमर व उंबर - | उमर - वय | उंबर - औदुंबर |
| उत्साह व उत्सव - | उत्साह - जोम | उत्सव - समारंभ |
| कद व कंद - | कद - एक रेशमी सोवळ्याचे वस्त्र | कंद - झाडाचा कांदा, गड्डा |
| काल व काळ - | काल - अगोदरचा दिवस | काळ - मुदत, यम |
| कुडी व कुंडी - | कुडी - शरीर, एक दागिना | कुंडी - झाड लावण्याचे एक पात्र |
| कबर व कंबर - | कबर - थडगे | कंबर - शरीराचा एक भाग |
| कली व कळी - | कली - भांडण | कळी - कलिका |
| कष्ट व काष्ठ - | कष्ट - श्रम | काष्ठ - लाकूड |
| कल व कळ - | कल - झोक | कळ - वेदना |
| केसरी व केशरी - | केसरी - सिंह | केशरी - रंगाचे नाव |
| खून व खूण - | खून - ठार मारण्याची क्रिया | खूण - चिन्ह |
| खत व खंत - | खत - कुजलेला पदार्थ | खंत - काळजी |
| खोड व खोंड - | खोड - झाडाचे खोड, अवगुण | खोंड - तरूण बैल |
| खलबत्ता व खलबत - | खलबत्ता - कुटण्याचे साधन | खलबत - मसलत |
| गृह व ग्रह - | गृह - घर | ग्रह - आकाशातील ग्रह |
| गंगाजळी व गंगाजल - | गंगाजळी - पैसा अडका | गंगाजल - गंगा नदीचे पाणी |
| गट व गट्ट - | गट - समुदाय | गट्ट - एकदम गिळणे |
| गडी व गढी - | गडी - कामगार पुरुष | गढी - किल्ला |
| गोरा व गोहरा - | गोरा - रंगाने गोरा | गोहरा - गाईचे वासरू |

| | | |
|---|---|---|
| गोट व गोठ - | गोट - सैन्याचे तळ | गोठ - सोन्याचा गोठ |
| गाल व गाळ - | गाल - चेहऱ्याचा भाग | गाळ - चिखल |
| गीता व गीत - | गीता - भागवत गीता | गीत - गाणे |
| धन व धण - | धन - दाट मेघ | धण - मोठा लोखंडी हातोडा |
| घर व घार - | घर - गृह | घार - एक पक्षी |
| चिता व चिंता - | चिता - सरण | चिंता - काळजी |
| चूल व चूळ - | चूल - शेगडी | चूळ - पाण्याची गुळणी |
| जर व जरा - | जर - कपड्यातील जर | जरा - म्हातारपण, किंचित |
| जामात व जमात - | जामात - जावई | जमात - जात |
| जित व जीत - | जित - जिंकला गेलेला | जीत - जय, जीवंत |
| जाळ व जाल - | जाळ - आग | जाल - जाळे |
| तम व तमा - | तम - अंधार | तम - पर्वा |
| तरू व तारू - | तरू - झाड | तारू - गलबत, नावाडी |
